# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

**बी. ए. भाग-३ : इतिहास**

**सत्र-५ : Major IX**

## इतिहासः सिद्धांत आणि नवे प्रवाह

**(History : Theory and Recent Trends)**

**सत्र-६ : Major XII**

## इतिहास लेखनाचे तंत्र

**(Techniques of History Writting)**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२६
बी. ए. भाग - ३ इतिहास करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती :** २००

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-47370-27-4

❐ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (महाराष्ट्र)

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


### सल्लागार समिती

**प्रा. (डॉ.) आर. के. कामत**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) ज्योती जाधव**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) व्ही. व्ही. मैंदरगी**
प्र. अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
प्र. अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) आर. व्ही. गुरव**
प्र. अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) ए. बी. साळी**
प्र. अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्रीमती सुहासिनी सरदार पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. के. बी. पाटील** (सदस्य सचिव)
प्र. संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


**अभ्यासमंडळ : इतिहास**

अध्यक्ष - **डॉ. चंद्रवदन मोहनराव नाईक**
देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर

- **डॉ. अवनिश आर. पाटील**
  इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. अभयकुमार जगन्नाथ पाटील**
  सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड,
  ता. कराड, जि. सातारा
- **डॉ. श्रीमती आरती बळवंत नाडगौडा**
  देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर
- **डॉ. श्रीमती कविता अशोक गगराणी**
  द न्यू कॉलेज, कोल्हापूर
- **डॉ. श्रीमती उर्मिला एन. क्षीरसागर**
  मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली
- **डॉ. जयपाल चंद्रकांत सावंत**
  शंकरराव जगताप आर्टस कॉलेज, वाघोली, ता. सातारा
- **डॉ. संभाजी आनंदा मोरे**
  एम. एच. शिंदे महाविद्यालय, तिसंगी, ता. गगनबावडा,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. प्रमोदकुमार अंकुश ओलेकर**
  आर्टस अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा, ता. वाळवा,
  जि. सांगली
- **डॉ. चंद्रकांत संदिपान चव्हाण**
  इतिहास अधिविभाग, वालचंद कॉलेज ऑफ आर्टस अ‍ॅण्ड
  सायन्स, अशोक चौक, सोलापूर
- **डॉ. तेजस मदन गर्गे**
  डायरेक्टोरेट ऑफ आर्किओलॉजी अ‍ॅण्ड म्युझियम, संत
  गोर्गे फोर्ट, संत गोर्गे हॉस्पिटल प्रिमाईसेस, फोर्ट, मुंबई
- **डॉ. नंदा पारेकर**
  एव्हरग्रीन होम, टॉवर डी, फेज ४, फ्टॅट नं. २०८,
  राजहंस प्रिंटींग प्रेस समोर, प्रभू हॉस्पिटल रोड,
  नागाळापार्क, कोल्हापूर
- **डॉ. निरंजन कुलकर्णी**
  इतिहास अधिविभाग, मा. श्री. आण्णासाहेब डांगे, आर्टस,
  कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, हातकणंगले, जि. कोल्हापूर
- **श्री. सदानंद कदम**
  शिवराज, १०८२, दक्षिण वसंत नगर, छत्रपती शिवाजीराजे
  मार्ग, सांगली.

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाने दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या माध्यमातून शिक्षणापासून व्यक्तीगत आणि भौतिक परिस्थितीने दूर गेलेल्या अनेकांना पुन्हा शिक्षण प्रवाहात येण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली याचे संपूर्ण श्रेय विद्यापीठाला जाते. 'ज्ञानमेवामृतम्' शिवाजी विद्यापीठाच्या ब्रीद वाक्याप्रमाणे ज्ञानरूपी अमृत प्राप्त करण्याची संधी सर्वांसाठी उपलब्ध करून दिली. याच दूरशिक्षण केंद्राद्वारे नोंद झालेल्या बहिःस्थ विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन साहित्य उपलब्ध करून दिले आहे.

हे पुस्तक बी. ए. भाग तीन च्या इतिहास विषयाच्या Major IX सत्र पाच साठी 'इतिहास : सिद्धांत आणि नवे प्रवाह' आणि Major XII सत्र सहा साठी 'इतिहास लेखनाचे तंत्र' हे विद्यार्थ्यांच्या हाती देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

सत्र ५ साठी Major IX इतिहास : सिद्धांत आणि नवे प्रवाह यामध्ये इतिहास : अर्थ स्वरूप व व्याप्ती इतिहासातील नवे प्रवाह तर सत्र ६ साठी Major XII साधनांचा उपयोग, इतिहास लेखनाची प्रक्रीया या घटकांचा विस्ताराने अभ्यास करणार आहोत.

या पुस्तकामध्ये विविध घटकांच्या विवेचनात अचूकता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु त्यामध्ये कांही उणिवा राहिल्यास प्राध्यापक व विद्यार्थी यांनी त्या निदर्शनास आणून द्याव्यात. त्याचा उपयोग पुढील आवृत्ती अधिकाधिक सुधारित करण्यासाठी होईल. हे पुस्तक पदवी, पदव्युत्तर व विविध स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांना महत्त्वाचे ठरेल असा आम्हाला विश्वास वाटतो. तसेच सदरच्या पुस्तकाच्या लेखनाची जबाबदारी संबंधीत घटक लेखकांवर आहे.

शिवाजी विद्यापीठ, दूरशिक्षण केंद्राच्या अंतर्गत स्वयं अध्ययन निर्मिती करण्यासाठी मा. कुलगुरू, मा. प्र-कुलगुरू, मा. कुलसचिव यांचे प्रोत्साहन आणि मार्गदर्शन मोलाचे ठरले. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. के. बी. पाटील, इतिहास अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. सी. एस. नाईक, शिवाजी विद्यापीठ, इतिहास विभाग प्रमुख डॉ. अवनिश पाटील यांचे सहकार्य लाभले. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी जे परिश्रम घेतले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

■ **संपादक** ■

**प्रो. (डॉ.) सुरेश शिखरे**
श्री. शहाजी छत्रपती महाविद्यालय,
दसरा चौक, कोल्हापूर, जि. कोल्हापूर

**प्रो. (डॉ.) सी. एम. नाईक**
देवचंद कॉलेज अर्जुननगर
ता. कागल, जि. कोल्हापूर

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**सत्र–५** Major IX **: इतिहास : सिद्धांत आणि नवे प्रवाह**
**सत्र–६** Major XII **: इतिहास लेखनाचे तंत्र**
**बी. ए. भाग–३**

| **लेखकाचे नाव** | **घटक क्रमांक** | |
|---|---|---|
| | **सत्र–५** | **सत्र–६** |
| **डॉ. संघमित्रा सरवदे**<br>श्री आण्णासाहेब डांगे आर्टस्, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज हातकणंगले, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | १ | – |
| **प्रो. (डॉ.) सुरेश शिखरे**<br>श्री. शहाजी छत्रपती महाविद्यालय<br>दसरा चौक, कोल्हापूर, जि. कोल्हापूर | २ | ३, ४ |

■ **संपादक** ■

**प्रो. (डॉ.) सुरेश शिखरे**
श्री. शहाजी छत्रपती महाविद्यालय,
दसरा चौक, कोल्हापूर, जि. कोल्हापूर

**प्रो. (डॉ.) सी. एम. नाईक**
देवचंद कॉलेज अर्जुननगर
ता. कागल, जि. कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|

**सत्र–५ :** Major IX

**इतिहासः सिद्धांत आणि नवे प्रवाह**

| | | |
|---|---|---|
| १. | इतिहास : अर्थ स्वरूप व व्याप्ती | १ |
| २. | इतिहासातील प्रमुख प्रवाह | २७ |

**सत्र–६ :** Major XII

**इतिहास लेखनाचे तंत्र**

| | | |
|---|---|---|
| १. | साधने | ६९ |
| २. | इतिहास लेखनाची प्रक्रिया | ११२ |

■ **विद्यार्थ्यांना सूचना**

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्यास साहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२६-२७ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक १

# इतिहास : अर्थ स्वरूप व व्याप्ती

## (History : Meaning, Nature and Scope)

**अनुक्रमणिका**


१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

- १.२.१ इतिहासाच्या व्याख्या (Definitions)
- १.२.२ इतिहासाचे स्वरूप व व्याप्ती (Nature and Scope)
- १.२.३ इतिहासाचे प्रकार (Types of History)

१.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१.४ स्वय-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.५ सारांश

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ संदर्भ ग्रंथ व अधिक वाचनसाठीची पुस्तके


**१.० उद्दिष्टे :**

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास खालील माहिती स्पष्ट करता येईल.

- इतिहास या ज्ञान शाखेचे स्वरूप समजून घेता येईल.
- इतिहास म्हणजे काय याचा अर्थ सांगता येईल.
- विविध इतिहासकारांनी केलेल्या इतिहासाच्या व्याख्यांचे चिकित्सक परिक्षण करता येईल.
- या व्याख्यांद्वारा मानवी इतिहासाकडे बघण्याचा दृष्टिकोन विविध कालखंडात कसा विकसित होत गेला हे सांगता येईल.
- इतिहासाची व्याप्ती समजून घेता येईल.
- इतिहासाचे विविध प्रकार व त्याचे महत्त्व अधोरेखित करता येईल.

## १.१ प्रस्तावना :

इतिहास या ज्ञान शाखेने मानवाच्या कल्याणाच्या व विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. इतिहास हा विषय मानवाच्या दैनंदिन जीवनाशी निगडीत आहे. मानवने त्याच्या जीवनात केलेले बरे वाईट कार्य हा इतिहासाचा केंद्रबिंदु आहे. मानवाच्या भाव-भावना, त्याच्या जीवनातील चढ-उतार, खाचखळगे, चमत्कृतीपूर्ण घटना यांचा विचार इतिहासामध्ये केला जातो. थोडक्यात, मानवाच्या प्रगतीची गोष्ट इतिहासात सांगितली जाते. मानव समाजाच्या प्रगतीच्या दृष्टीने घडणाऱ्या प्रत्येक घटनेचा विचार केला जातो. घटना का घडली? कशी घडली? तसेच, समाजजीवनावर पडलेल्या परिणामांचा विचारही केला जातो. म्हणूनच इतिहास भूतकाळ व वर्तमान काळ यातील अखंड संवाद आहे, असे म्हटले जाते. एकंदरीत इतिहासामध्ये मानवी समाजाच्या वैशिष्ट्यपूर्ण घटना, त्यामागील तत्त्व, विचार व व्यक्तीची वृत्ती यांचा विचार केला जातो. राजकीय घटनाबरोबरच मानवी संस्कृती, सामाजिक चालीरीती, रूढी, सामाजिक संस्था, आर्थिक स्थिती, धर्म इत्यादिंचा विचार इतिहासात होतो. आजच्या आधुनिक काळात तर इतिहासातील जुन्या त्रुटी टाळून वैज्ञानिक पद्धतीने इतिहासाचे लेखन केले जात आहे. त्यामुळे इतिहासात मानवी संस्कृतीच्या सर्व अंगाने विचार केला जात आहे.

मानवाला आपल्या भूतकाळाबद्दल जाणून घेण्याची उत्सुकता असते. आपल्या भूतकाळाबद्दल कुतुहल असते. आपल्या अस्तित्वाची माहिती पुढील पिढीला करून देण्याची धडपड तो त्याच्या अस्तित्वापासूनच करत आलेला आहे. त्याच्या या स्वभाव वृत्ती मधून इतिहासाची सुरुवात झाली आहे. त्याची जशी-जशी बौद्धिक प्रगती झाली तस-तसे त्याचे इतिहाससंबंधित आकलन बदलत गेले. मानवी विकासाच्या विविध टप्प्यावर इतिहाससंबंधित त्यांच्या धारणा व आकलन वेगळे असल्याचे दिसून येते. विविध देशातही इतिहासाकडे पाहण्याचा दृष्टिकोनही भिन्न आहे. इतिहास या ज्ञान शाखेचे योग्य आकलन करून घेण्यासाठी त्या विषयाचा अर्थ, व्याख्या, स्वरूप, व्याप्ती व मर्यादा समजून घेणे आवश्यक आहे. इतिहासाच्या स्वरुपावरून त्याचे प्रकारही सामावून घेता येतील. इतिहासाच्या प्रकाराबरोबरच त्याचा इतर ज्ञान शाखांशी असलेला संबंधही समजावून घेता येईल. त्यामुळे इतिहासाचे एकंदरीत सम्यक आकलन होण्यास प्रस्तुत प्रकरणातून मदत होईल.

## १.२ विषय विवेचन

### १.२.१ इतिहासाचा अर्थ, व्याख्या

#### अ) इतिहासाचा अर्थ

इतिहास म्हणजे काय? हे जाणून घेण्यापूर्वी इतिहास (History) या शब्दाची व्युत्पत्ती अथवा अर्थ पाहू. इतिहास या संस्कृत शब्दाचा अर्थ असे - असे घडले, अशा प्रकारे घडले (इति + ह + आस) असा होतो. म्हणजे भूतकाळात जे घडले ते सर्व इतिहास विषयाच्या कक्षेत समावते. इंग्रजी भाषेतील 'History' या शब्दाचे मुळ 'Istoria' या ग्रीक शब्दात सापडते. या शब्दाचा अर्थ जिज्ञासेने केले जाणारे संशोधन व त्या द्वारा नव्या माहितीचा शोध असा आहे. तर जर्मन भाषेत इतिहासासाठी 'Geschichte' हा शब्द असून त्याचा अर्थ गतकालीन घटनांचे तर्कशूद्ध व अर्थपूर्ण विवेचन असा आहे. इतिहासासाठी वापरलेल्या विविध

भाषेतील शब्दाच्या अर्थावरून इतिहासाची व्याख्या स्थुलमानाने भूतकाळातील माहितीचा शोध घेऊन जे घडले त्याचे जसेच्या तसे वर्णन तर्कशुद्ध व अर्थपूर्ण रित्या करणे अशी केली जाऊ शकते. 'History' या शब्दाचा सर्वप्रथम वापर ग्रीक इतिहासकार हीरोडोटस याने केला. हीरोडोटसला इतिहासाचा जनक मानले जाते. त्याच्या मते इतिहासाचा अर्थ जाणून घेणे अथवा ज्ञात होणे होय!

इतिहास लेखनाची सुरुवात इ.स. पूर्व सहाव्या शतकात ग्रीसमध्ये झाली. हे लिखाण इसवी सनाच्या दुसऱ्या शतकापर्यंत चालू होते. हिकॅटिअस, डायोनियस, हीरोडोटस, थ्युसिडाईडस या ग्रीक इतिहासकारांनी इतिहास लेखनाची सुरुवात केली. हीरोडोटस यास इतिहासाचा जनक मानले जाते. त्याने ग्रीक-इराण संघर्षाचा इतिहास युद्धाचे प्रसंग प्रत्यक्ष पाहिलेल्या व्यक्तीकडून माहिती जमवून ९ भागामध्ये लिहिला. इतिहासाची व्याख्या ''भूतकालीन मनोरंजक व संस्मरणीय घटनांचा शोध म्हणजे इतिहास होय'' अशी केली आहे. या व्याख्येनुसार मनोरंजकता व संस्मरणीय हे इतिहासाचे प्रमुख निकष मानले आहे. तो इतिहासातील संस्मरणीय घटनांची निवड करण्याची जबाबदारी इतिहासकारावर टाकतो. हिकॅटिअस म्हणतो इतिहास लेखनात परंपरागत मिथकांचा अंतर्भाव नसावा. जे प्रत्यक्षात घडले त्याचेच वर्णन इतिहासकारांनी करावे. डायोनियस यांच्या मते, इतिहास प्रत्यक्ष जीवनातील उदाहरणे पुढे मांडून धडे शिकवितो. म्हणजे इतिहास हे मौल्यवान ज्ञानभांडार आहे. त्यातून माणसाला अनेक महत्त्वाच्या बाबी शिकता येतील. 'History is philosophy teaching by examples.' तर थ्युसिडाईड्स (इ.स. पूर्व ४६०-३९६) इतिहास म्हणजे संस्मरणीय घटनांचे निवेदन होय असे मानतो. 'History is story of things worthy to be remembered.' ॲरिस्टॉटल हा ग्रीक तत्त्वज्ञ इतिहास न बदलणाऱ्या भूतकाळाची कथा आहे असे मानतो.

इतिहास लेखनाच्या दुसऱ्या टप्प्याचे (मध्ययुगीन समाजाचे) वैशिष्ट्य म्हणजे मानवी विकासाच्या या टप्प्यावर हा ख्रिस्ती धर्माचा व पुढे सहाव्या शतकात इस्लाम धर्माचा झालेला उदय व या धर्माचा समाजावर पडलेला प्रभाव. या प्रभावातून युरोपात झालेले इतिहास लेखन धार्मिक तत्त्वज्ञाने प्रभावित झाले होते. अशा इतिहास लेखनाची सुरुवात इ.स. च्या तिसऱ्या शतकापासून झाली. इस्लाम धर्म तत्त्वांचा प्रभाव अरब इतिहास लेखनावरतीही झालेला दिसतो. परमेश्वर सर्व व्यापी आहे तो करता करविता आहे, विश्व निर्माता व विश्व चालक तोच आहे. ह्या पृथ्वीवरील जीव हे त्याच्या हातातील बाहुले आहेत तोच सूत्र संचालक असल्यामुळे मानवाला स्वतंत्र इच्छा शक्ती अगर कार्य कर्तृत्व नाही. अशी वैचारिक धारणा काही अपवाद वगळता त्या काळातील इतिहास लेखनात प्रतिबिंबीत झाली आहेत. थोडक्यात, धर्म विचार व धर्मनिष्ठा हाच इतिहास लेखनाचा प्रमुख प्रेरणा स्त्रोत असल्याचे आढळून येते. या काळातील आत्यंतिक धर्मनिष्ठा यामुळे मानवाच्या स्वतंत्र प्रज्ञेचा व जिज्ञासु वृत्तीचा लोप पावला. मध्ययुगीन समाजाची इतिहासासंबंधित अशी धारणा १५ व्या शतकापर्यंत प्रभावी होती.

१५ व्या शतकात उत्तरार्धात जगाच्या इतिहासाला कलाटणी देणाऱ्या तीन घटना घडल्या. त्या म्हणजे वैचारिक प्रबोधन, धर्म सुधारणा व अज्ञात जगाचा शोध. कॉन्स्टॅन्टिनोपॉल तुर्कांनी जिंकून घेतले तेथे वसलेले ग्रीक पंडित युरोपात स्थलांतरित झाले. त्यांनी ग्रीक वाङ्मयाचा आणि तत्त्वज्ञानाचा तेथे प्रसार केला. त्यातून युरोपात विद्येच्या पुनरुज्जीवनाची लाट पसरली. प्राचीन ग्रीक विद्येच्या पुनरुज्जीवनामुळे ज्ञानाची नवी दालने खुली झाली. त्यातून धर्माचा प्रभाव कमी होऊन नवे ज्ञान प्राप्त करण्याची जिज्ञासा, स्वतंत्र विचार शक्ती जागृत झाली.

मानव हा सर्व विचाराचा केंद्रबिंदु बनला, यातून मानवी जीवनाकडे पाहण्याची नवी दृष्टी निर्माण झाली. या घटनाचा परिणाम इतिहासावर झाला. मानवी कर्तृत्वाचे महत्त्व ध्यानात घेतले जाऊ लागले. इतिहासात मानवी कर्तृत्वाला स्थान मिळाले आणि इतिहास हे मानवाला उपयुक्त ठरणारे, शहाणपण शिकवणारे ज्ञानभांडार आहे असा विचार व्यक्त होऊ लागला. येथून पुढे इतिहासाचा विचार हा मानवकेंद्रित होऊ लागला व त्या पद्धतीने इतिहासाच्या व्याख्याही पुढे येऊ लागल्या. १७ व्या शतकातील फ्रान्सिस बेकन याने इतिहास ही मानवाला सुज्ञ बनवणारी शाखा आहे, अशी इतिहासाची व्याख्या केली. तर सर वॉल्टर रेले याने गतकाळातील उदाहरणे देऊन माणसाला शहाणपण शिकविणे व मार्गदर्शन करणे हे इतिहासाचे उद्दिष्ट्ये असल्याचे मत मांडले.

**इतिहासाविषयीची नकारात्मकता :**

१८ व्या शतकापर्यंत इतिहासाचा समावेश साहित्याच्या क्षेत्रामध्ये केला जाई. या शतकात युरोपात बुद्धिप्रामाण्यवाद शिगेला पोहचला होता. प्रत्येक गोष्ट बुद्धीच्या निकषावर तपासून पाहण्याची वृत्ती या काळात प्रचलित झाली होती. त्यातूनच बुद्धिवादी विचारवंत इतिहासाची चिकित्सा करू लागले. त्यातून त्यांना इतिहासातील सत्याविषयी शंका उत्पन्न होऊ लागली. त्यातून इतिहासाविषयी नकारात्मक दृष्टिकोन निर्माण झाला की इतिहासातून शिकण्यासारखे काहीही नाही.

फ्रेंच तत्त्ववेत्ता व्होल्टेअर आपला सर्व इतिहास हा केवळ काल्पनिक आहे असे इतिहासासंबंधी नकारात्मक दृष्टिकोन मांडू लागला. अनेक असत्य गोष्टीतून सत्याशी सादृश्य असलेल्या बाबींची निवड करण्याची कला म्हणजे इतिहास अशी इतिहासाची व्याख्या रूसोने केली. गिबन हा ब्रिटीश तत्त्ववेत्ता इतिहासासंबंधी म्हणतो, इतिहास म्हणजे मानव जातीने केलेले गंभीर गुन्हे, मूर्खपणा आणि दुर्दैव यांच्या कथेशिवाय काही नाही. हेगेल हा जर्मन तत्त्ववेत्ता इतिहासापासून कोणी काही धडे घेतल्याचे आढळत नाही असे विधान करून इतिहासाची निरूपयोगिता सिद्ध करतो.

**इतिहासाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनातील स्थित्यंतरे :**

१८ व्या शतकात इतिहासातील घटनाकडे बुद्धिवादी दृष्टिकोनातून पाहिले जाऊ लागले. इतिहासातील त्रुटी दूर करून शास्त्रीय दृष्टिकोनातून इतिहास लिहिला जाऊ शकतो अशी भूमिका घेऊन १९ व्या शतकात इतिहासाकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन निर्माण झाला. त्याच बरोबर या शतकात मात्र युरोपियन जगतात अनेक विचार प्रवाह प्रचलित झाले. त्याचा परिणाम इतिहासाच्या आकलनावर होऊ लागला. अठराव्या शतकातील निखळ बुद्धिवादाविरूद्धची प्रतिक्रिया म्हणून इतिहास लेखनात कल्पना शक्तीला स्थान मिळाले. साहित्य क्षेत्रातील रोमॅन्टिसिझमचा प्रभाव इतिहास लेखनावर झाला. तसेच विज्ञानाच्या विकासाबरोबर इतिहासाचे शास्त्रीय लेखन व्हावे असा आग्रह धरणारे इतिहास तज्ज्ञ पुढे आले. लोकशाहीच्या विकासाबरोबरच मानवी प्रगतीचा व स्वातंत्र्याचा विचार प्रभावी ठरू लागला. वसाहतवाद, साम्राज्यवाद, राष्ट्रवाद, अशा नव्या राजकीय विचार प्रणाली प्रचारात आल्याने राजकारणाचे महत्त्व इतिहासाच्या क्षेत्रात मांडले गेले आणि औद्योगिक व श्रमिक वर्गाचे शोषण यामुळे इतिहासाच्या मांडणीत आर्थिक हेतुमूलकतेच्या सिद्धांताला व सामाजिक संघर्षाला स्थान मिळाले. आज मानवी जीवनाचे यथार्थ आकलन होण्यासाठी राजकीय इतिहासाबरोबरच आर्थिक सामाजिक सांस्कृतिक घटकांचा विचार ही इतिहासात केला जात आहे. आज इतिहासाच्या व्याप्ती व स्वरुपातही मोठ्या प्रमाणात बदल होत आहेत.

## ब) इतिहासाच्या व्याख्या

इतिहासाच्या व्याख्या समाज परिवर्तनशील आहे. समाजाचे स्वरूप काळानुरूप बदलत असते. समाजाच्या बदलाची प्रक्रिया समाजाच्या गरजेनुसार होत असते. समाज बदलाच्या मुळाशी विचार असतात. आणि त्या काळाच्या विचाराला अनुसरून गरजेनुसार इतिहास लिहिला जातो. समाजाच्या संबंधित वरील धारणा लक्षात घेऊन इतिहासाच्या व्याख्या याचा विचार करता येईल. विविध इतिहासकार राजकीय व्यक्ती समाजशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ यांनी इतिहासाच्या व्याख्या केल्या आहेत. या व्याख्या त्या-त्या काळाचे प्रतिनिधीत्व करतात. या व्याख्यांचा अभ्यास करत असताना आपणास इतिहासाच्या आकलनामध्ये प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत झालेले बदलही लक्षात येतात.

इंग्रज इतिहासकारांनी केलेल्या व्याख्या

१) फ्रान्सिस बेकन : ''मानवाला शहाणी बनवणारी विद्याशाखा म्हणजे इतिहास.''

२) हेन्री जॉन्सन : ''ज्या घटनांचा मानवी मनावर खोल ठसा उमटतो त्याला इतिहास म्हणतात.''

३) प्रो. एच. डब्ल्यू. गेटलँड : ''मानवाने जे कार्य केले किंवा ज्याच्या संबंधाने त्याने विचार व्यक्त केले, त्या पेक्षा त्याने एकंदर परिस्थितीसंबंधी जे विचार व्यक्त केले त्याला इतिहास म्हणतात.''

४) प्रो. मेटलँड : ''इतिहास ही एक वैचारिक प्रक्रिया आहे अशा प्रक्रियेमध्ये माणसाला स्वत:च्या मनाचे प्रतिबिंब दिसत असते. विविध घटना मध्ये असणारे संबंध इतिहासकार ज्ञानाच्या आधारे प्रस्थापित करीत असतो.''

५) प्रो. जी. आर. एलटन : ''मानवाने जी आपली भावना व्यक्त केली, विचार व्यक्त केला किंवा जे कार्य केले अथवा त्याने जे आघात सहन केले ते सर्व म्हणजे इतिहास होय!''

६) एडमंड बर्क : ''इतिहासात सतत घडणाऱ्या बदलाचा संबंध मानवी जीवनाशी असतो. इतिहासाचा संबंध वस्तूशी नसतो. एखाद्या घटनेचा परिणाम हा व्यक्तिसापेक्ष, स्थल सापेक्ष असतो. असा बदल कोणत्याही तत्त्वज्ञानाच्या चौकटीत बसविता येत नाही. ऐतिहासिक व्यक्तीने तत्त्वानुसार हालचाली केलेल्या नसतात तर प्रत्येक बदल हा गरजेतून निर्माण झालेला असतो. त्यामुळे इतिहास हा तत्त्वाचा मार्गदर्शक नसतो तर दूरदर्शीपणाचा मार्गदर्शक असतो.''

७) लॉर्ड ॲक्टन : ''इतिहास म्हणजे मानवी स्वातंत्र्याची कथा आहे. साम्राज्याची मुहुर्तमेढ रोवणे हा इतिहासातील श्रेष्ठ क्षण नव्हे तर ज्या वेळी मानवी स्वातंत्र्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केला जातो तो क्षण श्रेष्ठ होय! प्रत्येक मानवाच्या ठिकाणी ही सुप्त शक्ती असते आणि अशा शक्तीचा विकास स्वातंत्र्यातच होत असतो. म्हणून इतिहास म्हणजे मानवी स्वातंत्र्याची कथा होय!''

८) प्रो. ए. एल. राऊस : ''इतिहास म्हणजे विशिष्ट अशा भौगोलिक व प्राकृतिक परिस्थितीमध्ये समाज करून राहणाऱ्या मानवी जीवनाची कथा आहे. त्या मानवी समाजाच्या सामाजिक व सांस्कृतिक वातावरणाची निर्मिती त्याच्या परस्परांतील अंतरप्रक्रियेतून आणि सामाजिक व भौगोलिक परिस्थितीच्या देवाणघेवाणातून होत असते.''

९) प्रो. एडवर्ड कार : ''इतिहास हा गतकाळ व वर्तमानकाळ यांच्यात अखंडपणे चालणारा संवाद आहे.''

**जर्मन इतिहासकारांच्या व्याख्या :**

१) इमॅन्युल कांट : ''निसर्गाने मानवामध्ये काही शक्ती दिल्या आहेत. त्या शक्ती जरूर भासेल त्या प्रमाणे दृगोचर होत असतात. इतिहासाची कारक मानवामधील विवेक शक्ती आहे. म्हणून मानवाच्या विवेक शक्तीला आवाहन करणारा विषय म्हणजे इतिहास होय!''

२) फॉन हार्डर : ''निसर्गाच्या उत्क्रांती मधून इतिहास निर्माण होतो. इतिहासात घटनांची मालिका असते.'' फॉन हार्डरने मानवी जीवनाचा नैसर्गिक विकासाशी अविभाज्य संबंध आहे सर्व वस्तू अदृश्य परिवर्तनाने एकमेकांच्या मागे व एक दुसऱ्याच्या आंत प्रवाहित असतात इतिहास आणि निसर्ग दोन्हीही कालमय, गतीशील व सजीव आहेत.

३) फ्रेडरिच हेगेल : ''इतिहास म्हणजे मानवी समाज एका विशिष्ट ध्येयाप्रत जात असताना चढत्या क्रमाने प्रगती होते यालाच इतिहास प्रक्रिया म्हणतात.''

४) लिओपोल्ड फॉन रान्के : रांके यास आधुनिक इतिहास लेखनशास्त्राचा जनक असे म्हणतात. त्याने इतिहास लेखनात साधनांना खूप महत्त्व दिले आहे. त्याचे एक विधान प्रसिद्ध आहे ते म्हणजे,‘सत्य जे काही आहे तेच नोंदवले पाहिजे, अर्थात, The facts must be produced as actually they were.’ तसेच, No documents no history हे रांकेचे हे विधान देखील प्रसिद्ध आहे. ''ऐतिहासिक घटना परमेश्वराच्या प्रेरणेने घडत असतात. व्यक्ती व राष्ट्रे परमेश्वरी इच्छांचे प्रकटीकरण करीत असतात. जगात घडणाऱ्या प्रत्येक घटनेमागे अदृश्य शक्तीचा हात असतो.''

५) कार्ल मार्क्स : ‘इतिहास म्हणजे वर्गकलह’ अशी व्याख्या मार्क्स यांनी केली आहे. मानवी जीवनाच्या वाटचालीचा सखोल अभ्यास केला. मानवी प्रगतीच्या अवस्था सांगून मानवी समाजाची भौतिक मीमांसा केली. त्याने समाजाचा विकास हा उत्पादन पद्धतीचा इतिहास आहे असे प्रतिपादन केले, त्याने मानवी जीवनाच्या वाटचालीचा शास्त्रीय व सखोल पद्धतीने अभ्यास करून थांबला नाही तर त्या संदर्भाने त्याने वर्तमानाचा अर्थ लावला आणि भविष्यातील सर्वसामान्य माणसाचे जीवन सुखी करण्यासाठी मार्गदर्शन केले. दुर्लक्षित व शोषित समाज गटांच्या समस्यांचे निराकरण करण्याचा व त्यांच्या कल्याणाचा मार्ग दाखविला. ''पूर्वीच्या तत्त्ववेत्त्यांनी जगाचे केवळ आकलन करून घेण्याचा प्रयत्न केला, परंतू मुख्य मुद्दा आहे तो त्यात परिवर्तन करण्याचा''. असा विचार त्याने मांडला. समाजाचा इतिहास हा उत्पादन पद्धतीचा इतिहास आहे. समाजात शोषक व शोषित दोन गट कार्यरत असतात. शोषित वर्ग आपल्या श्रमाची विक्री करून आपली उपजीविका करणारा असतो. शोषक वर्ग शोषित वर्गाच्या श्रमावर जास्तीचा नफा कमवत असतात. या दोन वर्गाच्या संघर्षातून समाजाचा विकास होत असतो या संदर्भाने त्यांनी द्वंद्वात्मक विकासाचा सिद्धांत मांडला. त्याने केलेली मानवी समाजाची भौतिकवादी मिमांसा दोन गृहितकांवर आधारित आहे. पहिला विचार म्हणजे वर्ग संघर्षातून इतिहास घडतो आणि दुसरा विचार म्हणजे सामाजिक घटकांच्या संबंधांना भौतिक व्यवहारांचा आधार असतो. त्याच्या तत्त्वज्ञानाच्या आधारावर रशियन साम्यवादी क्रांती व चीनची साम्यवादी क्रांती झाली आहे. इतिहासाची भौतिकवादी मिमांसा करणारा एक प्रवाह इतिहासामध्ये प्रचलित झाला. भारतीय

इतिहासाची भौतिकवादी मिमांसा रोमिला थापर, इरफान हबीब, इत्यादिंनी केली.

**फ्रेंच इतिहासकारांनी केलेल्या व्याख्या :**

१) डी. व्हॉल्टेर : ''मृत व्यक्तीवर जिवंत व्यक्तीने केलेली किमया म्हणजे इतिहास. इतिहासामध्ये कल्पना शक्तीला जास्त वाव आहे. मानव कसा आहे हे आपणास शिकविले तो विषय म्हणजे इतिहास होय!''

२) कॉन्डरसेट : ''इतिहास म्हणजे मानवाची बौद्धिक व कल्पनात्मक प्रगती नसून जागतिक मताधिकार व शिक्षण, भाषण व विचार स्वातंत्र्य, घटनात्मक ऐक्य व संपत्तीचे समान विभाजन करणारा विषय होय!''

३) ऑगस्त कॉम्त : ''ख्रिश्चन धर्माचा त्याग करावा व त्या ठिकाणी विवेक शक्तीचा उदय व्हावा. कोणत्याही एका धर्मापेक्षा जगात सर्व धर्म समभाव असावा. मानव जातीची प्रगती तीन टप्प्यांमधून होते.''

**इतर देशातील इतिहासकारांच्या व्याख्या :**

१) व्हिको :''मानवाची सामाजिक प्रगती म्हणजे इतिहास होय!''

२) क्रोचे :''सर्व इतिहास समकालीन असतो. इतिहासामध्ये भूतकाळ व वर्तमानकाळ एका विशिष्ट घटनाक्रमाने जोडलेले असतात अशा साखळीमुळे गतकाळातील घटना समकालीन वाटतात.''

३) डॉ. आर. सी. मुजुमदार : ''इतिहास म्हणजे पुराण, इतिवृत्त, आख्यायिका, उदाहरण, धर्मशास्त्र व अर्थशास्त्र होय!''

- **स्वयं अध्ययन प्रश्न–१**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) इतिहास या संस्कृत शब्दाचा अर्थ सांगा?

२) हिस्ट्री या शब्दांचा सर्वप्रथम वापर कोणी केला?

३) इतिहासाचा जनक कोणास म्हटले जाते?

४) इतिहास ही मानवाला सुज्ञ बनवणारी शाखा आहे ही इतिहासाची व्याख्या कोणी केली?

५) घटना बोलत नाही तर इतिहासकार त्यांना बोलते करतो असे कोणी म्हटले आहे?

**ब) रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा**

१) इतिहासात मिथकांचा अंतर्भाव नसावा असे ............ यांनी म्हटले आहे.

अ) हिक्याटिअस

ब) थ्युसिडाईड्स

क) हेरोडोटस

ड) डायोनियस

२) मध्ययुगीन इतिहास लेखनाचा हेतू ............हा होता.

अ) विश्व नियंत्याचा हेतू व कर्तृत्व कथेद्वारा सांगणे

ब) मानवाचे कर्तृत्व सांगणे

क) सत्य घटनेचे वर्णन करणे

ड) मनोरंजन करणे

३) अठराव्या शतकापर्यंत इतिहासाचा समावेश ............क्षेत्रांमध्ये केला जाई.

अ) कला ब) विज्ञान

क) पुराण ड) साहित्य

४) इतिहासाचा अर्थ लावताना वर्तमानात राहणारा इतिहासकार काही अंशी त्यात डोकावणे हे अपरिहार्य आहे असा विचार ............ यांनी मांडला.

अ) फ्रान्सिस बेकन ब) हेगेल

क) इ. एच. कार ड) कार्ल मार्क्स

५) इतिहास हा गतकाळ व वर्तमानकाळ यांच्यात अखंडपणे चालणारा संवाद आहे असे ............ यांनी म्हटले आहे.

अ) प्रो. ई. एच. कार ब) हेगेल

क) हेरोडोटस ड) यापैकी नाही

### १.२.२ इतिहासाचे स्वरूप आणि व्याप्ती

गतकालीन मानवी जीवनाची कथा म्हणजे इतिहास अशी साधी सोपी व्याख्या करता येते. अथवा 'रानटी अवस्थेकडून सुसंस्कृत अवस्थेकडे होणारी मानवाची वाटचाल म्हणजे इतिहास' या इतिहासाच्या व्याख्येवरून इतिहासाचे स्वरूप स्पष्ट होते. मानवाच्या प्रगती बरोबरच इतिहासासंबंधी अनेक कल्पना अस्तित्वात आल्या व त्यामध्ये बदलही होत गेले. मानव व राष्ट्र यांचे परस्पर संबंध काळानुरूप सतत बदलत राहतात त्यानुसार इतिहासाच्या स्वरुपामध्ये बदल होत राहतात.

मानवी जीवनाशी संबंधित भूतकाळात घडलेल्या घटना हा इतिहासाचा विषय असल्याने इतिहास ही मानव्यशास्त्राची अविभाज्य शाखा आहे. म्हणजे गतकालीन मानवी जीवनाची रूपरेखांचा आलेख म्हणजे इतिहास होय हे इतिहासाचे पहिले वैशिष्ट्य होय!

इतिहासामध्ये मानवाच्या लौकिक बाजूचा विचार केला जातो. पारलौकिकतेला इतिहासात स्थान नाही. स्थळ व काळ हे इतिहासाचे दोन आयाम आहेत. या मर्यादेतच इतिहासाचे कार्य चालते. स्थळ व काळानुरूप इतिहासाचे स्वरूप ठरत असते.

मानवी जीवन हे परिवर्तनशील आहे. या मानवी जीवनाच्या परिवर्तनाचे स्थायी व गतिमान स्वरूप उलगडून

दाखविणे हे इतिहासाचे स्वरूप आहे. निसर्गातील विविध बाबींचा मानवी जीवनावर होणारा परिणामाचा अभ्यास इतिहासकार करतो परंतू त्या बाबीचा स्वतंत्र अभ्यास इतिहासाच्या कक्षेत येत नाही.

इतिहासामध्ये मानवी जीवनातील लक्षवेधी संस्मरणीय घटनांचा अभ्यास केला जातो. सर्वसामान्य घटनाला इतिहासात स्थान नाही कारण अशा घटनापासून काही शिकवण मिळत नाही. म्हणजे इतिहासकार गतकाळात घडलेल्या घटनामधील महत्त्वाच्या वाटणाऱ्या घटनांचे वर्णन करतो म्हणून निवड हे इतिहासाचे स्वरूप आहे. विसाव्या शतकात इतिहासाच्या कक्षा रुंदावल्या आहेत. पूर्वी राजा हा इतिहासाचा नायक होता. तर कालौघात इतिहासाच्या स्वरुपामध्ये अनेक स्थित्यंतरे होऊन आज सामान्य माणूस हा इतिहासाचा नायक बनला आहे. मानवी जीवनात सर्वसामान्य वाटणाऱ्या घटनांची वर्णने करू लागला आहे. त्यातून सर्व सामान्यांचे जीवन दर्शन घडवू लागल्याचे आढळून येत आहे. या सर्व घडामोडीतून इतिहासाचे स्वरूप कसे बदलत चालले आहे ते लक्षात येते.

घटनांचा अन्वयार्थ लावणे हे इतिहासाचे स्वरूप आहे. इतिहासाचे स्वरूप केवळ वर्णनात्मक अगर निवेदनात्मक नाही. इतिहासात वर्णन केलेल्या घटनांचे स्पष्टीकरण करणे त्यावर भाष्य करणे. त्याचे मर्म उलगडून दाखविणे. थोडक्यात, त्या घटनांचा अन्वयार्थ इतिहासकाराला लावावा लागतो. म्हणूनच ई. एच. कार म्हणतात, ''घटना बोलत नाही तर इतिहासकार त्यांना बोलते करतो.''

घटनांच्या वास्तव स्वरुपाचे वर्णन हे इतिहासाचे स्वरूप आहे. इतिहासात वास्तव घटनांचे वर्णन पुराव्याच्या आधारे करावे लागते. ऐकीव काल्पनिक गोष्टींना, मिथकांना इतिहासात स्थान नाही. ज्या साधनांच्या आधारे इतिहासाचे लेखन करावयाचे त्याची सत्या-सत्यता पडताळून पाहून हाती आलेल्या सत्यच इतिहासात मांडावे लागते. म्हणजे सत्य शोधन व सत्य कथन हा इतिहासाच्या स्वरुपाचा आत्मा आहे.

वस्तुनिष्ठता हे इतिहासाचे स्वरूप आहे. इतिहासात गतकालीन घटना वास्तवदर्शी मांडण्यासाठी इतिहासकारांमध्ये वस्तुनिष्ठता असणे महत्त्वाचे आहे. पण अशी वस्तुनिष्ठता प्रत्यक्षात शक्य होत नाही. कारण इतिहास म्हणजे गतकाळ व वर्तमान काळ यात अखंड चालणारा संवाद आहे. म्हणून इतिहास विषयाचा अर्थ लावत असताना वर्तमानात राहणारा इतिहासकार काही अंशी त्यात डोकावणे हे अपरिहार्य आहे. हा विचार इ. एच. कार यांनी मांडला.

इतिहासाचे स्वरूप ठरवित असताना आपल्याला इतिहासा संबंधित पुढील संकल्पना समजावून घेतल्यास इतिहासाचा स्वरुपाची विविधता समजू शकेल.

**१) इतिहासाची पुनरावृत्ती होते :**

'इतिहासाची पुनरावृत्ती होते' या विचाराचे काही इतिहासकारांनी जोरदार समर्थन केले आहे तर काही इतिहासकार हे अर्धसत्य मानतात. इतिहासाची पुनरावृत्ती होते याचा साधा अर्थ म्हणजे ऐतिहासिक घटनात साम्य दिसते. मात्र त्या घटना घडण्याचे मार्ग भिन्न असतात. तसेच एखादी घटना जगाच्या पाठीवर घडत असताना मानवी कृतीमध्ये एकवाक्यता असते. कारण कोणत्याही देशातील व्यक्ती ठराविक परिस्थितीमध्ये तशीच वागत असते.

### २) इतिहासामध्ये मूल्यमापन असावे की नसावे? :

इतिहास लेखन करताना इतिहासकार घडून गेलेल्या घटनांचे वर्णन करत असतो. पण त्या घटनेचे मूल्यमापन इतिहासकाराने करावे की नाही या संदर्भात मतभिन्नता आढळते. लॉर्ड ॲक्टन यांच्या मते, इतिहासामध्ये मूल्यमापन, चर्चा, निर्णय घेणे अनिवार्य असते कारण त्याचा त्या विषयाचा अभ्यास असल्याने तो त्या विषयाचा भाष्यकार असतो. ॲक्टन म्हणतो, ''इतिहासाची सर्वात मोठी कामगिरी कोणती असेल तर त्याने माणसाची सद्सदविवेकबुद्धी ही सतेज केली पाहिजे.'' म्हणजेच प्रत्येक गोष्टीचे मूल्यमापन इतिहासकाराने करावे जेणे करून लोकांना योग्य मार्गदर्शन होईल. मात्र रान्के आणि ब्यूटी, या इतिहासकारांना इतिहासामधील मूल्यमापनाचा विचार मान्य नाही. संशोधकाने फक्त घटना मांडव्यात, त्यावर भाष्य करू नये त्यामुळे एखादे वेळी गैरसमज निर्माण होण्याची शक्यता असते. आधुनिक काळात मात्र इतिहासामध्ये मूल्यमापन असावे असा विचार पुढे आला आहे.

### ३) सर्व इतिहास समकालीन असतो :

इटालीयन तत्त्ववेत्ता बेनोडेटो क्रोचे (Benedetto Croce) म्हणतो की, ''सर्व इतिहास समकालीन असतो.'' भूतकाळ व वर्तमान काळ विशिष्ट क्रमाने जोडलेले असतात अशा या साखळीमुळे गतकाळातील घटनासुद्धा समकालीन वाटतात. क्रोचे पुढे म्हणतो की, ''इतिहास म्हणजे दुसरे तिसरे काही नसते तर गतकाळातील घटना नव्याने सांगितलेल्या असतात.'' थोडक्यात, याचा अर्थ असा की भूतकाळात घडलेल्या घटना या कालौघात घडत असल्या तरी त्याचे कारणे व परिणाम यामध्ये सारखेपणा दिसतो. तसेच इतिहासकार हा वर्तमान काळात राहून भविष्यकाळातील घटनांचे मूल्यमापन साधनांच्या सहाय्याने करत असतो या घटनांचा अन्वयार्थ लावताना समकालीन विचारांचा प्रभाव पडत असतो.

### ४) इतिहासात भवितव्य वर्तविण्याची क्षमता :

इतिहास हा भूतकाळाचा अभ्यास असला तरी ती वर्तमान काळाची गरज असते. त्यामुळे भूतकाळाचा नवा अर्थ वेळोवेळी लावला जातो. इतिहासकाराला भूतकाळात जाऊन भूत व वर्तमान यांच्यात सुसंवाद साधायचा असतो. हा सुसंवाद साधत असताना त्याला भूतकाळात घडलेल्या घटना का घडल्या कशा घडल्या हे शास्त्रीय दृष्टिकोनातून त्या घटनांचे विश्लेषण करून त्यांचा अन्वयार्थ लावावा लागतो. २० व्या शतकात इतिहास हे एक शास्त्र आहे हा विचार सर्वश्रुत झाला आहे. अन्य शास्त्रे जशी नियम तयार करून भविष्य वर्तववितात तसे इतिहासात ही शक्य आहे हा विचार पुढे येत आहे. पण मानवी प्रवृत्ती गुंतागुंतीच्या असतात त्यामुळे त्याच्या मनाचा अंत आपणास लावता येत नाही परिणामी भूतकाळाचा मागोवा घेऊन भवितव्य वर्तवविणे अवघड होणार आहे. असाही एक विचार मांडला जातो.

### ५) इतिहासाची गती सरळ की चक्राकार? :

इतिहासाची गती सरळ आहे की चक्राकार आहे हे ऐतिहासिक घटनेकडे पाहण्याचे दोन दृष्टिकोन आहेत. इतिहासाची गती सरळ आहे या संदर्भात असे म्हणतात की, अज्ञात भूतकाळात इतिहासाची गती सुरू होते. ती वर्तमान काळातून भविष्यकाळात जात असते याला प्रगती असे म्हणतात. म्हणजेच असे म्हणता येईल की मानवाची बौद्धिक व भौतिक प्रगतीची दिशा ही चढत्या क्रमाने होत असते. दुसऱ्या चक्राकार विचार

प्रवाहाप्रमाणे असे म्हटले जाते की, ज्या ठिकाणाहून गती प्राप्त होते तेथे ती पुन्हा येऊन मिळते. पण मानवी प्रगतीचा आलेख पाहिला तर इतिहासाची गती सरळ रेषेत आहे हे विधान अधिक योग्य वाटते.

### ६) इतिहास अनन्यसाधारण आहे :

गार्डिनर यांनी इतिहास स्वयंपूर्ण शास्त्र आहे असा विचार मांडला. आज इतिहासात शास्त्राचे निकष आणण्याचा प्रयत्न केला जात आहे म्हणजेच इतिहासात शास्त्रशुद्ध सिद्धांत मांडणे, विषयाच्या दृष्टीने साधने जमा करणे, त्याचे अंतरंग व बहिरंग परिक्षण करून त्या घटनांचा अन्वयार्थ लावणे व नंतर भवितव्यता वर्तविण्याचा प्रयत्न केला जातो हे इतिहासाचे स्वरूप आज निश्चित झाले आहे. आज इतिहासाला शास्त्राचे स्वरूप प्राप्त झाले असले तरी इतिहास स्वयंपूर्ण आहे. कारण त्याचा मुख्य आधार मानवी मन व मानवी चेतना आहे. शास्त्रा प्रमाणे इतिहासाला ठोकळबाज चौकट नसते. इतिहासातील विविधतेमुळे तो अनन्य आहे.

### ७) इतिहासाची स्वायत्तता :

इतिहासाचे स्वरूप खुप व्यापक आहे, त्यात विविधता आहे. इतिहासाचे सर्व व्यवहार मनुष्य निर्मित, मनुष्य प्रेरित, मनुष्य पुरस्कृत असल्याने मानव समाज हाच इतिहासाचा केंद्रबिंदु राहिला आहे. इतिहास हा भूतकाळाचा अभ्यास असतो, इतिहास हा विचारांचा असतो, इतिहास हा संस्कृतीचा असतो. इतिहास हा मानवी जीवनाच्या वाटचालीचा असतो. इतिहास हा भूतकाळ व वर्तमान काळ यांना जोडणारा दुवा आहे.

### ब) इतिहासाची व्याप्ती :

इतिहासाचा संबंध मानवी जीवनाशी असल्यामुळे मानवी जीवनाप्रमाणेच इतिहासाची व्याप्ती ही मोठी आहे. इतिहासाचा संबंध मानवी जीवनाशी असल्यामुळे त्याचा संबंध सर्व विषयांशी आहे. राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, मानसशास्त्र, विज्ञान, भाषा, साहित्य, लिपी, नाणकशास्त्र, पुरातत्त्व इ. सर्वच विषयाचा इतिहासाची जवळचा संबंध आहे. मानवाच्या जीवन संबंधी कोणत्याही विषय हा इतिहासाचा विषय आहे. आधुनिक काळात तर सर्वसामान्य जनतेतील लोककथा, दंतकथा व मिथके यांच्या मार्फत वंचितांचा व स्त्रियांचा इतिहास लिहिला जाऊ लागला आहे. यावरून आपल्या लक्षात येते की, इतिहासाची व्याप्ती मानवाच्या विकासाबरोबरच विकसित होत आली आहे. मानवी जीवनाची सर्व क्षेत्रे इतिहासाच्या कक्षात येतात.

### इतिहासाच्या व्याप्तीत समाविष्ट करण्यात येणाऱ्या बाबी

इतिहास केवळ गतकालीन गोष्टी सांगत नाही तर वर्तमानाचे आकलन करून भविष्याविषयीच्या वाटचालीचे दिशा दर्शनही करतो. थोडक्यात, इतिहास म्हणजे, ''भूतकाळाचे आपण किती ऋणी आहोत? वर्तमान स्थिती आपणास कशी प्राप्त झाली? व भविष्यकाळात आपले काय कर्तव्य आहे? या बाबतचे स्पष्टीकरण होय! म्हणजे मानवी जीवन हे गतकाळातील अनुभवांनी समृद्ध झालेले आहे. अनुभवाने मिळालेल्या शहाणपणाने मानवी जीवन प्रगतीच्या पुढच्या टप्प्यात पदार्पण करत असते. हे जे अनुभव आहेत ते इतिहासाची व्याप्ती दर्शवतात. प्रत्येक प्रकारचा अनुभव इतिहासाचा विषय होतो. या अनुभवाचा अभ्यासावरून सारांशरुपाने इतिहासाच्या व्याप्तीत पुढील बाबीचा समावेश करता येईल.

१. गतकालीन वाटचाल रेखाटणे.

२. ही वाटचाल कशी झाली हे सांगणे.

३. या वाटचालीतील घटनांचे विश्लेषण करणे.

४. घटनांची कारण मिमांसा करणे.

५. घटनांचा अन्वयार्थ लावणे.

६. घटनांचा अर्थ लावून सामान्यीकरण करणे.

७. घटनांच्या परिणामांची चर्चा करणे.

इतिहास म्हणजे गतकाळातील माहिती देणारे शास्त्र आहे हे मान्य केली की, मानवी जीवनासंबंधीची सर्व क्षेत्रे या व्याप्ती मध्ये येतात. यात नीति, धर्म, अर्थ, सामाजिक रूढी, परंपरा, कला, साहित्य इ. सर्वच बाबी इतिहासाच्या व्याप्तीत येतात.

**इतिहासाची व्याप्ती निश्चित करणारी तत्त्वे :**

वर्तमानातील प्रश्न सोडविण्यासाठी गतकाळाचा अभ्यास आपण करत असतो. भूतकाळातील घटना व वर्तमान कलातील घटना याचा आपण परस्पर संबंध लावत असतो म्हणजे या प्रक्रियामधून माणूस अनुभव समृद्ध बनत असतो. यातून आपणास असे म्हणता येते की एक प्रकारे इतिहासाची शिकवण ही मानवी जीवनाच्या विकासाला पूरक होते.

प्रो. बाँदिन याच्या मते, इतिहासाची व्याप्ती आपणास पुढील तत्त्वानुसार निश्चित करता येते.

१) ज्या शाश्वत तत्वांवर इतिहासाची बैठक आहे, त्या तत्त्वाची मानवी मनास ओळख होणे आवश्यक आहे.

२) इतिहासाने भविष्य वर्तविण्याच्या क्षमतेचा अधिकाधिक लाभ घेतला पाहिजे.

३) मानवाच्या इतिहासात त्याच्या वाटचालीत कोणती शाश्वत मूल्य दडलेली आहेत हे ओळखता आले पाहिजे.

मानवी जीवनातील शाश्वत मूल्य समजून घेऊन त्या मुल्याच्या आधारे मानव जातीची प्रगती कशी झाली हे ओळखून मानसाला भविष्याचा अंदाज वर्तवता येतो. ही सर्व शाश्वत मुल्ये इतिहासाची व्याप्ती दर्शवतात. इतिहासातील विविध प्रकारचे संघर्ष हे मूल्याच्या अधारेच होत असतात.

**इतिहासाच्या व्याप्तीची तत्त्वे :**

आधुनिक काळात इतिहास फक्त घटनांपुरता मर्यादित राहिला नसून मानवी जीवनातील कला, धर्म, वास्तुकला, परंपरा सौंदर्य विषयक दृष्टिकोन, इ. विषयक अभ्यास करणारी स्वतंत्र शाखा म्हणून उदयास येत आहे. इतिहासाच्या अभ्यासाने ज्ञानात भर पडते, तत्त्व बोध होतो, मुल्यांची जोपासना होते, स्थळ, काळ, समाजाची जान निर्माण होते. वादग्रस्त प्रश्न शांततेने हाताळता येतात. राष्ट्रनिष्ठा निर्माण होते. थोडक्यात,

उत्तम नागरिक निर्माण करण्यासाठीचे सर्व संस्कार इतिहासातून मिळतात. म्हणून इतिहास हा सर्वार्थाने व्यापक विषय बनला आहे. इतिहासाची व्याप्ती ही सतत बदलत जाणारी विकसित होणारी संकल्पना आहे. कालौघात इतिहासाची व्याप्ती बदलत गेलेली आहे. प्रो. सलिकी यांच्या मते, ''जी व्यक्ती गतकालीन घटनांचे वैशिष्ट्य जाणण्यात निष्णात असते, ती व्यक्ती स्वत:च्या समकालीन घटनांचे मूल्यमापन करण्यास फारशी चूक करत नाही.'' म्हणजे इतिहासाची व्याप्ती अशा प्रकारे व्यक्तीचे मूल्यमापन करण्यास पात्र असते. चांगल्या वाईटाची जाण इतिहासातून घडत असते. 'जे घडले त्याचे वर्णन करणे' व 'जे घडले त्याचे मूल्यमापन करणे' या दोन तत्त्वामध्ये वेगळ्या स्तरावर आपणास इतिहासाची व्याप्ती स्पष्ट करता येईल.

**प्रो. ट्रिव्हेलियन** (Trevelyan) **यांचे इतिहासाच्या व्याप्तीचे स्तर :**

इतिहासाची व्याप्ती ही साहित्याप्रमाणे अतिशय व्यापक आहे. प्रो. ट्रिव्हेलियन यांच्या मते १) शास्त्रीय २) काल्पनिक व ३) साहित्यिक अशा तीन वेगवेगळ्या अंगांना स्पर्श करणारा विषय आहे, असे प्रो. ट्रिव्हेलियन यांचे मत आहे. हे तिन्ही स्तरावर इतिहासाची व्याप्ती दर्शवतात. इतिहासाच्या व्याप्तीमध्ये आर्थिक घडामोडी व समाजशास्त्रीय बदल यामुळे वाढ होत गेली आहे. इतिहासाची व्याप्ती ही मानवाच्या उत्क्रांतीशी संबंधित आहे. इतिहासात मानवाच्या विविध क्षेत्रात केलेल्या प्रगतीचा आढाव्याचा आलेख येणे आवश्यक आहे. व्यक्ती इतिहास वाचत असताना तो आपले प्रतिबिंब इतिहासात शोधण्याचा प्रयत्न करत असतो व अशा तऱ्हेचे प्रतिबिंब ज्या वेळी इतिहासात दिसेल त्या वेळी खऱ्या अर्थाने इतिहास लेखन झाले असे म्हणता येईल.

**इतिहासाच्या व्याप्तीचा आलेख :**

ग्रीक इतिहासकार हेरोडोटस यास इतिहासाचा जनक म्हटले जाते. History या शब्दाचा वापर सर्वप्रथम हेरोडोटस याने केला होता. History अर्थात His Story म्हणजे त्याची म्हणजे मानवाची गोष्ट होय! म्हणजे अगदी प्रारंभीच्या काळात इतिहासाची व्याप्ती फक्त गोष्टी व कथांपुरतीच मर्यादित होती, असे दिसते. ग्रीक इतिहासकारांनी प्रारंभीच्या काळात इतिहास लेखनासाठी फक्त राजांच्या लढाया, राजकीय घटना, राजघराण्याची माहिती या सारखे विषय निवडले.

मध्ययुग हे अंधार युग म्हणून ओळखले जाते. धर्म संस्थेचे प्राबल्य सर्वत्र वाढल्याने त्याचाच विचार इतिहासात होऊ लागला. दैवी शक्तीमुळे प्रत्येक घटना घडत असते असा समज निर्माण झाला. माणूस दैवाच्या हातातले बाहुले आहे असा समज होता. त्यामुळे समाजात अंधश्रद्धा निर्माण झाल्या. मध्ययुगीन कालखंडात इतिहासाची व्याप्ती व वर्ण्य विषय बदलत गेले. मध्ययुगीन कालखंडाच्या सुरुवातीला ईश्वरी लीलांना इतिहासात स्थान मिळाले. १३ व्या शतकापर्यंत इतिहासावर धर्मगुरूंचा प्रभाव होता. १३ व्या शतकानंतरच्या कालखंडात मानवी कार्य व शौर्य याकडे इतिहासकार वळले. कालांतराने नव्या भूमीच्या शोधामुळे एका खंडातील लोकांचा अन्य खंडातील लोकांशी संबंध येऊ लागला. नव्या भूमीचा शोध घेतल्यानंतर तेथील संस्कृती, तेथील लोकांचे जीवन या विषयी लिखाण होऊ लागले. नवीन ज्ञान मिळू लागले नव्या भूमीच्या शोधामुळे नव्या साम्राज्याचा उदय झाला. जग जिंकण्याच्या आकांक्षाने राजे, महाराजे व सम्राट जग पादाक्रांत करण्याच्या ईर्षेने अन्य देशावर आक्रमणे करू लागली. यातून तुर्क साम्राज्य, रोमन साम्राज्य अशी साम्राज्य उदयास आली. तसेच अलेक्झांडर,

नेपोलियन, समुद्रगुप्त, चंगेजखान या राजांनी सर्व जग जिंकण्याचा प्रयत्न केला ते त्या काळाचे इतिहासाचे नायक बनले.

फ्रेंच राज्यक्रांती, रशियन राज्यक्रांती, अमेरिकन राज्यक्रांती इ. राज्यक्रांत्या घडवून आणणारा सामान्य माणूस इतिहासाचा नायक बनला. माओ-त्से-तुंगचा लाँग मार्च, महात्मा गांधीचा मिठाचा सत्याग्रह अशा किती तरी ऐतिहासिक प्रसंगाचा नायक सामान्य माणूस झाला. या क्रांत्यांमधून इतिहासाचे एक तत्त्वज्ञान निर्माण झाले. राजाकडून सामान्य माणसाकडे नायकत्व येऊ लागले. इतिहासाच्या अध्ययनात मानवी जीवनासंबंधी आर्थिक, धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक बदलही इतिहासकारांना आवश्यक वाटू लागले. कालौघात इतिहास लेखनाने भौगोलिक मर्यादाही ओलांडल्या. स्थानिक, देशाचा व जगाच्या इतिहासाचे लेखन होऊ लागले.

इतिहासाचा संबंध सर्व विषयांशी आहे. प्रत्येक विषयाला त्याचा इतिहास असतो. राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, मानसशास्त्र, विज्ञान, भाषा, साहित्य, लिपी, नाणकशास्त्र, पुरातत्त्व, इ. विषयाचा जवळचा संबंध इतिहासाची आहे. यामुळे इतिहासाचा अभ्यास व व्याप्ती प्रचंड प्रमाणात वाढली आहे. माणूस व त्याने निर्माण केलेल्या संस्था, धर्म, संस्कृती, त्याच्या धारणा या सर्व इतिहासाचा विषय आहेत. वंचितांचा व स्त्रियांचा इतिहास लिहिण्यासाठी तर सर्वसामान्य जनतेतील लोककथा, दंतकथा, मिथके, लोकगीते यांना ही इतिहासाने आपल्या जाळ्यात ओढले आहे. राजा प्रमाणेच सर्वसामान्यांचा इतिहास लिहिला जाऊ लागला.

आधुनिक काळात इतिहासाची व्याप्ती फक्त सनावळी, वंशावळी पुरती मर्यादित राहिली नाही. इतिहास म्हणजे संपूर्ण मानवी जीवनाचीच कथा असल्यामुळे इतिहासाला कोणताही विषय अस्पृश्य राहिला नाही. इतिहासाच्या प्रवाहात मानवी जीवनातील सर्व गोष्टीचा अंतर्भाव होतो. या प्रवाहात कुठे गौतम बुद्ध, महावीर, प्लेटो, ख्रिस्त भेटतो. तर कुठे सम्राट अशोक, शिवाजी, चंगेजखान, नेपोलियन दिसतो. याच प्रवाहात कधी अजिंठा, वेरूळ यासारखी शिल्पे निर्माण होतात. तर फ्रेंच, अमेरिकन क्रांती मानवी स्वातंत्र्याची दखल घेण्यास भाग पाडतात. यावरून इतिहासाची व्याप्ती कशी बदलत गेली हे आपल्या लक्षात येते.

काळाच्या ओघात इतिहासकाराच्या इतिहासविषयक दृष्टीत जसा बदल होत गेला. त्याप्रमाणे इतिहास विषयीच्या व्याप्ती संबंधीच्या कल्पनाही बदलत गेल्या.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-२**

अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) इतिहासाची पुनरावृत्ती होते म्हणजे काय?

२) 'इतिहासामध्ये मूल्यमापन व चर्चा होणे अनिवार्य असते' असे कोणी म्हटले आहे?

३) इतिहासामधे मूल्यमापनाचा विचार कोणी नाकारला?

४) सर्व इतिहास समकालीन असतो असे कोणी म्हटले आहे?

५) इतिहासाचा जनक कोणास मानले जाते?

ब) रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा.

१) 'रानटी अवस्थेकडून ........... अवस्थेकडे होणारी वाटचाल म्हणजे इतिहास होय!'

अ) प्रगत ब) काल्पनिक

क) सुसंस्कृत ड) वैज्ञानिक

२) इतिहास हा ............ शास्त्राची अविभाज्य शाखा आहे.

अ) मानव्यशास्त्राची ब) विज्ञानाची

क) कलेची ड) मानसशास्त्र

३) घटनांच्या .............. स्वरुपाचे वर्णन हे इतिहासाचे स्वरूप आहे.

अ) वास्तव ब) काल्पनिक

क) खोट्या ड) यापैकी सर्व

४) ................. याने इतिहास स्वयंपूर्ण शास्त्र आहे, असा विचार मांडला

अ) बेनेडेट्टो क्रोचे ब) गार्डिनर

क) मार्क्स ड) हेगेल

५) ............. हा इतिहासाचा केंद्रबिंदु राहिला आहे.

अ) निसर्ग ब) ईश्वर

क) मानव समाज ड) यापैकी नाही

६) इतिहासाच्या व्याप्ती संदर्भात ''जी व्यक्ती गतकालीन घटनांचे वैशिष्ट्य जाणण्यात निष्णात असते, ती व्यक्ती स्वत:च्या समकालीन घटनांचे मूल्यमापन करण्यास फारशी चूक करत नाही'' हे विधान ........... यांनी म्हटले आहे.

अ) प्रो. सलिकी ब) प्रो. ट्रिव्हेलियन

क) क्रोचे क) प्रो. ब्लॉक

७) इतिहासाच्या व्याप्तीचे तीन स्तर .............. यांनी स्पष्ट केले आहेत.

अ) प्रो. सलिकी ब) प्रो. ट्रिव्हेलियन

क) डॉ. सॅम्युअल जॉन्सन ड) प्रो. बॉर्नस

**१.२.३ इतिहासाचे प्रकार :**

इतिहास या विषयात मानवाच्या जीवनासंबंधीत सर्व बाबींचा विचार केला जातो. त्यामुळे मानवाच्या प्रत्येक पैलू विषयीचा अभ्यास करण्यासाठी गरजेनुसार इतिहासाचे प्रकार पाडले जातात. पूर्वी राज्यशास्त्र इतिहासाच्या प्रकाराविषयी प्रो. रेनियर म्हणतात, ''इतिहासाच्या वर्ण विषयात विभाजन अतिशय आवश्यक

आहे. कारण त्यामुळे मानवी जीवनाचे नवे पैलू डोळ्यासमोर येऊ शकतात. ज्या वेळी एखाद्या विषयाचे सर्वसाधारण ज्ञान मिळविले जाते, तेव्हा त्या ठिकाणी तंतोतंतपणा किंवा टिकात्मक प्रवृत्ती यांचा अभाव असतो. जर विभाजन केले तर एखाद्या बाबीवर विशेष भर दिला जातो. असे विभाजन अभ्यासकाच्या दृष्टीने महत्त्वाचे असते.'' म्हणजेच इतिहास तज्ज्ञ आपल्या सोईनुसार व गरजेनुसार इतिहासाचे विभाजन करत असतात. मात्र बोअर या इतिहासकाराने मानवी जीवनाची वस्तुनिष्ठता लक्षात घेऊन इतिहासाचे चार प्रकार सांगितले आहेत; वर्णनात्मक, तत्त्वाधिष्ठित, सामाजिक आणि वांशिक तर काही इतिहासकारांनी इतिहासाचे विभाजन काळाला महत्त्व देऊन प्राचीन, मध्ययुगीन आधुनिक असे केले आहे. तर काहींनी इतिहासाचे विभाजन आशिया, अफ्रिका, अमेरिका, युरोप खंड असे केले आहे. पण एवढा मोठा कालखंडाला ठराविक काळामध्ये विभाजन करणे व त्याचा इतिहास मांडणे अवघड आहे. थोडक्यात, इतिहासाचे प्रकार हे अभ्यासकांच्या गरजेनुसार व सोयीनुसार केले जातात. वेगवेगळ्या कसोट्यांवर केले. जातात मात्र ते काटेकोर नसतात. इतिहासाचे प्रकार खालील प्रमाणे पडतात.

### १) **राजकीय इतिहास** (Political History)

राजकीय सत्तेच्या स्थानात व स्वरूपात जी स्थित्यंतरे होतात ते सांगणारा इतिहास हा राजकीय इतिहासात असतो. प्रो. सिले यांनी इतिहास म्हणजे राजकीय इतिहासच होय, अशी भूमिका घेतली होती. एखाद्या देशाचा राजकीय इतिहास राजा त्याची अंतर्गत व परराष्ट्र धोरणे, प्रशासन, राजकीय पक्ष व नेते, संघटना या गोष्टी केंद्रस्थानी असतात.

राजकीय इतिहास हा इतिहासाचा अतिशय लोकप्रिय प्रकार आहे. प्राचीन काळापासून राजकीय घडामोडी, राजकीय संस्था व युद्ध हा इतिहासाचा केंद्रबिंदु राहिला आहे. पण अलीकडच्या काळात सामान्य माणूस हा केंद्रबिंदु बनत आहे. या इतिहास प्रकारात राष्ट्राभिमान व राष्ट्र निर्माण करण्याची ताकद असते. अशा प्रकारच्या इतिहासातून देशाचे भवितव्य घडविले जाते. तरूणांना देश उभारणीच्या कार्यामध्ये सामावून घेऊन त्यांच्या जीवनाला दिशा देण्याचा प्रयत्न केला जातो. हा इतिहास लिहिण्यासाठी राजकीय दस्तऐवज उपलब्ध असतो. हा इतिहास अधिकृत कागदपत्रावर लिहिलेला असल्यामुळे त्याला अतिशय महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. राजकीय इतिहासा संदर्भात प्रो. बॉर्नस म्हणतात, ''राजकीय इतिहास दोन कारणांसाठी महत्त्वाचा आहे, ती म्हणजे हेगेलच्या राज्य विषयी सिद्धांतांमुळे राष्ट्रवाद निर्माण होतो. हेगेलचे राज्य म्हणजे दैवी देणगी आहे, असे विचार मांडले. त्यामुळे राजकीय इतिहासाचे महत्त्व फार वाढले. या इतिहास प्रकाराची उणीव म्हणजे संकुचित व प्रादेशिक वृत्ती निर्माण होण्याचा शक्यता असते.

### २) **घटनात्मक इतिहास** (Constitutional History)

घटनात्मक इतिहास हा राजकीय इतिहासाचा भाग आहे. राजकीय इतिहासापासून घटनात्मक इतिहास हा सोईसाठी निर्माण केला आहे. प्रो. जी. एन. क्लार्क यांच्या मते, 'राजकीय इतिहास व घटनात्मक इतिहास' हे एकमेकांपासून अलग करता येत नाहीत. या इतिहास प्रकारात वेगवेगळ्या राजकीय संस्थांचा उगम, त्यांचा विकास याचा अभ्यास केला जातो. यात त्या देशाच्या घटनेचा अभ्यास, त्या देशाचे नागरिकत्व कसे मिळते, जनतेची मूलभूत हक्क व कर्तव्य कोणती, मालमत्तेचा हक्क, प्रांत व केंद्र सरकारच्या निर्मितीची रचना, संसदेची

रचना, कार्यपद्धती, न्यायदान पद्धती सार्वत्रिक निवडणुका आदि बाबींविषयी कायदेशीर माहिती मिळते. इंग्लंडच्या संसदेचा इतिहास हा जगातील कुठल्याही देशाला जर त्यांच्या देशात संसदीय शासन पद्धती सुरू करावयाची असल्यास मार्गदर्शक ठरतो.

**३) संसदीय पद्धतीची इतिहास** (Parliamentary History) :

हा घटनात्मक इतिहासाचाच भाग आहे. या इतिहास प्रकारात संसदीय पद्धतीच्या राज्यव्यवस्थेचा विचार स्वतंत्रपणे केला जातो. संसदेला वेगवेगळ्या देशात वेगवेगळी नावे आहेत. इंग्लंडमध्ये कनिष्ठ सभागृहाला 'हाऊस ऑफ कॉमन्स' व वरिष्ठ सभागृहाला 'हाऊस ऑफ लॉर्ड' असे म्हणतात. भारतात वरिष्ठ सभागृहाला राज्यसभा व कनिष्ठ सभागृहाला लोकसभा म्हणतात. याला द्विगृहीय संसदीय पद्धती असे म्हणतात. जगातील कोणत्याही देशात संसदीय पद्धती सुरू करावयाची असेल तर त्याला इंग्लंडच्या संसदेचा इतिहास मार्गदर्शक ठरतो. इंग्लंडच्या संसदेचे महत्त्व विशद करताना ब्रिटीश घटनातज्ञ म्हणतात, ''ब्रिटीश संसद एवढी सामर्थ्यशाली आहे की ती फक्त पुरूषाचे स्त्रीमध्ये व स्त्रीचे पुरूषामध्ये रूपांतर करू शकत नाही.''

**४) कायद्याचा इतिहास** (Legal History) :

हा घटनात्मक इतिहासाचाच भाग आहे. या इतिहास प्रकारात कायद्याचे मूळ शोधून त्याचा विकास कसा झाला याची माहिती असते. कायदे, राजकीय, धार्मिक, सामाजिक, आर्थिक स्वरुपाचे असतात. प्रत्येक समाजाला व राष्ट्राला अशा कायद्याचा वारसा असतो. कायद्याच्या अभ्यासातून त्या देशातील लोकांची मन:स्थिती काय होती हे समजू शकते. त्या देशाची सामाजिक आर्थिक स्थितीही स्पष्ट होऊ शकते. या प्रकारच्या इतिहासाचे लेखन करणाऱ्या इतिहासकाराला कायद्याचे ज्ञान तसेच कायद्याचा अर्थ लावण्याची क्षमता असावे लागते. त्याचे भाषेवर प्रभुत्व असावे लागते. कायद्याच्या इतिहासकाराने स्वत:चे भाष्य न करता कायद्याचा प्रवास वेगवेगळ्या काळात कसा झाला याचे विवेचन करावे. कायद्याच्या इतिहासाची आज अनेक ग्रंथ उपलब्ध आहेत. प्रो. मेटलॅण्ड यांचा 'दि कॉन्स्टिट्यूशनल हिस्ट्री ऑफ इंग्लंड' हा ग्रंथ जगातील कायदेपंडितांना मार्गदर्शक ठरला आहे.

**५) राजनैतिक इतिहास** (Diplomatic History) :

राजनैतिक इतिहास ही राजकीय इतिहासाची शाखा आहे. यात आंतरराष्ट्रीय संबंधामधील राजकीय तत्त्वे शोधली जातात. राजकीय पुढाऱ्यांची मुत्सद्देगिरी यातून लक्षात येते. दोन देशामधील राजकीय संबंध प्रस्थापित करीत असताना किंवा आहे ते संबंध टिकवत असताना त्या देशाच्या नेत्यांसमोर आलेल्या अडचणी व त्यांनी त्यावर मुत्सद्देगिरीने केलेली मात याची माहिती मिळते. या प्रकारच्या इतिहास लेखनातून सत्तासंतुलन, शीतयुद्ध, आंतरराष्ट्रीय करार, आंतरराष्ट्रीय संघटना इत्यादींवर प्रकाश टाकला जातो.

**६) लष्करी इतिहास** (Military History) :

लष्करी इतिहासात नाविक दलाचा इतिहास व हवाई दलाचा इतिहास याचाही समावेश होतो. इतिहासकार प्रत्येक युद्धामधून कोणती ना कोणती नीति तत्त्वे शोधून काढतात व ती समाजापुढे मांडतात. सर जदुनाथ सरकार यांनी 'मिलिटरी हिस्ट्री ऑफ इंडिया' या नावाचा ग्रंथ लिहिला आहे. लष्करी इतिहास हा युद्ध व युद्ध नीति, युद्ध तंत्र या भोवती केंद्रित झालेला असतो.

या प्रकारच्या इतिहासात लष्करी हालचाली, लष्करी डावपेच, भू-प्रदेशाची वैशिष्ट्ये, युद्ध भूमी, युद्ध तंत्र, युद्धात वापरली जाणारी शस्त्रे, सैन्य व्यवस्था, सेनापतीची भूमिका त्याची कामगिरी याचा अभ्यास केला जातो. लष्करातील हेर खाते अत्यंत महत्त्व पूर्ण असते. हे खाते वेगवेगळ्या मार्गांनी शत्रू पक्षाची माहिती जमा करत असते. या माहितीच्या आधारावरच लष्करी हालचाली होत असतात. या प्रकारच्या इतिहासामुळे युद्ध तंत्राचा विकासाचा इतिहास समजतो.

### ७) **वसाहतीचा इतिहास** (Colonial History)

वसाहतीचा इतिहास हा राजकीय इतिहासाचाच भाग आहे. सागरी मार्गाचा शोध व औद्योगिक क्रांती यामुळे युरोपियन राष्ट्रात वसाहती मिळवण्याची स्पर्धा सुरू झाली. त्यातून वसाहतवादाला चालना मिळाली. राजकारण, धर्म प्रसार, अतिरिक्त लोकसंख्या, कच्च्या मालाचा पुरवठा, पक्क्या मालाची हमखास बाजारपेठ इ. बाबीच्या पूर्ततेसाठी वसाहती मिळवल्या जाऊ लागल्या. व्यापार, प्रशासकीय व राजकीय गरजेसाठी वसाहतवादी राष्ट्रांनी वसाहतीचे इतिहास लिहिले. वसाहतीची संस्कृती चालिरीती, लोकांची, मानसिकता, धर्म, वसाहतीची आर्थिक स्थिती यांचा अभ्यास करून वसाहतीचे इतिहास लिहिले. अशा प्रकारच्या इतिहासातून अनेक प्रश्न ही निर्माण झाले आहेत. ते सोडवण्याचा प्रयत्न ही केला गेला. या इतिहासातून इतर लोकांना प्रेरणा मिळाली त्यातून अनेक धाडशी प्रयोग केले गेले. अनेक दर्यावर्दींना नवीन भू-प्रदेश शोधण्याची प्रेरणा मिळाली.

### ८) **वैचारिक इतिहास** (History of Thoughts) :

वैचारिक इतिहास हा समाजाच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचा इतिहासाचा विषय आहे. हा इतिहास तत्त्वज्ञान या विषयाला अतिशय जवळचा आहे. या इतिहासाच्या महत्त्वा संबंधात सॅम्युअल जॉन्सन म्हणतात, ''बौद्धिक इतिहासाशिवाय मानवी मनाची झालेली प्रगती, त्याच्या विचारसरणीमधील सुधारणा, मानवाची विद्वत्ता, शास्त्रांची प्रगती समजणे शक्य नसते.'' थोडक्यात, प्रत्येक काळात एखादी विचारसरणी किंवा एखादा विचार पुढे येत असतो त्यामुळे संपूर्ण समाजाच्या धारणा बदलत असतात. त्यामुळे समाज जीवन सुसह्य होत असते. इतिहास प्रक्रियेबाबत जे विचार मांडले जातात त्यातून इतिहासाचे तत्त्वज्ञान तयार होते. ''सर्व इतिहास हा विचारांचा इतिहास आहे'' असे विधान कॉलिंगवूड याने मांडले आहे. त्याच्या या विधानावरून आपणास वैचारिक इतिहासाचे महत्त्व लक्षात येते.

### ९) **धार्मिक इतिहास** (Religious History) :

धार्मिक इतिहास हा इतिहासाचा एक प्रकार आहे. धार्मिक इतिहासात फक्त धर्माचाच अभ्यास होतो असे नाही, धर्माच्या अभ्यासाबरोबरच तात्कालीन समाजकारण, अर्थकारण, समाजातील रूढी परंपरा, याचा विचार होणे अपरिहार्य आहे. उदाहरणार्थ, ख्रिश्चन धर्मसंस्थेचा इतिहास पाहताना या धर्मसंस्थेचा राजकीय सामाजिक व आर्थिक जीवनावर पडलेला प्रभाव पाहावा लागतो. बौद्ध व जैन या धर्माचा अभ्यास करताना या धर्माच्या तत्त्वज्ञानाचा राजनीति, भौतिक जीवनावर पडलेला प्रभाव अभ्यासावा लागतो.

ज्या युगात जी धर्म भावना प्रबळ असते त्याचाच विचार धार्मिक इतिहासात केला जातो. धार्मिक इतिहास म्हणजे धर्माचा इतिहास नव्हे असे प्रो. जी. रेनियर म्हणतात. हा इतिहास प्रकार हा सामाजिक इतिहासापेक्षा राज्यशास्त्राच्या जवळचा आहे. उदा. रोमच्या धर्म संस्थेचा इतिहास हा राजनैतिक किंवा

लष्करी इतिहासापासून वेगळा करता येणार नाही. मात्र आपल्या देशाच्या दृष्टीने विचार केल्यास धर्मशास्त्राचा इतिहास हा समाजशास्त्रास जास्त जवळ वाटतो. पां. वा. काणे यांच्या धर्मशास्त्राचा इतिहास हा भारताच्या समाजजीवनाशी निगडीत असल्याचे दिसून आले आहे. मात्र १९४५ नंतर जगामध्ये विविध क्षेत्रात मोठ्या प्रमाणात विकास झाला. निधर्मी तत्त्वज्ञानाचा प्रसार झाला तरी अधून-मधून धर्म ही संकल्पना डोके वर काढत असते.

**१०) सामाजिक इतिहास** (Social History)

माणूस हा समाजप्रिय प्राणी आहे. ब्लॉक या इतिहासकाराच्या मते, सामाजिक इतिहास हाच सर्वार्थाने मानवाचा इतिहास असतो. सामाजिक इतिहासात समाजाच्या जगण्याच्या पद्धती, आहार, विहार, सवयी, चालीरीती इ. चा समावेश होतो. टॉयन्बीच्या मते, इतिहासाच्या लेखन प्रकारात समाज व व्यक्ती हे दोनच घटक महत्त्वाचे असतात. त्यामुळे इतिहासाला एक सामाजिक शास्त्र म्हणून मान्यता मिळालेली आहे. समाज व संस्कृती इतिहासाचे अविभाज्य भाग आहेत. सामाजिक इतिहास अधिक लोकप्रिय बनवण्याचे श्रेय ट्रिव्हेलियन या ब्रिटीश इतिहासकाराला आहे. त्याचा 'सोशल हिस्ट्री ऑफ इंग्लंड' हा ग्रंथ विशेष महत्त्वाचा आहे.

या इतिहास प्रकाराची व्याप्ती फार मोठी आहे. मानवाची प्रगती रानटी अवस्थेपासून आज पर्यंत कशी होत गेली याचे चित्रण सामाजिक इतिहासात केले जाते. या इतिहासात मानवाचे विचार त्याचे कार्य, त्याचे दैनंदिन जीवन, त्यांच्या श्रद्धा, अन्न, वस्त्र, पोशाख, करमणुकीची साधने, खाजगी जीवन, उत्सव, विविध सामाजिक संस्था, यांचा संबंध असतो. तसेच समाज प्रबोधनाचा अभ्यासही या इतिहास प्रकारात केला जाते. थोडक्यात, या इतिहास प्रकारात समाजाचे यथार्थ चित्रण येते.

**११) सांस्कृतिक इतिहास** (Cultural History) :

मानवी संस्कृती ही इतिहासाचा अविभाज्य भाग आहे. सांस्कृतिक इतिहास ही इतिहासाची महत्त्वाची शाखा आहे. यात अश्मयुगापासून वर्तमान काळापर्यंतच्या मानवी संस्कृतीचा समावेश होतो. संस्कृतीमध्ये सामाजिक आर्थिक, सामाजिक, आदी सर्व बाबीचा समावेश होतो. संस्कृती म्हणजे मानवी समाजाने आपल्या परिसराशी साधलेला काल सापेक्ष संवाद होय! सांस्कृतिक इतिहासाची निश्चित व्याख्या करणे अवघड आहे. यात धर्म, विविध पंथ, परंपरा, कला, संगीत, नृत्य, रूढी, नीतिमूल्य, इ. सर्व गोष्टीचा समावेश करता येतो.

ज्या विचारांमुळे व संस्थांमुळे मानवाच्या चारित्र्याला व श्रद्धेला वळण लागते त्याला सांस्कृतिक इतिहास म्हणतात. हा मानवी मनाचा व स्वभावाचा इतिहास होय! ज्या काळात जो विचार प्रभावशाली असतो त्या विचाराभोवती संस्कृतीची गुंफण होत असते. त्यामुळे या इतिहासात तत्कालीन समाज जीवन, आर्थिक जीवन, कला, साहित्य, तत्त्वज्ञान, अन्न, वेषभूषा, केशभूषा, करमणूक, न्याय, कायदा, मानवी चारित्र्य, त्यांच्या श्रद्धा, स्थापत्य, जीवन जगण्याच्या पद्धती यांचा अंतर्भाव होतो. मानवाच्या सांस्कृतिक जीवनाचा आलेख यात मांडला जातो. मानवाने आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी अनेक साधनांची निर्मिती केली त्याचा एकत्रित प्रभाव म्हणजे संस्कृती होय! सांस्कृतिक इतिहासात घटनेपेक्षा विचार, संकल्पना या वर भर दिला जातो.

मानवी जीवनाचा अभ्यास म्हणजे प्रामुख्याने संस्कृतीचाच अभ्यास होय हे मूळ सूत्र पकडून अरनॉल्ड टॉयन्बी यांनी इतिहासाचे विवेचन केले आहे. 'A Study of History' चे बारा खंड त्यांनी लिहिले आहे.

संस्कृतीचा उदय विकास व विनाश याचे तर्कशुद्ध विवेचन टॉयन्बी यांनी केले आहे. संस्कृतीच्या विकासाच्या संदर्भात त्यांनी (Challenge and Response Theory) 'आव्हान व प्रतिसाद सिद्धांत' मांडला आहे. त्यानुसार निरनिराळ्या आव्हानांना सामोरे जातच संस्कृती विकसित होते असे टॉयन्बीचे म्हणणे होते.

**१२) आर्थिक इतिहास** (Economic History) :

इतिहासाच्या या प्रकारास आज जागतिकीकरणामुळे विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. या इतिहास प्रकारात प्रथम कोण-कोणत्या कालखंडाचा विचार करावयाचा हे प्रथम ठरवावे लागते. त्या नंतर शेती व्यापार, उत्पादनाची साधने, तंत्रज्ञान, वितरण व्यवस्था, अयात निर्यात, सागरी व्यापार, वस्तू निर्मितीची ठिकाणे इत्यादिंचा सखोल अभ्यास केला जातो. या इतिहास प्रकारातून तत्कालीन समाजाचे आर्थिक जीवनाचे चित्र उभे करता येते. व्यक्ती, समाज व राष्ट्र यांचा खरा इतिहास आर्थिक प्रगतीतून होतो. भरतात डी. डी. कोसंबी, आर. एस. शर्मा, डॉ. इरफान हबीब, एस. एस. सेन यांनी भारताच्या इतिहासाची आर्थिक मांडणी केली आहे. कार्ल मार्क्स याने मानवी इतिहास म्हणजे 'आहे रे व नाही रे' गटातील संघर्ष असल्याचे स्पष्ट करून आर्थिक दृष्टिकोनातून इतिहासाची मांडणी केली.

**१३) भौगोलिक इतिहास** (Geographical History) :

नैसर्गिक परिस्थिती व मानवी जीवन पद्धती यांचा जवळचा संबंध असतो. माणसाच्या शरीराची ठेवण, त्याच्या कर्तृत्वाची क्षेत्रे, त्याच्या सामर्थ्याच्या मर्यादा, स्वभाव वैशिष्ट्ये भूगोलावर अवलंबून असतात. भूमी व हवामान यांचा मानवी जीवनावर परिणाम होतो. काल व प्रदेश यांच्या संदर्भातील मानवाच्या गरजा पूर्ण करण्याचे कार्य इतिहास व भूगोल करीत असतात. भूगोलाचा इतिहासावर मोठा प्रभाव पडत असतो. इतिहासावर परिणाम करणारे भौगोलिक घटक म्हणजे समुद्र, बंदरे, व्यापार, आक्रमणांचे मार्ग, व्यापारी ठिकाणे, युद्ध भूमी इत्यादिंच्या विचार इतिहासात करावा लागतो. स्थल व काल याच्या संबंधानेच इतिहास लेखन करावे लागते. भौगोलिक वर्णनाशिवाय इतिहास म्हणजे निव्वळ कथा कथन ठरते. म्हणजेच स्थळ म्हणजे भूगोल व काल म्हणजे इतिहास असे सोपे समीकरण आपणाला जोडता येते.

**१४) समकालीन इतिहास** (Contemporary History) :

हा इतिहास प्रकार समकालीन राजकारणाशी निगडीत आहे. या प्रकारच्या इतिहासाचे लेखनही कागद पत्राच्या आधारेच करावे लागते. मात्र हे लेखन करताना प्रचलित साधने चिकित्सा करूनच वापरावी लागतात. या साधनामध्ये मुलाखती, वृत्तपत्रे, रेडिओ, टेलिव्हिजन, इंटरनेट, संसदीय कागदपत्रे, समकालिन ग्रंथ, नियतकालिके, सर्वेक्षण, सार्वजनिक कागदपत्रे, नव्याने सापडलेली कागदपत्रे व नवा विचार याचा विचार करावा लागतो. कारण ही साधने वादग्रस्त असू शकतात. तेव्हा समकालीन कागद पत्राचा बारकाईने विचार करून त्या मधून विश्वसनीय विचार मांडणे ही इतिहासकारांवर फार मोठी जबाबदारी असते.

**१५) जगाचा इतिहास** (World History) :

जगाचा इतिहास हा इतिहास लेखनाचा आधुनिक प्रकार आहे. जागतिक इतिहास लेखनामुळे जागतिक, आंतरराष्ट्रीय घटना त्याचे मानवी जगावर झालेले परिणाम याचा 'वसुधैव कुटुंबकम' या दृष्टीने विचार होऊ लागला आहे. राष्ट्र संघ, संयुक्त राष्ट्र संघ, इ. सारख्या संघटनांमुळे प्रत्येक मानव हा फक्त देशाचा नागरिक

न राहता  तो जगाचा नागरिक बनला आहे. या संघटना मानव कल्याणाचा विचार करतात. सर वॉल्टर रेले यांनी जागतिक इतिहासाच्या दृष्टीने सर्व प्रथम प्रयत्न केले. प्रो. एल्टन या बाबतीत म्हणतात, ''सर्व उत्तम ऐतिहासिक लेखन म्हणजे जागतिक इतिहासच असतो, कारण जगाच्या एका भागाचा अभ्यास करताना देखील जगाचा विचार करावाच लागतो.'' म्हणजे आपण कोणत्याही देशाच्या इतिहासाबद्दल विचार करताना आपण जगापासून अलिप्त राहू शकत नाही. 'History of Civilization' हा विल ड्यूरंट यांचा ग्रंथ जागतिक इतिहास लेखनाचे उत्तम उदाहरण आहे,

या इतिहास प्रकारात जगाचा इतिहास मांडला जातो. पण जगाचा इतिहासाचा आवाका फार मोठा होतो. तेव्हा जगावर परिणाम करणाऱ्या निवडक घटनांचा इतिहास मांडण्याचा प्रयत्न या इतिहास प्रकारात केला जातो. आज अनेक कारणांनी जग जवळ येत आहे. जागतिकीकरणाच्या प्रवाहामुळे कोणत्याही एका देशाचा, प्रदेशाचा किंवा खंडाचा एकाकी विचार करणे अशक्य होत आहे. कारण या देशांचे हितसंबंध एकमेकांशी जोडलेले असतात. एखाद्या देशामध्ये एखादी घटना घडली तर तिचा परिणाम संबंधित विविध देशावर होत असतो. जगाच्या इतिहासात मानववंशाचा विचारांचे व भावनांचे प्रतिबिंब असेल.

जगाचा इतिहास ही तुलनात्मक दृष्टीने नवी कल्पना आहे. त्यामध्ये राष्ट्रीय विचारसरणीला बाजूला सारून जागतिक बदलासाठी अनेक राष्ट्रानी केलेल्या योगदानाचा विचार केला जातो. जगाच्या इतिहासात मानव जातीची भूमिका श्रेष्ठ ठरली आहे.

**१६) स्थानिक इतिहास व प्रादेशिक इतिहास** (Local and Regional History) :

स्थानिक व प्रादेशिक इतिहासाचा विचार करण्यापूर्वी 'स्थानिक व प्रादेशिक' या संकल्पना स्पष्ट करणे आवश्यक आहे. स्थानिक इतिहास हा प्रादेशिक इतिहासाचा अधिक सूक्ष्म प्रकार म्हणता येईल. कारण अनेक गावांचा स्थानिक इतिहास मिळूनच त्या प्रदेशाचा इतिहास तयार होत असतो. त्यामुळे प्रादेशिक इतिहास ही संज्ञा तशी लवचिक म्हणता येईल. प्रादेशिक इतिहासात त्या-त्या प्रदेशाचे वैशिष्ट्य प्रतिबिंबित होते तर स्थानिक इतिहास हा त्या-त्या स्थानाचे प्रतिनिधित्व करत असतो.

स्थानिक इतिहासाला प्रादेशिक विभागाचा पोट विभाग म्हणता येईल. गेल्या ५०-६० वर्षांमध्ये स्थानिक इतिहास ही पाश्चात्य देशात रूढ झालेली इतिहासाच्या क्षेत्रातील एक सर्वमान्य संकल्पना आहे. स्थानिक इतिहासाच्या साह्याने सर्वांगीण राष्ट्रीय इतिहास लिहिला जाऊ शकतो. स्थानिक इतिहास हा राष्ट्रीय इतिहासाचाच एक भाग असतो. रिनियर म्हणतो की, स्थानिक इतिहास हा अशा पद्धतीने लिहिला पाहिजे की तो देशाच्या इतिहासामध्ये चपखल बसला पाहिजे.

स्थानिक इतिहासात प्रामुख्याने गाव, शहर, किंवा संस्थानाचा विचार केला जातो. संबंधित स्थानाविषयी सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, इत्यादिंची सूक्ष्म सखोल माहिती या इतिहास प्रकारातून मिळते. स्थानिक माहिती मिळवण्यासाठी  या प्रकारचा इतिहास  फार उपयोग होतो.

**१७) वंचितांचा इतिहास** (Subaltern History) :

वंचितांचा इतिहास किंवा सबाल्टर्नवाद या संकल्पनेचा उदय इंग्लंडमध्ये उदयास आलेल्या 'हिस्ट्री फ्रॉम

बिलो' या लेखन प्रवाहातून झाला आहे. भारतात डॉ. रणजीत गुहा यांनी सबाल्टर्न स्टडीज या प्रकल्पाच्या माध्यमातून वंचितांचा इतिहास म्हणून एक स्वतंत्र लेखन प्रवाह रूढ केला. समाजाच्या तळागळातील सत्तेपासून दूर असलेल्या लोकांची माहिती करून घेतल्याशिवाय तात्कालीन इतिहासाचे सम्यक ज्ञान दर्शन होणार नाही ही धारणा या विचार प्रणालीमागे आहे. हा आधुनिक इतिहास लेखनातील नवा विचार प्रवाह आहे. या इतिहासाने सर्वसामान्य लोकांची नोंद घेतली आहे. सबाल्टर्न या शब्दाचा अर्थ कनिष्ठ दर्जाचे किंवा श्रेणीचे लोक असा होतो.

**१८) मौखिक इतिहास** (Oral History) :

मौखिक इतिहास म्हणजे इतिहास घडवण्यात वाटा असलेल्यांच्या मुखातून ऐकलेला आणि नंतर शब्दबद्ध करण्यात आलेला इतिहास होय! इ.स. १९७० ते १९८० या दशकात ब्रिटनमध्ये या प्रकारास मान्यता मिळाली. 'ओरल हिस्ट्री' या नावाचे एक नियतकालिक इंग्लंड मधून प्रसिद्ध केले जाऊ लागले. भारतात मात्र अगदी १९८७ पर्यंत मौखिक इतिहासाला समकालीन इतिहासाचे एक उपयुक्त व विश्वसनीय साधन म्हणून मान्यता मिळालेली नव्हती. मौखिक इतिहासामध्ये आख्यायिका, परंपरा, ऐतिहासिक म्हणी, ऐतिहासिक पोवाडे व काव्य यांचा समावेश होतो. तसेच एखाद्या चळवळीत सहभागी असणाऱ्या व्यक्तींच्या मुलाखती या पण मौखिक इतिहासाचा एक महत्त्वाचा भाग असतो. उदा. दलित चळवळीत कार्य केलेल्या स्त्रियांचा इतिहास उर्मिला पवार व मीनाक्षी मून यांनी 'आम्हीही इतिहास घडवला' हे पुस्तक लिहिले.

**१९) स्त्रियांचा इतिहास** (Women History) :

आजवरचा इतिहास हा पुरुष केंद्रित आहे. मानवाच्या आतापर्यंतच्या वाटचालीत स्त्रियांचा वाटा महत्त्वाचा आहे. पण त्यांच्या योगदानाची दखल पुरुष केंद्रित इतिहासाने घेतली नाही. परिणाम मानवी इतिहासाचे स्त्रीवादी दृष्टीकोनातून पुनर्लेखन झाले पाहिजे अशी स्त्रीवादी इतिहासकारांची भूमिका आहे. व या भूमिकेतूनच स्त्रीवादी इतिहास लेखनाला सुरुवात झाली. हा इतिहास लेखन प्रवाह पुरूषसत्ताक व्यवस्थेत हरवलेल्या स्त्रीचे मनुष्यत्त्व तिला पुन्हा प्राप्त करून देण्याचा प्रयत्न करतो व स्त्री पुरुष समानतेचा आग्रह धरतो.

वरील विवेचनावरून हे लक्षात येते की इतिहासाचे प्रकार कोणत्याही ताठर तत्त्व रचनेवर केले नाहीत त्यामागे अभ्यासकाची गरज व सोय हे तत्त्व आहे हे लक्षात येते.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न–३**

अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) बोअर यांनी इतिहासाचे विभाजन कोणत्या चार प्रकारात केले आहे?

२) कोणत्या इतिहास प्रकारात समकालीन कागदपत्राचा बारकाईने अभ्यास करावा लागतो?

३) राजकीय घडामोडीचा व संस्थांचा अभ्यास कोणत्या इतिहास प्रकारात केला जातो?

४) कोणत्या इतिहास प्रकारामुळे मानवाच्या चरित्राला व श्रद्धेला वळण लागते?

५) कोणत्याही देशात संसदीय शासन पद्धती सुरू करावयाची असल्यास कोणत्या देशाचा घटनात्मक इतिहास मार्गदर्शक ठरू शकतो?

ब) रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा

१) इतिहासाचे अभ्यासक हे इतिहासाचे प्रकार त्यांच्या ............ नुसार करतात.

अ) गरज व सोय — ब) महत्त्वानुसार

क) वरिष्ठांच्या आदेशानुसार — ड) आवडीनुसार

२) इतिहासाच्या ............ प्रकारात राष्ट्राभिमान व राष्ट्र निर्माण करण्याची ताकद आहे.

अ) राजकीय — ब) सामाजिक

क) आर्थिक — ड) स्थानिक

३) ............ इतिहास लिहित असताना इतिहासकाराला कायद्याचे ज्ञान आवश्यक आहे.

अ) राजकीय — ब) सामाजिक

क) आर्थिक — ड) कायद्याचा

४) ............ इतिहास प्रकार तत्त्वज्ञानाला जवळच आहे.

अ) राजकीय — ब) वैचारिक

क) भौगोलिक — ड) सामाजिक

५) समाजाचे यथार्थ चित्रण इतिहास............. प्रकारात केले जाते.

अ) राजकीय — ब) कायद्याचा

क) सामाजिक — ड) सांस्कृतिक

६) ........ इतिहास प्रकारामुळे मानवाच्या चरित्राला व श्रद्धेला वळण मिळते.

अ) सामाजिक — ब) राजकीय

क) सांस्कृतिक — ड) भौगोलिक

७) मानवाच्या सांस्कृतिक जीवनाचे रेखाटन ............... इतिहास प्रकारात केले जाते.

अ) सांस्कृतिक — ब) स्थानिक

क) राजकीय — ड) भौगोलिक

८) स्थानिक माहिती मिळवण्यासाठी ................. इतिहास प्रकार उपयोगी आहे.

अ) स्थानिक इतिहास — ब) भौगोलिक

क) सांस्कृतिक इतिहास — ड) आर्थिक इतिहास

## १.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१) मिथक : पुराणकथा

२) आयाम : बाजू

३) परिवर्तनशील : बदल होऊ शकणारा

४) वस्तुनिष्ठ : जसे आहे तसे मांडणे

५) सद्सदविवेकबुद्धी : तर्काच्या आधारावर एखाद्या गोष्टीचे मूल्यमापन करता येणे.

६) शाश्वत मूल्य : जे कधीही नष्ट होणार नाहीत असे चिरंतन मूल्य

## १.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

**स्वयं अध्ययन प्रश्न-१**

अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) असे घडले, अशा प्रकारे घडले

२) हीरोडोटस

३) हीरोडोटस

४) फ्रान्सिस बेकन

५) प्रो. इ. एच. कार

ब) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.

१) हिक्यॅटिअस

२) विश्व नियंत्याचा हेतू व कर्तृत्व कथेद्वारा सांगणे

३) साहित्य

४) प्रो. इ. एच. कार

५) प्रो. इ. एच. कार

**स्वयं अध्ययन प्रश्न-२**

अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) ऐतिहासिक घटनात साम्य असते

२) लॉर्ड ॲक्टन

३) रान्के व ब्यूरी

४) बेनेडेट्टो क्रोचे

५) हीरोडोटस

ब) रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा.

१) सुसंस्कृत

२) मानव्यशास्त्राची

३) वास्तव

४) गार्डिनर

५) मानव समाज

६) सलिकी

७) ट्रिव्हेलियन

**स्वयं अध्ययन प्रश्न-३**

अ) एका वाक्यात उत्तरे लिहा

१) वर्णनात्मक, तत्त्वाधिष्ठित, सामाजिक आणि वांशिक

२) समकालीन इतिहास ३) राजकीय इतिहास ४) सांस्कृतिक ५) इंग्लंड

ब) रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा.

१) गरज व सोय २) राजकीय ३) कायद्याचा ४) वैचारिक

५) सामाजिक ६) सांस्कृतिक ७) सांस्कृतिक ८) स्थानिक

## १.५ सारांश

इतिहास म्हणजे काय? इतिहासाचे स्वरूप कसे आहे? इतिहासाच्या आकलनामध्ये काळानुरूप कसे बदल होत गेले? आधुनिक काळातील इतिहासाची बदलती संकल्पना कशी आहे? याची ओळख या प्रकरणात आपणास झाली आहे. मानवी प्रगतीमध्ये इतिहासाने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. इतिहास मानवाच्या सर्वांगीण बाबीचा त्याच्या विकासाचा विचार करतो. मानवनिर्मित सर्व गोष्टींचा अभ्यास या विषयात येत असल्यामुळे त्याची व्याप्ती फार मोठी आहे. त्यामुळे इतिहासाचे विविध प्रकार पडले आहेत. मानवाने हे प्रकार त्याच्या हेतुनुसार व गरजेनुसार केले आहेत. इतिहासाची व्याप्ती मोठी आहे. आज मानवाने आपले जीवन सुसह्य करण्यासाठी ज्या-ज्या कृती केल्या त्याचा अभ्यास स्वतंत्र शाखेत केला जात आहे. त्यातूनच समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, धर्मशास्त्र, अशा शाखा विकसित होत गेल्या. आज त्यात आणखी भर पडत आहे. इतिहास मानवी जीवनाच्या प्रत्येक पैलूचा अभ्यास करतो. मानवी जीवनाच्या विशिष्ट पैलूचा अभ्यास करताना इतिहासाचे विविध प्रकार निर्माण झाले आहेत. हे अभ्यास करताना इतिहासकार आपल्या सोईनुसार इतिहासाचे प्रकार निश्चित करतात.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय :

अ) दीर्घोत्तरी प्रश्न

१) इतिहासाच्या व्याख्या सांगून त्याचे स्वरूप स्पष्ट करा.

२) इतिहासाचे स्वरूप स्पष्ट करून त्याच्या व्याप्तीची चर्चा करा.

३) इतिहासाच्या विविध प्रकाराची माहिती द्या.

ब) टिपा लिहा.

१) इतिहासाचे स्वरूप

२) इतिहासाच्या महत्त्वपूर्ण व्याख्या

३) इतिहासाची व्याप्ती

४) राजकीय इतिहास

५) सामाजिक इतिहास

६) सांस्कृतिक इतिहास

**१.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ**


१) कोठेकर, शांता, इतिहास तंत्र आणि तत्त्वज्ञान, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

२) सातभाई, श्रीनिवास, इतिहास लेखनशास्त्र, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद.

३) गाठाळ, एम. एस., इतिहास लेखनशास्त्र, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद.

४) गोखले, शोभना, प्राचीन भारतीय इतिहासाची साधने, प्रकाशक डॉ. उमेश केसकर, कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

५) गद्रे, प्रभाकर, इतिहास लेखनाच्या परंपरा, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

६) आठवले, सदाशिव, इतिहासाचे तत्त्वज्ञान, प्रज्ञा पाठशाळा, वाई.

७) सरदेसाई, बी. एन., इतिहास लेखन परिचय, फडके प्रकाशन कोल्हापूर.


❑❑❑

**घटक २**

# इतिहासातील प्रमुख प्रवाह

# (Major Trends in History)


२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

    २.१.१ साम्राज्यवादी (Imperialist)

    २.१.२ राष्ट्रवादी (Nationalist)

    २.१.३ मार्क्सवादी (Marxist)

२.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

२.४ स्वय-अध्ययन प्रश्न व प्रश्नांची उत्तरे

२.५ सारांश

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ संदर्भ ग्रंथ व अधिक वाचनसाठीची पुस्तके


## २.० उद्दिष्टे

१) भारतीय इतिहास लिहिण्याच्या साम्राज्यवादी, राष्ट्रवादी आणि मार्क्सवादी परंपरा नेमक्या काय आहेत, हे समजेल.

२) इंग्रज इतिहासकारांनी स्वतःची सत्ता योग्य ठरवण्यासाठी भारतीय इतिहासाबद्दल कसे चुकीचे मत मांडले, याची माहिती मिळेल.

३) भारतीय इतिहासकारांनी आपल्या देशाचा गौरवशाली इतिहास समोर आणून लोकांमध्ये आत्मविश्वास कसा निर्माण केला, हे कळेल.

४) इतिहास म्हणजे केवळ युद्धे नसून पैसे, कामधंदा आणि सामान्य माणसाचे कष्ट यांचा समाजावर कसा परिणाम होतो, हे समजेल.

५) कोणत्याही इतिहासकाराने लिहिलेली माहिती ही कोणत्या विचारातून आली आहे आणि त्यात काय उणिवा असू शकतात, हे ओळखता येईल.

६) राजा-महाराजांशिवाय शेतकरी, मजूर आणि सामान्य जनता सुद्धा इतिहासाचे महत्त्वाचे भाग आहेत, हे त्यांना पटवून देता येईल.

**२.१ प्रास्ताविक:**

इतिहास म्हणजे केवळ घडून गेलेल्या घटनांची जंत्री नसून, त्या घटनांकडे पाहण्याचा एक विशिष्ट दृष्टिकोन असतो. इतिहासातील प्रमुख प्रवाह हा घटक अभ्यासत असताना आपल्याला प्रामुख्याने हे समजून घ्यायचे आहे की, इतिहास कोणाकडून आणि कोणत्या हेतूने लिहिला गेला. भारतीय इतिहासाच्या आधुनिक कालखंडातील लेखनावर नजर टाकली, तर आपल्याला तीन महत्त्वाचे वैचारिक प्रवाह प्रकर्षाने जाणवतात: साम्राज्यवादी, राष्ट्रवादी आणि मार्क्सवादी. ब्रिटीश राजवटीच्या काळात जेव्हा भारतात आधुनिक शिक्षण पद्धती सुरू झाली, तेव्हा सर्वप्रथम साम्राज्यवादी इतिहासलेखन अस्तित्वात आले. ब्रिटीश अधिकारी आणि इतिहासकारांनी लिहिलेला हा इतिहास भारतापेक्षा ब्रिटिशांच्या महानतेचे दर्शन घडवणारा होता. भारतीयांना स्वतःचा इतिहास नाही, ते कायम मागास राहिले आहेत आणि इंग्रजांमुळेच भारताची प्रगती होत आहे, असा एक विशिष्ट पूर्वग्रह या लेखनामागे होता. या इतिहासलेखनाने भारतीयांच्या मनात स्वतःच्या संस्कृतीबद्दल न्यूनगंड निर्माण करण्याचे काम केले. या साम्राज्यवादी टीकेला उत्तर देण्यासाठी एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात राष्ट्रवादी इतिहासलेखन उदयाला आले.

भारतीय इतिहासकारांनी प्राचीन ग्रंथ, शिलालेख आणि साधनांचा अभ्यास करून जगाला हे दाखवून दिले की, भारत कधीही मागास नव्हता. उलट, प्राचीन काळात भारत हे ज्ञानाचे केंद्र होते. या प्रवाहाने भारतीयांच्या मनात आत्मसन्मानाची ज्योत पेटवली आणि स्वातंत्र्यलढ्याला एक भक्कम वैचारिक बैठक प्राप्त करून दिली. विसाव्या शतकात इतिहासाकडे पाहण्याचा आणखी एक प्रगत दृष्टिकोन समोर आला, तो म्हणजे मार्क्सवादी इतिहासलेखन. या प्रवाहाने इतिहास म्हणजे केवळ राजांच्या लढाया ही चौकट मोडीत काढली. कार्ल मार्क्सच्या विचारांवर आधारित या परंपरेने आर्थिक घटक आणि वर्गसंघर्ष यांना इतिहासाच्या केंद्रस्थानी आणले. समाजात उत्पादन कसे होते? जमिनीची मालकी कोणाकडे होती? आणि सामान्य शेतकरी किंवा मजुरांचे जीवन कसे होते? या प्रश्नांचा शोध मार्क्सवादी इतिहासकारांनी घेतला.

या प्रकरणाचा अभ्यास करताना आपल्याला केवळ माहिती मिळवायची नाही, तर इतिहास कसा बदलत गेला आणि वेगवेगळ्या विचारसरणींनी त्याला कसे वळण दिले, याचा चिकित्सक शोध घ्यायचा आहे. या घटकामुळे इतिहासाची वस्तुनिष्ठ मांडणी करण्याची आणि विविध लेखन पद्धतींमधील फरक ओळखण्याची दृष्टी प्राप्त होईल.

**विषय विवेचन**

## २.१.१ साम्राज्यवादी इतिहासलेखन:

इतिहासलेखन ही केवळ घटनांची नोंद नसून, ती एका विशिष्ट विचारसरणीचा आरसा असते. भारतीय इतिहासलेखनाच्या प्रवासात साम्राज्यवादी इतिहासलेखन हा एक अत्यंत प्रभावी आणि वादग्रस्त टप्पा मानला जातो. अठराव्या शतकाच्या अखेरीस जेव्हा ईस्ट इंडिया कंपनीने भारताच्या मोठ्या भूभागावर आपली राजकीय पकड घट्ट केली, तेव्हा त्यांना या सत्तेला केवळ शस्त्राच्या बळावर नव्हे, तर बौद्धिक आणि नैतिक अधिष्ठानावर टिकवून ठेवण्याची गरज भासू लागली. सुरुवातीच्या काळात पौर्वात्यवादी इतिहासकारांनी भारतीय संस्कृतीचे काही प्रमाणात कौतुक केले होते, मात्र साम्राज्यवादी आकांक्षा वाढीस लागताच हा प्रवाह क्षीण झाला. इंग्रजांना हे सिद्ध करायचे होते की, भारतीय लोक स्वतःचे शासन करण्यास अक्षम आहेत आणि ब्रिटिशांचे राज्य हे त्यांच्यासाठी शाप नसून एक वरदान आहे. या गरजेतूनच साम्राज्यवादी इतिहासलेखनाचा जन्म झाला. या प्रवाहाने भारतीय समाजाला मागासलेला, गतिहीन आणि रानटी ठरवून ब्रिटीश सत्तेचे समर्थन केले. जेम्स मिल, हेन्री इलियट आणि व्हिन्सेंट स्मिथ यांसारख्या लेखकांनी या विचारसरणीचा पाया रचला, ज्याचा प्रभाव भारतीय राजकारण आणि समाजमनावर दीर्घकाळ राहिला.

### १) साम्राज्यवादी इतिहासलेखनाची संकल्पना:

साम्राज्यवादी इतिहासलेखन ही केवळ ऐतिहासिक नोंदींची पद्धत नसून, ती प्रामुख्याने ब्रिटिश राजवटीच्या राजकीय सत्तेला न्याय्य ठरवणारी एक बौद्धिक संरक्षण भिंत होती. या संकल्पनेचा गाभा 'युरोकेंद्री' मानसिकतेत दडलेला आहे. या विचारसरणीनुसार, जगाच्या इतिहासाचा केंद्रबिंदू केवळ युरोप असून, पाश्चात्य संस्कृती, ख्रिश्चन धर्म आणि तेथील शासनप्रणाली हीच जगातील सर्वोच्च व आदर्श व्यवस्था मानली गेली. या इतिहासलेखकांनी भारताची मांडणी करताना असा जाणीवपूर्वक दावा केला की, भारताला स्वतःचा कोणताही गौरवशाली इतिहास नाही. त्यांच्या मते, ब्रिटिशांच्या आगमनापूर्वीचा भारत हा केवळ अंधकार, अज्ञान आणि यादवीने ग्रासलेला देश होता. भारतीयांना लोकशाहीची मूल्ये, कायद्याचे राज्य आणि सुशासनाचे तंत्र माहितच नव्हते आणि ते केवळ इंग्रजांच्या कृपाप्रसादामुळेच मिळाले, असा खोटा तर्क या लेखनातून मांडला गेला. या संकल्पनेच्या केंद्रस्थानी 'पांढऱ्या माणसाचे ओझे' हा वंशवादी सिद्धांत होता. यानुसार, आशियाई आणि आफ्रिकी देशांतील अडाणी व मागास लोकांना सुसंस्कृत करणे, ही ईश्वराने गोऱ्या लोकांवर सोपवलेली एक नैतिक जबाबदारी असल्याचे भासवले गेले.

### २) साम्राज्यवादी इतिहासलेखनाचा उदय व विकास :

भारतीय इतिहासलेखनाच्या परंपरेत साम्राज्यवादी प्रवाहाचा उदय ही कोणतीही आकस्मिक घटना नव्हती, तर तो ब्रिटीश सत्तेच्या राजकीय महत्त्वाकांक्षेचा एक भाग होता. या विकासाचा आढावा आपण खालील तीन प्रमुख टप्प्यांत घेऊ शकतो:

१८ व्या शतकाच्या उत्तरार्धात प्लासी (१७५७) आणि बक्सार (१७६४) च्या लढायांनी भारताच्या

इतिहासाला कलाटणी दिली. या विजयांमुळे ईस्ट इंडिया कंपनी केवळ एक व्यापारी संस्था न राहता एक राजकीय शक्ती बनली. सुरुवातीच्या काळात विल्यम जोन्ससारख्या पौर्वात्यवादी विद्वानांनी भारतीय संस्कृतीबद्दल आदर व्यक्त केला होता; परंतु जसजशी इंग्रजांची सत्ता विस्तारू लागली, तसतसा हा आदर कमी होऊन त्याजागी टीकात्मक दृष्टिकोन येऊ लागला.

या काळात इंग्लंडमध्ये दोन प्रमुख वैचारिक प्रवाह प्रबळ होते. पहिला म्हणजे जेरेमी बेन्थेम आणि जेम्स मिल यांचा 'उपयुक्ततावाद'. या विचारसरणीनुसार, ज्या गोष्टी समाजासाठी उपयुक्त आहेत, त्याच श्रेष्ठ मानल्या गेल्या. मिलच्या मते, भारतीय कायदे आणि समाजव्यवस्था उपयुक्ततेच्या निकषावर पूर्णतः अपयशी होती. दुसरा प्रवाह होता ख्रिस्ती मिशनऱ्यांचा, ज्यांना 'इव्हेंजेलिकल' म्हटले जाते. चार्ल्स ग्रँटसारख्या विचारवंतांनी भारतीय समाज हा नैतिकदृष्ट्या पतित असून ख्रिस्ती धर्म आणि पाश्चात्य शिक्षणच त्याला वाचवू शकते, अशी मांडणी केली. या दोन्ही प्रवाहांनी भारतीय परंपरा, धर्म आणि संस्कृतीवर कडाडून टीका करत साम्राज्यवादी लेखनाची पूर्वपीठिका तयार केली.

१९ व्या शतकाच्या सुरुवातीला साम्राज्यवादी इतिहासलेखनाला खऱ्या अर्थाने संस्थात्मक स्वरूप प्राप्त झाले. १८१७ मध्ये जेम्स मिल याने लिहिलेला 'हिस्टरी ऑफ ब्रिटीश इंडिया' हा ग्रंथ या प्रवाहाचा मैलाचा दगड ठरला. या ग्रंथाने ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या अनेक पिढ्यांवर प्रभाव टाकला. मिलने भारतीय समाजाला 'गतिहीन' ठरवले, म्हणजेच इंग्रज येण्यापूर्वी भारतात कोणताही बदल किंवा प्रगती झाली नव्हती, असे भासवले. याच काळात विज्ञानाच्या क्षेत्रातील शोधांचा वापर सत्तेच्या समर्थनासाठी केला जाऊ लागला. चार्ल्स डार्विनचा उत्क्रांतीवादाचा सिद्धांत जीवशास्त्रासाठी होता, परंतु साम्राज्यवादी विचारवंतांनी त्याचा चुकीचा अर्थ लावून 'सामाजिक डार्विनवाद' विकसित केला. या सिद्धांतानुसार, जे प्रगत आणि सामर्थ्यवान आहेत, त्यांनी मागासलेल्यांवर राज्य करणे हा निसर्गाचाच नियम आहे, असे मानले गेले. या तर्कानुसार, ब्रिटिशांचे भारतावरील वर्चस्व हे अनैतिक नसून ते उत्क्रांतीच्या प्रक्रियेतील एक नैसर्गिक टप्पा आहे, असे सिद्ध करण्याचा प्रयत्न झाला.

१८५७ चा स्वातंत्र्यसमर ही ब्रिटिशांसाठी एक मोठी धोक्याची घंटा होती. या उठावानंतर इंग्रजांचा भारतीयांवरील उरलासुरला विश्वासही उडाला. परिणामी, १८५७ नंतरचे साम्राज्यवादी इतिहासलेखन अधिक आक्रमक आणि पूर्वग्रहदूषित बनले. या टप्प्यावर इतिहासाचा वापर भारतीयांना कायमस्वरूपी नियंत्रणात ठेवण्यासाठी करण्याचे धोरण आखले गेले.

या काळात व्हिन्सेंट स्मिथसारख्या इतिहासकारांनी असा युक्तिवाद केला की, भारताला स्वतःची एकता टिकवून ठेवता येत नाही; जेव्हा जेव्हा भारतात प्रबळ विदेशी सत्ता नसते, तेव्हा हा देश तुकड्यांमध्ये विभागतो आणि आपसात लढतो. त्यामुळे भारताच्या हितासाठीच ब्रिटीश सत्तेची येथे कायमस्वरूपी गरज आहे, असे ठसवले गेले. भारतीय इतिहासातील महान राजांच्या कर्तृत्वापेक्षा त्यांच्या चुकांवर अधिक बोट ठेवले गेले. तसेच, हिंदू आणि मुस्लिम यांच्यातील मतभेदांना ऐतिहासिक आधार देऊन 'फोडा आणि झोडो' या नीतीला बळकटी दिली गेली. विसाव्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत या प्रवाहाने भारतीय शिक्षण संस्था आणि ग्रंथालयांवर आपले पूर्ण अधिराज्य गाजवले होते.

### ३) साम्राज्यवादी इतिहासकालेखनाची वैशिष्ट्ये:

**अ) भारतीय समाजाचे मागासलेपण आणि गतिहीनता:** साम्राज्यवादी इतिहासकारांनी भारतीय समाजाला जाणीवपूर्वक अडाणी, रानटी आणि गतिहीन ठरवले. त्यांच्या मते, भारतीय समाज शेकडो वर्षांपासून प्रगतीविना एकाच जागी थबकला होता. त्यांनी जात व्यवस्था आणि ग्रामसंस्थांवर टीका करून भारतीय समाज तुकड्यांमध्ये विभागलेला आणि कालबाह्य असल्याचे प्रतिपादन केले. पाश्चात्य शिक्षण आणि प्रशासकीय शिस्त आल्याशिवाय भारतीयांची सुधारणा होणे अशक्य आहे, असा दावा करून त्यांनी ब्रिटीश राजवटीची गरज अधोरेखित केली.

**ब) ब्रिटीश संस्कृतीची श्रेष्ठता आणि उपयुक्ततावाद:** या इतिहासलेखनाचा मुख्य आधार युरोपीय संस्कृतीची जागतिक श्रेष्ठता मान्य करणे हा होता. जेम्स मिलसारख्या उपयुक्ततावादी विचारवंतांनी भारतीय धर्म, कायदे आणि संस्कृतीला पूर्णतः निरुपयोगी ठरवले. औद्योगिक क्रांतीमुळे आलेल्या भौतिक प्रगतीचा अभिमान बाळगत, त्यांनी ब्रिटीश मूल्ये भारतासाठी श्रेष्ठ असल्याचे सांगितले. भारतासारख्या मागास देशात सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी ब्रिटीश कायदे आणि प्रशासकीय पद्धती राबवणे हे ब्रिटिशांचे पवित्र कर्तव्य मानले गेले.

**क) नैतिक जबाबदारी:** ब्रिटिशांनी भारतावरील राज्याला केवळ राजकीय गरज न मानता, ती ईश्वराने सोपवलेली एक नैतिक जबाबदारी असल्याचे भासवले. यालाच रुडयार्ड किपलिंगने 'पांढऱ्या माणसाचे ओझे' असे म्हटले. अज्ञानाच्या अंधारात चाचपडणाऱ्या भारतीयांना ज्ञानाच्या प्रकाशात आणण्यासाठी 'सिव्हिलायझिंग मिशन' ही संकल्पना मांडली गेली. यानुसार, भारतीयांचे प्रबोधन करणे आणि त्यांना सुसंस्कृत करणे ही ब्रिटिशांची ईश्वरी योजना असल्याचे चित्र रंगवण्यात आले.

**ड) संघर्ष आणि निसर्गाचा नियम:** १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात डार्विनच्या उत्क्रांतीवादाचा वापर मानवी समाजासाठी करून 'सामाजिक डार्विनवाद' मांडला गेला. यानुसार, निसर्गात जसा बलवान जीव दुर्बलावर विजय मिळवतो, तसेच प्रगत राष्ट्राने मागास राष्ट्रावर वर्चस्व गाजवणे हा निसर्गाचाच नियम आहे, असा युक्तिवाद झाला. ब्रिटीश हे बौद्धिक आणि लष्करीदृष्ट्या श्रेष्ठ ठरल्यामुळे त्यांना भारतावर राज्य करण्याचा नैसर्गिक अधिकार प्राप्त झाला आहे, असे या इतिहासकारांनी ठामपणे प्रतिपादन केले.

**इ) वंशश्रेष्ठत्वाचा सिद्धांत:** वंशवाद हा साम्राज्यवादी इतिहासलेखनाचा सर्वात घातक कणा होता. या लेखकांनी मानवी वंशांचे वर्गीकरण करून गोऱ्या लोकांना जन्मतःच बुद्धिमान आणि राज्यकर्ते ठरवले, तर भारतीयांना आळशी, भित्रे आणि केवळ शासित होण्यासाठी पात्र ठरवले. गोऱ्या लोकांकडे उपजत नेतृत्वगुण असतात आणि भारतीयांना कायम मार्गदर्शनाची गरज असते, हा विचार पेरला गेला. प्रशासनातील उच्च पदे केवळ इंग्रजांसाठीच का राखीव आहेत, याचे समर्थन करण्यासाठी या सिद्धांताचा वापर केला गेला.

### ४) साम्राज्यवादी इतिहासलेखनाचे प्रमुख इतिहासकार:

#### १) जेम्स मिल:

भारतीय इतिहासलेखनाच्या परंपरेत साम्राज्यवादी दृष्टिकोनाचा पाया रचण्याचे काम जेम्स मिल याने

केले. लंडन येथील ईस्ट इंडिया कंपनीच्या कार्यालयात पत्रव्यवहार तपासनीस म्हणून काम करणाऱ्या मिलने भारताच्या इतिहासाला एक विशिष्ट वळण दिले. त्याचे कार्य आणि त्याचा भारतीय इतिहासावर झालेला परिणाम हा अत्यंत खोलवर आणि वादग्रस्त राहिला आहे.

### अ) पार्श्वभूमी आणि ग्रंथनिर्मिती:

जेम्स मिलचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्याने भारताला प्रत्यक्ष कधीही भेट न देता भारताचा सविस्तर इतिहास लिहिला. त्याला भारतीय भाषांचे ज्ञान नव्हते, तसेच त्याने भारतातील समाजजीवन कधीही जवळून पाहिले नव्हते. त्याचा संपूर्ण दृष्टिकोन हा केवळ कंपनीच्या कार्यालयातील पत्रव्यवहार, ख्रिस्ती मिशनऱ्यांनी दिलेले पूर्वग्रहदूषित अहवाल आणि पूर्वीच्या काही प्रवाशांच्या नोंदींवर आधारित होता. १८०६ मध्ये त्याने भारताचा इतिहास लिहिण्यास प्रारंभ केला आणि तब्बल २० वर्षांच्या परिश्रमानंतर १८२६ मध्ये 'हिस्टरी ऑफ ब्रिटीश इंडिया' हा ग्रंथ सहा खंडांत प्रकाशित केला. या ग्रंथाने इंग्लंडमध्ये प्रचंड खळबळ उडवून दिली आणि त्याला अभूतपूर्व प्रसिद्धी मिळाली. ब्रिटीश पार्लमेंट आणि कंपनीच्या प्रशासनात या ग्रंथाला एवढे महत्त्व प्राप्त झाले की, भारतात येणाऱ्या प्रत्येक ब्रिटीश अधिकाऱ्यासाठी या ग्रंथाचे वाचन अनिवार्य करण्यात आले. यामुळेच जेम्स मिलला साम्राज्यवादी इतिहासलेखनाचा जनक असे संबोधले जाते.

### ब) कालविभाजन आणि जमातवादाची मुळे:

जेम्स मिलच्या इतिहासलेखनातील सर्वात मोठा आणि नकारात्मक प्रभाव म्हणजे त्याने केलेले इतिहासाचे कालविभाजन. मिलने भारतीय इतिहासाचे तीन कालखंड पाडले; हिंदू काळ, मुस्लिम काळ आणि ब्रिटीश काळ. मिलने जाणीवपूर्वक पहिल्या दोन कालखंडांना धर्माची नावे दिली, मात्र तिसऱ्या कालखंडाला ख्रिश्चन काळ न म्हणता ब्रिटीश काळ असे संबोधले. यातून त्याला हे सुचवायचे होते की, हिंदू आणि मुस्लिम काळात भारत धार्मिक अंधश्रद्धा आणि संघर्षात अडकलेला होता, तर ब्रिटीश काळातच भारताला आधुनिकता आणि राष्ट्रवादाची ओळख झाली. या कालविभाजनामुळे भारतीय इतिहासात जमातवादाची बीजे पेरली गेली. इतिहासाकडे धर्माच्या चष्म्यातून पाहण्याची जी घातक प्रथा पडली, तिचे मूळ मिलच्या याच मांडणीत आहे.

### क) भारतीय संस्कृतीची निंदानालस्ती आणि श्रेष्ठत्वाचा दंभ:

जेम्स मिल हा उपयुक्ततावादी विचारसरणीचा कट्टर पुरस्कर्ता होता. त्याच्या मते, कोणतीही संस्कृती ही तिथल्या कायद्यांच्या आणि प्रशासनाच्या उपयुक्ततेवरून श्रेष्ठ किंवा कनिष्ठ ठरते. मिलने आपल्या ग्रंथात प्राचीन भारतीय संस्कृती, साहित्य आणि हिंदू धर्माची अत्यंत हीन भाषेत निंदानालस्ती केली. त्याने प्राचीन भारतीयांना रानटी, कपटी आणि प्रगतीविरोधी ठरवले. विशेष म्हणजे, हिंदूंच्या तुलनेत त्याने मुस्लिम शासकांना थोडे श्रेष्ठ ठरवले आणि शेवटी हिंदू व मुस्लिम या दोन्ही संस्कृतींपेक्षा ब्रिटीश संस्कृती ही अनेक पटींनी श्रेष्ठ असल्याचे प्रतिपादन केले. त्याने असा तर्क मांडला की, भारतीय समाज हा 'अपरिवर्तनीय' आहे, त्यामुळे केवळ इंग्रज आल्याशिवाय येथे सुधारणा होणे शक्य नाही.

### ड) मिलच्या इतिहासलेखनाचा परिणाम:

जेम्स मिलच्या लेखनामुळे भारतीय इतिहासाचे प्रचंड नुकसान झाले. त्याच्या लेखनामुळे खालील दूरगामी परिणाम दिसून आले; भारतातील ब्रिटीश शिक्षण पद्धतीत हाच इतिहास शिकवला गेल्यामुळे शिक्षित भारतीयांच्या मनात आपल्या पूर्वजांविषयी न्यूनगंड निर्माण झाला. ब्रिटीश नोकरशाही भारतीय लोकांशी तुच्छतेने वागू लागली, कारण मिलच्या ग्रंथानुसार भारतीय लोक स्वशासनासाठी नालायक होते.

### २) हेन्री इलियट:

साम्राज्यवादी इतिहासलेखनाच्या परंपरेत जेम्स मिलनंतर ज्या इतिहासकाराचा प्रभाव ब्रिटीश प्रशासनावर सर्वाधिक राहिला, तो म्हणजे हेन्री इलियट. जेम्स मिल याने आपल्या लेखनात प्राचीन भारताची निंदा करताना मुस्लिमांना हिंदूंपेक्षा काहीसे श्रेष्ठ ठरवले होते. मात्र, हेन्री इलियट याने ही मांडणी पूर्णतः बदलून मध्ययुगीन मुस्लिम कालखंडावर कडाडून टीका केली आणि त्या माध्यमातून ब्रिटीश सत्तेचे समर्थन केले.

### अ) पार्श्वभूमी आणि ग्रंथनिर्मिती :

हेन्री इलियट हा ईस्ट इंडिया कंपनीच्या नागरी सेवेत कार्यरत असलेला एक उच्चपदस्थ अधिकारी होता. त्याला फारसी भाषेचे उत्तम ज्ञान होते. त्याच्या काळात मध्ययुगीन भारताचा इतिहास प्रामुख्याने फारसी हस्तलिखितांमध्ये उपलब्ध होता. इलियटने या हस्तलिखितांचा सखोल अभ्यास केला आणि लंडन येथील प्राध्यापक जॉन डाऊसन यांच्या मदतीने त्यांचे इंग्रजीत भाषांतर केले. त्याचे हे प्रचंड कार्य 'History of India as Told by its Own Historians' या नावाने आठ खंडात प्रकाशित झाले. या ग्रंथाचे शीर्षक जरी निष्पक्ष वाटत असले, तरी त्यामागील हेतू हा अत्यंत राजकीय आणि साम्राज्यवादी होता. इलियटने निवडक हस्तलिखितांची अशी काही मांडणी केली, जेणेकरून भारतातील मुस्लिम राजवट ही अत्यंत क्रूर आणि अराजकतेची वाटेल.

### ब) मुस्लिम शासकांची प्रतिमा आणि जुलमी राजवट :

हेन्री इलियटच्या इतिहासलेखनाचा मुख्य उद्देश हा भारतातील मुस्लिम कालखंडाला अंधकारयुग म्हणून चित्रित करणे हा होता. त्याने आपल्या ग्रंथाच्या प्रस्तावनेत आणि संकलित केलेल्या भागांमध्ये भारतातील मुस्लिम शासकांना; इलियटच्या मते, मुस्लिम राजे हे केवळ प्रजेचे शोषण करणारे आणि धर्मांध होते. त्याने असा दावा केला की, या शासकांकडे प्रशासकीय कौशल्य नव्हते आणि ते केवळ विलासभोगात मग्न असत. इलियटने असे प्रतिपादन केले की, ब्रिटिशांच्या आगमनापूर्वी भारतात कायद्याचे राज्य ही संकल्पनाच अस्तित्वात नव्हती. येथे केवळ राजाची मर्जी हाच कायदा होता. या मांडणीमागे इलियटचा एक सुप्त हेतू होता. त्याला हिंदू प्रजेला हे पटवून द्यायचे होते की, मुस्लिम शासक किती क्रूर होते आणि त्यांच्या तुलनेत आताचे ब्रिटीश शासक किती न्यायप्रिय आहेत.

### क) ब्रिटीश सत्तेचे न्यायप्रिय स्वरूप आणि समर्थन:

इलियटने मुस्लिम राजवटीचे भयानक चित्र रंगवून त्या पार्श्वभूमीवर ब्रिटीश सत्तेची महती गायली. त्याच्या मते, भारताला इतिहासात पहिल्यांदाच न्यायप्रिय आणि नि:पक्षपाती शासक ब्रिटिशांच्या रूपाने

लाभले आहेत. इलियटने काढलेले निष्कर्ष खालील मुद्द्यांवर आधारित होते; मुस्लिमांच्या काळात जी अराजकता होती, ती ब्रिटिशांनी संपवून 'पॅक्स ब्रिटानिका' प्रस्थापित केली. ब्रिटिशांनी भारतात प्रथमच संहितीकरण करून सर्वांना समान न्याय देणारी व्यवस्था निर्माण केली. भारत हा शासन करण्यास असमर्थ असल्यामुळे येथे सुव्यवस्था निर्माण करणे, हे ब्रिटिशांचे ऐतिहासिक आणि ईश्वरदत्त कार्य आहे. इलियटच्या या मांडणीमुळे भारतात काम करणाऱ्या ब्रिटीश नोकरशाहीमध्ये आत्मश्रेष्ठत्वाची भावना पराकोटीला पोहोचली. त्यांना असे वाटू लागले की, आपण भारतीयांवर राज्य करून त्यांच्यावर उपकारच करत आहोत.

**ड) इलियटच्या इतिहासलेखनाचे दीर्घकालीन परिणाम:**

हेन्री इलियटच्या लेखनाचे परिणाम भारतीय समाजावर अत्यंत विघातक झाले; इलियटने मुस्लिम राजवटीतील अत्याचारांचे जे अतिरंजित वर्णन केले, त्यामुळे हिंदू आणि मुस्लिम समुदायांमध्ये अविश्वासाची भिंत उभी राहिली. ब्रिटिशांनी आपल्या फोडा आणि झोडा धोरणासाठी या इतिहासाचा पुरेपूर वापर केला. मूळ फारसी साधनांमधील केवळ नकारात्मक भाग निवडून आणि त्यांचे सोयीस्कर भाषांतर करून इलियटने भारतीय इतिहासाचे विकृत स्वरूप जगासमोर मांडले. इलियटच्या ग्रंथामुळे ब्रिटिशांना त्यांचे शोषण लपवण्यासाठी सुधारणेचे आणि न्यायाचे एक भक्कम बौद्धिक कवच मिळाले.

**३) माऊंट स्टयूअर्ट एलफिन्स्टन:**

साम्राज्यवादी इतिहासलेखनाच्या प्रवाहात माऊंट स्टयूअर्ट एलफिन्स्टन यांचे स्थान अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे. जेम्स मिल आणि हेन्री इलियट यांच्यासारख्या कट्टर टीकाकारांच्या तुलनेत एलफिन्स्टन यांचा दृष्टिकोन अधिक संतुलित, अभ्यासू आणि अनुभवाधिष्ठित होता. मुंबई प्रांताचे गव्हर्नर म्हणून त्यांनी दीर्घकाळ काम केल्यामुळे त्यांना भारतीय समाज आणि संस्कृतीचे जवळून दर्शन घडले होते.

**अ) प्रत्यक्ष अनुभव आणि जेम्स मिलच्या मांडणीला विरोध:**

एलफिन्स्टन यांच्या इतिहासलेखनाचा पाया त्यांच्या प्रत्यक्ष प्रशासकीय अनुभवात दडलेला होता. जेम्स मिल याने लंडनमध्ये बसून, भारताला कधीही न पाहता जो ग्रंथ लिहिला होता, त्यावर एलफिन्स्टन यांनी कडाडून टीका केली. एलफिन्स्टन यांच्या मते, मिलचे लिखाण वस्तुनिष्ठ नव्हते. मिलने भारतीय समाजाला सरसकट रानटी आणि गतिहीन ठरवले होते, जे एलफिन्स्टन यांना मान्य नव्हते. एलफिन्स्टन यांनी पौर्वात्यवादी इतिहासकारांच्या ग्रंथांचा सखोल अभ्यास केला होता. त्यामुळे प्राचीन भारतीय संस्कृतीतील उदात्तता आणि येथील समाजव्यवस्थेतील गुंतागुंत त्यांना समजत होती. मिलचे लिखाण हे केवळ एका विशिष्ट विचारसरणीने प्रेरित असून त्यात प्राचीन भारतीयांचे योग्य मूल्यमापन करण्यात आलेले नाही, असे स्पष्ट मत एलफिन्स्टन यांनी मांडले.

**ब) सांस्कृतिक इतिहासावर भर आणि ग्रंथाची निर्मिती:**

इंग्लंडला परतल्यानंतर १८४१ साली एलफिन्स्टन यांनी 'History of Hindu and Muhammadan India' हा ग्रंथ लिहून प्रकाशित केला. या ग्रंथाची रचना जेम्स मिलच्या ग्रंथापेक्षा पूर्णतः भिन्न होती.

एलफिन्स्टन यांनी केवळ राजांच्या लढाया आणि राजकीय घडामोडींवर लक्ष केंद्रित न करता भारताच्या सांस्कृतिक इतिहासाला प्राधान्य दिले. त्यांनी आपल्या ग्रंथात पुढील विषयांचे सविस्तर विश्लेषण केले; प्राचीन ग्रामसंस्था आणि राजेशाहीचे स्वरूप. भारतीय साहित्याची समृद्धी आणि इथल्या दर्शनांचा सखोल अभ्यास. भारताचा परदेशी सागरी व्यापार आणि येथील भरभराटीला आलेले उद्योग आणि भारतीय लोकांचे सण, उत्सव, धार्मिक विधी आणि त्यांच्या सामाजिक परंपरा. एलफिन्स्टन यांनी भारताकडे एका प्रतिकूल शत्रूच्या नजरेतून न पाहता सहानभूतीपूर्वक पाहिले. त्यांच्या लेखनात भारतीयांना तुच्छ लेखण्याची प्रवृत्ती कमी होती.

**क) उदारवादी साम्राज्यवादाचे समर्थन:**

एलफिन्स्टन हे उदारवादी असले तरी, अंतिमतः ते एक ब्रिटीश अधिकारी होते. त्यांनी जरी भारतीय संस्कृतीचे कौतुक केले असले, तरी त्यांच्या लेखनाचा निष्कर्ष हा ब्रिटीश सत्तेचे समर्थन करणाराच होता. त्यांनी असे प्रतिपादन केले की, भारत हा सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध असला तरी राजकीयदृष्ट्या तो दुर्बळ आणि विस्कळीत आहे. त्यांच्या मते, भारतातील अंतर्गत संघर्ष आणि राजकीय अस्थिरता पाहता, भारताला प्रगतीच्या मार्गावर नेण्यासाठी ब्रिटीश शासनाची नितांत आवश्यकता आहे. त्यांनी साम्राज्यवादाचा पुरस्कार करताना शोषकाची नव्हे तर एका मार्गदर्शकाची भूमिका मांडली.

**ड) एलफिन्स्टन यांच्या लेखनाचा प्रभाव:**

एलफिन्स्टन यांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्या अनेक अधिकाऱ्यांवर पडला. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली ग्रँट डफ व जेम्स टॉड यांनी लेखन केले. या इतिहासकारांच्या लेखनातही भारतीयांबद्दलची तुच्छता कमी आणि त्यांच्या पराक्रमाबद्दलचा आदर अधिक दिसून येतो. एलफिन्स्टनच्या कार्याचा सर्वात मोठा परिणाम हा झाला की, ब्रिटीश प्रशासनाला हे समजले की भारतावर केवळ दडपशाहीने राज्य करता येणार नाही, तर येथील संस्कृती समजून घेऊन लोकांचा विश्वास संपादन करावा लागेल. त्यांच्या ग्रंथामुळे युरोपातील विद्वानांना भारताच्या एका वेगळ्या, समृद्ध आणि मानवी पैलूची ओळख झाली.

**४) इतर साम्राज्यवादी इतिहासकार:**

साम्राज्यवादी इतिहासलेखन केवळ जेम्स मिल किंवा एलफिन्स्टन यांच्यापुरते मर्यादित नव्हते, तर अनेक ब्रिटीश प्रशासकीय अधिकाऱ्यांनीही भारतीय प्रादेशिक इतिहासाची मांडणी केली. यात प्रामुख्याने ग्रँट डफ आणि जेम्स टॉड यांचा समावेश होतो. साताऱ्याचे रेसिडेंट असताना ग्रँट डफ यांनी मराठ्यांच्या अस्सल साधनांचा अभ्यास करून १८२६ मध्ये 'History of the Marathas' हा ग्रंथ लिहिला. त्यांनी मराठ्यांच्या लष्करी कौशल्याचा आदर केला असला, तरी ब्रिटीश सत्तेची अपरिहार्यता सिद्ध करणे हाच त्यांचा मूळ हेतू होता. जेम्स टॉड यांनी 'Annals and Antiquities of Rajasthan' या ग्रंथातून राजपूतांच्या शौर्याचे आणि बलिदानाचे कौतुक केले. त्यांनी राजपूतांची तुलना युरोपातील नाईट्सशी केली. मात्र, या गौरवामागे राजपूतांना ब्रिटीश छत्राखाली आणण्याचा राजकीय उद्देश दडलेला होता.

१८५७ च्या स्वातंत्र्यसमरानंतर ब्रिटीश इतिहासकारांच्या भूमिकेत कमालीचा बदल होऊन साम्राज्यवादी इतिहासलेखन अधिक कट्टर आणि आक्रमक झाले. या कालखंडातील लेखकांनी भारतीयांच्या स्वशासनाच्या क्षमतेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित करून ब्रिटीश सत्तेचे समर्थन करण्यावर भर दिला. विल्यम हंटर यांनी इम्पीरियल गॅझेटिअरच्या माध्यमातून सांख्यिकी माहिती संकलित करतानाच, मुस्लिमांच्या सामाजिक स्थितीवर भाष्य करून ब्रिटिशांच्या फोडा आणि झोडो या धोरणाला पूरक ठरतील असे विचार मांडले. हेन्री मेन यांनी भारतीय ग्रामसंस्थांचा अभ्यास करून त्या स्थितिशील असल्याचा निष्कर्ष काढला आणि ब्रिटीश कायद्यांच्या स्पर्शानेच भारतीय समाजात गतिशीलता आली, असा युक्तिवाद केला. याच काळात आल्फ्रेड लायल आणि जेम्स स्टीफन्स यांनी तर अधिक टोकाची भूमिका घेतली. त्यांच्या मते, भारतीय लोक स्वशासनासाठी जन्मजात अपात्र असून, भारतात शांतता राखण्यासाठी ब्रिटिशांची 'हितकारक हुकूमशाही' हीच एकमेव योग्य शासनपद्धती आहे. तसेच, जे. टी. व्हीलर यांनी भारतीय इतिहासातील राजकीय गोंधळ आणि अराजकता जाणीवपूर्वक अधोरेखित केली, जेणेकरून ब्रिटीश राजवटीमुळे प्रस्थापित झालेली शांतता श्रेष्ठ ठरवता येईल.

## ५) साम्राज्यवादी इतिहासलेखनाचे परिणाम:

साम्राज्यवादी इतिहासलेखन हे केवळ ग्रंथालयापुरते मर्यादित राहिले नाही, तर त्याचे पडसाद भारतीय समाज, राजकारण आणि जनमानसावर अत्यंत खोलवर उमटले. या परिणामांचे विश्लेषण खालील चार प्रमुख मुद्द्यांच्या आधारे करता येईल:

**अ) न्यूनगंडाची निर्मिती:** साम्राज्यवादी लेखकांनी भारतीय संस्कृतीला रानटी आणि गतिहीन ठरवल्यामुळे नवशिक्षित भारतीयांमध्ये तीव्र न्यूनगंड निर्माण झाला. शालेय अभ्यासक्रमातून पूर्वजांच्या पराक्रमाऐवजी केवळ चुका आणि पराभव शिकवले गेले. परिणामी, आपली भाषा, परंपरा आणि वेशभूषा मागासलेली असून इंग्रजांचे अनुकरण म्हणजेच प्रगती, असा चुकीचा समज रूढ झाला. भारतीय समाज आपली स्वत्वाची जाणीव आणि आत्मसन्मान हरवून बसला, ज्यातून बाहेर पडण्यासाठी पुढे समाजसुधारकांना मोठे वैचारिक युद्ध लढावे लागले.

**ब) जमातवादाची बीजे:** जेम्स मिलसारख्या इतिहासकारांनी भारतीय इतिहासाचे हिंदू काळ आणि मुस्लिम काळ असे धार्मिक कप्पे पाडून जमातवादाची विषपेरणी केली. या लेखनातून दोन्ही समाज एकमेकांचे नैसर्गिक शत्रू असल्याचे भासवले गेले. ब्रिटिशांनी आपल्या फोडा आणि झोडा नीतीसाठी या इतिहासाचा वापर केला. यातून निर्माण झालेले ऐतिहासिक वैमनस्य राष्ट्रीय एकात्मतेला बाधक ठरले. इतिहासाकडे पाहण्याच्या या धर्मांध दृष्टिकोनाचा शेवट पुढे २० व्या शतकात भारताच्या अत्यंत दुःखद फाळणीमध्ये झाला.

**क) ब्रिटीश सत्तेला नैतिक मान्यता:** साम्राज्यवादी लेखकांनी ब्रिटीश सत्ता हे भारतासाठी ईश्वरी वरदान असल्याचे बिंबवले. रेल्वे, आधुनिक शिक्षण आणि कायद्याचे राज्य केवळ ब्रिटिशांमुळेच आले, असा सतत प्रचार केल्याने सुरुवातीच्या काळात राजवटीला मोठा जनविरोध झाला नाही. भारतीयांना सुसंस्कृत करणे हे आमचे कर्तव्य असल्याचे त्यांनी भासवले. या नैतिक समर्थनामुळे सामान्य जनतेचा राजकीय

प्रतिकार बराच काळ क्षीण राहिला आणि भारतीय स्वातंत्र्यलढ्याची गती सुरुवातीच्या टप्प्यात संथ राहिली.

**ड) ऐतिहासिक साधनांचे संकलन:** साम्राज्यवादी इतिहासलेखनाचा एक सकारात्मक परिणाम म्हणजे विखुरलेल्या ऐतिहासिक साधनांचे शास्त्रशुद्ध संकलन होय. प्रशासकीय अधिकार पदावर असल्याने ग्रँट डफ, जेम्स टॉड यांसारख्या अभ्यासकांनी अनेक हस्तलिखिते, शिलालेख, नाणी व बखरी जतन केल्या. जरी त्यांनी या साधनांचा अर्थ स्वतःच्या सोयीनुसार लावला, तरी ही सामग्री भविष्यासाठी सुरक्षित राहिली. पुढे राष्ट्रवादी इतिहासकारांनी याच साधनांचा आधार घेऊन साम्राज्यवाद्यांचे दावे खोडून काढले आणि भारताचा सत्य व गौरवशाली इतिहास जगासमोर मांडला.

**६) साम्राज्यवादी इतिहासलेखनाच्या मर्यादा:**

साम्राज्यवादी इतिहासलेखनाने जरी आधुनिक पद्धतीने इतिहास लिहिण्याची सुरुवात केली असली, तरी हा प्रवाह अनेक गंभीर त्रुटी आणि मर्यादांनी ग्रासलेला होता. या मर्यादांमुळेच हा इतिहास वस्तुनिष्ठ न राहता प्रचारकी स्वरूपाचा बनला. त्यातील मुख्य मर्यादा खालीलप्रमाणे आहेत:

**अ) एकांगी आणि युरोकेंद्री दृष्टिकोन:** साम्राज्यवादी इतिहासलेखन पूर्णपणे ब्रिटिशांच्या नजरेतून केले गेल्याने ते एकांगी ठरले. यात भारतीयांकडे केवळ शासित म्हणून पाहिले गेले. भारतीय प्रज्ञा, राष्ट्रीय आकांक्षा आणि महान राजांच्या (सम्राट अशोक, छत्रपती शिवाजी महाराज) लोककल्याणकारी कार्याची दखल न घेता, या लेखकांनी भारताला स्वतःची ओळख नसलेला देश मानले. त्यांच्या मते भारतात जे काही चांगले घडले, ते केवळ परकीयांमुळेच. हा वस्तुतः भारताचा इतिहास नसून भारतातील ब्रिटिशांचा इतिहास होता, ज्याने मानवी संस्कृतीतील भारताचे योगदान नाकारले.

**ब) साधनांचा विपर्यास आणि निवडक वापर:** साम्राज्यवादी लेखकांनी वस्तुनिष्ठतेऐवजी राजकीय अजेंडा राबवण्यासाठी पुराव्यांची निवडकपणे वापर केला. भारतीय समाज मागासलेला आणि रानटी सिद्ध करण्यासाठी त्यांनी केवळ प्रतिकूल माहिती गोळा केली. उदा. हेन्री इलियट यांनी मुस्लिम कालखंडातील प्रगती बाजूला सारून केवळ युद्धांचे आणि क्रूरतेचे वर्णन करणारे पुरावे निवडले. आपल्या साम्राज्यवादी सिद्धांताला बाधा आणणारे भारतीय श्रेष्ठत्वाचे पुरावे जाणीवपूर्वक दुर्लक्षित केल्यामुळे हे लेखन ऐतिहासिक सत्यापेक्षा पूर्वग्रहदूषित आणि वैज्ञानिक कसोटीवर अपूर्ण ठरले.

**क) वास्तवाशी फारकत आणि काल्पनिक मांडणी:** जेम्स मिलसारख्या अनेक लेखकांनी भारताला कधीही भेट न देता केवळ ऐकीव गोष्टी आणि कागदपत्रांच्या आधारे डेस्कवर बसून इतिहास लिहिला. त्यांना येथील भूगोल, भाषा आणि प्रथांचे वास्तव ज्ञान नव्हते. त्यामुळे त्यांनी भारतीय ग्रामसंस्था आणि न्यायव्यवस्थेचा चुकीचा अर्थ लावला. भारतीय समाजाला गतिहीन ठरवून त्यांनी अंतर्गत परिवर्तनांकडे दुर्लक्ष केले. युरोपीय चष्म्यातून भारताकडे पाहिल्यामुळे त्यांचे लेखन जमिनीवरील वास्तवाशी फारकत घेतलेले आणि काल्पनिक स्वरूपाचे ठरले.

**इ) राजकीय हेतू आणि वैज्ञानिकतेचा अभाव:** या इतिहासलेखनाचा मूळ हेतू ज्ञानाची उपासना नसून ब्रिटीश सत्तेचे नैतिक समर्थन करणे हा होता. त्यांनी वंशश्रेष्ठत्व आणि पांढऱ्या माणसाचे ओझे यांसारख्या

अवैज्ञानिक सिद्धांतांचा आधार घेतला. ब्रिटीश श्रेष्ठ आहेत हे आधीच गृहीत धरून पुराव्यांची जुळवाजुळव केल्यामुळे या लेखनाने आपले वैज्ञानिक स्वरूप गमावले. सत्तेच्या शोषक धोरणांना पाबळ देण्याचे काम केल्यामुळे हा इतिहास वस्तुनिष्ठ न ठरता ब्रिटिशांचे एक राजकीय पत्रक बनून राहिला.

**साम्राज्यवादी इतिहासलेखनाचे मूल्यमापन :**

साम्राज्यवादी इतिहासलेखन हा केवळ ऐतिहासिक मांडणीचा प्रयत्न नसून, ब्रिटीश सत्ता दृढ करण्यासाठी राबवलेला एक राजकीय प्रकल्प होता. त्याचे मूल्यमापन खालील मुद्द्यांच्या आधारे करता येईल; या लेखनाचा मुख्य उद्देश ऐतिहासिक सत्यापेक्षा ब्रिटीश साम्राज्याला नैतिक अधिष्ठान देणे हा होता. भारतीयांना स्वशासनासाठी अपात्र ठरवून, भारताची प्रगती केवळ ब्रिटिशांच्या नियंत्रणाखालीच शक्य आहे, असा आभास जाणीवपूर्वक निर्माण केला गेला. साम्राज्यवादी इतिहासकारांनी आधुनिक संशोधन पद्धती, संदर्भ आणि हस्तलिखितांचा वापर अशा खुबीने केला की, त्यांचे विकृत निष्कर्षही सर्वसामान्यांना वस्तुनिष्ठ वाटू लागले. या प्रवाहाने नवशिक्षित भारतीयांमध्ये न्यूनगंड निर्माण केला आणि भारतीय अस्मितेला धक्का पोहचवला. तसेच, इतिहासाचे हिंदू-मुस्लिम असे धार्मिक कालविभाजन करून समाजात कायमची दुही पेरली, ज्याचे पर्यवसान पुढे फाळणीत झाले. एक सकारात्मक बाजू म्हणजे, साम्राज्यवादी लेखकांच्या पूर्वग्रहांनी भारतीय विद्वानांना डिवचले. या आव्हानातूनच राष्ट्रवादी इतिहासलेखन उदयाला आले. भारतीय इतिहासकारांनी स्वतःच्या मूळ साधनांचा शोध घेऊन भारताचा सत्य आणि गौरवशाली इतिहास जगासमोर मांडण्याची जिद्द बाळगली.

**स्वय-अध्ययन प्रश्न क्र. १**

१) जेम्स मिल याने १८१७ मध्ये प्रसिद्ध केलेल्या 'हिस्टरी ऑफ ब्रिटीश इंडिया' या ग्रंथाने भारतीय इतिहासाचे कोणते तीन कालखंड पाडले?

अ) आर्य, द्राविड आणि युरोपीय काळ

ब) वैदिक, मोघल आणि पाश्चात्य काळ

क) हिंदू, मुस्लिम आणि ब्रिटीश काळ

ड) प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक

२) रुडयार्ड किपलिंग याने मांडलेली कोणती संकल्पना ब्रिटिशांच्या 'नैतिक जबाबदारी'चे समर्थन करण्यासाठी वापरली गेली?

अ) सिव्हिलायझिंग मिशन	ब) फोडा आणि झोडो

क) पांढऱ्या माणसाचे ओझे	ड) सामाजिक डार्विनवाद

३) खालीलपैकी कोणत्या इतिहासकाराने ‘History of India as Told by its Own Historians’ या ग्रंथातून मुस्लिम राजवटीला ‘अंधकारयुग’ म्हणून चित्रित केले?

अ) ग्रँट डफ

ब) माऊंट स्ट्यूअर्ट एलफिन्स्टन

क) हेन्री इलियट

ड) जेम्स टॉड

४) जेम्स मिल याच्या इतिहासलेखनाची सर्वात मोठी मर्यादा कोणती होती?

अ) भारतीय संस्कृतीचे खूप कौतुक केले.

ब) भारताला कधीही भेट न इतिहास लिहिला.

क) त्याने फक्त युद्धांचे वर्णन केले.

ड) केवळ मराठ्यांच्या इतिहासावर लक्ष केंद्रित केले.

५) मुंबई प्रांताचे गव्हर्नर राहिलेले कोणते इतिहासकार जेम्स मिलच्या ‘गतिहीन समाज’ या सिद्धांताशी असहमत होते?

अ) व्हिन्सेंट स्मिथ

ब) हेन्री मेन

क) विल्यम हंटर

ड) माऊंट स्ट्यूअर्ट एलफिन्स्टन

६) साम्राज्यवादी इतिहासकारांनी डार्विनच्या उत्क्रांतीवादाचा वापर करून कोणता सिद्धांत मांडला?

अ) उपयुक्ततावाद

ब) वंशश्रेष्ठत्व

क) सामाजिक डार्विनवाद

ड) वैज्ञानिक समाजवाद

७) १८२६ मध्ये ‘History of the Marathas’ हा ग्रंथ कोणी लिहिला?

अ) ग्रँट डफ

ब) जॉन डाऊसन

क) व्हिन्सेंट स्मिथ

ड) जेम्स टॉड

८) साम्राज्यवादी इतिहासलेखनाचा एक सकारात्मक परिणाम कोणता मानता येईल?

अ) ऐतिहासिक साधनांचे शास्त्रशुद्ध संकलन झाले.

ब) भारताची आर्थिक प्रगती झाली.

क) हिंदू-मुस्लिम ऐक्य वाढीस लागले.

ड) भारतीय लोकांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला.

९) १८५७ च्या उठावानंतर साम्राज्यवादी इतिहासलेखन अधिक आक्रमक का बनले?

अ) इंग्लंडमध्ये लोकशाही आली.

ब) भारतीयांनी इतिहासाची मागणी केली.

क) मुस्लिम शासकांनी ब्रिटिशांना मदत केली.

ड) भारतीयांच्या उठावामुळे ब्रिटिशांचा विश्वास उडाला.

१०) जेम्स मिल कोणत्या वैचारिक प्रवाहाचा कट्टर पुरस्कर्ता होता?

अ) साम्यवाद ब) इव्हेंजेलिकल

क) राष्ट्रवाद ड) उपयुक्ततावाद

**२.१.२ राष्ट्रवादी इतिहासलेखन:**

१९ व्या शतकात ब्रिटीश राजवटीने सुरू केलेल्या पाश्चात्य शिक्षण पद्धतीमुळे भारतात एका नव्या सुशिक्षित मध्यमवर्गाचा उदय झाला. या वर्गाला युरोपीय लोकशाही मूल्यांचा परिचय झाला असला तरी, त्यांच्या मनात स्वदेशाबद्दल तीव्र ओढ होती. त्याच वेळी, साम्राज्यवादी इतिहासकारांनी भारतीय संस्कृतीला हीन आणि रानटी ठरवून भारतीयांमध्ये न्यूनगंड निर्माण करण्याचा प्रयत्न केला. या वासाहतिक आणि पूर्वग्रहदूषित मांडणीला सडेतोड वैचारिक उत्तर देण्यासाठी राष्ट्रवादी इतिहासलेखन हा नवा प्रवाह उदयाला आला. या इतिहासकारांनी केवळ साम्राज्यवादी टीकेचे खंडन केले नाही, तर प्राचीन भारताच्या प्रगत संस्कृतीची आणि सुवर्णयुगाची शास्त्रशुद्ध पुनर्मांडणी केली. त्यांनी ब्रिटिशांच्या सुधारणेच्या बुरख्याखाली लपलेले आर्थिक शोषणाचे सत्य जगासमोर आणले. या प्रवाहाचा मुख्य उद्देश केवळ इतिहासलेखन नसून तो एक बौद्धिक लढा होता. परकीय दास्यात अडकलेल्या भारतीयांच्या मनात आत्मसन्मान आणि तीव्र राष्ट्रवादाची भावना जागृत करणे, हे या इतिहासकारांचे ध्येय होते. इतिहासातील महापुरुषांचे चरित्र आणि प्राचीन विज्ञानाचे पुरावे देऊन त्यांनी देशाला स्वातंत्र्यलढ्यासाठी मानसिकदृष्ट्या सज्ज केले. अशाप्रकारे, राष्ट्रवादी इतिहासलेखन हे भारतीय प्रबोधनाचे आणि राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेचे महत्त्वपूर्ण अंग ठरले.

**१) राष्ट्रवादी इतिहासलेखनाची संकल्पना:**

राष्ट्रवादी इतिहासलेखन ही केवळ ऐतिहासिक नोंद नसून ती भारतीय अस्मितेच्या पुनरुज्जीवनाची एक प्रबळ बौद्धिक चळवळ आहे. १८ व्या आणि १९ व्या शतकातील साम्राज्यवादी इतिहासलेखन हे पूर्णतः 'युरोकेंद्री' होते, ज्याचा मुख्य हेतू पाश्चात्य संस्कृतीचे श्रेष्ठत्व सिद्ध करणे हा होता. याला छेद देण्यासाठी भारतीय इतिहासकारांनी जो 'भारतकेंद्री' दृष्टिकोन मांडला, त्यालाच राष्ट्रवादी इतिहासलेखन असे संबोधले जाते.

२) **प्रमुख आधार:**

१) **विकृत मांडणीचे खंडन:** जेम्स मिलसारख्या पाश्चात्य लेखकांनी भारतीय समाजाला मागासलेला आणि गतिहीन चित्रित केले होते. राष्ट्रवादी इतिहासकारांनी मूळ ऐतिहासिक साधनांचा आधार घेऊन या पूर्वग्रहदूषित आक्षेपांचे साधार खंडन केले.

२) **गौरवशाली भूतकाळाचे दर्शन:** भारताचा प्राचीन काळ हा वैज्ञानिक, गणितीय आणि सांस्कृतिक प्रगतीचे सुवर्णयुग होता, ही मांडणी या संकल्पनेचा गाभा आहे. पाश्चात्य जगाच्या आधी भारतात वैदिक काळातील सभा-समिती आणि गणराज्यांच्या माध्यमातून लोकशाही मूल्ये रुजलेली होती, हे त्यांनी पुराव्यानिशी सिद्ध केले.

३) **राष्ट्रीय एकात्मता:** विविधतेने नटलेल्या भारतात भौगोलिक आणि सांस्कृतिक एकसंधता आहे, हे या परंपरेने ठसवले. मौर्य आणि गुप्त यांसारख्या महान साम्राज्यांनी देशाला एका छत्राखाली कसे आणले होते, याचे दाखले देऊन त्यांनी विखुरलेल्या भारतीय समाजाला एकत्र बांधले.

४) **स्वातंत्र्यलढ्याला प्रेरणा:** इतिहासाचे रूपांतर एका जिवंत प्रेरणास्त्रोतात करणे हा या संकल्पनेचा मुख्य उद्देश होता. छत्रपती शिवाजी महाराज, महाराणा प्रताप आणि झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्या चरित्रातून स्वराज्य आणि स्वाभिमानाची प्रेरणा जनमानसात रुजवण्यात आली.

३) **राष्ट्रवादी इतिहासलेखनाचा उदय व विकास :**

भारतीय राष्ट्रवादी इतिहासलेखन हा प्रामुख्याने साम्राज्यवादी लेखकांच्या पूर्वग्रहदूषित मांडणीला दिलेला एक प्रखर वैचारिक प्रतिसाद होता. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात पाश्चात्य शिक्षण घेतलेल्या भारतीय विद्वानांनी, ब्रिटिशांनी लादलेला न्यूनगंड मोडीत काढण्यासाठी स्वदेशी दृष्टिकोनातून इतिहास मांडण्यास सुरुवात केली. विष्णूशास्त्री चिपळूणकर यांनी निबंधमालाद्वारे या लेखनाचा पाया घातला, तर न्यायमूर्ती रानडे यांनी मराठ्यांचा इतिहास हा राष्ट्रनिर्मितीचा जाणीवपूर्वक केलेला प्रयत्न असल्याचे सिद्ध केले. या प्रवासात वि. का. राजवाडे यांचे योगदान अतुलनीय ठरले; त्यांनी आपला इतिहास आपणच लिहिला पाहिजे हा विचार मांडून ऐतिहासिक साधनांच्या संकलनावर भर दिला. रा. ग. भांडारकर आणि काशीप्रसाद जयस्वाल यांसारख्या संशोधकांनी प्राचीन भारतातील लोकशाही मूल्ये आणि प्रगत संस्कृतीचे पुरावे जगासमोर आणले. केवळ भावनेवर आधारित गौरवीकरण न करता, या इतिहासकारांनी शिलालेख, नाणी आणि हस्तलिखितांचा वैज्ञानिक अभ्यास करून भारतीय अस्मितेचे पुनरुज्जीवन केले. परिणामी, या इतिहासलेखनाने भारतीय स्वातंत्र्यलढ्याला एक भक्कम वैचारिक बैठक आणि राष्ट्रप्रेमाची प्रेरणा मिळवून दिली.

४) **राष्ट्रवादी इतिहासलेखनाची वैशिष्ट्ये:**

राष्ट्रवादी इतिहासलेखन ही केवळ भूतकाळाची नोंद नव्हती, तर ती भारतीय अस्मितेची पुनर्रचना होती. या इतिहासलेखन परंपरेची प्रमुख वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे स्पष्ट करता येतील:

१) **गौरवीकरण:** साम्राज्यवाद्यांनी मांडलेल्या पराभूत भारताच्या चित्राला छेद देण्यासाठी राष्ट्रवादी

इतिहासकारांनी भारतीय इतिहासाचे देदीप्यमान चित्रण केले. त्यांनी प्राचीन कालखंडाला सुवर्णयुग संबोधून सम्राट अशोक, गुप्त राजे आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शौर्यावर व प्रशासकीय कौशल्यावर प्रकाश टाकला. हा प्रयत्न केवळ भावनिक नसून, भारतीयांचा गमावलेला आत्मविश्वास परत मिळवून देण्यासाठी आणि पूर्वजांविषयी आदराची भावना निर्माण करण्यासाठी केलेला एक जाणीवपूर्वक प्रयत्न होता.

**२) साम्राज्यवादाला आणि वासाहतिक दाव्यांना विरोध:** ब्रिटीश लेखकांच्या 'पांढऱ्या माणसाचे ओझे' या सिद्धांताला राष्ट्रवादी इतिहासकारांनी सडेतोड उत्तर दिले. भारतीय अडाणी व स्वशासनासाठी नालायक आहेत हा ब्रिटीश दावा त्यांनी पुराव्यानिशी खोडून काढला. ब्रिटीश येण्यापूर्वी भारत अंधश्रद्धेत अडकला होता, हा भ्रम मोडीत काढून भारतीय समाज हा स्वायत्त आणि प्रगत होता, हे त्यांनी ठामपणे मांडले. या विरोधातून ब्रिटिशांच्या 'सिव्हिलायझिंग मिशन'चा बुरखा फाटला आणि त्यांच्या सत्तेचे शोषक स्वरूप जगासमोर आले.

**३) ऐतिहासिक साधनांचे संकलन आणि जतन:** इतिहासाला वैज्ञानिक आधार देण्यासाठी वि. का. राजवाडे यांच्यासारख्या विद्वानांनी ऐतिहासिक साधनांच्या संकलनावर भर दिला. राजवाड्यांनी महाराष्ट्रात फिरून हस्तलिखिते, बखरी आणि पत्रे गोळा करून 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' हे २२ खंड प्रकाशित केले. या संशोधनामुळे इतिहासाला सत्यतेचा ठोस आधार मिळाला. साधनांच्या या शास्त्रशुद्ध मांडणीमुळे साम्राज्यवादी लेखकांचे खोटे दावे खोडून काढणे शक्य झाले आणि भारतीय इतिहासाचे वस्तुनिष्ठ दर्शन घडले.

**४) लोकशाही आणि घटनात्मक मूल्यांचा शोध:** लोकशाहीची ओळख ब्रिटिशांनीच करून दिली हा भ्रम राष्ट्रवादी इतिहासकारांनी मोडीत काढला. प्राचीन साहित्याच्या आधारे त्यांनी ऋग्वेद काळातील सभा व समिती आणि बुद्धाच्या काळातील गणराज्यांचे दाखले दिले. काशीप्रसाद जयस्वाल यांच्यासारख्या अभ्यासकांनी हे सिद्ध केले की, पाश्चात्य जगाच्या कित्येक शतके आधी भारतात लोकशाही मूल्ये अस्तित्वात होती. यामुळे भारतीयांना हे पटले की, लोकशाही ही आपल्यासाठी परकी नसून आपल्या संस्कृतीचाच अविभाज्य भाग आहे.

**५) राष्ट्रीय अस्मितेचे आणि देशप्रेमाचे जागरण:** राष्ट्रवादी इतिहासलेखनाचा मुख्य उद्देश मरगळलेल्या भारतीय जनमानसात राष्ट्रप्रेमाची ठिणगी टाकणे हा होता. इतिहासातील शौर्यगाथांच्या माध्यमातून भारत हा केवळ भूभाग नसून एक महान राष्ट्र आहे, ही जाणीव करून देण्यात आली. स्वतःच्या मुळांचा आणि महान वारशाचा शोध घेतल्यामुळे समाजात अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा निर्माण झाली. या वैचारिक आधारामुळेच स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारकांना आणि नेत्यांना ब्रिटीश सत्तेविरुद्ध लढण्यासाठी मोठे मानसिक बळ प्राप्त झाले.

**५) प्रमुख राष्ट्रावादी इतिहासकार:**

**१) काशीप्रसाद जयस्वाल:**

व्यवसायाने प्रख्यात वकील असलेल्या काशीप्रसाद जयस्वाल यांनी केवळ कायद्याच्या क्षेत्रातच नव्हे,

तर इतिहास संशोधनाच्या क्षेत्रातही क्रांती घडवून आणली. त्यांच्या इतिहास लेखनाचा मूळ उद्देश भारतीय संस्कृतीच्या वारशाचे पुनरुज्जीवन करणे आणि साम्राज्यवाद्यांनी भारतीयांवर लादलेला न्यूनगंड नष्ट करणे हा होता.

**अ) सखोल संशोधन आणि भाषेवरील प्रभुत्व:** जयस्वाल यांना संस्कृत भाषेचे उत्तम ज्ञान होते. त्यांनी केवळ भाषांतरांवर अवलंबून न राहता स्वतः धर्मशास्त्रीय ग्रंथ, प्राचीन कोरीव लेख आणि नाण्यांचा अभ्यास केला. प्राचीन भारतीय राजकारण आणि समाजव्यवस्था समजून घेण्यासाठी त्यांनी विविध ऐतिहासिक साधनांचे सूक्ष्म विश्लेषण केले. त्यांच्या या सखोल संशोधनातून दोन अत्यंत मौलिक ग्रंथ जन्माला आले; 'Hindu Polity' हा ग्रंथ राष्ट्रवादी इतिहासलेखनाचा मैलाचा दगड मानला जातो. 'History of India (150-350 -D)' या ग्रंथात त्यांनी गुप्तपूर्व काळातील राजकीय घडामोडींवर प्रकाश टाकला.

**ब) साम्राज्यवादी दाव्यांचे खंडन:** ब्रिटीश इतिहासकारांचे सर्वात मोठे विधान हे होते की, भारतात प्राचीन काळी केवळ हुकूमशाही होती आणि भारतीयांना प्रतिनिधिक संस्थांचे ज्ञान कधीच मिळाले नाही. काशीप्रसाद जयस्वाल यांनी आपल्या ग्रंथातून या विधानाला सबळ पुराव्यानिशी छेद दिला. त्यांनी हे सिद्ध केले की, प्राचीन भारतात केवळ राजेशाही नव्हती, तर प्रजासत्ताक आणि लोकशाही संस्थांचे अस्तित्व होते.

**क) प्राचीन संस्थांचे अस्तित्व सिद्ध करणे:** जयस्वाल यांनी आपल्या संशोधनातून खालील ऐतिहासिक पुरावे जगासमोर आणले; ऋग्वेद काळापासून चालत आलेल्या 'सभा' आणि 'समिती' या संस्था राजाच्या अधिकारांवर नियंत्रण ठेवत असत. या संस्थांमध्ये लोकशाही पद्धतीने चर्चा आणि निर्णय घेतले जात, हे त्यांनी स्पष्ट केले. गौतम बुद्धांच्या काळात बौद्ध संघामध्ये मतदान, प्रस्ताव मांडणे आणि बहुमताने निर्णय घेणे यांसारख्या आधुनिक लोकशाहीतील प्रक्रिया राबवल्या जात असत, हे त्यांनी पुराव्यासह मांडले. भारतातील लिच्छवी, शाक्य यांसारखी गणराज्ये ही खऱ्या अर्थाने प्रजासत्ताक होती. तिथे राजाची निवड प्रजेद्वारे किंवा निवडून दिलेल्या प्रतिनिधींद्वारे होत असे.

**ड) प्रखर राष्ट्रवाद आणि अभिमान:** जयस्वाल यांच्या लेखनातून केवळ ऐतिहासिक माहिती मिळत नाही, तर त्यातून त्यांचा प्रखर राष्ट्रवाद व भारतीय संस्कृतीचा सार्थ अभिमान दिसून येतो. त्यांनी साम्राज्यवादी लेखकांना हे दाखवून दिले की, ज्या लोकशाहीचा अभिमान युरोप बाळगतो, ती लोकशाही भारतात अडीच-तीन हजार वर्षांपूर्वीच प्रगत अवस्थेत होती.

जयस्वाल यांच्या कार्यामुळे पाश्चात्य विद्वानांना त्यांच्या भूमिकेत बदल करणे भाग पडले. त्यांनी भारतीय तरुणांना हे पटवून दिले की, भारत हा शासन करण्यास नालायक नसून, आपल्या रक्तामध्येच लोकशाही आणि स्वशासनाचे गुण आहेत. प्राचीन भारताच्या या राष्ट्रवादी मांडणीमुळे स्वातंत्र्यलढ्याला एक मोठे वैचारिक बळ मिळाले आणि भारतीयांचा स्वाभिमान पुन्हा एकदा जागृत झाला.

### ३) राधा कुमुद मुखर्जी:

राष्ट्रवादी इतिहासलेखनाच्या प्रवाहात राधा कुमुद मुखर्जी यांचे स्थान अत्यंत अढळ आहे. ज्या काळात

साम्राज्यवादी इतिहासकार भारतीय संस्कृतीला केवळ आध्यात्मिक आणि भौतिकदृष्ट्या मागासलेली ठरवत होते, त्या काळात मुखर्जी यांनी आपल्या सखोल संशोधनातून भारतीयांच्या भौतिक, शैक्षणिक आणि राजकीय प्रगतीचा पुरावा जगासमोर ठेवला. त्यांचा मुख्य संघर्ष साम्राज्यवाद्यांच्या त्या विधानाशी होता, ज्यात असे म्हटले गेले होते की भारतीयांनी कधीही भौतिक किंवा शास्त्रीय प्रगती केली नाही.

**अ) भौतिक प्रगती आणि नाविक सामर्थ्य:** साम्राज्यवादी लेखकांनी भारतीयांना केवळ परलोकाचा विचार करणारे ठरवून हिणवले होते. याला उत्तर म्हणून मुखर्जी यांनी 'The History of Indian Shipping' हा ग्रंथ लिहिला. त्यांनी संस्कृत वाङ्मय आणि लेण्यांमधील पुराव्यांच्या आधारे हे सिद्ध केले की, प्राचीन भारतीय लोक जहाजबांधणी शास्त्रात निपुण होते. भारतीयांनी समुद्र ओलांडून आग्नेय आशियाशी व्यापार आणि सांस्कृतिक संबंध प्रस्थापित केले होते. यातून भारतीयांची भौतिक व व्यापारी जिद्द सिद्ध होऊन त्यांच्या मागासलेपणाचा ब्रिटीश दावा खोडून निघाला.

**ब) शैक्षणिक वारसा आणि सामाजिक प्रगती:** भारतात ब्रिटिशांपूर्वी शिक्षण व्यवस्थाच नव्हती, हा भ्रम मुखर्जी यांनी 'Ancient Indian Education' या ग्रंथाद्वारे दूर केला. त्यांनी तक्षशिला, नालंदा आणि विक्रमशिला यांसारख्या जागतिक दर्जाच्या विद्यापीठांची माहिती दिली. भारतात केवळ धार्मिक शिक्षणच नव्हते, तर आयुर्वेद, खगोलशास्त्र आणि शस्त्रक्रिया यांसारख्या विषयांतही मोठी प्रगती झाली होती. भारतीय शिक्षण पद्धती ही सर्वांगीण विकासावर भर देणारी आणि प्रगत होती, हे त्यांनी पुराव्यानिशी जगासमोर मांडले.

**क) विविधतेत एकता आणि सांस्कृतिक राष्ट्रवाद:** भारत हे राष्ट्र नसून केवळ भौगोलिक समूह आहे, या ब्रिटीश विधानाला मुखर्जी यांनी 'The Fundamental Unity of India' द्वारे सडेतोड उत्तर दिले. राजकीयदृष्ट्या अनेक राज्ये असली तरी, सप्तसिंधू किंवा भरतखंड या संकल्पनांमुळे भारतीयांच्या मनात एकात्मतेची भावना हजारो वर्षांपासून आहे, हे त्यांनी ठसवले. विभिन्न भाषा आणि प्रांत असूनही त्यातील सांस्कृतिक अंतःप्रवाह एकच होता, ही त्यांची मांडणी भारतीय राष्ट्रवादाला वैचारिक बळ देणारी ठरली.

**ड) स्वशासन आणि राजकीय वारसा:** भारतीयांना स्वशासनासाठी नालायक ठरवणाऱ्यांना मुखर्जी यांनी 'Local Self Government in Ancient India' या ग्रंथातून आरसा दाखवला. त्यांनी प्राचीन ग्रामपंचायतींच्या स्वायत्ततेचे वर्णन करून त्यांना लहान प्रजासत्ताक म्हटले. तसेच, 'The Gupta Empire' या ग्रंथात त्यांनी गुप्त काळातील प्रशासकीय शिस्त आणि भरभराटीचे वर्णन करून त्या काळाचे सुवर्णयुग म्हणून समर्थन केले. भारतीयांचा प्रशासकीय आणि राजकीय वारसा प्रगत होता, हे त्यांनी ओघवत्या शैलीत सिद्ध केले.

**४) डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर:**

भारतीय इतिहासलेखनाच्या क्षेत्रात डॉ. रा. गो. भांडारकर (१८३७-१९२५) यांचे स्थान अत्यंत आदराचे आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे. ज्या काळात राष्ट्रवादी इतिहासलेखनावर केवळ गौरवीकरण आणि अतिशयोक्ती असे आरोप साम्राज्यवादी इतिहासकारांकडून केले जात होते, त्या काळात भांडारकरांनी

शास्त्रीय आणि चिकित्सक पद्धतीचा अवलंब करून भारतीय इतिहासाला जागतिक स्तरावर प्रतिष्ठा मिळवून दिली.

**अ) विद्वत्ता आणि भाषेवर प्रभुत्व:** डॉ. भांडारकर हे केवळ इतिहासकार नव्हते, तर ते एक थोर प्राच्यविद्यापंडित होते. त्यांचे संस्कृत आणि प्राकृत या भारतीय भाषांसोबतच इंग्रजी भाषेवरही विलक्षण प्रभुत्व होते. तत्त्वज्ञान आणि धर्मशास्त्राचा त्यांचा सखोल अभ्यास असल्याने त्यांना प्राचीन ग्रंथांचे अर्थ लावणे सुलभ झाले. त्यांनी पाश्चात्य संशोधन पद्धतीचा आणि भारतीय पाण्डित्याचा असा सुरेख संगम घडवून आणला की, त्यांच्या निष्कर्षांना कोणीही सहजपणे आव्हान देऊ शकत नव्हते.

**ब) प्रमुख ग्रंथसंपदा आणि संशोधन:** भांडारकरांनी आपल्या लेखनातून भारतीय इतिहासाचे विविधांगी पैलू उलगडले. त्यांचे दोन ग्रंथ आजही इतिहास संशोधकांसाठी दीपस्तंभासारखे कार्य करतात; 'The Early History of the Deccan' या ग्रंथाद्वारे त्यांनी दक्षिण भारताच्या, विशेषतः महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासाला शिस्तबद्ध स्वरूप दिले. सातवाहन, चालुक्य आणि राष्ट्रकूट यांसारख्या राजघराण्यांचा इतिहास त्यांनी पुराव्यानिशी मांडला. ' A Peep into the Early History of India' या ग्रंथात त्यांनी भारताच्या प्राचीन राजकीय आणि सामाजिक घडामोडींचे धावते पण अत्यंत चिकित्सक दर्शन घडवले.

**क) शास्त्रीय इतिहासलेखन पद्धतीचे पुरस्कर्ते:** भांडारकरांच्या लेखनाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची शास्त्रीय पद्धती. पुराव्याशिवाय काहीही लिहायचे नाही हा त्यांचा बाणा होता. साम्राज्यवादी इतिहासकारांच्या पूर्वग्रहांना उत्तर देताना त्यांनी कधीही भावनेच्या आहारी जाऊन अतिशयोक्ती केली नाही. त्यांनी शिलालेख, ताम्रपट आणि प्राचीन साहित्याची तुलनात्मक चिकित्सा केली. राजकीय घडामोडींसोबतच त्यांनी समाजाच्या आर्थिक, धार्मिक आणि सांस्कृतिक स्थितीचे विवेचन केले. शैव, वैष्णव आणि इतर संप्रदायांचा उगम आणि विकास कसा झाला, याचा त्यांनी चिकित्सक अभ्यास केला. इतिहास हा केवळ राजांच्या लढायांचा नसून तो समाजाच्या वैचारिक प्रवासाचाही असावा, हा विचार त्यांनी आपल्या लिखाणातून कृतीत आणला.

**ड) राष्ट्रवादी भूमिकेचे स्वरूप:** भांडारकर हे जरी राष्ट्रवादी असले, तरी त्यांचा राष्ट्रवाद हा सत्य शोधण्यावर आधारित होता. त्यांनी दाखवून दिले की, प्राचीन भारतीय समाज हा अत्यंत प्रगत आणि वैचारिकदृष्ट्या समृद्ध होता. त्यांनी मांडलेले निष्कर्ष हे पुराव्यांच्या भक्कम पायावर उभे असल्याने, साम्राज्यवादी इतिहासकारांना भारतीय संस्कृतीला हीन ठरवणे कठीण झाले. भारतीय अस्मितेची जोपासना करताना ऐतिहासिक सत्यतेशी तडजोड न करणारा हा महान इतिहासकार आधुनिक भारतीय इतिहासलेखनाचा खऱ्या अर्थाने जनक ठरला.

### ५) डॉ. अनंत सदाशिव आळतेकर:

राष्ट्रवादी इतिहासलेखनाच्या प्रवाहात डॉ. अ. स. आळतेकर (१८९८-१९६०) यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. बनारस हिंदू विद्यापीठ आणि पटना विद्यापीठात इतिहासाचे प्राध्यापक व विभागप्रमुख म्हणून त्यांनी दीर्घकाळ कार्य केले. केवळ पुस्तकी ज्ञानावर अवलंबून न राहता त्यांनी प्रत्यक्ष क्षेत्रीय संशोधन, शिलालेख, ताम्रपट, पुरावशेष आणि नाणी यांचा गाढा अभ्यास केला होता. प्राचीन भारताच्या सामाजिक आणि शैक्षणिक स्थितीबद्दल साम्राज्यवादी इतिहासकारांनी जे भ्रम पसरवले होते, ते पुराव्यानिशी

खोडून काढण्याचे महान कार्य आळतेकरांनी केले.

**अ) प्राचीन भारतीय शिक्षण पद्धतीचे पुनर्मूल्यांकन:** साम्राज्यवादी इतिहासकारांचा असा दावा होता की, ब्रिटीश येण्यापूर्वी भारत शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला होता आणि येथील शिक्षण केवळ मर्यादित वर्गापुरतेच होते. डॉ. आळतेकर यांनी त्यांच्या 'Education in Ancient India' या सुप्रसिद्ध ग्रंथाच्या माध्यमातून हा समज पूर्णतः खोडून काढला. त्यांनी प्राचीन वाङ्मय आणि ऐतिहासिक साधनांच्या आधारे हे सिद्ध केले की, प्राचीन भारतात नालंदा, तक्षशिला, विक्रमशिला आणि वल्लभी यांसारखी जागतिक कीर्तीची विद्यापीठे अस्तित्वात होती. या विद्यापीठांमध्ये केवळ धार्मिक शिक्षणच नाही, तर आयुर्वेद, खगोलशास्त्र, तर्कशास्त्र, शस्त्रविद्या आणि विज्ञानाचे प्रगत शिक्षण दिले जात असे. भारतीय शिक्षण पद्धती ही शिस्तबद्ध, सर्वांगीण आणि चारित्र्य घडवणारी होती, हे त्यांनी साधार मांडले.

**ब) स्त्रियांच्या सामाजिक स्थितीचे चिकित्सक विश्लेषण:** डॉ. आळतेकर यांनी 'The Position of Women in Hindu Civilization' या ग्रंथाद्वारे स्त्रियांच्या सामाजिक स्थितीचे चिकित्सक विश्लेषण केले. त्यांच्या मते, वैदिक काळात स्त्रियांना उपनयन संस्कार आणि वेदाध्ययनाचा अधिकार असून त्यांचे स्थान अत्यंत मानाचे होते. मात्र, मध्ययुगीन काळात परकीय आक्रमणे आणि कर्मकांडांमुळे सती, बालविवाह यांसारख्या अनिष्ट प्रथा बळावून त्यांचा दर्जा घसरत गेला. स्त्रियांच्या या घसरणीला धार्मिक संकुचितता कारणीभूत असल्याचे स्पष्ट करत त्यांनी स्त्रियांच्या स्वातंत्र्याचे आणि अधिकारांचे ऐतिहासिक समर्थन केले.

**क) राजकीय संस्था आणि राजसत्तेचे सिद्धांत:** डॉ. आळतेकर यांनी केवळ सामाजिकच नव्हे, तर राजकीय इतिहासातही मोलाचे कार्य केले. 'State and Government in Ancient India' या ग्रंथात त्यांनी प्राचीन भारतातील विविध राजकीय संस्थांचे विश्लेषण केले. प्राचीन भारतात केवळ निरंकुश राजेशाही नसून, लोकशाही तत्त्वावर चालणारी गणराज्ये आणि राजसत्तेचे विविध प्रगत सिद्धांत प्रचलित होते, हे त्यांनी शिलालेख आणि नाण्यांच्या पुराव्यांनी सिद्ध केले. त्यांच्या या मांडणीमुळे भारतीयांना प्रशासनाचे ज्ञान नव्हते हा ब्रिटिशांचा आरोप फोल ठरला.

**६) सर जदुनाथ सरकार:**

मध्ययुगीन भारताच्या इतिहासाला वैज्ञानिक शिस्त, वस्तुनिष्ठता आणि मूलगामी संशोधनाचा पाया मिळवून देण्याचे ऐतिहासिक श्रेय सर जदुनाथ सरकार (१८७०-१९५८) यांना जाते. ज्या काळात इतिहास म्हणजे केवळ दंतकथा किंवा पूर्वग्रहदूषित मांडणी मानली जात होती, त्या काळात सरकारने पुराव्यांच्या आधारे इतिहासाचे साधार विश्लेषण करण्याची परंपरा सुरू केली.

**अ) बहुभाषिक विद्वत्ता आणि साधनांचा व्यासंग:** सर जदुनाथ सरकारांचे इंग्रजी, फारसी, मराठी आणि पोर्तुगीज यांसारख्या भाषांवरील प्रभुत्व त्यांच्या संशोधनाचा पाया होते. अनुवादावर अवलंबून न राहता त्यांनी मूळ फारसी हस्तलिखिते आणि मराठी साधनांचे थेट अध्ययन केले. यामुळे त्यांच्या इतिहासलेखनात कमालीची अचूकता आणि विश्वासार्हता आली. त्यांनी इतिहासाला दंतकथांच्या जाळ्यातून बाहेर काढून पुराव्यांवर आधारित वैज्ञानिक शिस्त मिळवून दिली.

**ब) प्रत्यक्ष भौगोलिक दौरा आणि संशोधन पद्धती:** सरकार यांची संशोधन पद्धती केवळ ग्रंथांपुरती मर्यादित नव्हती. इतिहास हा भूगोलावर आधारित असतो, या विश्वासातून त्यांनी ऐतिहासिक रणांगणे आणि किल्ल्यांना प्रत्यक्ष भेटी दिल्या. भौगोलिक स्थिती आणि लष्करी हालचालींचा प्रत्यक्ष दौरा करून त्यांनी केलेले विश्लेषण त्यांच्या लेखनाला वास्तववादी बनवते. प्रदीर्घ मनन आणि क्षेत्रीय संशोधनानंतरच त्यांनी आपले ओघवते ग्रंथ साकारले.

**क) मुघल इतिहासावरील ग्रंथ:** मुघल साम्राज्याच्या इतिहासावर सरकारने अजोड कार्य केले. 'History of Aurangzeb' या पाच खंडांसाठी त्यांनी २५ वर्षे संशोधन करून औरंगजेबाच्या धोरणांचे सूक्ष्म विश्लेषण केले. तसेच 'Fall of the Mughal Empire' या चार खंडांतून त्यांनी मुघल सत्तेच्या ऱ्हासाची कारणमीमांसा मांडली. मुघल इतिहासाचे त्यांचे हे कार्य जागतिक स्तरावर आजही प्रमाण मानले जाते.

**ड) मराठा इतिहासातील योगदान:** मराठ्यांच्या इतिहासावर त्यांनी 'Shivaji and His Times' सारखे महत्त्वाचे ग्रंथ लिहिले. शिवाजी महाराजांचे चरित्र मांडताना त्यांनी मराठी साधनांसोबतच फारसी आणि युरोपीय साधनांची सांगड घातली. महाराजांचे लष्करी चातुर्य आणि प्रशासकीय दृष्टी त्यांनी प्रभावीपणे अधोरेखित केली. मुघल-मराठा संघर्षाचे त्यांनी केलेले साधार विश्लेषण मराठ्यांच्या इतिहासाला जागतिक पटलावर नेणारे ठरले.

**इ) परखड मते आणि वस्तुनिष्ठता:** इतिहासलेखनात सरकारने कधीही सत्याशी तडजोड केली नाही. भावनेच्या आहारी न जाता त्यांनी ऐतिहासिक पुराव्यांच्या आधारे आपली परखड मते मांडली. औरंगजेबाचे धार्मिक धोरण असो वा शिवाजी महाराजांचे निर्णय, त्यांनी कोणाचीही खुशामत न करता वस्तुनिष्ठ विश्लेषण केले. यामुळे काही वेळा वाद निर्माण झाले, तरी त्यांची संशोधनातील निष्पक्षता इतिहासकारांसाठी आदर्श ठरली.

**ई) राष्ट्रवादी इतिहासलेखनातील स्थान:** सर जदुनाथ सरकारने साम्राज्यवादी लेखकांच्या विकृत मांडणीला ऐतिहासिक पुराव्यांनी छेद दिला. भारतीय शासकांकडे प्रगत लष्करी डावपेच आणि उत्तम प्रशासन होते, हे त्यांनी जगाला दाखवून दिले. त्यांचे मध्ययुगीन भारताचे चित्रण शास्त्रीय आणि भारतीय दृष्टिकोनातून केलेले होते. वस्तुनिष्ठतेचा पुरस्कार करूनही त्यांची भूमिका व्यापक अर्थाने राष्ट्रप्रेमाने प्रेरित आणि अस्मितेचे जतन करणारी होती.

**७) डॉ. रमेशचंद्र दत्त:**

रमेशचंद्र दत्त (१८४८-१९०९) हे स्वतः एक उच्चपदस्थ प्रशासकीय अधिकारी (ICS) होते. त्यांच्या प्रशासकीय अनुभवामुळे त्यांना ब्रिटिशांच्या धोरणांचा आणि ग्रामीण भारताच्या दुर्दशेचा जवळून परिचय होता. प्रशासकीय सेवेतून निवृत्त झाल्यावर त्यांनी लंडन विद्यापीठात प्राध्यापक म्हणून कार्य केले आणि आपला सर्व वेळ भारताच्या आर्थिक इतिहासाच्या संशोधनासाठी खर्च केला.

**अ) शोषणाचा दस्तऐवज:** दत्त यांनी दोन खंडात लिहिलेला 'Economic History of India' हा ग्रंथ आधुनिक भारताच्या इतिहास संशोधनातील मैलाचा दगड मानला जातो. या ग्रंथाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य

म्हणजे त्यांनी ही मांडणी केवळ भावनेच्या आधारे केली नाही, तर ब्रिटीश पार्लमेंटची कागदपत्रे, अधिकृत शासकीय अहवाल आणि सांख्यिकी माहितीच्या आधारे केली. ब्रिटीश राजवट ही भारताच्या आर्थिक अधोगतीला कशी जबाबदार आहे, हे त्यांनी पुराव्यासह सिद्ध केले.

**ब) वसाहतवादी व्यापाराचे दोन मूळ उद्देश:** दत्त यांनी ब्रिटिशांच्या आर्थिक धोरणांचे दोन मुख्य पैलू उजागर केले; ब्रिटिशांनी भारताच्या शेतीचे व्यापारीकरण करून भारताला केवळ इंग्लंडमधील कारखान्यांसाठी लागणारा कच्चा माल (उदा. कापूस, नीळ) पुरवणारी बाजारपेठ बनवले. इंग्लंडमधील मँचेस्टर आणि लँकेशायरमध्ये तयार होणारा पक्का माल भारतीय बाजारपेठेत स्वस्त दरात खपवण्यासाठी भारतीयांवर अन्यायकारक कर लादले गेले. या दुहेरी धोरणामुळे भारताची स्वयंपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्था उद्ध्वस्त झाली आणि भारतीय शेतकरी कर्जबाजारी झाला.

**क) अनौद्योगीकीकरणचा सिद्धांत:** रमेशचंद्र दत्त यांनी मांडलेला अनौद्योगीकीकरणचा सिद्धांत आजही आर्थिक इतिहासात अत्यंत महत्त्वपूर्ण मानला जातो. ब्रिटिशांच्या आगमनापूर्वी भारत हा जगातील कापड उद्योगाचे प्रमुख केंद्र होता. मात्र, ब्रिटिशांनी भारतीय हातमाग उद्योगावर अव्वाच्या सव्वा कर लादले आणि दुसरीकडे यंत्रावर तयार होणाऱ्या ब्रिटीश कापडाला करमुक्ती दिली. परिणामी, भारतातील लाखो विणकर आणि कारागीर बेरोजगार झाले. उद्योगांच्या या ऱ्हासाला दत्त यांनी अनौद्योगीकीकरण असे संबोधले, ज्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेचा समतोल बिघडला.

**ड) आर्थिक निस्सारण आणि राष्ट्रवादाला वैचारिक बळ:** दत्त यांच्या संशोधनाने दादाभाई नौरोजी यांच्या 'आर्थिक निस्सारण' (Drain of Wealth) च्या सिद्धांताला ऐतिहासिक पुष्टी दिली. त्यांनी दाखवून दिले की, भारताचा पैसा होम चार्जेस, लष्करी खर्च आणि ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या पेन्शनच्या स्वरूपात दरवर्षी इंग्लंडला जात आहे. या संशोधनामुळे भारतीय स्वातंत्र्यलढ्याला एक भक्कम आर्थिक आधार मिळाला. जोपर्यंत ब्रिटीश सत्ता भारतात आहे, तोपर्यंत भारताचे दारिद्र्य संपणार नाही, ही जाणीव त्यांनी सामान्य जनतेच्या आणि राष्ट्रीय नेत्यांच्या मनात निर्माण केली.

**८) इतर राष्ट्रवादी इतिहासकार:** आधुनिक भारताच्या इतिहासलेखनात डॉ. ताराचंद आणि डॉ. आर. सी. मुजुमदार हे दोन स्तंभ मानले जातात. या दोन्ही विद्वानांनी राष्ट्रवादी भूमिकेतून भारतीय इतिहासाची पुनर्मांडणी केली, मात्र त्यांच्या विश्लेषण पद्धतीत काही मूलभूत फरक होते. डॉ. ताराचंद (१८८८–१९७३) यांनी भारत सरकारच्या विनंतीवरून 'History of the Freedom Movement in India' हा चार खंडांचा अधिकृत इतिहास लिहिला. त्यांनी ब्रिटिशांच्या आगमनापूर्वीची भारतीय अर्थव्यवस्था संपन्न आणि स्वयंपूर्ण असल्याचे सिद्ध केले. ब्रिटीश राजवटीने भारतीय उद्योगांचे शोषण करून भारताला केवळ कच्च्या मालाची वसाहत बनवले, हा आर्थिक राष्ट्रवादाचा मुद्दा त्यांनी साधार मांडला. त्यांचे दुसरे महत्त्वाचे योगदान म्हणजे 'The Influence of Islam on Indian Culture' हा ग्रंथ. यात त्यांनी भारतीय संस्कृतीला केवळ हिंदू न मानता ती हिंदू आणि इस्लामच्या समन्वयातून निर्माण झालेली एक संमिश्र संस्कृती असल्याचे प्रतिपादन केले. सुफी आणि भक्ती चळवळीने या समन्वयाचा पाया रचला,

असे त्यांचे मत होते. फाळणीसाठी त्यांनी प्रामुख्याने ब्रिटिशांच्या फोडा आणि झोडा या कुटिल नीतीला जबाबदार धरले.

डॉ. आर. सी. मुजुमदार (१८८४-१९८०) यांनी सुमारे ७० वर्षे इतिहास संशोधनाला वाहिली. भारतीय विद्या भवनच्या 'The History and Culture of the Indian People' या ११ खंडीय महाप्रकल्पाचे मुख्य संपादक म्हणून त्यांनी भारतीय इतिहासाला एक अखंड ओळख मिळवून दिली. त्यांनी 'Ancient India Colonies in the Far East' द्वारे आग्नेय आशियातील भारतीय संस्कृतीचा विस्तार जगासमोर आणला. १८५७ च्या उठावाबद्दल त्यांनी अत्यंत वस्तुनिष्ठ भूमिका घेतली. वि. दा. सावरकरांनी त्याला १८५७ चे स्वातंत्र्यसमर तर ब्रिटिशांनी बंड म्हटले होते, पण मुजुमदार यांनी ऐतिहासिक पुराव्यांच्या आधारे हा उठाव पूर्णतः राष्ट्रीय नसल्याचे मांडले. डॉ. ताराचंद यांच्या तुलनेत मुजुमदार यांचे हिंदू-मुस्लिम संबंधांवरील मत भिन्न होते. त्यांच्या मते या दोन समाजांत मूलभूत सांस्कृतिक भेद होते, जे समन्वयात अडथळे ठरले. त्यांनी गांधीजींच्या कार्याचे कौतुक केले तरीही खिलाफत चळवळीसारख्या धार्मिक मुद्द्यांना राजकारणात आणल्याबद्दल त्यांच्यावर चिकित्सक टीकाही केली.

**६) राष्ट्रवादी इतिहासलेखनाचा परिणाम:**

राष्ट्रवादी इतिहासलेखन ही केवळ एक बौद्धिक कसरत नव्हती, तर ती भारतीय पुनर्जागरणाची एक शक्तिशाली लाट होती. साम्राज्यवादी इतिहासकारांनी भारताच्या अस्मितेवर जो घाला घातला होता, त्याला राष्ट्रवादी इतिहासकारांनी दिलेल्या उत्तरामुळे भारतीय समाज आणि राजकारणावर अत्यंत खोलवर आणि दूरगामी परिणाम झाले. या परिणामांचे विश्लेषण खालील चार प्रमुख मुद्द्यांच्या आधारे करता येईल:

**अ) न्यूनगंडातून मुक्ती आणि आत्मसन्मानाची जागृती:** ब्रिटीश लेखकांनी भारतीयांना अंधश्रद्धाळू आणि मागास ठरवून निर्माण केलेला न्यूनगंड राष्ट्रवादी इतिहासकारांनी मोडीत काढला. त्यांनी प्राचीन भारताचे सुवर्णयुग आणि प्रगत विज्ञानाचे पुरावे सादर करून भारतीयांना महान परंपरेची जाणीव करून दिली. आम्ही जगाला ज्ञान देणारे राष्ट्र होतो ही भावना रुजल्यामुळे भारतीयांचा गमावलेला आत्मविश्वास परत आला आणि परकीय सत्तेविरुद्ध स्वाभिमानाने उभे राहण्याचे धैर्य निर्माण झाले.

**ब) स्वातंत्र्य चळवळीला वैचारिक आणि भावनिक आधार:** राष्ट्रवादी इतिहासाने स्वातंत्र्यलढ्याला आवश्यक प्रेरणा पुरवली. लोकमान्य टिळकांनी शिवजयंती व गणेशोत्सवाद्वारे ऐतिहासिक स्मृतींना उजाळा देत जनतेला संघटित केले. वि. दा. सावरकरांनी १८५७ च्या घटनेला स्वातंत्र्यसमर संबोधून क्रांतिकारी विचार पेरले. महान राष्ट्रपुरुषांच्या पराक्रमी कथांमुळे क्रांतिकारकांना त्याग करण्याचे बळ मिळाले, तर सर्वसामान्यांना अन्यायाविरुद्ध लढण्याची जिद्द लाभली. इतिहास हा स्वातंत्र्य चळवळीचा प्रमुख ऊर्जास्त्रोत ठरला.

**क) ऐतिहासिक साहित्यात भर आणि प्रादेशिक अस्मिता:** राष्ट्रवादी प्रेरणेमुळे प्रादेशिक इतिहास संशोधनाची मोठी चळवळ सुरू झाली. वि. का. राजवाडे आणि वा. सी. बेंद्रे यांसारख्या संशोधकांनी गावोगावी फिरून अस्सल कागदपत्रे व बखरी शोधल्या. मराठा, राजपूत आणि शिखांच्या इतिहासावर वस्तुनिष्ठ लेखन

झाल्याने ऐतिहासिक साहित्यात मोलाची भर पडली. यातून भारताची सांस्कृतिक एकता सिद्ध झाली, ज्याने राष्ट्रीय एकात्मतेसोबतच प्रादेशिक स्वाभिमानालाही बळकटी दिली.

**ड) आर्थिक शोषणाची जाणीव आणि वसाहतवादाचा विरोध:** दादाभाई नौरोजी आणि रमेशचंद्र दत्त यांसारख्या विचारवंतांनी ऐतिहासिक आकडेवारीद्वारे ब्रिटिशांच्या आर्थिक शोषणाचे सत्य उघड केले. त्यांनी मांडलेला संपत्तीचे निस्सारण हा सिद्धांत जनतेपर्यंत पोहोचताच ब्रिटिशांच्या न्यायप्रियतेचा बुरखा फाटला. इंग्रज हे उद्धारकर्ते नसून आर्थिक शोषण करणारे परकीय आहेत, ही जाणीव झाल्यामुळे स्वदेशी आणि बहिष्कार आंदोलनाला प्रचंड बळ मिळाले.

**७) राष्ट्रवादी इतिहासलेखनाच्या मर्यादा:**

राष्ट्रवादी इतिहासलेखनाने भारतीय अस्मितेचे पुनरुज्जीवन केले आणि स्वातंत्र्यलढ्याला वैचारिक बळ दिले, हे सत्य असले तरी, ऐतिहासिक निकषांवर या लेखनपरंपरेच्या काही गंभीर मर्यादा आणि त्रुटी दिसून येतात. साम्राज्यवादी इतिहासलेखनाला सडेतोड उत्तर देण्याच्या उत्साहात या प्रवाहाने काही ठिकाणी वस्तुनिष्ठतेशी तडजोड केली. या मर्यादांचे विश्लेषण खालीलप्रमाणे करता येईल:

**अ) वस्तुनिष्ठतेचा अभाव आणि अतिरंजित मांडणी:** साम्राज्यवादी टीकेला उत्तर देताना राष्ट्रवादी इतिहासकारांनी प्रतिक्रियात्मक भूमिका घेतल्यामुळे लेखनात वस्तुनिष्ठतेचा अभाव जाणवतो. ऐतिहासिक सत्यापेक्षा स्वदेशाभिमानाला अधिक महत्त्व दिल्याने अनेक घटनांचे अतिरंजित आणि उदात्तीकरण करण्याकडे कल राहिला. यामुळे काही ठिकाणी हा इतिहास पुराव्यांवर आधारित शास्त्र न राहता केवळ भावनाप्रधान साहित्य बनल्याची टीका केली जाते, ज्यामुळे संशोधनातील तर्कशुद्धता कमी झाली.

**ब) सामाजिक दोषांकडे दुर्लक्ष:** गौरवशाली भूतकाळ मांडण्याच्या नादात राष्ट्रवादी इतिहासकारांनी समाजव्यवस्थेतील जातिव्यवस्था, अस्पृश्यता आणि स्त्रियांची दुरवस्था यांसारख्या गंभीर दोषांकडे दुर्लक्ष केले. काहींनी तर जातिव्यवस्थेचे समर्थन करण्याचा प्रयत्न केला. प्राचीन काळी सर्व काही आदर्श होते या मांडणीमुळे समाजातील अंतर्गत शोषणाच्या वास्तवाकडे डोळेझाक झाली. केवळ परकीय आक्रमकांवर लक्ष केंद्रित केल्याने अंतर्गत सामाजिक संघर्षाचा चिकित्सक अभ्यास या प्रवाहात मागे पडला.

**क) जमातवादाचा धोका:** ऐतिहासिक व्यक्तींचे उदात्तीकरण करताना धार्मिक निकष लावल्यामुळे नकळतपणे जमातवादाला खतपाणी मिळाले. प्राचीन भारताला केवळ हिंदू काळ मानून त्याचे अति-गौरवीकरण करण्यात आले, तर मध्ययुगीन संघर्षाला केवळ धार्मिक स्वरूप दिले गेले. यामुळे इतिहासाचे हिंदू आणि मुस्लिम राष्ट्रवाद असे तुकडे पडले. साम्राज्यवाद्यांनी पेरलेली दुही या एकतर्फी लेखनामुळे अधिक गडद झाली, ज्याचा परिणाम आधुनिक राजकारणावरही झाला.

**ड) अतार्किक विधाने आणि वैज्ञानिकतेचा अभाव:** प्रखर राष्ट्रवादामुळे काही लेखकांनी विज्ञानाच्या कसोटीवर न उतरणारी अतार्किक विधाने केली. प्राचीन भारतात अण्वस्त्रे किंवा विमाने होती, अशा प्रकारच्या दाव्यांमुळे जागतिक स्तरावर भारतीय इतिहास संशोधनाच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. पुराव्यांपेक्षा भावना आणि श्रद्धेला अधिक महत्त्व दिल्याने इतिहास संशोधनातील वैज्ञानिक दृष्टिकोन

धूसर झाला. ऐतिहासिक सत्य आणि वैयक्तिक अभिमान यातील सीमारेषा पाळण्यात अनेकदा अपयश आले.

### ८) राष्ट्रवादी इतिहासलेखनाचे मूल्यमापन:

राष्ट्रवादी इतिहासलेखन ही केवळ लेखनशैली नसून ब्रिटीश वसाहतवादाविरुद्ध उठलेली एक प्रबळ वैचारिक लाट होती. तिचे मूल्यमापन खालीलप्रमाणे करता येईल; साम्राज्यवादी लेखकांनी भारतीयांना इतिहासहीन ठरवून जो न्यूनगंड निर्माण केला होता, तो राष्ट्रवादी इतिहासकारांनी प्राचीन भारताचे वैभव आणि वैज्ञानिक प्रगती मांडून मुळापासून उखडून टाकला. दादाभाई नौरोजींसारख्या विद्वानांनी संपत्तीचे निस्सारण हा आर्थिक शोषणाचा सिद्धांत मांडून स्वातंत्र्यलढ्याला भक्कम तार्किक बैठक दिली. वि. का. राजवाडे यांच्यासारख्या संशोधकांनी ऐतिहासिक साधनांचे संकलन करून संशोधनाला वैज्ञानिक शिस्त मिळवून दिली. मात्र, या परंपरेत काही मर्यादाही होत्या. साम्राज्यवाद्यांचे खंडन करताना काही वेळा वस्तुनिष्ठतेचा अभाव राहिला आणि पूर्वजांचे केवळ उदात्तीकरण करण्याकडे कल वाढला. काही ठिकाणी ऐतिहासिक घटनांना धार्मिक रंग दिल्याने लेखनात नकळत जमातवादी सूर उमटला. तरीही, भारतीय अस्मितेचे रक्षण करून आधुनिक इतिहासलेखनाचा पाया रचण्याचे आणि जनमानसात राष्ट्रप्रेम जागवण्याचे ऐतिहासिक श्रेय या परंपरेलाच जाते.

**स्वय-अध्ययन प्रश्न क्र. २**

१) राष्ट्रवादी इतिहासलेखनाचा मुख्य हेतू खालीलपैकी कोणता होता?

अ) पाश्चात्य संस्कृतीचे श्रेष्ठत्व सिद्ध करणे

ब) ब्रिटीश सत्तेचे समर्थन करणे

क) केवळ राजांच्या लढायांची नोंद करणे

ड) भारतीय अस्मितेचे पुनरुज्जीवन, न्यूनगंड दूर करणे

२) 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' हे २२ खंड प्रकाशित करून ऐतिहासिक साधनांच्या संकलनावर कोणी भर दिला?

अ) न्यायमूर्ती रानडे

ब) विष्णूशास्त्री चिपळूणकर

क) वि. का. राजवाडे

ड) सर जदुनाथ सरकार

३) काशीप्रसाद जयस्वाल यांनी ‘Hindu Polity’ या ग्रंथातून कोणता महत्त्वाचा निष्कर्ष मांडला?

अ) प्राचीन भारतात केवळ निरंकुश राजेशाही होती.

ब) प्राचीन भारतात लोकशाही आणि प्रजासत्ताक संस्था अस्तित्वात होत्या.

क) भारतीय समाज कायमच मागासलेला राहिला.

ड) प्राचीन भारतात शिक्षणाचा अभाव होता.

४) ‘The History of Indian Shipping’ या ग्रंथाद्वारे भारतीयांच्या नाविक सामर्थ्याचा पुरावा कोणी दिला?

अ) राधा कुमुद मुखर्जी
ब) डॉ. अ. स. आळतेकर

क) डॉ. रा. गो. भांडारकर
ड) रमेशचंद्र दत्त

५) डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांच्या इतिहासलेखन पद्धतीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य कोणते होते?

अ) अतिशयोक्तीपूर्ण गौरवीकरण

ब) केवळ धार्मिक ग्रंथांवर अवलंबून राहणे

क) शास्त्रीय आणि चिकित्सक पद्धती

ड) साम्राज्यवादी विचारांचा पुरस्कार

६) रमेशचंद्र दत्त यांनी ‘Economic History of India’ या ग्रंथात कोणता महत्त्वाचा सिद्धांत मांडला?

अ) सांस्कृतिक समन्वयाचा सिद्धांत

ब) अनौद्योगीकीकरण आणि आर्थिक निस्सारण

क) वंशश्रेष्ठत्वाचा सिद्धांत

ड) प्राचीन लोकशाहीचा सिद्धांत

७) स्त्रियांच्या सामाजिक स्थितीचे आणि प्राचीन शिक्षण पद्धतीचे पुनर्मूल्यांकन करणारे राष्ट्रवादी इतिहासकार कोण?

अ) वि. का. राजवाडे

ब) डॉ. आर. सी. मुजुमदार

क) सर जदुनाथ सरकार

ड) डॉ. अ. स. आळतेकर

८) सर जदुनाथ सरकार यांच्या संशोधन पद्धतीचे खास वैशिष्ट्य कोणते होते?

अ) केवळ इंग्रजी साधनांचा वापर

ब) प्रत्यक्ष भौगोलिक दौरा, लष्करी हालचालींचे विश्लेषण

क) केवळ दंतकथांवर आधारित लेखन

ड) ब्रिटीश सत्तेची खुशामत करणे

९) राष्ट्रवादी इतिहासलेखनावर कोणती प्रमुख मर्यादा किंवा टीका केली जाते?

अ) हे लेखन केवळ इंग्रजी भाषेतच होते.

ब) ऐतिहासिक साधनांचा वापरच केला नाही.

क) त्यांनी भारतीय संस्कृतीला कमी लेखले.

ड) काही ठिकाणी वस्तुनिष्ठतेचा अभाव आणि अतिरंजित गौरवीकरण झाले.

१०) भारतीय संस्कृतीला 'संमिश्र संस्कृती' मानणारे इतिहासकार कोण?

अ) डॉ. अ. स. आळतेकर

ब) डॉ. ताराचंद

क) वि. दा. सावरकर

ड) डॉ. आर. सी. मुजुमदार

**२.१.३ मार्क्सवादी इतिहासलेखन:**

विसाव्या शतकातील जागतिक वैचारिक क्रांतीमध्ये मार्क्सवाद हा केवळ एक राजकीय सिद्धांत न राहता, तो मानवी प्रगतीचा अभ्यास करणारी एक प्रबळ ज्ञानशाखा म्हणून उदयास आला. कार्ल मार्क्सने मांडलेला ऐतिहासिक भौतिकवाद हा सिद्धांत इतिहासाकडे पाहण्याचा एक नवा आणि क्रांतिकारी दृष्टिकोन ठरला. या सिद्धांतानुसार, इतिहासाची चाके ही थोर पुरुषांच्या इच्छेमुळे नव्हे, तर समाजातील भौतिक गरजा आणि उत्पादन साधने यांच्यातील बदलांमुळे फिरत असतात. या विचारसरणीने जगभरातील इतिहासलेखनाला प्रभावित केले आणि भारतातही या परंपरेने इतिहास संशोधनाची जुनी चौकट मोडीत काढली.

भारतात मार्क्सवादी इतिहासलेखनाचा उदय हा साम्राज्यवादी आणि राष्ट्रवादी अशा दोन प्रबळ इतिहास लेखनपरंपरांच्या पार्श्वभूमीवर झाला. साम्राज्यवादी इतिहासकारांनी भारतीय समाजाला कायमच स्थितीशील आणि अपरिवर्तनीय ठरवून ब्रिटीश राजवटीचे समर्थन केले होते. याला प्रत्युत्तर देताना राष्ट्रवादी इतिहासकारांनी भारताच्या प्राचीन गौरवशाली वारशावर आणि राजकीय विजयांवर अधिक लक्ष केंद्रित

केले. मात्र, या दोन्ही परंपरांमध्ये समाजातील सामान्य घटक, शेतकरी, कामगार आणि आर्थिक संरचनेचा अभ्यास गौण ठरला होता. या दोन टोकांच्या भूमिकांच्या पलीकडे जाऊन, समाजाच्या तळागाळातील आर्थिक प्रक्रिया, उत्पादनाची साधने आणि सतत चालणारा वर्गसंघर्ष यांचा अभ्यास करण्यावर मार्क्सवादी परंपरेने भर दिला.

**१) मार्क्सवादी इतिहासलेखनाची संकल्पना:**

मार्क्सवादी इतिहासलेखन हे ऐतिहासिक घटनांच्या नोंदीपेक्षा समाजाच्या उत्क्रांतीचा वैज्ञानिक शोध घेण्यावर भर देते. ही संकल्पना कार्ल मार्क्सच्या आर्थिक नियतिवाद आणि वर्गसंघर्ष या सिद्धांतांवर आधारलेली आहे. मार्क्सवादानुसार, समाजाचा पाया हा आर्थिक असतो, ज्यात उत्पादन साधने आणि मालक-मजूर संबंधांचा समावेश होतो. या पायावरच धर्म, संस्कृती आणि राजकारणाची इमारत उभी असते. उत्पादन पद्धतीत बदल झाला की संपूर्ण सामाजिक व्यवस्था बदलते; उदा. शिकारी अवस्थेतून शेतीकडे वळताना कुटुंबसंस्था आणि कायद्यांचे स्वरूपही बदलले.

या परंपरेने इतिहासाचा केंद्रबिंदू राजे-महाराजांकडून बदलून सामान्य माणसाकडे आणला. इतिहास म्हणजे केवळ लढाया नसून तो शेतकरी, कारागीर आणि मजुरांनी उत्पादन प्रक्रियेत केलेल्या संघर्षाचा अभ्यास आहे. उत्पादनाच्या पद्धतीतील बदल हेच खऱ्या क्रांतीचे लक्षण मानले जाते. मार्क्सवादी दृष्टिकोनातून, प्रत्येक काळातील समाज शोषक आणि शोषित अशा दोन वर्गांत विभागलेला असतो. या दोन वर्गांमधील हितसंबंधांच्या संघर्षातूनच नवीन सामाजिक व्यवस्थेचा जन्म होतो. प्राचीन गुलामगिरी ते आधुनिक भांडवलशाहीपर्यंतचा प्रवास हा या वर्गसंघर्षाचीच परिणती आहे.

**२) मार्क्सवादी इतिहासलेखनाचा आधार**

मार्क्सवादी इतिहासलेखन परंपरा ही कोणत्याही काल्पनिक कथांवर किंवा केवळ राजांच्या पराक्रमावर आधारलेली नसून ती एका भक्कम वैज्ञानिक सिद्धांतावर उभी आहे. या परंपरेचा मुख्य वैचारिक आधार कार्ल मार्क्सने मांडलेला द्वंद्वात्मक भौतिकवाद हा आहे. हा सिद्धांत सांगतो की, निसर्ग आणि समाज हे दोन्हीही सतत बदलत असतात आणि या बदलांच्या मुळाशी भौतिक (आर्थिक) कारणे असतात. जेव्हा आपण भारतीय इतिहासाचा विचार करतो, तेव्हा मार्क्सवादी इतिहासकारांनी या सिद्धांताचा वापर करून भारतीय समाजव्यवस्थेचे एक नवीन चित्र उभे केले. या इतिहासलेखनाचे चार मुख्य आधारस्तंभ खालीलप्रमाणे स्पष्ट करता येतात:

**अ) उत्पादन साधने आणि उत्पादन संबंध:** मार्क्सवादी इतिहासलेखनात उत्पादन पद्धती हा प्राथमिक आधार असतो. यात उत्पादनाची साधने, त्यांची मालकी आणि श्रमिकांची स्थिती यांचा अभ्यास केला जातो. भारतीय संदर्भात, जमिनीची मालकी समुदायाकडून राजा किंवा जमीनदारांकडे गेल्यामुळे समाजात विषमता आणि वर्णव्यवस्था कशी निर्माण झाली, याचे विश्लेषण केले जाते. केवळ राजकीय बदल न पाहता उत्पादन पद्धतीतील बदल शोधण्याला येथे सर्वाधिक महत्त्व दिले जाते.

**ब) भौतिक अंतर्विरोध आणि वर्गसंघर्ष:** इतिहास ही शोषक आणि शोषित या दोन परस्परविरोधी

वर्गांमधील संघर्षाची प्रक्रिया आहे. उत्पादन साधनांच्या असमान विभागणीमुळे निर्माण होणाऱ्या या संबंधांना 'भौतिक अंतर्विरोध' म्हणतात. उदा. मध्ययुगातील शेतकरी आणि सत्ताधाऱ्यांमधील संघर्ष केवळ धार्मिक नसून तो महसूल आणि आर्थिक पिळवणुकीतून निर्माण झाला होता. या वर्गसंघर्षातूनच जुनी व्यवस्था मोडते आणि नवीन समाजव्यवस्था जन्माला येते.

**क) आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन:** मार्क्सवादी इतिहासकारांनी केवळ लिखित ग्रंथांवर अवलंबून न राहता पुरातत्त्वशास्त्र, मानववंशशास्त्र आणि अर्थशास्त्र या विज्ञानांची मदत घेतली. डी. डी. कोसंबी यांनी नाणी आणि प्राचीन अवशेषांच्या अभ्यासातून इतिहासाला वैज्ञानिक स्वरूप दिले. केवळ साहित्यातील वर्णनापेक्षा, त्या काळातील लोकांची जगण्याची भौतिक साधने काय होती, हे तपासण्यासाठी विविध ज्ञानशाखांचा वापर करणे हा या परंपरेचा मुख्य आधार आहे.

**ड) भारतीय स्थितीशीलतेच्या सिद्धांताचे खंडन:** कार्ल मार्क्सने सुरुवातीला भारतीय ग्रामव्यवस्था स्थितीशील असल्याचे म्हटले होते. मात्र, कोसंबी आणि आर. एस. शर्मा यांसारख्या भारतीय मार्क्सवादी इतिहासकारांनी हा 'आशियाई उत्पादन पद्धती'चा सिद्धांत खोडून काढला. त्यांनी सिद्ध केले की भारतीय समाज कधीही थबकलेला नव्हता; त्यात युरोपप्रमाणेच गुलामी आणि सरंजामशाहीचे विविध टप्पे भारतीय वैशिष्ट्यांसह गतिमान पद्धतीने अस्तित्वात होते.

**३) मार्क्सवादी इतिहासलेखनाची वैशिष्ट्ये:**

भारतीय इतिहासलेखनाच्या परंपरेत मार्क्सवादी दृष्टिकोनाने एक क्रांतिकारी बदल घडवून आणला. या इतिहासलेखन पद्धतीची प्रमुख वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे स्पष्ट करता येतील:

**अ) आर्थिक पैलूंवर भर:** मार्क्सवादी इतिहासलेखनात राजकीय घटनांपेक्षा आर्थिक घटकांना सर्वोच्च स्थान दिले जाते. केवळ युद्धांच्या तारखा न मांडता, व्यापाराचा ऱ्हास, सिंचन व्यवस्था आणि कर प्रणाली यावर लक्ष केंद्रित केले जाते. एखादे साम्राज्य कोसळण्यामागे राजाच्या कमकुवतपणापेक्षा बिघडलेली आर्थिक घडी आणि शेतीवरील करांचा बोजा ही मूळ कारणे कशी होती, याचे विश्लेषण करणे हे या परंपरेचे मुख्य उद्दिष्ट आहे.

**ब) वर्गसंघर्षाचे विश्लेषण:** इतिहासाच्या प्रत्येक टप्प्यावर समाज 'शोषक' आणि 'शोषित' अशा दोन वर्गांत विभागलेला असतो. प्राचीन काळातील ब्राह्मण-शूद्र संघर्ष, मध्ययुगातील जमीनदार-शेतकरी संबंध आणि आधुनिक काळातील भांडवलदार-कामगार संघर्ष यांतून सत्तेचे आणि शोषणाचे स्वरूप स्पष्ट केले जाते. सामाजिक विषमतेच्या मुळाशी असलेली आर्थिक विषमता कशी कारणीभूत आहे, हे दाखवून देणे या लेखनाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

**क) कनिष्ठ वर्गाचा इतिहास:** पारंपारिक इतिहासातील उच्चभ्रू चौकटीला छेद देत मार्क्सवादी इतिहासकारांनी शेतकरी, कारागीर आणि पददलित वर्गाला केंद्रस्थानी आणले. ज्यांच्या श्रमावर संस्कृती उभी राहिली, त्या मूक घटकांचे जीवन आणि विद्रोहाची नोंद येथे घेतली जाते. शेतकरी उठाव किंवा कामगार चळवळी या शोषणाविरुद्धच्या प्रतिक्रिया होत्या, अशी मांडणी केल्यामुळे इतिहासाला खऱ्या अर्थाने लोकशाहीवादी स्वरूप प्राप्त झाले.

**ड) धर्म आणि संस्कृतीची भौतिकवादी मीमांसा:** मार्क्सवादी इतिहासकार धर्म आणि संस्कृतीकडे आध्यात्मिक दृष्टिकोनाऐवजी 'भौतिकवादी' भूमिकेतून पाहतात. त्यांच्या मते, धर्म ही आर्थिक पायावर उभी असलेली एक सामाजिक इमारत आहे. विशिष्ट काळात धार्मिक रूढींना राजाश्रय का मिळाला, याचे विश्लेषण करताना त्यामागील सत्ताधीशांचे हितसंबंध तपासले जातात. धर्म हा शोषणाचे हत्यार म्हणून कसा वापरला गेला, याची चिकित्सक मांडणी या वैशिष्ट्यामुळे शक्य झाली.

**इ) साधनांची चिकित्सा आणि वैज्ञानिक मांडणी :** हे इतिहासलेखन लिखित साधनांसोबतच नाणी, मातीची भांडी आणि पुरातत्त्वीय अवशेषांवर अधिक भर देते. केवळ राजांच्या प्रशस्तीपत्रांवर विश्वास न ठेवता, नाण्यांमधील धातूचे प्रमाण किंवा उत्खननातील वस्तूंच्या आधारे लोकांच्या राहणीमानाचा स्तर तपासला जातो. या वैज्ञानिक आणि तुलनात्मक पद्धतीमुळे इतिहासातील मिथके दूर होऊन ऐतिहासिक सत्यापर्यंत पोहोचणे सोपे झाले आहे.

**४) मार्क्सवादी इतिहासलेखन परंपरेतील प्रमुख इतिहासकार:**

**१) डॉ. डी. डी. कोसांबी:**

भारतीय इतिहासलेखनाला आधुनिक, वैज्ञानिक आणि वास्तववादी वळण देणाऱ्या मोजक्या विचारवंतांमध्ये डॉ. डी. डी. कोसांबी (१९०७-१९६६) यांचे नाव अग्रक्रमी आहे. कोसांबी हे केवळ इतिहासकार नव्हते, तर ते एक बहुआयामी व्यक्तिमत्व होते. गणित, संख्याशास्त्र, पुरातत्त्वशास्त्र, मानववंशशास्त्र आणि नाणकशास्त्र यांसारख्या अत्यंत भिन्न वाटणाऱ्या ज्ञानशाखांचा त्यांनी इतिहासाच्या संशोधनासाठी अत्यंत कल्पकतेने वापर केला. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्चमध्ये गणितज्ञ म्हणून कार्यरत असतानाही, त्यांनी प्राचीन भारतीय संस्कृतीच्या मुळाशी जाऊन जे संशोधन केले, त्याने जागतिक स्तरावर भारतीय विद्वत्तेचा ठसा उमटवला.

**अ) इतिहासलेखनाची नवी व्याख्या:** कोसांबी यांनी इतिहास लेखनाची पारंपारिक चौकट मोडीत काढली. त्यांच्या मते, इतिहास म्हणजे केवळ राजांच्या वंशावळी किंवा युद्धांच्या तारखा नसून तो उत्पादन साधनांमधील बदलांचा आरसा आहे. त्यांनी उत्पादनातील घटकांच्या परस्पर संबंधांतून होणाऱ्या सामाजिक परिवर्तनांना केंद्रस्थानी ठेवले. त्यांच्या 'An Introduction to the Study of Indian History' या ग्रंथाने भारतीय इतिहासाकडे पाहण्याचा संपूर्ण दृष्टिकोनच बदलून टाकला.

**ब) मार्क्सवादाचे भारतीय संदर्भात उपयोजन:** कोसांबी यांनी मार्क्सवादी विचार स्वीकारला, पण कार्ल मार्क्सचे सिद्धांत जसेच्या तसे न घेता त्यात भारतीय संदर्भात सुधारणा केली. मार्क्सने भारतीय समाजाला स्थितीशील म्हटले होते, मात्र कोसांबी यांनी त्याचे खंडन केले. त्यांनी सिद्ध केले की, भारतीय ग्रामव्यवस्था कधीही गतिहीन नव्हती; त्यातही तंत्रज्ञान आणि अंतर्गत वर्गसंघर्षामुळे निरंतर बदल होत आले आहेत.

**क) आंतरविद्याशाखीय संशोधन पद्धती:** कोसांबी यांनी गणिताचा वापर करून नाण्यांच्या वजनातील घटीवरून तत्कालीन आर्थिक स्थितीचे निष्कर्ष काढले. त्यांनी केवळ लिखित साहित्यावर अवलंबून न राहता प्रत्यक्ष क्षेत्रीय संशोधन केले. आदिवासी जमातींच्या प्रथा आणि सणांचा अभ्यास करून त्यांनी

त्यातून प्राचीन इतिहासाचा उलगडा केला. त्यांच्या मते, आजच्या अनेक ग्रामीण प्रथा या प्राचीन काळातील उत्पादन पद्धतींचे जिवंत अवशेष आहेत.

**ड) तत्त्वज्ञान आणि धर्माची भौतिकवादी मीमांसा:** कोसांबी यांनी धार्मिक ग्रंथांचे विश्लेषण भौतिकवादी दृष्टिकोनातून केले. त्यांनी भगवद्गीतेचे तत्त्वज्ञान हे तत्कालीन सरंजामशाही व्यवस्थेला वैचारिक बळ देणारे आणि विविध वर्गांत समन्वय साधणारे साधन असल्याचे मांडले. तसेच, प्राचीन मिथकांचा अभ्यास करून त्यांनी ऐतिहासिक रहस्यांचा शोध घेतला. त्यांच्या या वैज्ञानिक पद्धतीमुळे भारतीय इतिहासाला एक तर्कशुद्ध आणि जागतिक दर्जाची बैठक प्राप्त झाली.

**२) डॉ. आर. एस. शर्मा:**

भारतीय इतिहासलेखनात मार्क्सवादी दृष्टिकोनाला शास्त्रीय आणि संशोधनात्मक बैठक मिळवून देण्यात डॉ. राम शरण शर्मा (१९१९-२०११) यांचे योगदान अद्वितीय आहे. इंग्लंडमध्ये उच्चशिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी भारतीय इतिहास संशोधनाला नवी दिशा दिली. 'इंडियन कौन्सिल ऑफ हिस्टॉरिकल रिसर्च' या संस्थेचे पहिले अध्यक्ष म्हणून त्यांनी इतिहास लेखनातील वस्तुनिष्ठता आणि वैज्ञानिक पद्धतीचा आग्रह धरला. त्यांनी केवळ राजकीय घटनांची नोंद न करता, समाजाच्या पायाशी असणाऱ्या आर्थिक बदलांची मीमांसा केली.

**अ) वर्णव्यवस्था आणि शूद्रांचा इतिहास :** डॉ. शर्मा यांनी त्यांच्या 'Shudras in Ancient India' या ग्रंथात वर्णव्यवस्थेची भौतिकवादी कारणमीमांसा मांडली. त्यांनी सिद्ध केले की, वर्णव्यवस्था ही दैवी नसून उत्पादन साधनांच्या मालकीशी संबंधित होती. समाजात अतिरिक्त उत्पादन वाढल्याने श्रमाचे विभाजन झाले आणि त्यातून एका वर्गाला केवळ सेवा देण्याच्या भूमिकेत ढकलले गेले. या आर्थिक शोषणाला धर्माने केवळ धार्मिक अधिष्ठान दिले, हे त्यांनी पुराव्यांसह स्पष्ट केले.

**ब) भारतीय सामंतशाही:** शर्मा यांनी भारतीय सामंतशाही हा क्रांतिकारी सिद्धांत मांडला. त्यांच्या मते, गुप्तकाळापासून राजाने ब्राह्मणांना आणि अधिकार्यांना रोख पगाराऐवजी जमिनी दान करण्यास सुरुवात केली. या भूदानामुळे स्थानिक सत्ताकेंद्रे निर्माण झाली, शेतकरी भूमीहीन झाला आणि तो सामंतांच्या अधिपत्याखाली आला. या प्रक्रियेतूनच भारतीय सरंजामशाहीची पाळेमुळे घट्ट झाली, जी भारताच्या आर्थिक इतिहासातील महत्त्वाची घटना मानली जाते.

**क) भौतिक संस्कृती आणि सामाजिक संरचना:** 'Material Culture and Social Formation in Ancient India' या ग्रंथात त्यांनी तंत्रज्ञानाचा सामाजिक संरचनेशी संबंध जोडला. लोखंडाचा शोध आणि त्याचा शेतीतील वापर यामुळे गंगा खोऱ्यात नागरी संस्कृतीचा उदय कसा झाला, याचे त्यांनी सखोल विश्लेषण केले. तंत्रज्ञानातील बदल हेच सामाजिक परिवर्तनाचे मुख्य चालक असतात, हा विचार त्यांनी या ग्रंथातून मांडला.

**ड) नगरांचा ऱ्हास आणि नागरी अवनती:** 'Urban Decay in India' या ग्रंथात शर्मा यांनी तिसऱ्या-चौथ्या शतकानंतर भारतातील नगरे ओस पडण्यामागची कारणे शोधली. त्यांनी व्यापारातील मंदी आणि

सरंजामशाहीचा उदय ही प्रमुख कारणे सांगितली. विदेशी व्यापार मंदावल्यामुळे लोकांचे नगरांकडून पुन्हा शेतीकडे वळणे आणि त्यातून स्वयंपूर्ण ग्रामव्यवस्था विकसित होणे, हे ऐतिहासिक सत्य त्यांनी मार्क्सवादी दृष्टिकोनातून उलगडले.

**३) डॉ. रोमिला थापर:**

प्राचीन भारताच्या इतिहासाला जागतिक स्तरावर प्रतिष्ठा मिळवून देण्यात आणि त्याला वैज्ञानिक शिस्त लावण्यात डॉ. रोमिला थापर यांचे योगदान अतुलनीय आहे. दिल्लीतील प्रख्यात जवाहरलाल नेहरू विद्यापीठात दीर्घकाळ अध्यापन केलेल्या डॉ. थापर यांनी आपल्या संशोधनातून इतिहासलेखनाच्या पारंपारिक चौकटींना धक्का दिला. मार्क्सवादी दृष्टिकोनाचा आणि सामाजिक शास्त्रांतील प्रगत पद्धतींचा वापर करून त्यांनी प्राचीन भारताचे जे चित्र उभे केले, ते आजच्या पिढीसाठी दिशादर्शक ठरले आहे.

**अ) अशोक आणि मौर्य साम्राज्याचा ऱ्हास:** डॉ. थापर यांनी त्यांच्या ‘Ashoka and the Decline of the Mauryas’ या ग्रंथात अशोकाच्या धम्म धोरणाकडे निव्वळ धार्मिक विचार म्हणून न पाहता, त्याकडे एक राजकीय साधन म्हणून पाहिले. विस्तीर्ण साम्राज्यातील विविध गटांना एकत्र बांधण्यासाठी धम्म हे एक वैचारिक सूत्र होते, अशी मांडणी त्यांनी केली. मौर्य साम्राज्याच्या ऱ्हासासाठी केवळ लष्करी कमकुवतपणा जबाबदार नसून, प्रशासकीय केंद्रीकरण आणि आर्थिक ताण ही मुख्य कारणे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**ब) आर्यांच्या सिद्धांताचे खंडन:** डॉ. थापर यांनी आर्य वंशाच्या आक्रमणाचा सिद्धांत पुराव्यानिशी खोडून काढला. त्यांच्या मते, आर्य हा शब्द कोणत्याही वंशाचा वाचक नसून तो एका भाषा-गटाचा निदर्शक आहे. प्राचीन भारतात आर्यांचे कोणतेही रक्तरंजित आक्रमण झाले नसून, तो लोकांच्या लहान गटांचे स्थलांतर आणि संस्कृतींच्या समन्वयाचा दीर्घकालीन प्रवास होता, हे त्यांनी पुरातत्त्वीय पुराव्यांच्या आधारे सिद्ध केले.

**क) कुळाकडून राज्याकडे-सामाजिक स्थित्यंतर:** त्यांच्या ‘From Lineage to State’ या ग्रंथात त्यांनी राजकीय संस्थांच्या विकासाचा प्रवास मांडला. समाज सुरुवातीला रक्ताच्या नात्यावर आधारित ’कुळ’ व्यवस्थेत होता आणि नंतर शेतीचा विस्तार, लोखंडाचा वापर व नागरीकरण यांमुळे तो ’राज्य’ व्यवस्थेत कसा रूपांतरित झाला, याची सामाजिक-आर्थिक मीमांसा त्यांनी केली. ही मांडणी प्राचीन भारताच्या राजकीय जडणघडणीवर नवा प्रकाश टाकणारी ठरली.

**ड ) इतिहासलेखनाची चिकित्सा आणि पद्धती:** डॉ. थापर यांनी केवळ इतिहास लिहिला नाही, तर इतिहास संशोधनातील पूर्वग्रहांचे विश्लेषणही केले. ‘Ideology and Interpretation of Early Indian History’ या ग्रंथात त्यांनी साम्राज्यवादी आणि राष्ट्रवादी लेखनातील मर्यादा स्पष्ट केल्या. त्यांचे संशोधन मार्क्सवादी दृष्टिकोनाशी जवळीक साधणारे असले, तरी त्यात स्वतंत्र बुद्धीने केलेले सखोल चिंतन आणि सामाजिक शास्त्रांतील आधुनिक निकषांचा अचूक वापर दिसून येतो.

**४) डॉ. इरफान हबीब:**

मध्ययुगीन भारताचा इतिहास केवळ राजांच्या लढाया आणि दरबारी राजकारणापुरता मर्यादित न

ठेवता, तो सामान्य कष्टकरी शेतकरी आणि अर्थव्यवस्थेच्या अंगाने मांडण्याचे महान कार्य डॉ. इरफान हबीब यांनी केले आहे. अलिगढ मुस्लिम विद्यापीठाचे प्रख्यात प्राध्यापक राहिलेले हबीब हे मध्ययुगीन भारताच्या 'आर्थिक इतिहासाचे' जागतिक स्तरावरील अधिकारी मानले जातात. त्यांनी मार्क्सवादी दृष्टिकोनाचा वापर करून मध्ययुगीन सामाजिक-आर्थिक संरचनेचे जे मूलगामी विश्लेषण केले, त्याने इतिहासलेखनात एक नवीन मापदंड प्रस्थापित केला आहे.

**अ) मुघलकालीन कृषीव्यवस्था आणि सत्तेचा ऱ्हास:** हबीब यांचा 'The Agrarian System of Mughal India' हा ग्रंथ मध्ययुगीन इतिहासाचा महत्त्वपूर्ण दस्तऐवज मानला जातो. मुघल सत्तेच्या ऱ्हासामागे केवळ राजकीय कारणे नसून कृषी संकट कारणीभूत होते, असे त्यांनी मांडले. महसूल वसुलीच्या कडक धोरणामुळे झालेल्या आर्थिक शोषणातूनच जाट, सतनामी आणि शीखांचे उठाव झाले. औरंगजेबाच्या काळातील संघर्षाच्या मुळाशी धार्मिक कारणांपेक्षा आर्थिक घटक प्रबळ होता, हे त्यांनी साधार सिद्ध केले.

**ब) जात, पैसा आणि मध्ययुगीन अर्थव्यवस्था:** इरफान हबीब यांनी जातिव्यवस्थेचा अभ्यास आर्थिक दृष्टिकोनातून केला. त्यांच्या मते, श्रमाचे स्वस्त विभाजन करण्यासाठी आणि विशिष्ट कौशल्यांचे जतन करण्यासाठी जातिव्यवस्थेचा वापर केला गेला. तसेच, भारतातील जमिनीची मालकी आणि महसूल यंत्रणा ही युरोपियन सरंजामशाहीपेक्षा कशी भिन्न होती, याचे त्यांनी आशियाई संदर्भात स्वतंत्रपणे विश्लेषण केले.

**क) ऐतिहासिक भूगोल आणि नकाशे:** हबीब यांनी इतिहासाला भूगोलाची शास्त्रीय जोड दिली. 'The Atlas of the Mughal Empire' या ग्रंथात त्यांनी ३२ नकाशांद्वारे मुघल साम्राज्याचे वास्तव चित्र उभे केले. व्यापाराचे मार्ग, पिकांचे क्षेत्र आणि प्रशासकीय विभाग नकाशांच्या स्वरूपात मांडल्यामुळे मध्ययुगीन भारताची भौगोलिक आणि आर्थिक व्याप्ती समजण्यास मोठी मदत झाली.

**ड) मार्क्सवादी इतिहासलेखनाची चिकित्सा:** मार्क्सवादी सिद्धांतांचा आंधळेपणाने स्वीकार न करता, हबीब यांनी पुराव्यांच्या निकषावर इतिहासाची पुनर्मांडणी करण्याचा आग्रह धरला. 'Problems of Marxist Historiography' मधून त्यांनी इतिहासाला विज्ञानाचे स्वरूप दिले. त्यांनी इतिहासाच्या केंद्रस्थानी सामान्य शेतकरी आणि कारागीर यांना आणून मध्ययुगीन भारताच्या सामाजिक-आर्थिक इतिहासाला एक वास्तववादी दृष्टी दिली.

**५) डॉ. बिपीन चंद्र:**

आधुनिक भारताच्या इतिहासलेखनात डॉ. बिपीन चंद्र (१९२८-२०१४) यांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांनी भारतीय राष्ट्रीय चळवळीचा अभ्यास करण्यासाठी मार्क्सवादी दृष्टिकोनाचा अत्यंत प्रभावी आणि कल्पकतेने वापर केला. प्रामुख्याने जवाहरलाल नेहरू विद्यापीठात कार्यरत असलेल्या बिपीन चंद्र यांनी साम्राज्यवादी इतिहासकारांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्याबद्दल पसरवलेले भ्रम मोडीत काढले आणि या लढ्याला एक व्यापक जनआंदोलन म्हणून सिद्ध केले.

**अ) केंब्रिज स्कूलच्या प्रमेयांचे खंडन:** डॉ. बिपीन चंद्र यांनी केंब्रिज इतिहासकारांचा हा दावा खोडून

काढला की, भारतीय स्वातंत्र्यलढा केवळ उच्चभ्रू वर्गाचा सत्तासंघर्ष होता. 'India's Struggle for Independence' या ग्रंथात त्यांनी सिद्ध केले की, ही चळवळ एक खऱ्या अर्थाचे 'जनआंदोलन' होती. सुशिक्षित मध्यमवर्गाने नेतृत्व केले असले, तरी शेतकरी, कामगार आणि सामान्य जनतेचा सक्रिय सहभाग हा या चळवळीचा खरा आत्मा होता.

**ब) आर्थिक राष्ट्रवादाचा उदय:** 'The Rise and Growth of Economic Nationalism in India' या ग्रंथात त्यांनी राष्ट्रवादाच्या मुळाशी असलेल्या आर्थिक शोषणाचे विश्लेषण केले. दादाभाई नौरोजी आणि रानडे यांनी मांडलेल्या आर्थिक शोषणाच्या सिद्धांताला त्यांनी मार्क्सवादी चौकटीत बसवले. ब्रिटीश वसाहतवादाची धोरणेच भारताच्या दारिद्र्याला कशी कारणीभूत होती आणि या शोषणाच्या जाणिवेतूनच भारतीयांमध्ये राष्ट्रवाद कसा निर्माण झाला, याचे सखोल विवेचन त्यांनी केले.

**ब) जमातवादाचे चिकित्सक विश्लेषण:** बिपीन चंद्र यांनी 'Communalism in Modern India' मध्ये मांडले की, जमातवाद हा प्राचीन परंपरेचा भाग नसून ब्रिटीश वसाहतवादाचे अपत्य आहे. ब्रिटिशांनी फोडा आणि झोडा नीतीद्वारे हिंदू-मुस्लिमांमध्ये भेदाची बीजे पेरली. त्यांनी जमातवादाला एक खोटा राजकीय विचार मानले, जो केवळ विशिष्ट राजकीय आणि आर्थिक हितसंबंध जपण्यासाठी वापरला गेला होता.

**क) राष्ट्रीय चळवळीचे स्वरूप आणि रणनीती:** त्यांनी गांधीजींच्या 'संघर्ष-तडजोड-संघर्ष' या रणनीतीचे मार्क्सवादी विश्लेषण केले. गांधीजींनी जनसामान्यांच्या ताकदीचा वापर करून ब्रिटिशांवर टप्प्याटप्प्याने दबाव कसा निर्माण केला, हे त्यांनी स्पष्ट केले. त्यांच्या मते, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस हे एक असे व्यासपीठ होते जिथे विविध विचारधारांचे लोक वसाहतवादाविरुद्धच्या समान ध्येयासाठी एकत्र आले होते.

**५) मार्क्सवादी इतिहासलेखनाचा परिणाम**

भारतीय इतिहासलेखनाच्या प्रवासात मार्क्सवादी परंपरेचा उदय ही केवळ एक नवी विचारसरणी नसून, ती एक मोठी बौद्धिक क्रांती ठरली. या परंपरेने इतिहासाच्या अभ्यासाची जुनी चौकट पूर्णतः बदलून टाकली. या परंपरेचे भारतीय इतिहासलेखनावर झालेले दूरगामी परिणाम खालील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येतात:

**अ) इतिहासलेखनाचे आंतरविद्याशाखीय स्वरूप:** मार्क्सवादी परंपरेमुळे भारतीय इतिहासलेखन अधिक वैज्ञानिक आणि बहुआयामी झाले. केवळ कागदपत्रांवर अवलंबून न राहता पुरातत्त्वशास्त्र, मानववंशशास्त्र आणि अर्थशास्त्र यांसारख्या ज्ञानशाखांची मदत घेण्याची पद्धत रूढ झाली. यामुळे ऐतिहासिक घटनांची मांडणी केवळ काय घडले यापुरती मर्यादित न राहता ते का घडले याच्या तार्किक कारणांपर्यंत पोहोचली, ज्यामुळे संशोधनाला एक भक्कम बैठक प्राप्त झाली.

**ब) सामाजिक-आर्थिक इतिहासाचा उदय:** या परंपरेने इतिहासाला राजवाड्यांतून बाहेर काढून सामान्य माणसाच्या श्रमाशी जोडले. केवळ राजांच्या लढायांना महत्त्व न देता उत्पादन पद्धती, शेतीमधील बदल आणि श्रमिकांची स्थिती हे अभ्यासाचे मुख्य विषय बनले. यामुळे समाजातील पददलित आणि कष्टकरी

वर्गाच्या योगदानाला प्रथमच इतिहासात मानाचे स्थान मिळाले आणि इतिहासाला एक व्यापक मानवी परिमाण प्राप्त झाले.

**क) मिथके आणि वास्तव यातील फरक स्पष्ट होणे:** इतिहासातील पुराणांमधील कथा आणि ऐतिहासिक सत्य यांची सरमिसळ मार्क्सवादी इतिहासकारांनी भौतिकवादी चिकित्सेद्वारे दूर केली. पुराव्यांच्या निकषावर त्यांनी ऐतिहासिक घटनांची पडताळणी करून अंधश्रद्धा आणि अतिशयोक्ती दूर केली. एखाद्या घटनेमागील दैवी स्वरूपापेक्षा त्यामागील तत्कालीन सामाजिक आणि राजकीय हेतू उघड केल्यामुळे वस्तुनिष्ठ मांडणीला वेग आला आणि इतिहासातील वास्तव समोर आले.

**ड) जागतिक स्तरावर भारतीय विद्वत्तेला मान्यता:** कोसांबी, शर्मा आणि रोमिला थापर यांसारख्या इतिहासकारांनी केलेल्या वैज्ञानिक मांडणीमुळे भारतीय इतिहासलेखनाला जागतिक प्रतिष्ठा मिळाली. ऑक्सफर्ड आणि केंब्रिजसारख्या विद्यापीठांनी या संशोधनाची दखल घेतली. भारतीय इतिहास हा केवळ स्थानिक विषय न राहता जागतिक मानवी संस्कृतीच्या विकासातील एक महत्त्वाचा दुवा मानला जाऊ लागला, ज्यामुळे भारतीय संशोधनाचे निष्कर्ष जागतिक स्तरावर चर्चिले गेले.

**इ) नवीन इतिहास प्रवाहांना प्रेरणा:** मार्क्सवादी परंपरेने दिलेल्या विश्लेषणात्मक पद्धतीमुळेच भारतात वंचितांचा इतिहास आणि स्त्रीवादी इतिहासलेखन यांसारखे नवीन प्रवाह उदयाला आले. सत्तेच्या विरोधात सामान्य माणसाचा आवाज कसा शोधावा, हे मार्क्सवादाने शिकवल्यामुळे उपेक्षित घटकांवर संशोधन करण्याची प्रेरणा नव्या पिढीला मिळाली. यामुळे इतिहासाची व्याप्ती वाढून तो अधिक सर्वसमावेशक झाला.

### ६) मार्क्सवादी इतिहासलेखनाची मर्यादा

कोणतीही इतिहासलेखन परंपरा पूर्णतः निर्दोष नसते. मार्क्सवादी इतिहासलेखनाने भारतीय इतिहासाला वैज्ञानिक आधार दिला असला, तरी कालांतराने या पद्धतीतील काही मर्यादा आणि उणिवा समोर आल्या आहेत. अनेक इतिहासकार आणि टीकाकारांनी या परंपरेवर केलेल्या टीकेचा आढावा खालील मुद्द्यांच्या आधारे घेता येईल:

**अ) आर्थिक निकषांचा अतिरेक:** टीकाकारांच्या मते, मार्क्सवादी इतिहासकारांनी मानवी इतिहासातील बदलांच्या मुळाशी केवळ आर्थिक कारणांचा शोध घेतला. मानवी जीवन हे भावना, श्रद्धा आणि मूल्यांनीही व्यापलेले असते. केवळ उत्पादन साधने बदलल्याने समाज बदलतो, असे मानणे मानवी स्वभावाच्या इतर पैलूंकडे दुर्लक्ष करण्यासारखे आहे. उदाहरणार्थ, भक्ती चळवळीतील आध्यात्मिक ओढीपेक्षा केवळ आर्थिक असंतोषावर भर दिल्याने ही मांडणी एकांगी ठरते.

**ब) पुराव्यांची ओढाताण आणि ठराविक चौकट:** मार्क्सवादी इतिहासकार आधी एक वैचारिक चौकट ठरवतात आणि मग त्यात बसणारेच पुरावे गोळा करतात, असा आक्षेप घेतला जातो. वर्गसंघर्षासारख्या सिद्धांतांच्या विरोधात जाणारे पुरावे अनेकदा नाकारले जातात किंवा त्यांची ओढाताण केली जाते. इतिहास

हे मुक्त संशोधनाचे क्षेत्र असावे, ते कोणत्याही वादाच्या चौकटीत बंदिस्त नसावे, अशी टीका या अभ्यास पद्धतीवर वारंवार केली जाते.

**क) राष्ट्रवादी पैलूंकडे दुर्लक्ष:** ही परंपरा जागतिक वर्गसंघर्षावर अधिक भर देत असल्याने 'राष्ट्रीय अस्मिता' आणि देशप्रेम या भावनांना त्यात दुय्यम स्थान मिळाले. भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा अभ्यास करताना आर्थिक हितसंबंधांवर अधिक भर दिला गेल्याने क्रांतिकारकांचे बलिदान आणि राष्ट्रप्रेमाची उत्कट भावना काहीशी झाकोळली गेली. वसाहतवादाविरुद्धचा लढा हा केवळ आर्थिक नसून तो सन्मानाचाही होता, याकडे दुर्लक्ष झाल्याचे मानले जाते.

**ड) सांस्कृतिक आणि धार्मिक प्रभावाचे अल्पमूल्यमापन:** भारतातील जातीव्यवस्थेची सामाजिक आणि मानसिक पकड केवळ आर्थिक कारणांपुरती मर्यादित नाही. मार्क्सवादी इतिहासकारांनी जातीला केवळ श्रमविभाजनाचे साधन मानल्याने त्यातील धार्मिक आणि पारंपरिक सामर्थ्याची पूर्णतः उकल झाली नाही. सांस्कृतिक बदलांची मीमांसा करताना केवळ भौतिकवादी दृष्टिकोन वापरल्यामुळे ही परंपरा भारतीय समाजाचे गुंतागुंतीचे वास्तव मांडण्यात काहीशी अपूर्ण ठरते.

**इ) मध्ययुगीन इतिहासाचे विश्लेषण आणि टीका:** मार्क्सवादी इतिहासकारांनी मध्ययुगीन मुस्लिम शासकांच्या धोरणांचे विश्लेषण करताना केवळ आर्थिक परिप्रेक्ष्य वापरल्याचा आरोप होतो. मंदिर विध्वंसासारख्या घटनांना निव्वळ आर्थिक लूट म्हणून मांडल्याने त्यातील धार्मिक संघर्षाचा पैलू दुर्लक्षित राहिला, अशी टीका उजव्या विचारसरणीच्या इतिहासकारांकडून केली जाते. यामुळे ऐतिहासिक सत्याची मांडणी एका बाजूला झुकलेली वाटू शकते.

**७) मार्क्सवादी इतिहासलेखनाचे मूल्यमापन:**

भारतातील मार्क्सवादी इतिहासलेखन परंपरा ही केवळ एका राजकीय विचारसरणीची मांडणी नसून, ती भारतीय इतिहासलेखन शास्त्राला लाभलेली एक वैज्ञानिक आणि चिकित्सक दृष्टी आहे. या परंपरेने इतिहासाकडे पाहण्याचे जुने निकष बदलून संशोधनाला एका नव्या उंचीवर नेऊन ठेवले. या परंपरेचे सर्वांगीण मूल्यमापन खालील मुद्द्यांच्या आधारे करता येते:

**अ) इतिहासलेखनाला मिळालेली नवी दिशा:** मार्क्सवादी इतिहासकारांनी भारतीय इतिहासाचा आवाका आणि मांडणीचे तंत्र पूर्णतः बदलले. पूर्वी इतिहास म्हणजे केवळ राजघराणी, युद्धे आणि तह यांची जंत्री मानली जात असे. मार्क्सवादी परंपरेने हा प्रभाव कमी करून आर्थिक आणि सामाजिक प्रक्रियांचा सखोल अभ्यास सुरू केला. इतिहासातील तार्किक निष्कर्ष काढण्यासाठी त्यांनी 'उत्पादन साधने' आणि 'उत्पादन संबंध' या निकषांचा वापर केला, ज्यामुळे इतिहासाला एक शास्त्रीय बैठक प्राप्त झाली.

**ब) मार्क्सवादाचे भारतीय संदर्भात स्वदेशीकरण:** या परंपरेचे सर्वात मोठे यश म्हणजे त्यांनी कार्ल मार्क्सची युरोपीय प्रमेये जशीच्या तशी स्वीकारली नाहीत. डॉ. डी. डी. कोसांबी, आर. एस. शर्मा आणि इरफान हबीब यांसारख्या विद्वानांनी स्वतंत्र बुद्धीने भारतीय परिस्थितीचे सखोल आकलन केले. मार्क्सने भारताला स्थितीशील म्हटले होते, मात्र भारतीय मार्क्सवादी इतिहासकारांनी हे विधान नाकारून भारतीय

समाज कसा निरंतर परिवर्तनीय होता, हे पुराव्यानिशी मांडले. त्यांनी भारतीय इतिहासाची मांडणी करताना मार्क्सच्या मूळ प्रमेयांत आवश्यक ते बदल केले, ज्यामुळे हा इतिहास अधिक वास्तववादी झाला.

**क) आर्थिक आणि सांस्कृतिक इतिहासाचा समन्वय:** राजकीय इतिहासाच्या पलीकडे जाऊन या इतिहासकारांनी आर्थिक इतिहासावर विशेष भर दिला. त्यांनी व्यापाराचा विकास, जमिनीची मालकी, कर पद्धती आणि नागरीकरण यांसारख्या विषयांवर संशोधन केले. महत्त्वाचे म्हणजे, त्यांनी केवळ अर्थव्यवस्थाच मांडली नाही, तर तिचा सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहासाशी असलेला संबंधही उलगडला. धर्म, कला आणि साहित्याची निर्मिती ही त्या काळातील भौतिक स्थितीवर कशी अवलंबून असते, याचे द्वंद्वात्मक भौतिकवादी विश्लेषण त्यांनी केले.

**ड) आंतरविद्याशाखीय संशोधनाचा प्रारंभ:** मार्क्सवादी इतिहासकारांनी ऐतिहासिक संशोधनाचे दरवाजे इतर ज्ञानशाखांसाठी उघडले. त्यांनी भाषाशास्त्र, समाजशास्त्र, पुरातत्त्वशास्त्र आणि अर्थशास्त्र यांसारख्या विषयांची सांगड घातली. कोसांबींनी नाणकशास्त्राचा वापर करून आर्थिक चढ-उतार मांडले. आर. एस. शर्मांनी पुरातत्त्वीय अवशेषांवरून नागरी अवनती स्पष्ट केली. या आंतरविद्याशाखीय स्वरूपामुळे भारतीय इतिहास संशोधन हे केवळ साहित्यापुरते मर्यादित न राहता ते अधिक सखोल आणि वस्तुनिष्ठ बनले.

**इ) उपेक्षित वर्गांना दिलेले स्थान:** या परंपरेने इतिहासाच्या केंद्रस्थानी राजांना काढून सामान्य माणसाला बसवले. शेतकरी, कारागीर, विणकर आणि पददलित वर्गाच्या श्रमाचे आणि त्यांच्या विद्रोहाचे मूल्यमापन या लेखनात आढळते. यामुळे इतिहासाला एक व्यापक मानवी स्वरूप प्राप्त झाले.

थोडक्यात; भारतातील मार्क्सवादी इतिहासलेखन परंपरेने साम्राज्यवादी पूर्वग्रहांना छेद दिला आणि राष्ट्रवादी इतिहासलेखनातील काही त्रुटी दूर केल्या. जरी या पद्धतीवर आर्थिक नियतिवादाचा अतिरेक झाल्याची टीका होत असली, तरी या परंपरेने दिलेले चिकित्सक विवेचन आणि संशोधनाची वैज्ञानिक पद्धती भारतीय इतिहासलेखनात पथदर्शक ठरली आहे. याच पायावर पुढे वंचितांच्या इतिहासाचा डोलारा उभा राहिला आहे.

**स्वय-अध्ययन प्रश्न क्र. ३**

१) मार्क्सवादी इतिहासलेखनाच्या केंद्रस्थानी खालीलपैकी कोणता घटक असतो?

अ) साम्राज्यशाहीचा पुरस्कार

ब) उत्पादन साधने आणि श्रमिक वर्गाचा इतिहास

क) राजे-महाराजांचा पराक्रम

ड) केवळ धार्मिक ग्रंथांचे विश्लेषण

२) कार्ल मार्क्सने मांडलेल्या कोणत्या सिद्धांताचा आधार मार्क्सवादी इतिहासलेखनासाठी घेतला जातो?

अ) स्थितीशील ग्रामव्यवस्था

ब) सांस्कृतिक राष्ट्रवाद

क) द्वंद्वात्मक भौतिकवाद

ड) युरोकेंद्री इतिहासलेखन

३) 'An Introduction to the Study of Indian History' या प्रसिद्ध ग्रंथाचे लेखक कोण आहेत?

अ) डॉ. राम शरण शर्मा

ब) डॉ. डी. डी. कोसांबी

क) बिपीन चंद्र

ड) इरफान हबीब

४) डॉ. आर. एस. शर्मा यांनी कोणत्या ग्रंथात वर्णव्यवस्थेची भौतिकवादी कारणमीमांसा मांडली आहे?

अ) Shudras in Ancient India

ब) Ashoka and the Decline of the Mauryas

कू) The Mughal Empire

ड) Urban Decay in India

५) रोमिला थापर यांनी सम्राट अशोकाच्या 'धम्म' धोरणाकडे कोणत्या दृष्टीने पाहिले?

अ) बौद्ध धर्माचा प्रसार करण्याचा एकमेव मार्ग

ब) केवळ युद्धाचा त्याग

क) केवळ एक धार्मिक प्रचार

ड) राजकीय ऐक्य साधण्याचे एक वैचारिक सूत्र

६) 'The -grarian System of Mughal India' हा मध्ययुगीन कृषीव्यवस्थेवर आधारित ग्रंथ कोणाचा आहे?

अ) रमेशचंद्र दत्त

ब) डॉ. ताराचंद

क) जदुनाथ सरकार

ड) इरफान हबीब

७) डॉ. बिपीन चंद्र यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्याबद्दल कोणता महत्त्वाचा मुद्दा मांडला?

अ) तो एक खऱ्या अर्थाचे 'जनआंदोलन' होते.

ब) जमातवाद हा प्राचीन काळापासून चालत आला आहे.

क) तो केवळ उच्चभ्रूंचा सत्तासंघर्ष होता.

ड) क्रांतिकारकांनी आर्थिक कारणांकडे दुर्लक्ष केले.

८) मार्क्सवादी इतिहासलेखनामुळे कोणता नवीन प्रवाह उदयाला आला?

अ) साम्राज्यवादी इतिहासलेखन
ब) केवळ राजकीय इतिहास
क) युरोकेंद्री इतिहास
ड) वंचितांचा इतिहास

९) मार्क्सवादी इतिहासलेखनाची एक मर्यादा कोणती मानली जाते?

अ) त्यांनी प्राचीन भारताचे कौतुक केले.

ब) त्यांनी पुराव्यांवर भर दिला नाही.

क) त्यांनी केवळ इंग्रजी साधनांचा वापर केला.

ड) आर्थिक निकषांचा अतिरेक,मानवी भावनांकडे दुर्लक्ष.

१०) डॉ. डी. डी. कोसांबी यांनी प्राचीन इतिहासाचा उलगडा करण्यासाठी कोणत्या गोष्टीचा अभ्यास केला?

अ) राजांच्या वंशावळी
ब) आदिवासी जमातींच्या प्रथा व सण
क) केवळ ब्रिटीश कागदपत्र
ड) केवळ दरबारी कविता

## २.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

**युरोकेंद्री:** जगाचा इतिहास, संस्कृती आणि मूल्ये केवळ युरोपच्या दृष्टिकोनातून पाहण्याच्या वृत्तीला युरोकेंद्री म्हणतात; यात युरोपीय संस्कृतीला श्रेष्ठ मानले जाते.

**पौर्वात्यवादी:** आशियाई किंवा पूर्वेकडील देशांची संस्कृती, भाषा आणि परंपरा यांचा अभ्यास करणाऱ्या पाश्चात्य अभ्यासकांना किंवा त्यांच्या विशिष्ट दृष्टिकोनाला पौर्वात्यवादी म्हणतात.

**उपयुक्ततावाद:** ज्या कृतीमुळे जास्तीत जास्त लोकांचे जास्तीत जास्त कल्याण किंवा सुख साध्य होते, तीच कृती योग्य मानणाऱ्या नैतिक सिद्धांताला उपयुक्ततावाद म्हणतात.

**इव्हेंजेलिकल:** ख्रिश्चन धर्मातील असा एक पंथ किंवा विचारधारा जी बायबलमधील शिकवण आणि धर्मांतराच्या प्रसारावर सर्वाधिक भर देते.

**सामाजिक डार्विनवाद:** डार्विनचा बळी तो कान पिळी हा निसर्गशास्त्रातील सिद्धांत मानवी समाजाला लावून, श्रेष्ठ वंश किंवा राष्ट्राला कनिष्ठ घटकांवर राज्य करण्याचा नैसर्गिक हक्क आहे, असे मानणारी विचारसरणी.

**पांढऱ्या माणसाचे ओझे:** जगातील मागासलेल्या किंवा कृष्णवर्णीय लोकांना सुसंस्कृत करणे ही पांढऱ्या (युरोपीय) माणसाची नैतिक जबाबदारी किंवा ओझे आहे, असे मानणारा साम्राज्यवादी विचार.

**सिव्हिलायझिंग मिशन:** आपली सत्ता असलेल्या वसाहतींमधील अडाणी लोकांना पाश्चात्य शिक्षण आणि संस्कृती देऊन 'सुसंस्कृत' करणे, हे आपले कर्तव्य आहे असा ब्रिटिशांचा दावा.

**पॅक्स ब्रिटानिका:** ब्रिटीश साम्राज्याच्या वर्चस्वाखाली असलेल्या काळात जगभरात जी एक प्रकारची सापेक्ष शांतता आणि सुव्यवस्था नांदली, त्या कालखंडाला पॅक्स ब्रिटानिका म्हणतात.

**भारतकेंद्री:** इतिहासाची किंवा संस्कृतीची मांडणी करताना भारताच्या भौगोलिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक संदर्भांना सर्वोच्च महत्त्व देणारा दृष्टिकोन म्हणजे भारतकेंद्री होय.

## २.४ स्वय-अध्ययन प्रश्न व प्रश्नांची उत्तरे

स्वय-अध्ययन प्रश्न क्र. १

१)-क, २)-क, ३)-क, ४)-ब, ५)-ड, ६)-क, ७)-अ, ८)-अ, ९)-ड, १०)-ड

स्वय-अध्ययन प्रश्न क्र. २

१)-ड, २)-क, ३)-ब, ४)-अ, ५)-क, ६)-ब, ७)-ड, ८) ब, ९)-ड, १०)-ब

स्वय-अध्ययन प्रश्न क्र. ३

१)-ब, २)-क, ३)-ब, ४)-अ, ५)-ड, ६)-ड, ७)-अ, ८)-ड, ९) ड, १०)-ब

## २.५ सारांश:

इतिहासातील प्रमुख प्रवाह या घटकाचा साकल्याने विचार केला असता, आपल्याला असे दिसून येते की, इतिहासलेखन हे काळाच्या गरजेनुसार आणि बदलत्या विचारसरणीनुसार सतत विकसित होत असते. साम्राज्यवादी, राष्ट्रवादी आणि मार्क्सवादी या तिन्ही प्रवाहांचे भारतीय इतिहासाच्या जडणघडणीत स्वतःचे वेगळे स्थान आणि महत्त्व आहे.

साम्राज्यवादी इतिहासलेखनाची मांडणी जरी एकांगी आणि वसाहतवादाचे समर्थन करणारी असली, तरी त्यातूनच भारतीय इतिहासकारांना आपली बाजू मांडण्याची प्रेरणा मिळाली. राष्ट्रवादी इतिहासलेखनाने साम्राज्यवाद्यांचे खोटे दावे खोडून काढले आणि भारतीयांच्या गमावलेल्या अस्मितेचे रक्षण केले. या

प्रवाहाने स्वातंत्र्य चळवळीच्या काळात लोकांमध्ये राष्ट्रीय एकात्मतेची भावना रुजवली. जरी राष्ट्रवादी लेखनात काही ठिकाणी अतिरंजितपणा किंवा केवळ गौरवीकरण आढळत असले, तरी त्या काळात स्वाभिमान जागवण्यासाठी ते अत्यंत आवश्यक होते.

दुसरीकडे, मार्क्सवादी इतिहासलेखनाने भारतीय इतिहासाला खऱ्या अर्थाने वैज्ञानिक आणि वास्तववादी वळण दिले. या परंपरेने इतिहासाला राजवाड्यांच्या बाहेर काढून शेतात आणि कारखान्यांत राबणाऱ्या सामान्य माणसापर्यंत नेले. इतिहासाची मांडणी करताना केवळ भावनिक न होता, ती आर्थिक आणि सामाजिक पुराव्यांच्या आधारे कशी करावी, हे मार्क्सवादी इतिहासकारांनी शिकवले. डॉ. कोसांबी, आर. एस. शर्मा आणि इरफान हबीब यांच्या संशोधनामुळे भारतीय इतिहासाचा आवाका वाढला आणि त्याला जागतिक स्तरावर प्रतिष्ठा प्राप्त झाली.

या तिन्ही प्रवाहांच्या अभ्यासातून आज आपण ज्या निष्कर्षापर्यंत पोहोचतो तो म्हणजे इतिहास हा केवळ भूतकाळातील 'सत्याचा' शोध नसून तो 'दृष्टिकोनाचा' खेळ आहे. प्रत्येक प्रवाहाने आपल्या समोर इतिहासाची एक वेगळी बाजू मांडली आहे. साम्राज्यवाद्यांनी शिस्त आणि पद्धत दिली, राष्ट्रवाद्यांनी अस्मिता आणि गौरव दिला, तर मार्क्सवाद्यांनी वैज्ञानिक चिकित्सा आणि सामान्य माणसाचा संघर्ष दिला.

आजच्या आधुनिक काळात, जेव्हा आपण इतिहास वाचतो किंवा लिहितो, तेव्हा आपल्याला या सर्व प्रवाहांच्या मर्यादा आणि बलस्थाने माहित असणे गरजेचे आहे. कोणत्याही एका विचारसरणीला अंतिम न मानता, पुराव्यांच्या आधारे वस्तुनिष्ठपणे इतिहासाचे विश्लेषण करणे, हेच खऱ्या इतिहासप्रेमीचे कर्तव्य आहे. या घटकामुळे विद्यार्थ्यांमध्ये हीच चिकित्सक वृत्ती निर्माण होईल आणि त्यांना मानवी समाजाच्या उत्क्रांतीचा सखोल अर्थ समजण्यास मदत होईल. हा अभ्यास केवळ परीक्षेसाठी नसून, समाजाची जडणघडण समजून घेण्यासाठी एक पाया ठरेल.

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

**टिपा लिहा:**

१) साम्राज्यवादी इतिहासकालेखनाची वैशिष्ट्ये

२) जेम्स मिल

३) माऊंट स्ट्यूअर्ट एलफिन्स्टन

४) साम्राज्यवादी इतिहासलेखनाचे परिणाम

५) राष्ट्रवादी इतिहासलेखनाची वैशिष्ट्ये

६) सर जदुनाथ सरकार

७) डॉ. रमेशचंद्र दत्त

८) राष्ट्रवादी इतिहासलेखनाच्या मर्यादा

९) मार्क्सवादी इतिहासलेखनाची वैशिष्ट्ये

१०) डॉ. डी. डी. कोसांबी

**दिर्घोत्तरी प्रश्न**

१) साम्राज्यवादी इतिहासलेखन परंपरेची सविस्तर माहिती द्या.

२) साम्राज्यवादी इतिहासलेखन परंपरेतील प्रमुख इतिहासकारांची माहिती द्या.

३) साम्राज्यवादी इतिहासलेखनाचा परिणाम व मर्यादा सांगा.

४) राष्ट्रवादी इतिहासलेखन परंपरेतील प्रमुख इतिहासकारांची माहिती द्या.

५) राष्ट्रवादी इतिहासलेखनाचा परिणाम व मर्यादा सांगा.

६) राष्ट्रवादी इतिहासलेखन परंपरेची सविस्तर माहिती द्या.

७) मार्क्सवादी इतिहासलेखन परंपरेतील प्रमुख इतिहासकारांची माहिती द्या.

८) मार्क्सवादी इतिहासलेखनाचा परिणाम व मर्यादा सांगा.

९) मार्क्सवादी इतिहासलेखन परंपरेची सविस्तर माहिती द्या.

## २.७ संदर्भ ग्रंथ व अधिक वाचनसाठीची पुस्तके


१) वाबूरकर, जास्वंदी., इतिहासातील नवे प्रवाह, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २०१४

२) निवडक समाज प्रबोधन पत्रिका; खंड १, इतिहास लेखन मीमांसा, लोकवाङ्मय गृह, मुंबई, २०१०

३) कोठेकर, शांता., इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, नागपूर, २००५

४) सरदेसाई, बी. एन., इतिहासलेखन परिचय, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००६

५) सातभाई, श्रीनिवास., इतिहास लेखनशास्त्र, विद्या बुक्स, संभाजीनगर, २०११


❑❑❑

घटक १

# साधने (Sources)


१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.१.१ साधनांचे वर्गीकरण (Classification of Sources)

१.१.२ साधनांची चिकित्सा (Criticism of Sources)

१.१.३ तथ्य संकलनाच्या पद्धती; सर्वेक्षण, प्रश्नावली, मुलाखत (Data Collection)

१.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१.४ स्वय-अध्ययन प्रश्न व प्रश्नांची उत्तरे

१.५ सारांश

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ संदर्भ ग्रंथ व अधिक वाचनसाठीची पुस्तके


## १.० उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थी...

१) ऐतिहासिक संशोधनामध्ये साधने म्हणजे काय आणि साधनांची संकल्पना स्पष्ट करू शकतील.

२) प्राथमिक आणि दुय्यम साधनांमधील फरक ओळखू शकतील.

३) भौतिक आणि लिखित अशा विविध प्रकारच्या साधनांचे अचूक वर्गीकरण करू शकतील.

४) साधनाची सत्यता तपासण्यासाठी बाह्य व अंतर्गत परीक्षण का आवश्यक आहे हे सांगू शकतील.

५) तथ्य संकलनाच्या विविध पद्धतींची तुलना करू शकतील. सर्वेक्षण, प्रश्नावली आणि मुलाखत यांपैकी कोणत्या परिस्थितीत कोणती पद्धत योग्य ठरेल, याचा निर्णय घेऊ शकतील.

६) संशोधनासाठी प्रभावी प्रश्नावली तयार करणे आणि योग्य पद्धतीने मुलाखत घेण्याचे कौशल्य आत्मसात करतील.

**प्रास्ताविक:**

मानवी संस्कृतीचा उगम आणि विकास यांचा मागोवा घेणे म्हणजे इतिहासलेखन होय. इतिहास हा केवळ भूतकाळातील गोष्टींचा संग्रह नसून, ती एक अत्यंत शास्त्रशुद्ध आणि पुराव्यांवर आधारित वैचारिक प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत संदर्भ साधनांना अनन्यसाधारण महत्त्व असते. किंबहुना, संदर्भ साधनांच्या भक्कम आधाराशिवाय लिहिलेल्या कोणत्याही साहित्याला खऱ्या अर्थाने इतिहास ही संज्ञा प्राप्त होऊ शकत नाही. इतिहासलेखनाचा पाया हा पूर्णतः वस्तुनिष्ठ पुराव्यांवर उभा असतो.

कोणत्याही राष्ट्राचा किंवा विशिष्ट कालखंडाचा राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक इतिहास लिहिताना तो पुराव्यांच्या कसोटीवर उतरणे अनिवार्य असते. या संशोधनासाठी वापरल्या जाणाऱ्या पुराव्यांनाच आपण साधने किंवा संदर्भ असे म्हणतो. ललित साहित्य आणि इतिहासलेखन यामध्ये एक मूलभूत फरक आहे. एखादा लेखक आपल्या कल्पनाशक्तीच्या जोरावर ललित कलाकृती निर्माण करू शकतो, कारण तिथे सत्य घटना मांडण्याचे बंधन नसते. मात्र, इतिहासलेखनाच्या बाबतीत कल्पनाशक्तीपेक्षा सत्यतेला अधिक महत्त्व असते. इतिहास म्हणजे मानवी जीवनात प्रत्यक्ष घडून गेलेल्या सत्य घटनांचा कालानुक्रम होय. एखादी घटना जशी घडली, तशीच ती मांडण्यासाठी लेखकाकडे सबळ पुरावा असावा लागतो; अन्यथा तो इतिहास न ठरता केवळ एक कथा ठरते.

इतिहास हा विषय संपूर्णतः भूतकाळाशी संबंधित असल्याने, त्याचे वर्णन करण्यासाठी आपल्याला त्या काळातील अवशेषांवर आणि उपलब्ध साधनांवर विसंबून राहावे लागते. ऐतिहासिक संशोधनाचे मूल्य हे संशोधकाने निवडलेल्या साधनांच्या गुणवत्तेवर आणि विश्वासार्हतेवर अवलंबून असते. इतिहास संशोधनात अस्सल किंवा प्राथमिक साधने हीच पायाभूत मानली जातात. म्हणूनच जागतिक स्तरावर 'No Documents, No History' (पुरावा नाही, तर इतिहास नाही) हे सूत्र सर्वमान्य आहे. संदर्भ साधनांच्या अभावी इतिहास हा दिशाहीन ठरतो, म्हणूनच ऐतिहासिक घटकांचे संकलन आणि जतन करणे आवश्यक असते.

प्रस्तुत प्रकरणामध्ये आपण इतिहासलेखनासाठी आवश्यक असणाऱ्या विविध साधनांचा सखोल अभ्यास करणार आहोत. यामध्ये प्रामुख्याने प्राथमिक व दुय्यम साधनांचे प्रकार व त्यांचे स्वरूप स्पष्ट करण्यात आले आहे. आधुनिक इतिहासलेखनात केवळ जुन्या कागदपत्रांवर अवलंबून न राहता, माहिती संकलनाच्या विविध पद्धतींचा वापर केला जातो. यात प्रत्यक्ष क्षेत्रावर जाऊन केलेले सर्वेक्षण, जनमताचा कौल घेणारी प्रश्नावली पद्धती आणि तज्ज्ञांकडून माहिती मिळवण्यासाठी वापरली जाणारी मुलाखत पद्धती यांचा समावेश होतो. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात वर्तमानपत्रे आणि इंटरनेट हे संशोधनासाठी कसे उपयुक्त ठरतात, याचेही विवेचन या घटकात केले आहे.

**१.२ विषय विवेचन:**

**१.१ साधनांचे वर्गीकरण:**

गतकालीन मानवी जीवनाचे दर्शन घडवणाऱ्या आणि ज्यांच्या आधारे ऐतिहासिक घटनांचा अन्वयार्थ

लावता येतो, अशा घटकांना इतिहासाची साधने असे म्हणतात. यामध्ये विविध वस्तू, वास्तू, ताम्रपट, कागदपत्रे आणि ग्रंथांचा समावेश होतो. इतिहास म्हणजे केवळ घडून गेलेल्या घटना नव्हे, तर मानवी जीवनातील परिवर्तनाचा अभ्यास होय. हा अभ्यासाचा आलेख मांडण्यासाठी ठोस साधनसामग्रीची आवश्यकता असते. गतकाळातील घटना आपण प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहू शकत नाही, त्यामुळे इतिहास लेखकाला ही माहिती अप्रत्यक्षरीत्या तत्कालीन कागदपत्रांतून किंवा वस्तूंतून मिळवावी लागते. इतिहास लेखनाच्या प्रक्रियेत या साधनांना कच्चा माल मानले जाते. या साधनांचे प्रामुख्याने प्राथमिक आणि दुय्यम असे दोन प्रकार पडतात. संशोधकासाठी दोन्ही साधने तितकीच महत्त्वाची आहेत; कारण जेथे प्राथमिक साधने अपुरी पडतात, तेथे दुय्यम साधने पूरक ठरतात. १९ व्या शतकापासून इतिहासाचा शास्त्रीय अभ्यास सुरू झाला आणि साधनांच्या वापराचे वस्तुनिष्ठ नियम ठरवले गेले. पुरातत्वशास्त्र व नाणेशास्त्र यांसारख्या सहाय्यकारी शास्त्रांच्या विकासामुळे ऐतिहासिक साधनसामग्रीत मोलाची भर पडली आहे. या साधनांच्या वैज्ञानिक चिकित्सेतूनच इतिहासाची पुनर्रचना करणे शक्य होते.

## १) संदर्भ साधन अथवा पुरावा म्हणजे काय?

इतिहासलेखन हे निव्वळ कल्पनेवर आधारित नसून ते पुराव्यांच्या भक्कम पायावर उभे असते. ज्या वस्तू, वास्तू, लिखित किंवा अलिखित दस्तऐवजांच्या आधारे ऐतिहासिक घटनांचा अन्वयार्थ लावता येतो आणि सत्यापर्यंत पोहोचता येते, त्यांना संदर्भ साधन किंवा पुरावा असे म्हणतात. प्रो. मायकेल स्टॅनफोर्ड यांच्या मते, ऐतिहासिक घटना स्वतःच पुरावा निर्माण करतात आणि हेच पुरावे ऐतिहासिक ज्ञानाचा मुख्य आधार ठरतात. पुराव्याशिवाय लिहिलेले कोणतेही लिखाण शास्त्रशुद्ध इतिहास मानले जाऊ शकत नाही. शॉर्टर ऑक्सफर्ड डिक्शनरी'नुसार, ज्यातून पुरावा स्पष्टपणे दृष्टीस पडतो किंवा ज्याच्या आधारे ऐतिहासिक निर्णय घेता येतो, ते म्हणजे साधन होय. साधनांना अनेकदा कागदपत्रे हा पर्यायी शब्दही वापरला जातो. थुसिडीडीज या ग्रीक इतिहासकाराने स्पष्ट केल्याप्रमाणे, भविष्यासाठी आदर्श ठरेल असे ऐतिहासिक घटनांचे तंतोतंत वर्णन करण्यासाठी योग्य साधने जमवणे अनिवार्य आहे.

## २) साधनांचे स्वरूप:

ऐतिहासिक साधनांचे स्वरूप भिन्न प्रकारचे असून ते कलपरत्वे बदलत गेलेले दिसते. उदा. अश्मयुगीन इतिहासाची साधने वस्तु किंवा वास्तु स्वरुपात आढळतात तर मध्ययुगीन अथवा आधुनिक काळातील साधने लिखित स्वरुपात मिळतात. इतिहासाची व्याप्ती जस जशी वाढत जाते तस-तसे साधनांचे स्वरूपही बदलत जाते. मानव अथवा मानवी संस्कृतीपर्यन्त झालेला आहे. मानवी विकासाची ही स्थित्यंतरे विविध टप्प्यात झालेली आहेत. या विविध स्थित्यंतराचा व टप्प्यांचा अभ्यास करण्यासाठी विविध स्वरूपाची साधने इतिहास लेखनासाठी महत्वाची आहेत. कालपरत्वे ऐतिहासिक साधनांच्या स्वरुपात बदल व विकास झालेला दिसतो. पुरातत्वीय वस्तू किंवा वास्तू, विविध कलाकृती, कागदपत्रे, वाङमय, नाणी, शस्त्रास्त्रे अशी अनेक विविध साधने काळानुरूप सापडतात. इतिहासाच्या साधनांचे स्वरूपानुसार वर्गीकरण केले जाते. साधनांच्या स्वरूपानुसार प्रामुख्याने तीन विभागात वर्गीकरण केले जाते. ते पुढीलप्रमाणे,

**१) लिखित साधने**

२) भौतिक  अथवा पुरात्वीय साधने

३) मौखिक साधने

याशिवाय इतिहासाच्या अभ्यासासाठी कालखंडानुसार पुढील प्रमाणे वर्गीकरण केले जाते.

१) प्राचीन कालखंड

२) मध्ययुगीन कालखंड

३) आधुनिक कालखंड

कालखंडानुसार साधनांचे स्वरूप

| प्राचीन कालखंड | मध्ययुगीन कालखंड | आधुनिक कालखंड |
|---|---|---|
| दगडी हत्यारे | ताम्रपट | शासकीय दस्तऐवज |
| प्राणी/मानवी सांगाडे | हस्तलिखिते | खाजगी पत्रव्यवहार |
| मातीची भांडी | दरबारी कागदपत्रे | आत्मचरित्र |
| दगडी अवजारे | इतिवृत | आठवणी |
| धातूची अवजारे/शस्त्रास्त्रे | प्रवास वर्णने | अहवाल |
| धातूची भांडी | आज्ञापत्रे | सर्वेक्षण |
| खेळणी/मनोरंजन साधने | जमाखर्च कागदपत्रे | वर्तमानपत्रे |
| अलंकार/आभूषणे | चरित्र ग्रंथ | भाषण संग्रह |
| विविध प्रकारचे मणी | निवडा पत्रे | गुप्त अहवाल |
| नाणी | बातमी पत्रे (अखबरात) | नियतकालिक |
| इमारती/नगराचे अवशेष | आत्मवृते | मुलाखती |
| गुहाचित्रे | रोजनिशी | प्रश्नावली |
| शिलालेख | तवारीखा | संसदीय कागदपत्रे |
| ताम्रपट | बखरी | इतिवृते |
| प्राचीन शिल्पाकृती | शकावल्या | प्रवासवर्णने |

| | | |
|---|---|---|
| वेद वाड:मय | करीने | नाणी |
| महाकाव्ये | महजर | परकीय कागदपत्रे |
| स्मृतीशिळा | वंशावळी | चरित्र ग्रंथ |
| पुराणे | कुळकुटी | टी. व्ही बातमीपत्रे |
| बौद्ध वाड:मय | धार्मिक साहित्य | रेडिओ बातमीपत्रे |
| जैन वाड:मय | खाजगी पत्रव्यवहार | साप्ताहिके |
| संगम साहित्य | प्रांतिक साहित्य | कादंबरी |
| प्रवासवर्णने | लोक साहित्य | लोक साहित्य |
| लेण्या/गुहा मंदिरे | मंदिरे /मठ/चर्च/मशिदी | मौखिक साहित्य |
| चैत्यगृह/विहार | स्मारके/वाडे | |
| मूर्तिशिल्पे | परकीय कागदपत्रे | |

**अ) प्राथमिक संदर्भ साधने:**

इतिहासलेखन शास्त्रामध्ये प्राथमिक संदर्भ साधनांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. ही साधने म्हणजे इतिहासाचा असा कच्चा माल आहे, ज्यावर प्रक्रिया करून इतिहासकार सत्याचे मूर्त रूप उभे करतो. ऑर्थर मार्विक यांच्या मते, प्राथमिक साधने ही त्या घटनांची साक्ष देणारी मूळ कागदपत्रे असतात. प्राथमिक साधन म्हणजे अशी माहिती, जिचा लेखक त्या घटनेचा प्रत्यक्ष साक्षीदार असतो किंवा त्याने स्वतः त्या घटनेत सहभाग घेतलेला असतो. कार्ल गुस्तावसन यांच्या 'The Preface to History' या ग्रंथानुसार, जी साधने केवळ एकाच ठिकाणी मूळ स्वरूपात सापडतात, ज्यांच्यावर कोणतीही प्रक्रिया झालेली नसते आणि जी पूर्णतः समकालीन असतात, त्यांना प्राथमिक साधने म्हणतात. उदा. पानिपतच्या युद्धातील प्रत्यक्षदर्शींची पत्रे किंवा महात्मा गांधींच्या चळवळीविषयी महादेव देसाई यांनी केलेले समकालीन लिखाण. डॉ. शांता कोठेकर यांच्या मते प्राथमिक साधनांची वैशिष्ट्ये: डॉ. शांता कोठेकर यांनी इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान' या ग्रंथात प्राथमिक साधनांचे निकष स्पष्ट केले आहेत: १) समकालीनता: संशोधक ज्या काळाचा अभ्यास करत आहे, त्याच काळातील ती साधने असावीत. २) प्रत्यक्ष सहभाग: घटनेत सहभागी असलेल्या व्यक्तींची मूळ कागदपत्रे. ३) साक्षीदार: स्वतः घटनेत नसले तरी ती डोळ्यांनी पाहिलेल्या व्यक्तींचे वृत्तांत. ४) आत्मवृत्त व दिनवृत्त: व्यक्तीने स्वतःच्या जीवनाबद्दल किंवा काळाबद्दल लिहिलेल्या दैनंदिनी. ५) वस्तुरूप साधने: केवळ लिखितच नव्हे, तर तत्कालीन इमारती, नाणी, मूर्ती आणि उत्खनित अवशेष ही देखील प्राथमिक साधनेच आहेत.

**१) समकालीन कागदपत्रे:** इतिहासलेखनाच्या दृष्टीकोणातून ऐतिहासिक घटनांच्या संदर्भात समकालीन कागदपत्रे अतिशय महत्वाची असतात. समकालीन कागदपत्राच्या साहयाने त्या काळातील वस्तुस्थितीवर

प्रकाश टाकण्यास मदत होते. ही कागदपत्रे अतिशय स्पष्ठ व महत्वाची बिनचूक माहिती देणगी असतात. समकालीन कागदपत्रामधून राजकीय, सामाजिक व समकालीन इतर महत्वाच्या घडामोडीसंबंधी असंख्य बाबीचा समावेश यामध्ये असतो. उदा. रोजनिशी, मुल्यपत्रे, पत्रव्यवहार, वृत्तपत्रे इत्यादी समकालीन कागदपत्राच्या संदर्भात प्रो. गॉसचॉक असे म्हणतात की, एखाद्या घटनेसंबंधी सूचना देण्याच्या उद्देशाने अथवा घटनेमध्ये सहभागी असलेल्या व्यक्तीस स्मरण करून देण्याच्या उद्देशाने लिहिलेल्या कागदपत्रात समकालीन कागदपत्रे असे म्हणतात. उदा. कोर्टामधील कागदपत्रे, रेडिओ, वृत्तवाहिनीवरील चर्चा इत्यादी विविध राज्यकर्त्यानी एकमेकांना केलेला पत्रव्यवहार देखील समकालीन कागदपत्रामध्ये येतो. उदा. लेटर्स फ्रॉम दि मराठा कॅम्प.

**अ) सरकारी कागदपत्रे:** सरकारी कागदपत्रे म्हणजे प्रशासकीय दृष्टीकोनातून केलेला पत्रव्यवहार समाविष्ठ असतो. यामध्ये प्रशासकीय जमीन महसून विषयक कागदपत्रे, मांडलिक राज्यकर्त्याकडून मिळालेल्या खंडणीच्या व्यवहारासंबंधी कागदपत्रे, कर्ज रोखे, सनदा, इनामपत्रे, शाही फर्माने तसेच आधुनिक सरकारी कागदपत्रामध्ये सरकारतर्फे प्रसिध्द केली जाणारी खानेसुमारीची आकडेवारी, विविध खात्याचे अहवाल, आर्थिक सर्वेक्षण अहवाल, प्रत्येक राज्याच्या विधानसभा व विधान परिषदेची इतिवृत्त, लोकसभा व राज्यसभेची इतिवृत्त, गृहखात्याचे अहवाल इत्यादि. भारतामध्ये १७ व्या शतकापासूनच्या सर्वच सरकारी कागदपत्राचे जतन शासकीय पुराभिलेखागारातून केलेले आहे. याशिवाय अनेक इतिहास संशोधकांनी मराठाकालीन खाजगी परंतु सरकारी कागदपत्राचे संकलन व संपादन केलेले आहे उदा. रियाझकार गो. स. सरदेसाई यांनी संपादीत केलेले पेशवे दप्तराचे ४५ खंड, वि. का. राजवाडे यांनी संपादीत केलेली मराठ्यांच्या इतिहासाची साधने, २२ खंड व ग. चि. वाड यांनीही १३ खंडांचे संपादन केलेले आहे. भारतामध्ये ज्या परकीय व्यापारी कंपन्या झालेल्या होत्या त्यांनीही आपल्या मायदेशी राज्यकारभारा संदर्भात केलेल्या पत्रव्यवहाराचा समावेश होतो. ब्रिटिशानी केंद्रीय पुराभिलेखागारांची निर्मिती करून सरकारी कागदपत्रे व दप्तर सांभाळण्याचा प्रयत्न केला व सरकारी कागदपत्राच्या संदर्भात गुप्ततेचा कायदा ही केलेला आहे. ब्रिटिश काळापासूनची सरकारी कागदपत्रे भारतातील सर्व पुराभिलेखागारांच्यामध्ये मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत.

**ब) गुप्त पत्रव्यवहार:** गुप्त पत्रव्यवहाराला इतिहासलेखनामध्ये खूप महत्वाचे स्थान आहे. राजकीय व लष्करी इतिहासाच्या मांडणीसाठी गुप्त पत्रव्यवहार अनेक घटनावर प्रकाश टाकण्यास साहयाभूत ठरतो. गुप्तपत्रव्यवहार हा अधिकारी वर्ग व सरकार अथवा राज्यकर्ते यांच्याशी संबंधीत असतो. याशिवाय खाजगी गुप्त व्यवहारांचाही समावेश असतो. लष्करामध्ये अशाप्रकारचा गुप्त पत्रव्यवहार खूप मोठ्या प्रमाणावर होत असतो. उच्च लष्करी अधिकाऱ्यांचे गोपनीय अहवाल, पोलिसाचे गोपनीय अहवाल, उच्चश्रेणीतील सरकारी अधिकाऱ्यांचे अहवाल, कनिष्ठ अधिकाऱ्यांनी वरिष्ठांना पाठवलेली गोपनीय निरीक्षणे व अहवाल, इत्यादी यामध्ये समावेश होतो. ज्यांनी ही पत्रे किंवा अहवाल लिहिलेले असतात. त्या व्यक्ती व ज्यांनी ही पत्रे पाठवलेली असतात. त्या दोन्ही व्यक्ती एकमेकाच्या विश्वासातील असतात. उदा. सन १८५७ च्या उठावाच्या अगोदर व उठाव चालू असताना ब्रिटिश अधिकाऱ्यांनी जो गुप्त पत्रव्यवहार. इंग्लंडमधील अधिकाऱ्यांशी केलेला होता त्यामधून १९५७ च्या उठावासंबंधी घटनावर अधिक प्रकाश पडतो. ब्रिटिश

काळापासूनच्या भारतातील गुप्तवार्ता विभागाच्या डायऱ्या आज उपलब्ध आहेत. यामधील नोंदीही गुप्त स्वरुपाच्याच आहेत. या डायऱ्याच्या मधून भारतीय स्वातंत्र्य चळवळीवर वेगळ्या दृष्टीकोनातून प्रकाश पडतो.

**क) सार्वजनिक सरकारी कागदपत्रे:** सार्वजनिक कागदपत्रे म्हणजे सरकारच्या वतीने प्रसिध्द होणारी कागदपत्रे होय. उदा. हुकुमनामा किंवा जाहीरनामा इत्यादी स्वरुपाची कागदपत्रे सार्वजनिक कागदपत्रात मोडतात. गुप्त कागदपत्राच्या पेक्षा सार्वजनिक कागदपत्रे भिन्न स्वरूपाची असतात. उदा. मुघलकालीन अकबरात ही सार्वजनिक कागदपत्रात मोडतात.

**२) खाजगी कागदपत्रे:** एखाद्या राजकीय व्यक्तीने, लष्करी अधिकाऱ्याने, सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींनी खाजगीत केलेल्या नोंदीचा समावेश खाजगी कागदपत्रामध्ये होतो. या कागदपत्राच्या मध्ये व्यक्तीगत जीवनापासून सार्वजनिक क्षेत्रातील राजकीय, सामाजिक, आर्थिक घटनांचा समावेश असतो. असा पत्रव्यवहार काही वर्षा नंतर अथवा दशकांच्या नंतर उजेडात येतो किंवा प्रकाशित केला जातो. यामधून इतिहास लेखनास महत्वाची माहिती मिळते. ही कागदपत्रे एखाद्या व्यक्तीच्या वैयक्तिक जीवनावर प्रकाश टाकू शकतात. परंतु त्याचबरोबर समकालीन इतर अनेक घटनावर प्रकाश टाकते. खाजगी कागदपत्राच्या मधून आलेली माहिती एकांगी, पक्षपाती व पूर्वग्रहदूषित असू शकते. त्यामुळे इतिहास संशोधकांनी अशा कागदपत्राची खातरजमा करून लिखाण करावे. अनेक मोठमोठ्या व्यक्तीचा खाजगी पत्रव्यवहार आज उपलब्ध आहे उदा. बाळासाहेब खेर, शंकरराव देव, महात्मा गांधी, भूलाभाई देसाई, यशवंतराव चव्हाण, सरदार वल्लभाई पटेल, जी. के. गोखले, ना. वि. गाडगीळ, शंकरराव मोरे, आचार्य अत्रे. अशा कितीतरी व्यक्तीचा पत्रव्यवहार आज उपलब्ध आहे.

**ब) रोजनिशी अथवा डायऱ्या:** रोजनिशी अथवा डायरी हे इतिहासलेखनासाठी महत्वाचे साधन ठरू शकते. अनेक इतिहास प्रसिध्द व्यक्तीनी आपल्या रोजनिशी अथवा डायऱ्या लिहून ठेवलेल्या आहेत. या डायऱ्यामधून त्या व्यक्तीच्या दैनंदिन जीवनातील घडामोडीची नोंद केलेली असते. उदा. ग. चि. वाड यांनी पेशव्यांच्या रोजनिशी संपादीत केलेल्या आहेत. या डायरीवरुन तत्कालिन सामाजिक, आर्थिक व राजकीय धोरणावर प्रकाश पडतो. काही प्रसंगी रोजनिशीतील माहिती अर्धवट, अपूर्ण किंवा अतिशयोक्तीपूर्ण किंवा खोटीही असू शकते.

**क) आठवणी किंवा आत्मवृत्ते:** राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक, लष्करी प्रशासकीय जीवनात काम करणाऱ्या जगातील अनेक श्रेष्ठ व्यक्तीनी आपल्या आठवणी अथवा आत्मवृत्ते लिहिलेली आहेत. त्यांच्या लिखाणामधून ही तत्कालीन अनेक घटनांच्यावर प्रकाश टाकण्यास मदत होते. मध्ययुगीन कालखंडात 'तुझुक-ए-बाबरी' (बाबरनामा) हा ग्रंथ खुद्द बाबराने आत्मचरित्रावर लिहिला त्याचबरोबर 'तुझुक-ए-जहागिरी' हे आत्मचरित्र स्वत: जहाँगिराने लिहिले आहे. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या आठवणी प्रा. गो. मा. पवार यांनी संपादीत केलेल्या आहेत. महात्मा गांधी यांनी माझे सत्याचे प्रयोग' प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे यांचे माझी जीवनगाथा', सेतुमाधवराव पगडी यांचे जीवनसेतु', माधवराव

बागल यांचे जीवन प्रवाह' अशी आत्मवृत्ते आज प्रकाशित आहेत. या आठवणी किंवा आत्मावृत्तातून समकालीन विविध घटनावर दृष्टीक्षेप पडतो.

३) **राजकीय तह-करार:** राजकीय तह किंवा करारनामे हे इतिहासाचे अत्यंत महत्वाचे अस्सल साधन आहे. तह किंवा करारनामा अनेक कलमाचा असतो. प्राचीनकाळापासून जगाच्या इतिहासात तह किंवा करारनामा करण्याची प्रथा अस्तित्वात होती. मध्ययुगीन कालखंडापासूनचे विविध राजवटीतील अनेक तह व करारनामे अजूनही उपलब्ध आहेत. या कागदपत्राच्यामधून तत्कालीन राजकीय व लष्करी जीवनावर प्रकाश पडतो. उदा. ग.चि. वाड यांनी पेशवेकालीन करार व तहनामे संपादीत केलेले आहेत. तह व करारपत्रे यामधून तत्कालीन राजकीय परिस्थिती, राजे त्यांच्या राज्याच्या सिमा व तहातील कलमावरून त्या तहाचे कशाप्रकारे परिणाम झाला याविषयी माहिती मिळते.

४) **प्रवास वर्णने:** प्राचीन काळापासून भारतात येऊन गेलेल्या परकीय प्रवाशांनी लिहिलेली प्रवासवर्णने ही प्राथमिक संदर्भ साधन मानले जाते. प्राचीन भारताचा अभ्यास करताना मेगॅस्थेनिसचे 'इंडिका', टॉलेमीचा 'भारताचा भुगोल' इत्यादी लिखाण महत्वाची माहिती देतात. चिनी प्रवासी युआॅन च्वांग व इत्सिगचे प्रवासवर्णन प्राचीन भारतातील राजकीय, सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक जीवनाची माहिती देतात. मध्ययुगीन काळात आलेला मोरोक्कन प्रवासी इब्ज बतुता यांने लिहिलेले 'किताब-उल-रहेला', पर्शियन वकिल अब्दुर रझाक, फ्रॉन्सचा प्रवासी जॉन ऑफ ऑटे कोर्विनो मार्को पोलो, निकोलो कोटी, रशियन व्यापारी अयन्सिंसन निकीतीन व इटलीया लुडोव्होको दी वथेगा इत्यादी. पोर्तुगालचा बार्बोसा व डोमिगोज पीस, इग्लंडमधून आलेले कॅप्टन हॉकीन्स, सर थॉमस रो, फ्रान्समधून आलेला फ्रान्सिस बर्नियर, थेवेनॉट, बे कॅरे, फ्रॉन्सिस मॉटिन व जॉन फ्रायर इत्यादीची प्रवास वर्णने मध्ययुगीन भारताच्या संदर्भात बहुमोल माहिती देतात. या प्रवास वर्णनामध्ये त्यांची भाषिक अडचण असो अथवा त्यांचा भारताकडे पाहण्याचा दृष्टीकोण असो काही प्रमाणात चूकीची माहितीही आलेली दिसते. त्या संदर्भात इतिहास अभ्यासकानी ती माहिती तपासून घेतली पाहिजे.

५) **जमाखर्चाच्या नोंदी:** कोणत्याही राजवटीतील व प्रशासनातील जमाखर्च हा इतिहासलेखन शास्त्राच्या दृष्टीकोणातून अत्यंत महत्वाचा पुरावा मानला जातो. जमाखर्चाच्या नोंदी म्हणजे त्या राज्याचा आर्थिक आरसा मानल्या जातात. याच्या माध्यमातून उत्पन्नाच्या बाजू व खर्चाच्या बाजू या संदर्भात माहिती मिळते. पेशवेकालीन जमाखर्चाच्या नोंदीवरून पेशवे श्रावणमासामध्ये किती मोठ्या प्रमाणात ब्राह्मणांना दान व ब्राह्मण भोजन करत होते यावर प्रकाश पडतो. मुघलकालीन जमाखर्चाच्या नोंदीवरून थॉमस एडवर्ड यांने 'Revenue Resources of the Mughal empire from 1593 to 1707' हा उत्कृष्ठ ग्रंथ लिहिलेला आहे.

**ब) प्राथमिक अलिखित साधने:** इतिहासाच्या साधनांमध्ये अलिखित साधनांचे स्थान अनन्यसाधारण आहे. ही साधने ज्या काळात निर्माण झाली, त्याच काळाची ती मूक साक्षीदार असतात. ही साधने भौतिक स्वरूपात असल्याने ती शतकानुशतके टिकून राहतात आणि त्यामध्ये कोणीही जाणीवपूर्वक फेरफार करू शकत नाही. त्यामुळे इतिहास लेखनात ही साधने अत्यंत विश्वसनीय मानली जातात. अभ्यासाच्या

दृष्टीकोणातून जरी दोन प्रकारात वर्गीकरण केले जात असले तरी खालील प्रमाणे पुरातत्वीय साधने आढळून येतात.



पुरातत्वीय वस्तू अथवा वास्तूच्या स्वरुपात जी साधने उपलब्ध होतात त्याच्यामधून इतिहासाच्या पाऊलखुणा आढळतात. या वस्तू अथवा वास्तूच्या माध्यमातून अभ्यासकास तत्कालीन सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक व राजकीय परिस्थितीवर प्रकाश टाकणे शक्य होते. यामधील काही प्रमुख साधनाचा या ठिकाणी अभ्यास करावयाचा आहे.

### १) पुराणवस्तू/ उत्खनित अवशेष:

मानवी संस्कृती आणि विकासाचा मागोवा घेण्यासाठी उत्खनित अवशेष' हे सर्वात विश्वसनीय साधन मानले जाते. उत्खननात सापडलेल्या दैनंदिन वापरातील वस्तू म्हणजे गतकालीन समाजजीवनाचा आरसाच असतात. ज्या ठिकाणी उत्खनन होते, तिथे वसाहतींचे विविध थर आढळतात. या थरांमध्ये सापडणारी मातीची भांडी, खापरे, अलंकार, शस्त्रास्त्रे, खेळणी, मणी आणि मानवी व प्राणी सांगाडे यांच्यावरून त्या संस्कृतीचा कालखंड निश्चित करता येतो. विज्ञानाच्या मदतीने, विशेषतः 'कार्बन-१४' आणि रेडिओ कार्बन' या रासायनिक प्रक्रियांमुळे सांगाड्यांचे वय, वंश आणि मृत्यूचे कारण शोधणे शक्य झाले आहे. पुरातत्व शास्त्रात मातीच्या खापरांना 'पुरातत्व विद्येची मुळाक्षरे' म्हटले जाते. मानवाने हजारो वर्षांपासून वापरलेल्या या भांड्यांच्या बनावटीवरून आणि त्यावरील चित्रकलेवरून तत्कालीन जीवनमान, तंत्रज्ञान आणि व्यावसायिक प्रगतीवर प्रकाश पडतो. शेतीची अवजारे आणि युद्धातील शस्त्रास्त्रे तत्कालीन कृषक जीवन व प्रगत तंत्रज्ञानाची साक्ष देतात. आदिम काळातील शिकारीच्या हत्यारांपासून ते धातूच्या शस्त्रास्त्रांपर्यंत झालेला बदल मानवी बुद्धिमत्तेच्या प्रवासाचे दर्शन घडवतो. उत्खननात केवळ राजा-महाराजांच्याच नव्हे, तर सामान्य माणसांच्या वापरातील वस्तूही सापडतात. धान्याचे कण, सौंदर्य प्रसाधने, बांगड्या आणि मुलांची खेळणी यातून तत्कालीन सामान्य जनतेचा सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहास रेखाटता येतो. खेळातील बैलगाडी किंवा जहाजाच्या प्रतिकृतीवरून त्या काळातील दळणवळणाची कल्पना येते. प्रत्येक काळातील अलंकारांची कलाकुसर आणि त्यांचा विशिष्ट पोत हा त्या त्या संस्कृतीच्या सौंदर्याभिरुचीचा पुरावा असतो.

### २) वास्तू अवशेष:

प्राचीन काळापासून विकसित झालेली भारतीय स्थापत्यकला ही इतिहासाचे एक जिवंत आणि भौतिक साधन आहे. स्तूप, लेणी, मंदिरे, किल्ले आणि राजवाडे यांसारखे वास्तू अवशेष काळाच्या ओघात, परकीय आक्रमणांमुळे किंवा नैसर्गिक आपत्तींमुळे काही अंशी उद्ध्वस्त झाले असले, तरी आजही ते तत्कालीन वैभव अधोरेखित करतात. तक्षशिला, नालंदा, लोथल आणि दायमाबाद यांसारख्या उत्खनित स्थळांमधून प्राचीन नागरी संस्कृतीचे दर्शन घडते. भारतीय स्थापत्यकलेचा पाया लेण्यांमधून विस्तारला. अजिंठा, वेरुळ आणि कार्ल्यासारखी लेणी ही चैत्यगृहे, विहार आणि गुहा मंदिरांचे उत्कृष्ट नमुने आहेत. सम्राट अशोकापासून ते गुप्त, चालुक्य आणि चोल राजवटींपर्यंत, ज्या धर्माला राजाश्रय मिळाला, त्याचा प्रभाव वास्तूंवर दिसून येतो. सांची आणि अमरावतीचे स्तूप बौद्ध धर्माची माहिती देतात, तर ऐहोळ व पट्टडकलची मंदिरे हिंदू मंदिर स्थापत्यशैलीचा उदय स्पष्ट करतात. नागर, द्रविड आणि हेमाडपंथी शैलीतील मंदिरे केवळ धार्मिकच नव्हे, तर तांत्रिक प्रगतीचीही साक्ष देतात.

मध्ययुगीन काळात मुघल स्थापत्यशैलीने नवीन उंची गाठली. आग्र्याचा किल्ला आणि दिल्लीचा लाल किल्ला हे लष्करी व निवासी स्थापत्याचे जागतिक नमुने आहेत. मुघल वास्तूंमधील जाळीकाम आणि नक्षीकाम तत्कालीन कलात्मकतेची ओळख करून देते. दुसरीकडे, राजपूत राजांनी जयपूर आणि जोधपूर येथे बांधलेले भव्य राजवाडे त्यांच्या संरक्षक तटबंदी आणि अंतर्गत मांडणीसाठी प्रसिद्ध आहेत. इतिहासाच्या पाऊलखुणा शोधताना शिवकालीन दुर्गस्थापत्य क्रांतीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. छत्रपती शिवाजी महाराजांनी जलदुर्ग, गिरीदुर्ग आणि भुईकोट किल्ल्यांच्या माध्यमातून अभेद्य संरक्षक भिंत उभी केली. महाराजांची दुर्गनीती आजही लष्करी संशोधकांसाठी अभ्यासाचा विषय आहे.

### ३) शिल्पावशेष:

प्राचीन काळापासून भारतात अस्तित्वात आलेल्या मूर्ती, कला अवशेष, चित्रकलेला पाश्चात्य अभ्यासकांनी इतिहासाचे एक साधन म्हणून पाहिलेले आहे. या अवशेषावरून त्यांनी भारतीय कला परंपरांचा इतिहास शोधला. कलेची वैशिष्टये जगासमोर आणली. शिल्पावशेषांच्या माध्यमातुन इतिहास, मुर्तीशास्त्र, कला, अभिव्यक्ती इत्यादी ची समीक्षा या अवशेषाच्या माध्यमातूनच केलेली आहे. इतिहासाचे एक साधन म्हणून या शिल्पावशेषाला महत्त्व आहे. शिल्पावशेषात मूर्तिशास्त्राचा चित्रपरंपरेचा अभ्यास केला. त्यातन सामान्य जीवन, केशभूषा पध्दती, वेशभूषा पध्दती, अलंकारभूषणे, वापरात असलेली निरनिराळी वारे इत्यादी अभ्यास व त्याचे प्रार्यासास सिध्द केलेले आहे. अभिव्यक्तीची अनेक माध्यमे आहेत. यामधील शिल्पकला हे ही एक आहे. या कालाभिव्यक्तिमा तत्कालीन समाजाचे प्रतिबिंब सहजपणे उतरलेले दिसते. त्या दृष्टीकोणातून शिल्पकला किंवा त्याचे अवशेष तत्कालीन समाजाच्या व्यवहाराचे महत्वपूर्ण पुरावे ठरतात. या पुराव्याच्या माध्यमातून तत्कालीन समाजजीवनाचा इतिहास रेखाटला जाऊ शकतो. चित्र रेखाटणे किंवा दैनंदिन जीवनातील प्रसंग दगडावर कोरून ठेवणे ही मानवी प्रवृत्ती संपूर्ण जगभर पहावयास मिळते. म्हणूनच हे अवशेष विस्मरणीय व अस्सल दर्जाचा पुरावा मानला जातो.

### ४) आलेख/अभिलेख:

प्राचीन काळी लिहिलेला अथवा कोरलेला मजकूर म्हणजे अभिलेख अथवा पुराभिलेख पुरातत्वीय साधनांच्यामध्ये अत्यंत महत्वाचे व अविनाशी साधन म्हणून याचा उल्लेख केला जातो. ताम्रपट, स्तमालेख, गुहालेख, प्रस्तरलेख इत्यादी प्रकार यामध्ये आढळतात. इतिहासलेखन व पुर्नलेखनासाठी अतिशय उपयुक्त व विश्वसनीय साधन म्हणून याचा उपयोग होतो. कारण शिलालेख अथवा ताम्रपटावरील नोंदी स्पष्टपणे व निःसंदिग्धपणे कोणतीही खाडाखोड न करता केलेल्या असतात. या लेखाच्यामधून धर्माज्ञा, धर्मोपदेश, राजज्ञा, राज्यकृत्ये, राजसूती, आज्ञापत्रे, बतनपत्रे, नीतीतत्वे, पदव्या, वंशावळी इत्यादी संबंधी माहिती कोरलेली आढळते. सदर विषयाच्या अनुशंगाने संशोधकास तत्कालीन राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक व सांस्कृतिक परिस्थितीवर प्रकाश टाकण्यास मदत होते.

### ५) शिलालेख व स्तंभालेख:

इतिहासलेखनाच्या साधनांमध्ये शिलालेख आणि स्तंभालेख यांना अत्यंत विश्वसनीय मानले जाते.

दगडावर किंवा स्तंभावर कोरलेले हे लेख काळाच्या ओघात नष्ट होत नाहीत, म्हणून त्यांना शाश्वत पुरावे म्हटले जाते. भारतात मौर्य, गुप्त, सातवाहन, चालुक्य आणि यादव अशा अनेक राजघराण्यांचा इतिहास या लेखांमुळेच उजेडात आला आहे. सम्राट अशोकाचे स्तंभालेख हे मौर्यकालीन इतिहासाचे सर्वोत्तम साधन आहेत. सुरुवातीचे लेख प्रामुख्याने ब्राह्मी आणि खरोष्टी लिपीत होते. पुढे १७८४ मध्ये एशियाटिक सोसायटीची स्थापना झाल्यावर जेम्स प्रिन्सेप यांनी या लिपींचा उलगडा केला, ज्यामुळे भारतीय इतिहासाला नवी दिशा मिळाली. गुप्तकाळानंतर हे लेख प्रामुख्याने संस्कृत भाषेत कोरले जाऊ लागले. हे शिलालेख विविध स्वरूपाचे असतात: १. व्यापारी: व्यापाराचे नियम आणि श्रेणींची माहिती देणारे. २. धार्मिक: अशोकाचे धम्मलेख आणि उपदेश. ३. दानात्मक: मंदिरे किंवा लेण्यांना दिलेल्या दानांची नोंद (उदा. कान्हेरी, नाशिक लेणी). ४. प्रशासकीय: राज्याज्ञा आणि करप्रणालीची माहिती. ५. प्रशस्तीपर: राजांचे विजय आणि पराक्रम सांगणारे (उदा. समुद्रगुप्ताचा अलाहाबाद स्तंभालेख).

प्राचीन भारताच्या तुलनेत मध्ययुगीन काळात शिलालेखांचे प्रमाण कमी झाले, तरी ते किल्ले, मशिदी आणि कबरींवर आढळतात. 'इपिग्राफिया इंडिका' आणि 'इपिग्राफिया कर्नाटिका' यांसारख्या ग्रंथमालेतून हजारो शिलालेखांचे संपादन झाले आहे. वा. सी. बेंद्रे यांनीही मध्ययुगीन आलेखांची क्रमबद्ध मांडणी केली आहे. हे शिलालेख केवळ राजकीय इतिहासच नव्हे, तर सामाजिक आणि आर्थिक पैलूही उलगडतात. राजस्थानच्या कुंभलगड लेखातून तत्कालीन आश्रमसंस्था आणि उत्सवांची माहिती मिळते, तर आंध्र प्रदेशातील मोटुपल्ली लेखातून सागरी व्यापाराचा इतिहास कळतो. केरळमधील मंदिर लेखांवरून तत्कालीन सरंजामशाही आणि समाजव्यवस्थेवर प्रकाश पडतो. थोडक्यात, शिलालेख हे इतिहासातील रिकाम्या जागा भरून काढणारे सर्वात महत्त्वाचे दुवे आहेत.

### ६) ताम्रपट:

इतिहासलेखनाच्या साधनांमध्ये ताम्रपटांचे स्थान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. मानवी जीवनात धातूचा वापर सुरू झाल्यानंतर, तांब्याच्या जाड पत्र्यावर अक्षरे कोरून हे दस्तऐवज तयार करण्याची प्रथा रूढ झाली. शिलालेखांच्या तुलनेत ताम्रपटांची संख्या अधिक असून ते प्रामुख्याने दानपत्रे, जमिनीची हक्कपत्रे आणि राजाज्ञा म्हणून वापरले जात. ताम्रपटांचा मूळ उद्देश दानधर्माची नोंद ठेवणे हा असला, तरी त्यातून राजघराण्यांची वंशावळ, राज्यविस्तार आणि पराक्रम यावर मोलाचा प्रकाश पडतो. विशेषतः वाकाटक घराण्याचा इतिहास प्रामुख्याने ताम्रपटांतूनच उलगडला आहे. याशिवाय गुप्त, चालुक्य, राष्ट्रकूट आणि यादव काळातही ताम्रपटांचा विपुल वापर झाला. चिनी प्रवासी फाहियान आणि सुएनत्संग यांच्या वर्णनानुसार, बौद्ध मठांमध्ये जमिनीच्या दानाचे आणि सम्राट कनिष्कासारख्या राजांच्या भाषणांचे संदर्भ ताम्रपटांवर कोरून ते स्तूपांमध्ये सुरक्षित ठेवले जात असत.

ताम्रपटांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यातील नोंदी स्पष्ट आणि नि:संदिग्ध असतात. यात तिथी, वार, नक्षत्र आणि वर्षाचा उल्लेख असल्याने कालनिश्चिती करणे सोपे जाते. विजयनगर साम्राज्यात तर 'शासनम्' (जमीन दान), 'जयपत्रम्' (न्यायनिवाडा), 'आज्ञापत्रम्' (राजाज्ञा) आणि 'प्रज्ञापत्रम्' (जाहीरनामा) असे विशिष्ट प्रकार प्रचलित होते. या लेखांत दान देणाऱ्याचे नाव, त्याची वंशावळ, दानाचे स्वरूप आणि

सीमारेषा यांची सविस्तर माहिती दिलेली असे. जरी प्राचीन भारताच्या तुलनेत सुलतानशाहीतील ताम्रपट कमी आढळत असले, तरी एकूणच ऐतिहासिक संदर्भ म्हणून ताम्रपट हे तत्कालीन सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थितीचे विश्वसनीय पुरावे मानले जातात. हे दस्तऐवज केवळ धार्मिक किंवा वैयक्तिक नोंदी नसून, त्या काळातील प्रशासकीय आणि सांस्कृतिक जीवनाचे अधिकृत पुरावे आहेत.

### ७) नाणी:

इतिहासलेखनाच्या पुरातत्वीय साधनांमध्ये नाणी' हे सर्वात विश्वसनीय आणि खात्रीशीर साधन मानले जाते. सन १२०० मध्ये काल्हणाने राजतरंगिणी'मध्ये नाण्यांचा ऐतिहासिक पुरावा म्हणून सर्वप्रथम वापर केला. भारतात नाणकशास्त्राचा (Numismatics) पाया एशियाटिक सोसायटी'ने घातला, तर अलेक्झांडर कनिंगहॅम, रॅपसन आणि डॉ. ए. एस. आळतेकर यांसारख्या संशोधकांनी या शास्त्रात मोलाची भर घातली. प्राचीन भारताच्या इतिहासात इंडो-ग्रीक, शक आणि कुषाण यांसारख्या अनेक राजवंशांची ओळख केवळ त्यांच्या नाण्यांमुळेच पटली आहे. नाण्यांवर कोरलेली राजांची नावे, बिरुदे, वंशावळ आणि काळ यामुळे इतिहासाची सुसंगत मांडणी करणे शक्य झाले. मध्ययुगीन काळात दिल्ली सुलतानांनी सोन्या-चांदीचे टंका आणि तांब्याचे जितल चलनात आणले. अल्तमशच्या नाण्यांवरून त्याचे खलिफाशी असलेले संबंध स्पष्ट होतात, तर अल्लाउद्दीन खिलजीच्या नाण्यांतून त्याच्या दक्षिण दिग्विजयाची आणि प्रचंड लुटीची माहिती मिळते. मोहम्मद बीन तुघलकाने केलेले चलनातील प्रयोगही नाण्यांच्या माध्यमातून अभ्यासता येतात.

मुघल काळात नाणकशास्त्र अधिक कलात्मक बनले. शेरशहा सुरीने सुरू केलेला रुपया' ही आधुनिक भारताला लाभलेली मोठी देणगी आहे. अकबराच्या नाण्यांवर 'राम-सीता' आणि बदकाची चित्रे आढळतात, तर जहांगीरच्या काही नाण्यांवर राशीचक्र आणि त्याची पत्नी नूरजहाँ हिचे नाव कोरलेले दिसते. औरंगजेबाने मात्र नाण्यांवर कलमा' कोरण्याची धार्मिक प्रथा बंद केली. विजयनगर साम्राज्यातील 'सोन्याची वराह' नाणी त्या काळातील आर्थिक भरभराटीची साक्ष देतात. नाण्यांवरील देवदेवतांच्या प्रतिमा आणि लिपीवरून (कानडी व नागरी) तत्कालीन धार्मिक श्रद्धा आणि सांस्कृतिक संक्रमणाचा अभ्यास करता येतो. थोडक्यात, नाणी केवळ विनिमयाचे साधन नसून ती तत्कालीन राजाचा साम्राज्यविस्तार, आर्थिक स्थिती, परकीय व्यापार, धातूकाम आणि सौंदर्यदृष्टी उलगडणारी महत्त्वाची ऐतिहासिक साधने आहेत.

### ८) वस्त्रे व धातू कलावस्तू:

इतिहासाच्या भौतिक साधनांमध्ये तत्कालीन वस्त्रे आणि धातू कलावस्तू समाजजीवनाचा दर्जा आणि कलात्मक प्रगती अधोरेखित करतात. मुघल काळात भारत हा कापडनिर्मितीचा प्रमुख केंद्र होता. ढाका, बनारस, पैठण आणि आग्रा यांसारखी शहरे रेशीम व भरजरी कापडासाठी जगप्रसिद्ध होती. लाहोरचे ओर्मे सिन' आणि बनारसचे 'मिरीरकुल' हे कापड प्रकार उच्चभ्रू वर्गात लोकप्रिय होते. जरी त्या काळातील मूळ वस्त्रे आज उपलब्ध नसली, तरी समकालीन चित्रांवरून त्यातील वैविध्य, वेशभूषेचे प्रकार आणि व्यक्तीचा सामाजिक दर्जा यांचे स्पष्ट आकलन होते.

धातूकामाच्या क्षेत्रात मुघल सम्राट अकबर, जहांगीर आणि शाहजहान यांच्या काळात मोठी प्रगती

झाली. मुघल दरबारात केवळ स्त्रियांनाच नव्हे, तर पुरुषांनाही दागिन्यांची विशेष आवड होती. शिरोपेच, बाजूबंद, मोत्यांचे हार आणि रत्नांनी जडवलेले अलंकार हे अमीर-उमरावांच्या विलासी जीवनाचे प्रतीक होते. विशेषतः 'हरितमणी' (Jade) सारख्या मौल्यवान दगडांवर कोरीव काम करून, त्यात सोने आणि हिरे जडवून मद्यपात्रे, हुक्कापात्र आणि झुंबरे तयार केली जात. जहांगीरकालीन मद्यपात्रांवरील गुलाबाच्या फुलांचे आणि पिंपळपानांचे नक्षीकाम त्या काळातील प्रगत सौंदर्याभिरुचीची साक्ष देते.

शस्त्रास्त्रांच्या मुठींवर हत्ती, वाघ किंवा घोड्यांच्या शिर्षाची कलाकृती कोरण्याची पद्धत या काळात विकसित झाली. याशिवाय, 'मीनाकारी' आणि 'बीदरीकाम' या तंत्रांनी धातू कलेला एका नव्या उंचीवर नेले. हैदराबादजवळील बीदर येथे विकसित झालेल्या बीदरीकामातून सुरया, अत्तरदाण्या आणि दागिन्यांच्या पेट्यांवर अत्यंत मोहक नक्षीकाम केले जाई. एकाच वस्तूवर अनेक कारागीर मिळून काम करत, ज्यामुळे या वस्तू जागतिक दर्जाच्या कलाकृती ठरल्या. आजही दिल्ली आणि हैदराबाद येथील वस्तुसंग्रहालयात जतन केलेले हे अवशेष तत्कालीन समृद्ध सांस्कृतिक इतिहासाची माहिती देतात.

**९) बाग-बगीचे व कालवे:**

मुघल कालखंडात अनेक बाग-बगीचे तयार करण्यात आले. यावर पर्शियन बागांचा प्रभाव जाणवतो, याला चारबाग पद्धती म्हणतात. मुघल बादशहानी दिल्ली, आग्रा आणि इतर ठिकाणी फळा-फुलांच्या बागा लावल्या. जहांगीरने बादशहाने काश्मीरमध्ये 'शालिमार उद्यान', 'निशांत बाग' निर्माण केली. दिल्ली मधील 'हुमायूँ का मकबरा बाग', आग्रा मधील ताजमहाल बाग, आर्म बाग, मेहेताब बाग, रामबाग, जहराबाग, पिंजोर मधील यादवेन्द्र बाग, इलाहाबाद मधील खुसरो बाग इत्यादींचा उल्लेख करता येईल. शहाजहान द्वारा निर्मित अंगुरीबाग' प्रसिद्ध आहे. मुघल बादशहांच्या बरोबर राजस्थानमधील राजपूत राजांनी जोधपूर, उदयपूर, बिकानेर आणि जयपूर इत्यादी ठिकाणी अनेक बाग- बगीचे तयार केले. या काळात कालवे व बंधारे बांधून शेतीला व जनतेला पाणीपुरवठ्याची सोय केली जाई. पंजाब, सिंध, लाहोर, गोवळकोंडा इत्यादी ठिकाणी तलाव बांधून शेतीला पाणीपुरवठ्याची सुविधा पुरवण्यात आल्याचे उल्लेख मिळतात. मेवाड मधील धेवर' सरोवर प्रसिद्ध होते. शहाजहान व जहांगीरच्या कालखंडात तलाव निर्मितीवर भर देण्यात आला. शहाजहानने रावी नदीपासून लाहोरपर्यंत ९८ मैल लांबींचा कालवा काढला. शहाजहानने 'नहर- ए-साहिब' हा फिरोज तघुलकाचा कालवा दुरुस्त करून त्याची लांबी पुढे ६० मैल वाढविली. त्याचे नूतनीकरण करून 'नहर-ए-शाह' असे त्याचे नामकरण केले होते. सन १६१५ मध्ये बरहानपूर येथे तब्कुतुल अर्ज याने बांधलेला कालवा प्रसिद्ध आहे. मुघल काळातील बाग-बगीचे, धरणे व कालवे काही उत्तम स्थितीत तर काही अवशेषरूपाने पहावयास मिळतात. तत्कालीन मुघल कालखंडाच्या इतिहासलेखनासाठी ही सर्वांत विश्वसनीय समजली जाते. या वरुन इतिहास संशोधक तत्कालीन बांधकाम कला, स्थापत्य तंत्रज्ञान, पाणी व्यवस्थापन, शेती पद्धती, आवड-निवड, अभिरुचि इत्यादीवर प्रकाश टाकण्यास मदत होते.

**१०) शस्त्रास्त्रे व अवजारे:**

पुरतात्वीय साधनांच्या मध्ये विविध प्रकारची शस्त्रास्त्रे आणि शेतीची अवजारे यांचा समावेश होतो.

भारत आणि परदेशातील विविध वस्तुसंग्रहालयांच्यामध्ये शस्त्रास्त्रे आणि अवजारे पाहावयास मिळतात. तत्कालीन युद्धशास्त्राचा आणि शेतीचा अभ्यास करण्यासाठी ही साधने महत्वाची आहेत. बाबराने पानिपतच्या युद्धात पहिल्यांचा तोफाचा वापर केला, बंदुकांचा वापर सुरू झाला. पारंपरिक युद्ध शास्त्रात खूप मोठ बद्दल घडून आला. किल्ला स्थापत्य शास्त्रात झालेला बदल आणि शास्त्रास्त्रे याचा या वस्तु अवषेशावरून अभ्यास केला जावू शकतो, त एक महत्वाचे साधन आहे. मुघल काळातील ढाल, तलवार, भाला, धनुष्यबाण, कट्यार, खंजीर, दांडपट्टा, सुरा-बरचा, वाघनखे, बंदुका, तोफा, जिरेटोप, चिलखत, शिंगाडा इत्यादीसारखी अनेक शस्त्रास्त्रे पहावयास मिळतात. या शस्त्रास्त्राच्याद्वारे तत्कालीन लढाईमध्ये कोणकोणती शस्त्रे वापरली असून त्या लढाईचे तंत्र कसे होते यावरही प्रकाश टाकता येतो. मुघलकालीन शेतीशी संबंधित विविध आवजारांच्यावरून शेती पद्धतीचा अभ्यास केला जावू शकतो.

**११) गुहाचित्रे (चित्रकला):**

मानवी भावनांच्या अभिव्यक्तीचे एक साधन म्हणून आपल्या मनातील भाव-भावनांचे सुंदर चित्रण दगड धातू, गुहा व लाकडावर कोरीव अथवा रंगाच्या माध्यमातून चित्रे रेखाटलेली दिसतात. आदिमानवाला भाषा येण्यापूर्वी तोंडातील स्वरांनी केवळ विकारच दर्शविता येत असावेत. मानवी बुध्दीच्या विकासाबरोबर त्याला विचाराचीही अभिव्यक्ती करण्याची गरज वाटली असावी. शब्दशुन्य विचार आकाराने व्यक्त करता येतो. जेथे शब्द नसतो किंवा शब्दच संपतो तेथे कलेचा प्रारंभ होतो. भाषेचा विकास होण्यापूर्वी स्वाभाविकपणे मानव कलेकडे वळला. मानवी संस्कृतीच्या इतिहासावर प्रकाश टाकण्यासाठी गुहाचित्रे अथवा चित्रकला हे प्रमुख साधन आहे.

अश्मयुगीन मानव ज्यावेळी डोंगराच्या टेकडाच्या आश्रयाने राहत होता. त्या ठिकाणी त्याच्या प्रतिमेचे आणखी एक स्फूरण दिसले ते म्हणजे डोंगराच्या गुहामधून रंगविलेली किंवा कोरलेली गुहाचित्रे मध्यप्रदेश, कर्नाटक व आंध प्रदेशातील प्राचीन गुहामध्ये अतिप्राचीन चित्रकलाकृती रेखाटलेली आहेत. यामध्ये सिधनपूर, आदमगढ, चक्रधरपूर, मिर्झापूर, लघुनिया, भलदारिया, विजयगढ, पंचपदी, भीमदेखा इत्यादी ठिकाणी आहेत. मौर्य काळात हिनयान पंथीय चित्रकलेचा विकास झालेला दिसतो. अजंठा, पितळखोरे, भाजे, कार्ले इत्यादी शैलगृहातील चित्रकलाकृतीचा यामध्ये समावेश होतो. गुप्तकाळात महायान पंथीय चित्रकलाकृतीचा विकास झालेला दिसतो. अंजिठा व बाघा लेण्यामधील महायान पंथीय चित्रकाम विशेष प्रसिध्द आहे. या चित्रकलेच्या माध्यमातून विविध प्रकारची पाने, फुले, पक्षी, प्राणी, मानवी हावभाव, आचार-विचार, वेशभूषा व केशरचना इत्यादी बरोबर विविध रूपकात्मक कथाच्यावर प्रकाश पडतो. गुहाचित्रापासुन सुरु झालेला चित्रकलेचा विकास आजतागायत पहावयास मिळतो. यामध्ये विविध प्रवाह दिसतात. या मध्ये जैनकला, राजपूत कला, कांग्रा चित्रशैली, गढवाल कला, मुघल शैली व मराठा शैली इत्यादी समावेश होतो.

**१२) नकाशे:**

इतिहासलेखनासाठी व ऐतिहासिक घटना विशद करण्यासाठी नकाशांचा उपयोग होतो. ए. ए. मिलर यांन 'The Dissection Analysis of Maps' या ग्रंथात नकाशाचे महत्व विशद करताना म्हणतात की,

‘I refer to the map as a tool in reality it is a whole bag of tools, containing more ingenious devices than boy scouts knife and if property Used it will open almost any geographic problem’ वरील विधानावरुन नकाशाचे महत्व लक्षात येते. रोमन संस्कृतीच्या काळात नकाशे तयार करण्याच तंत्रात प्रगती झाली. टॉलेमीने लिहिलेल्या ‘जिऑग्राफिया’ या ग्रंथात विविध नकाशे पहावयास मिळतात. भारताचा पहिला नकाशा टॉलमीने रेखाटला, त्यानंतर सर थॉमस रो यांने मुघल साम्राज्याचा नक काढला. भारताचा पहिला अधिकृत नकाशा सन १७५२ मध्ये डी-ॲनव्हील यांने काढला. ब्रिटिश काळात ‘सर्वे ऑफ इंडिया’ या विभागाची स्थापना झाली. त्यांच्या मार्फत अधिकृत नकाशा तयार केले जाऊ लागले. कार्टोग्राफी (Cartography) या विषयामध्ये नकाशा शाखाचा अभ्यास केला जातो.

विविध काळात तयार झालेल्या नकाशावरून तत्कालीन भौगोलिक माहितीचे आकलन होण्यास मदत होते. ऐतिहासिक घटनांचा अन्वयार्थ लावत असताना भौगोलिक घटक खूप महत्वाचे असतात. एका अर्थानि विविध भौगोलिक घटकांचा इतिहासावर प्रभाव पडलेला दिसतो. कारण ज्या भागात जे भौगोलिक वातावरण असते. त्या वातावरणानुसार तेथील आर्थिक, सामाजिक, धार्मिक, व राजकीय जडणघडण होत असते. एखाद्या संस्कृतिया किंवा साम्राज्याचा उदय किंवा अस्त हा तेथील भौगोलिक परिस्थितीमुळे झालेला दिसतो. त्यामुळे नकाशे तेथील भौगोलिक परिस्थिती विशद करण्यासाठी सहाय्यभूत ठरतात.

**ब) दुय्यम साधने:**

इतिहासलेखनाची प्रक्रिया शास्त्रशुद्ध करण्यासाठी साधनांचे ‘प्राथमिक’ आणि ‘दुय्यम’ अशा दोन गटांत वर्गीकरण केले जाते. दुय्यम साधन म्हणजे अशी माहिती, जिचा लेखक त्या घटनेचा प्रत्यक्ष साक्षीदार नसतो. ऐतिहासिक घटना घडून गेल्यानंतर, स्मृतीच्या आधारे किंवा ऐकीव माहितीवरून केलेले हे लेखन असते. यात लेखकाचे वैयक्तिक मत, विशिष्ट विचारसरणी किंवा मूळ साधनांचा लावलेला सोयीस्कर अर्थ यामुळे सत्यासत्यतेबाबत काही मर्यादा असू शकतात. म्हणूनच, प्राथमिक साधनांच्या तुलनेत ही साधने दुय्यम’ मानली जातात. असे असले तरी, इतिहासलेखनात दुय्यम साधनांचे महत्त्व नाकारता येत नाही. संशोधकाला विषयाची प्राथमिक चौकट तयार करण्यासाठी आणि संदर्भग्रंथांची सूची मिळवण्यासाठी ही साधने अत्यंत उपयुक्त ठरतात. एखाद्या विषयाची नव्याने कारणमीमांसा करताना किंवा प्राथमिक साधनांमधील उणिवा भरून काढण्यासाठी दुय्यम ग्रंथांमधील समर्पक पुरावे संशोधनाला नवी दिशा देतात.

प्रा. एडवर्ड कार यांच्या मते, घटिते स्वतः बोलत नाहीत, तर त्यांना बोलते करणारा इतिहासकार असतो. यामुळेच सर जदुनाथ सरकार किंवा इरफान हबीब यांसारख्या प्रज्ञावंत संशोधकांनी अस्सल साधनांवर आधारित लिहिलेले ग्रंथही तांत्रिकदृष्ट्या दुय्यम साधनेच मानली जातात. साधनांचा वापर किती आणि कसा करायचा, हे शेवटी संशोधकाच्या कौशल्यावर अवलंबून असते.

**१) बखरी:**

मराठी इतिहासलेखन परंपरेत बखर हा एक अत्यंत महत्त्वपूर्ण गद्य वाङ्मय प्रकार आहे. बखर म्हणजे ऐतिहासिक वृत्तांत, ज्यामध्ये पराक्रमी पुरुषांचा गौरव, ऐतिहासिक घटनांची हकीकत, कैफियत आणि

आत्मवृत्तांचा समावेश होतो. घटना घडून गेल्यानंतर अनेक वर्षांनी स्मृती किंवा ऐकीव माहितीच्या आधारे लिहिल्या गेल्यामुळे, बखरींना प्रामुख्याने दुय्यम संदर्भ साधन मानले जाते. इतिहासकार वि. का. राजवाडे यांनी बखरींचे तीन मुख्य प्रकारांत वर्गीकरण केले आहे: १) समकालीन बखरी: घटनेच्या जवळच्या काळात लिहिल्या गेलेल्या या बखरी अधिक विश्वसनीय असतात (उदा. सभासद बखर, ९१ कलमी बखर). २) ऐकीव माहितीवर आधारित बखरी: या केवळ सांगीवांगीच्या माहितीवर आधारलेल्या असतात (उदा. पेशव्यांची बखर). ३) जुन्या टिपणांच्या आधारे लिहिलेल्या बखरी: जुन्या नोंदींचे संकलन करून या तयार केल्या जातात (उदा. चिटणीस बखर, शिवदिग्विजय).

कालखंडानुसारही बखरींचे शिवपूर्वकालीन, शिवकालीन आणि पेशवेकालीन असे वर्गीकरण केले जाते. जरी बखरींमध्ये काही प्रमाणात अतिशयोक्ती किंवा अख्यायिकांचा समावेश असला, तरी तत्कालीन भाषा, सामाजिक स्थिती आणि लोकमनाचा अभ्यास करण्यासाठी त्या अनिवार्य ठरतात. एखाद्या घटनेची अस्सल कागदपत्रे उपलब्ध नसताना बखरींचा आधार मोलाचा ठरतो; मात्र त्यांचा वापर करताना संशोधकाने चिकित्सक दृष्टी ठेवणे आवश्यक असते.

**२) कुळकटी:**

कुळकटी म्हणजे कुलांचा किंवा घराण्यांचा इतिहास होय. मध्ययुगीन कालखंडात कुळांचा इतिहास लिहिण्याची प्रथा होती. अनेक कुळांचा इतिहास त्या काळात लिहिला गेलेला आहे. या कुळकटीचा उपयोग इतिहास लेखनासाठी होतो. कुळकटीच्या माध्यमातून कुळाचा विस्तार कसा झाला. नाते संबंध कोणाशी आले, त्या कुळाची घसरण कोणत्या कारणामुळे झाली इत्यादी माहिती यामधून प्राप्त होते कुळकटीच्या माध्यामातून तत्कालीन सामाजिक व धार्मिक विषयावर देखील प्रकाश टाकण्यास मदत होते. म्हणून बखरीपेक्षा कुळकटी अधिक प्रमाणात ग्राह्य मानली जाते. आठवले, गोखले, घोरपडे, पटवर्धन, गुणे, हिंगणे, पेठे, चंद्रचूड, रास्ते व पुरंदरे इत्यादी घराण्याच्या कुळकटी प्रकाशित झालेल्या आहेत. कुळकटी इतिहास प्रसिध्द घराण्यांपुरत्याच मर्यादीत आहेत. त्यामुळे सर्वसामान्य घराण्यावरं यातून काहीही प्रकाश पडत नाही.

**३) बाडे:**

एखाद्या कुटूंबाशी हस्तलिखित स्वरुपात लिहून ठेवलेली माहिती म्हणजे बाड होय. मध्यकाळात छापण्याची कला अस्तित्वात नसल्याने महत्वाच्या कागदपत्रांच्या नक्कला करुन त्या सांभाळून ठेवल्या जात. अशा कागदपत्रांना बाड अथवा बाडे असे म्हणतात. बाडाच्या माध्यमातून देवादिक, राजे, बादशाहा यांच्या कारर्कीदीची कालगणती, निवडक ऐतिहासिक प्रसंग तिथी, शके संबंधी माहिती मिळते. दुय्यम स्वरुपातील या साधनाचा वापर करुन ऐतिहासिक घराण्यावर, त्या घराण्यातील पराक्रमी व्यक्तीच्या चरित्रावर व समकालीन सत्ताधिशांच्यावर प्रकाश टाकण्यास मदत होते.

**४) वंशवेल. वंशावळी:**

कुळकटीप्रमाणेच ऐतिहासिक घराण्यांचा वंशवृक्ष तयार करण्यांची प्रथा मध्ययुगीन काळात अस्तित्वात

होती. एखादया वृक्षाचे वंशवेलीचा क्रम डावीकडून उजवीकडे लिहिण्याचा असतो. परंतु शिवकालीन बऱ्याच वंशवेली उजवीकडून डावीकडे लिहिलेल्या आढळतात. मोठमोठ्या नामांकित घराण्यांच्या वंशावळीना अगदी ब्रह्मापासून सुरुवात केलेल्या आढळतात. यामधील पहिला क्रम हा पुराणावरुन घेतलेला असतो. वंशवेलीतून प्रत्येक व्यक्तीची किंवा त्यातील मुख्य व कतृत्वान व्यक्तीचा जन्म किंवा मृत्यूच्या तारखा देण्यात येत असत. अनेक उदाहरणामध्ये वंशावळी अपूर्ण असलेल्या दिसतात. वंशवेलीचा अभ्यास करुन एखादया घराण्याचा विस्तार कुठपर्यंत झालेला होता किंवा त्या घराण्यातील व्यक्ती कोणत्या व्यक्तीस अथवा राजास समकालीन होती. यावर प्रकाश टाकता येतो. वंशवेलीवरून समकालीन व्यक्तीचा अभ्यास करून तत्कालीन राजकीय, सामाजिक परिस्थितीवर प्रकाश टाकता येतो. गो. स. सरदेसाई यांनी मुसलमान रियासतीचे दोन खंड व मराठी रियासतीचे ८ खंड यामध्ये खूप मोठ्या संख्येने विविध घराण्यांच्या वंशवेली दिलेल्या आहेत.

**५) न्याय निवाड्याची कागदपत्रे:**

करीने, महजर, तकरीरा व पुरशिसे इत्यादी साधने न्याय मिळविण्याच्या अथवा देण्याच्या उद्देशाने तयार केलेली असतात. यातील मजकूर साधार लिहिण्याची खबरदारी घेतलेली दिसते. यामधील मजकुराची कालमर्यादा ही अनेक वर्षाची अगर अनेक पिढ्याची असू शकते त्यामुळे यातून प्राथमिक किंवा संपूर्ण व एकत्रित माहिती मिळेलच असे मात्र नाही. न्यायनिवाड्या संदर्भात करीने व महजर मधून न्याय व्यवस्थेसंबंधी माहिती मिळते.

**अ) करीने:**

एखाद्या घराण्याच्या मालकीच्या जमीनीबद्दलची किंवा वतनाबद्दल माहिती देणारी कागदपत्रे म्हणजे करीने होय. करीन्यामध्ये जी माहिती दिलेली असेल त्यांच्या खरे-खोटेपणाबद्दल पंचायतीमध्ये कागदपत्रे दाखल करीत. करीना सादर केल्यानंतर कामदार किंवा गोतपंचायत एकत्र बसून चौकशी करीत व नंतर करीन्याचे एक वैशिष्टये म्हणजे आधीच्या पिढीने जसे सादर केलेले असेल त्याची नक्कल करून ती माहिती जशीच्या तशी सादर केली जात असे करीन्यामधून तत्कालीन जमिनी संदर्भात माहिती मिळवण्यास मदत होते. जमिनचे क्षेत्र, वर्गवारी, महसूल आकारणी, जमीन धारणेचा प्रकार इत्यादी संबंधीवर प्रकाश टाकण्यास करीने' महत्वाचे साधन ठरतात.

**ब) महजर:**

महजर म्हणजे न्याय निवाड्याची कागदपत्रे, गोतसभेत न्यायनिवाड्या संदर्भात झालेली चर्चा व गोतसभेच्या अधिकाऱ्यांनी दिलेला निर्णय यासंबंधीची माहिती व त्यासंबधीचे साक्षीदार, अधिकारी यांच्या सह्या व हुद्याची नोंद असलेल्या कागदपत्राची नक्कल महजर मध्ये असते. गोतसभेत चर्चा होऊन त्यांची नोंद महजर मध्ये केली जात व महजरमध्ये नोंद झाली म्हणजे वाद संपला असे म्हणत. एखाद्या न्यायनिवाड्यासंदर्भात जो साक्षी पुरावा सादर केला जात असे. अशा कागदपत्रातून मध्ययुगीन न्यायव्यवस्थेवर, न्यायनिवाड्याची पध्दत, न्याय देणाऱ्याचा हुद्दा व न्यायनिवाड्याचे स्वरूप यावर प्रकाश टाकण्यात मदत होते. गणेश चिमणाजी वाड यांनी न्यायदान विषयक जे निवाडे संपादीत केलेले आहेत.

### ६) शकावल्या:

इतिहासलेखनात शकावली किंवा जंत्री हे साधन कालनिश्चितीसाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. शकावली म्हणजे एखाद्या राजघराण्यातील किंवा महत्त्वाच्या व्यक्तीच्या जीवनातील घटनांची तिथी, वार आणि शके यांनुसार केलेली पद्धतशीर नोंद होय. यामध्ये दैनंदिन खर्चाच्या नोंदींपासून ते राज्यव्यवस्थेच्या मोठ्या निर्णयांपर्यंतचे संदर्भ आढळतात. शकावल्यांचे प्रामुख्याने दोन प्रकारे वर्गीकरण केले जाते: १) विषयानुसार: पौराणिक परंपरेचा प्रभाव असलेल्या आणि राजकीय घडामोडींवर आधारित शकावल्या. २) कालखंडानुसार: शिवकालीन शकावल्या आणि शाहू छत्रपतींच्या काळातील शकावल्या. मराठा इतिहासाच्या अभ्यासात जेधे शकावली' ही सर्वाधिक विश्वसनीय मानली जाते, जिचे इंग्रजी भाषांतर सर जदुनाथ सरकार यांनी केले आहे. याशिवाय शिवापूर दप्तरातील शकावली, गदाधर प्रल्हाद शकावली आणि घोडेगावकर शकावली हे महत्त्वाचे दस्तऐवज उपलब्ध आहेत. जरी काही शकावल्यांची शैली पौराणिक कथांसारखी असली, तरी त्यांमधील तारखा आणि घटनांचे संदर्भ इतर अस्सल साधनांशी पडताळून पाहिल्यास ऐतिहासिक सत्यापर्यंत पोहोचणे सोपे जाते. शकावल्यांमुळे इतिहासातील घटनांचा घटनाक्रम अचूकपणे मांडता येतो.

### ७ ) चरित्र ग्रंथ:

इतिहासलेखनात चरित्र ग्रंथ दुय्यम संदर्भ साधन म्हणून वापरले जातात. चरित्रग्रंथ एखादी व्यक्ती जीवंत असताना किंवा त्यांच्या मृत्यू नंतर लगेच लिहिलेले असतात. चरित्रग्रंथ आत्मचरित्रापेक्षा वेगळे असतात. आत्मचरित्र ही स्वत: लिहिलेले असतात व चरित्रग्रंथ हे दुसऱ्या व्यक्तीनी लिहिलेले असतात. प्राचीन कालखंडात चरित्र लेखनांची परंपरा आपल्याकडे फारसी प्रचलित नव्हती. विशाखा दत्ताने रचलेले 'बुध्दचरित्र' बाणभट्टाचे 'हर्षचरित्र' पहावयास मिळतात. मध्यपूर्व व मध्ययुगीन कालखंडात अरबी, तुर्की, फार्शी भाषेत चरित्र ग्रंथ लिहिले गेले. उदा. तारीखे रशीदी, हुमायुनामा, अकबरनामा, शहाजानांमा, परमानंदाचे शिवभारत, मराठा काळात लिहिलेल्या अनेक प्रकारच्या बखरी हे एक प्रकारचे चरित्रग्रंथच आहेत. आधूनिक काळात अनेक व्यक्तीवर हाजारो चरित्र ग्रंथ समकालीनानी लिहिले आहेत.

### क) आधुनिक साधने:

२१ व्या शतकात विज्ञान आणि तंत्रज्ञानाने घेतलेल्या भरारीमुळे इतिहास लेखनाच्या साधनांचे स्वरूप पूर्णतः बदलले आहे. पारंपारिक लिखित आणि अलिखित साधनांच्या पलीकडे जाऊन आता इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमे ही इतिहासाची अत्यंत महत्त्वाची आणि विश्वासार्ह साधने बनली आहेत. या साधनांमुळे घटना केवळ वाचता किंवा ऐकता येत नाहीत, तर त्या प्रत्यक्ष पाहताही येतात. आधुनिक साधनांमध्ये प्रामुख्याने श्राव्य, दृक आणि दृकश्राव्य अशा तीन प्रकारच्या माध्यमांचा समावेश होतो.

### १) आकाशवाणी:

आकाशवाणी हे एक प्रभावी श्राव्य माध्यम आहे. भारतात २३ जुलै १९२७ रोजी आकाशवाणीची अधिकृत सुरुवात झाली. तेव्हापासून आजपर्यंतच्या सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक बदलांचे

आकाशवाणी हे एक जिवंत संग्रहण आहे. आकाशवाणीवरून प्रसारित होणारी बातमीपत्रे, परिसंवाद आणि माहितीपर कार्यक्रम तत्कालीन समाजमनाचे प्रतिबिंब उमटवतात. आकाशवाणीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे ध्वनिमुद्रण. आपल्याकडे महात्मा गांधी, पंडित नेहरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सुभाषचंद्र बोस आणि वल्लभभाई पटेल यांसारख्या महापुरुषांच्या मूळ आवाजातील भाषणे जतन केलेली आहेत. उदा. १५ ऑगस्ट १९४७ रोजी पंडित नेहरूंनी दिलेले 'ट्रीस्ट विथ डेस्टिनी' हे भाषण आजही आपल्याला त्या ऐतिहासिक क्षणाचा अनुभव देते. केवळ राजकीय नेतेच नव्हे, तर नामवंत गायक, वादक आणि शास्त्रज्ञ यांच्या मुलाखतीही आकाशवाणीच्या अर्काइव्हजमध्ये सुरक्षित आहेत. एखादा इतिहास संशोधक जेव्हा १९ व्या किंवा २० व्या शतकातील जनमताचा अभ्यास करतो, तेव्हा त्या काळातील रेडिओ नाटके, गाणी आणि सरकारी घोषणा यांतून त्याला मोलाची माहिती मिळते.

### २) दूरचित्रवाणी:

दूरचित्रवाणी हे दृकश्राव्य माध्यम आहे. या माध्यमामुळे इतिहासाचा अभ्यास केवळ कल्पनांवर आधारित न राहता तो प्रत्यक्षदर्शी' झाला आहे. १९ व्या शतकापर्यंत इतिहासासाठी आपल्याला केवळ वर्णनावर अवलंबून राहावे लागत असे, परंतु दूरचित्रवाणीमुळे आपण ऐतिहासिक घटना घडताना पाहू शकतो. समकालीन सामाजिक, धार्मिक आणि राजकीय घडामोडींचे थेट प्रक्षेपण हे या साधनाचे बलस्थान आहे. उदाहरणादाखल, भारतीय संसदेतील कामकाज, निवडणुकांचे निकाल, नैसर्गिक आपत्ती किंवा अंतराळ मोहिमा (जसे की चांद्रयान मोहीम) यांचे चित्रीकरण हे भविष्यात प्राथमिक साधन म्हणून वापरले जाईल. दूरचित्रवाणीवरील विविध वाहिन्यांद्वारे (उदा. डिस्कव्हरी, नॅशनल जिओग्राफिक, दूरदर्शन) प्रसारित होणारी ऐतिहासिक नाटके आणि चित्रपट तत्कालीन लोकजीवनाची मांडणी करतात. जरी यांत काही अंशी रंजकता असली, तरी वेशभूषा, भाषा आणि वास्तुकला समजून घेण्यासाठी ही साधने उपयुक्त ठरतात. उदा. रामायण किंवा महाभारत यांसारख्या मालिकांनी तत्कालीन समाजमनावर केलेला परिणाम हा देखील समाजशास्त्रीय इतिहासाचा भाग बनतो. विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांच्या मुलाखतींमधून एखाद्या धोरणामागची भूमिका स्पष्ट होते, जी लिखित दस्तऐवजात सापडणे कठीण असते.

### ३) लघुपट आणि वृत्तपट:

भारत सरकारने १९६० मध्ये पुणे येथे 'फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया' (FTII) ची स्थापना केली. या संस्थेचा आणि फिल्म्स डिव्हिजनचा आधुनिक इतिहास लेखनात मोठा वाटा आहे. या विभागाने राजकारण, समाजकारण, कला, क्रीडा आणि संस्कृती या विषयांवर हजारो वृत्तपट आणि अनुबोधपट तयार केले आहेत. ज्या महापुरुषांचे कार्य देशासाठी मोलाचे ठरले, त्यांच्या जीवनावर आधारित अनुबोधपट हे इतिहासाचे अस्सल साधन आहेत. उदा. महात्मा गांधी, बाबासाहेब आंबेडकर किंवा डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनावरील माहितीपट. हे लघुपट तयार करताना दिग्दर्शक आणि संशोधक मूळ छायाचित्रे, समकालीन चित्रीकरण आणि संदर्भांची मदत घेतात. यामुळे त्या काळातील वेशभूषा, बोलण्याची ढब आणि लोकांच्या समस्या यांचे जिवंत दर्शन घडते. लघुपटांची ताकद ही आहे की ते कमी वेळेत जास्तीत जास्त अचूक माहिती प्रेक्षकांपर्यंत पोहोचवतात. स्थानिक प्रश्नांपासून ते

जागतिक युद्धांपर्यंतचे विषय यात हाताळले जातात. एखादा संशोधक जेव्हा १९७१ च्या युद्धाचा अभ्यास करतो, तेव्हा त्या काळातील फिल्म्स डिव्हिजनचे वृत्तपट त्याला रणांगणावरील प्रत्यक्ष परिस्थितीची जाणीव करून देतात. त्यामुळे लघुपट हे केवळ मनोरंजनाचे साधन न राहता इतिहासाचे एक सशक्त आणि जिवंत दस्तऐवज ठरले आहेत.

**४) महाजाल** (Internet)**:**

इंटरनेट हे आधुनिक काळातील माहितीचे महासागर आहे. जगभरातील संगणकीय जाळ्यांचे हे एक प्रचंड नेटवर्क असून, याने माहिती मिळवण्याच्या प्रक्रियेत क्रांती घडवून आणली आहे. आज एखादा इतिहास संशोधक जगात कुठेही बसून 'डिजिटल लायब्ररी'च्या माध्यमातून मूळ दस्तऐवज पाहू शकतो. पूर्वी संशोधकाला कागदपत्रे पाहण्यासाठी प्रत्यक्ष पुराभिलेखालयात जावे लागत असे. आता इंटरनेटमुळे हस्तलिखिते, जुनी वृत्तपत्रे आणि सरकारी गॅझेट्स पीडीएफ स्वरूपात उपलब्ध आहेत. विकिपीडिया, विविध विद्यापीठांची वेबसाईट्स आणि सरकारी पोर्टल्स माहितीचे मोठे स्रोत आहेत.

**५) वेब जर्नलिझम आणि वेब जर्नल्स:**

इंटरनेटच्या माध्यमातून केली जाणारी पत्रकारिता म्हणजेच वेब जर्नलिझम'. यामध्ये दररोज घडणाऱ्या घटनांचे तात्काळ आणि सविस्तर वार्तांकन केले जाते. वेब जर्नल्स'मध्ये विविध संशोधक आपले शोधनिबंध प्रसिद्ध करतात. सोशल मीडिया (Twitter/X, Facebook) वरील अधिकृत खात्यांवरून केलेल्या घोषणा किंवा पोस्ट्स या देखील आता डिजिटल हिस्ट्री'चा भाग मानल्या जात आहेत. इंटरनेटवर उपलब्ध असलेली ही अफाट माहिती जरी तपासून घ्यावी लागत असली, तरी आधुनिक इतिहासाचे ते सर्वात वेगवान आणि सुलभ साधन आहे.

**स्वय अध्ययन प्रश्न क्र. १**

१) कार्ल गुस्तावसन यांच्या 'The Preface to History' या ग्रंथाप्रमाणे प्राथमिक साधने कशाला म्हणतात?

अ) दुसऱ्या व्यक्तीकडून ऐकून लिहिलेली माहिती.

ब) इतिहासकाराने स्वतःच्या कल्पनेने लिहिलेली माहिती.

क) जी साधने मूळ स्वरूपात एकाच ठिकाणी सापडतात आणि पूर्णतः समकालीन असतात.

ड) घटनेनंतर अनेक वर्षांनी लिहिलेले वृत्तांत.

२) डॉ. शांता कोठेकर यांनी प्राथमिक साधनांच्या वैशिष्ट्यांमध्ये कशाचा समावेश केला आहे?

अ) इतर देशातील इतिहासकारांची मते.

ब) केवळ तोंडी कथा आणि दंतकथा.

क) समकालीनता, प्रत्यक्ष सहभाग आणि वस्तुरूप साधने.

ड) केवळ लिखित कागदपत्रे.

३) पुरातत्व विद्येत कशाला 'पुरातत्व विद्येची मुळाक्षरे' असे म्हटले जाते?

अ) ताम्रपट ब) नाणी

क) मातीची खापरे ड) शिलालेख

४) भारतात नाणकशास्त्राचा पाया खालीलपैकी कोणी घातला?

अ) युआॅन च्वांग ब) मुघल दरबार

क) एशियाटिक सोसायटी ड) जेम्स प्रिन्सेस

५) इतिहासातील अविनाशी आणि शाश्वत पुरावा म्हणून कोणत्या साधनाचा उल्लेख केला जातो?

अ) वृत्तपत्रे ब) रोजनिशी

क) प्रवास वर्णने ड) शिलालेख आणि स्तंभालेख

६) बखर हा वाङ्मय प्रकार प्रामुख्याने कोणत्या इतिहासलेखन परंपरेत आढळतो?

अ) मुघल इतिहास ब) मराठी इतिहास

क) ब्रिटिश इतिहास ड) पोर्तुगीज इतिहास

७) ऐतिहासिक घराण्यांचा वंशवृक्ष दर्शवणाऱ्या साधनास काय म्हणतात?

अ) शकावली ब) महजर

क) वंशवेल किंवा वंशावळी ड) चरित्र ग्रंथ

८) जेधे शकावली हे साधन प्रामुख्याने कशासाठी महत्त्वाचे मानले जाते?

अ) चित्रकलेसाठी

ब) कालनिश्चितीसाठी

क) पोवाडे गाण्यासाठी

ड) परकीय व्यापारासाठी

९) भारतामध्ये आकाशवाणीची अधिकृत सुरुवात कोणत्या वर्षी झाली?

अ) १९४७ ब) १९३०

क) १९२७ ड) १९६०

१०) फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया' ची स्थापना कोठे करण्यात आली?

अ) मुंबई ब) दिल्ली

क) पुणे ड) नागपूर

**१.२ साधनांची चिकित्सा:**

संशोधनासाठी साधनांचे संकलन करणे हा जितका महत्त्वाचा टप्पा आहे, त्याहीपेक्षा महत्त्वाचा टप्पा म्हणजे गोळा केलेल्या साधनांचे परीक्षण करणे होय. इतिहास म्हणजे केवळ जुन्या गोष्टींची जंत्री नसून ती सत्यावर आधारित मांडणी असते. अनेकदा ऐतिहासिक कागदपत्रांमध्ये जाणीवपूर्वक फेरफार केले जातात किंवा लेखकाच्या पूर्वग्रहामुळे माहिती चुकीची असू शकते. त्यामुळे, हाती आलेले साधन अस्सल आहे की बनावट, हे ठरवण्यासाठी साधनांचे परीक्षण करणे अनिवार्य असते. ही प्रक्रिया वैज्ञानिक असून ती बहिरंग आणि अंतरंग अशा दोन स्तरांवर चालते.

**अ) बहिरंग परीक्षण:**

बहिरंग परीक्षण ही ऐतिहासिक कागदपत्रांच्या परीक्षणाचा पहिला व प्राथमिक टप्पा आहे. याला कनिष्ठ परीक्षण असेही म्हणतात. याचा मुख्य उद्देश कागदपत्राची बाह्य सत्यता आणि अस्सलपणा तपासणे हा असतो. या प्रक्रियेत संशोधक कागदाच्या स्वरूपावरून त्याचा काळ, स्थळ आणि लेखक यांची खात्री करून घेतो.

**१) कागदपत्रातील विषयाची सुसंगतता:**

संशोधकाने सर्वप्रथम हे तपासावे की, उपलब्ध झालेले साधन त्याच्या संशोधन विषयाशी संबंधित आहे का? अभ्यासाचा विषय आणि साधनांचा कालखंड यात मेळ असणे आवश्यक असते. समजा एखाद्या संशोधकाचा विषय पेशवेकालीन अर्थव्यवस्था असा आहे आणि त्याला मिळालेली कागदपत्रे जर शिवकालीन लिपीतील किंवा भाषेतील असतील, तर ती प्रथमदर्शनीच त्याच्या संशोधनासाठी अनुपयुक्त ठरतात. विषयाशी संबंधित नसलेली साधने संशोधनाचा ओघ भरकटवू शकतात. त्यामुळे विषयाची व्याप्ती आणि साधनांचा आशय यांची सांगड घालणे हा चिकित्सेचा पहिला निकष आहे.

**२) कागदपत्रांचा अस्सलपणा:**

साधन मूळ स्वरूपातील आहे की ती केवळ एक नक्कल आहे, हे शोधणे म्हणजे अस्सलपणा तपासणे होय. तिहासकाळात एकाच कागदपत्राच्या अनेक प्रती केल्या जात असत. नक्कल करणारा व्यक्ती

मूळ मजकुरात स्वतःच्या ज्ञानानुसार सुधारणा करण्याची किंवा चुकीचा अर्थ लावण्याची शक्यता असते. संशोधकाला जर एखाद्या बखरीच्या दोन प्रती सापडल्या, तर त्यातील अक्षराचे वळण, शाईचा प्रकार आणि कागदाचा पोत यावरून मूळ प्रत कोणती हे ओळखावे लागते. बनावट दस्तऐवज ओळखण्यासाठी कागदपत्रांच्या भौतिक गुणधर्मांची तपासणी करणे आवश्यक असते.

### ३) लेखकाची सत्यता आणि ओळख:

अनेक जुन्या कागदपत्रांचा सुरुवातीचा किंवा शेवटचा भाग नष्ट झालेला असतो, ज्यामुळे लेखकाचे नाव समजत नाही. काहीवेळा लेखकाने आपले नाव गुप्त ठेवलेले असते. आपल्या लेखनाला प्रतिष्ठा मिळावी म्हणून अनेकदा दुय्यम लेखक एखाद्या प्रसिद्ध व्यक्तीच्या नावाचा वापर करून खोटा मजकूर लिहितात. अशा वेळी संशोधकाला त्या लेखकाची लेखनशैली, त्याने वापरलेले विशिष्ट शब्द आणि त्याचा दृष्टिकोन अभ्यासावा लागतो. लेखक त्या घटनेचा समकालीन होता का, की त्याने खूप नंतरच्या काळात हे लिहिले आहे, यावर त्या साधनाची विश्वासार्हता अवलंबून असते. उदा. ज्ञानेश्वरीची मूळ प्रत शोधताना संत एकनाथांनी केलेली शुद्धीकरणाची प्रक्रिया संशोधकाला अभ्यासावी लागते.

### ४) शिक्का आणि नाममुद्रा मारण्याची पद्धत:

प्राचीन आणि मध्ययुगीन काळात शासकीय पत्रांवर ठराविक ठिकाणी आणि ठराविक पद्धतीने शिक्के मारण्याचे नियम होते. प्रत्येक राजवटीची स्वतःची एक अधिकृत मुद्रा असते. पत्राच्या सुरुवातीला किंवा शेवटी शिक्का कोठे मारला आहे, यावरून त्या पत्राची अधिकृतता ठरते. जर एखाद्या पत्रावर शिक्का चुकीच्या ठिकाणी असेल किंवा शिक्क्याची भाषा आणि राजाचा काळ जुळत नसेल, तर ते पत्र बनावट मानले जाते. शिवकालीन पत्रांवरील राजमुद्रा आणि तिची अक्षरे यांच्या अभ्यासावरून अनेक बनावट पत्रे इतिहासकारांनी बाजूला काढली आहेत.

### ५) लेखनकाळाची निश्चिती:

कागदपत्र नेमक्या कोणत्या वर्षी किंवा तारखेला लिहिले गेले, हे शोधणे म्हणजे लेखनकाळाची निश्चिती होय. यासाठी संशोधकाला कालगणनाशास्त्र, लिपिशास्त्र आणि भाषाशास्त्राची मदत घ्यावी लागते. कागदाचा प्रकार आणि त्यातील मजकुराचा संदर्भ यांचा मेळ बसणे आवश्यक असते. समजा, एखाद्या कागदपत्रात अशा घटनेचा उल्लेख आहे जी घटना त्या कागदाच्या तारखेनंतर घडली आहे, तर ते साधन संशयास्पद ठरते. काळाची विसंगती हे बनावट दस्तऐवज ओळखण्याचे सर्वात मोठे साधन आहे.

### ६) स्थळ निश्चिती:

कागदपत्र कोठे लिहिले गेले किंवा त्यातील घटना कोठे घडली, याचे भौगोलिक स्थान निश्चित करणे महत्त्वाचे असते. अनेकदा कागदपत्रात स्थळाचा स्पष्ट उल्लेख नसतो. अशा वेळी त्यातील नद्या, पर्वत, किल्ले किंवा गावे यांच्या उल्लेखावरून भौगोलिक स्थान निश्चित करावे लागते. भाषेतील प्रादेशिक बोलीवरूनही ते साधन कोणत्या प्रदेशातील आहे हे समजू शकते. जर एखादे पत्र कोकणातील भौगोलिक परिस्थितीचे वर्णन

करत असेल, परंतु त्यातील भाषा विदर्भातील असेल, तर संशोधकाला त्याच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करावे लागते.

**७) हस्तलेखाशास्त्र आणि अक्षराचे वळण:**

प्रत्येक कालखंडातील आणि प्रत्येक व्यक्तीच्या लिहिण्याच्या ढबेला अक्षर वळण असे म्हणतात. मोडी लिपी किंवा बालबोध लिपी यांच्या वळणात शतकानुसार बदल होत गेले आहेत. पेशवे दप्तरातील कागदपत्रे तपासताना लिपीतील बारकावे अभ्यासावे लागतात. जर एखादा कागद १८ व्या शतकातील असल्याचा दावा केला जात असेल, पण त्यातील अक्षर वळण २० व्या शतकातील असेल, तर ते साधन बाद ठरते. हस्ताक्षरातील सातत्य आणि शाईचा पसरलेला डाग यावरूनही कागदाचे वय ठरवता येते.

**८) भाषा आणि शब्दरचना:**

भाषेचे स्वरूप हे प्रवाही असते. काळानुसार अनेक शब्द भाषेत येतात किंवा लुप्त होतात. ऐतिहासिक साधनांची चिकित्सा करताना भाषाशास्त्र हे प्रमुख साधन ठरते. शिवकाळात फारसी शब्दांचा प्रभाव जास्त होता, तर पेशवेकाळात तो कमी होऊन संस्कृतप्रचुर मराठीचा वापर वाढला. जर एखाद्या शिवकालीन पत्रात इंग्रजी शब्दांचा किंवा आधुनिक मराठी व्याकरण नियमांचा वापर आढळला, तर ते पत्र बनावट असल्याचे सिद्ध होते. शब्दांच्या अर्थावरूनही संशोधक लेखकाच्या मानसिकतेचा शोध घेतो.

**९) भौतिक साधनांचे रासायनिक परीक्षण:**

आधुनिक काळात साधनांची विश्वासार्हता तपासण्यासाठी विज्ञानाची मदत घेतली जाते. कागदाचा दर्जा, शाईचे रासायनिक घटक आणि ताम्रपटातील धातूचे मिश्रण यांचे लॅबोरेटरीमध्ये परीक्षण केले जाते. 'कार्बन-१४' सारख्या पद्धतीमुळे लाकूड, हाडे किंवा कापड यांचे वय अचूकपणे सांगता येते. जर एखाद्या कागदपत्राचा मजकूर जुना वाटत असेल, पण तो कागद आधुनिक यंत्रावर तयार झालेला असेल, तर विज्ञानाच्या मदतीने हे खोटे साधन सहज पकडले जाते.

**१०) इतर समकालीन पुराव्यांशी तुलना:**

बहिरंग परीक्षणाचा शेवटचा निकष म्हणजे हाती आलेल्या साधनाची तुलना इतर उपलब्ध पुराव्यांशी करणे. एखादी नवीन माहिती देणारा कागद सापडल्यास, इतर समकालीन साधनांमध्ये (उदा. नाणी, शिलालेख किंवा परकीय प्रवाशांच्या नोंदी) तसा उल्लेख आहे का, हे पाहिले जाते. जर नवीन साधन इतर सर्व पुराव्यांच्या विरोधात असेल, तर त्याची कसून तपासणी करावी लागते. पुराव्यांची साखळी जुळवणे हे संशोधकाच्या तर्कावर अवलंबून असते. अशा प्रकारे, बहिरंग परीक्षणाचा माध्यमातून संशोधक पुराव्याचा अस्सलपणा सिद्ध करतो.

**ब) अंतरंग परीक्षण:**

बहिरंग परीक्षणाद्वारे साधनाची अस्सलता सिद्ध झाल्यानंतर, संशोधकाला त्यातील मजकुराच्या विश्वसनीयतेची पडताळणी करावी लागते. या प्रक्रियेला अंतरंग चिकित्सा किंवा उच्च चिकित्सा म्हणतात.

एखादे पत्र किंवा दस्तऐवज अस्सल असूनही त्यातील माहिती खोटी, अतिशयोक्तीपूर्ण किंवा पूर्वग्रहदूषित असू शकते. त्यामुळे लेखकाने नेमके काय म्हटले आहे आणि ते म्हणण्यामागचा त्याचा हेतू काय आहे, याचा शोध घेणे म्हणजे अंतरंग चिकित्सा होय. या चिकित्सेचे दोन मुख्य प्रकार पडतात:

**१) सकारात्मक अंतरंग परीक्षण:**

सकारात्मक परीक्षणाचा मुख्य उद्देश हा कागदपत्रातील मजकुराचा खरा अर्थ आणि लेखकाला नेमके काय सुचवायचे आहे, हे समजावून घेणे हा असतो. ऐतिहासिक साधनांचा अभ्यास करताना संशोधकाला त्या काळातील भाषेचे सखोल ज्ञान असणे आवश्यक असते. अनेकदा शब्दांचा शब्दशः अर्थ (वाच्यार्थ) आणि त्यामागील लपलेला अर्थ (गर्भितार्थ) वेगवेगळा असू शकतो. काळानुसार शब्दांचे अर्थ बदलतात. उदाहरणादाखल, मध्ययुगीन पत्रांतील साहेबांनी मेहरबानी केली या वाक्याचा अर्थ केवळ दया दाखवणे असा नसून, तो राजकीय संरक्षण किंवा अधिकारांशी संबंधित असू शकतो. एखाद्या विशिष्ट प्रदेशात वापरला जाणारा शब्द दुसऱ्या प्रदेशात वेगळ्या अर्थाने वापरला जाऊ शकतो. संशोधकाला लेखकाची शैली, उपरोधिक विधाने आणि त्या काळातील वाक्प्रचार यांचा मेळ घालावा लागतो. सकारात्मक परीक्षणात संशोधक हा दृष्टिकोन ठेवतो की, लेखकाने जे लिहिले आहे त्यातील काही भाग निश्चितपणे सत्यावर आधारित असू शकतो, फक्त तो योग्य संदर्भात शोधणे गरजेचे असते.

**२) नकारात्मक अंतरंग परीक्षण:**

ही प्रक्रिया अधिक कठोर असून, यात लेखकाच्या विश्वसनीयतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाते. लेखकाने खोटे का लिहिले असावे किंवा त्याच्याकडून चुका का झाल्या असाव्या, याची कारणे यात शोधली जातात. याचे मुख्य पैलू खालीलप्रमाणे आहेत:

**१) लेखकाचा प्रामाणिकपणा आणि हेतू:**

लेखक कितीही विद्वान असला तरी तो पूर्णपणे निष्पक्ष असेलच असे नाही. लेखकाच्या मनात विशिष्ट हेतू असू शकतो. काही लेखक स्वतःची किंवा आपल्या पूर्वजांची प्रौढी मिरवण्यासाठी अतिशयोक्तीपूर्ण वर्णन करतात. जर लेखकाने स्वतःच्या पराभवाचे वर्णन धोरणात्मक माघार असे केले असेल, तर त्याचा हेतू सत्य लपवणे हा असतो. संशोधकाने लेखकाच्या मानसिकतेचा अभ्यास करून त्यातील सत्य आणि प्रशंसा यातील रेषा ओळखावी लागते.

**२) लेखकाचा आश्रय:**

इतिहास लेखनामध्ये लेखकाच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा त्याच्यालेखनावर मोठा प्रभाव असतो. ऐतिहासिक कालखंडात बहुतेक लेखक, कवि, इतिहासकार हे राजे, सम्राट किंवा श्रीमंत सरदारांच्या आश्रयाला असत. अशा वेळी लेखकाचे हितसंबंध त्याच्या अन्नदात्याशी जोडलेले असायचे. ज्या राजाच्या आश्रयाने लेखकाचा उदरनिर्वाह चालतो, त्या राजाच्या धोरणांविरुद्ध किंवा वैयक्तिक दोषांवर लिहिण्याचे धैर्य लेखक सहसा दाखवू शकत नाही. परिणामी, राजाश्रयाखाली लिहिलेल्या बखरी, तवारीखा किंवा पोवाड्यांमध्ये संबंधित राजाचे वर्णन अतिशयोक्तीपूर्ण किंवा त्याला देवत्व बहाल करणारे असते. अशा

साधनांचा अभ्यास करताना संशोधकाला लेखकाची व्यक्तिनिष्ठता अत्यंत बारकाईने तपासावी लागते. राजाने युद्धात केलेली चूक किंवा घेतलेला चुकीचा निर्णय लेखक कशा प्रकारे मांडतो की तो सोयीस्करपणे गाळतो, यावरून त्या साधनाची विश्वासार्हता ठरते. म्हणूनच, सत्य शोधण्यासाठी अशा लेखनाचे इतर स्वतंत्र पुराव्यांशी ताडून पाहणे अनिवार्य असते.

### ३) धार्मिक आणि सामाजिक पार्श्वभूमी:

कोणत्याही लेखकाचे विचार हे तो ज्या समाजात वाढला, तिथल्या संस्कारांनी आणि मूल्यांनी प्रभावित असतात. व्यक्तीच्या लेखनावर तिच्या धर्माचा, जातीचा, पंथाचा आणि सामाजिक वर्गाचा अत्यंत खोलवर पगडा असतो, जो इतिहास संशोधनात महत्त्वाचा ठरतो. जर एखादा लेखक विशिष्ट विचारसरणीचा किंवा कर्मठ धार्मिक वृत्तीचा असेल, तर तो दुसऱ्या धर्माबद्दल किंवा संस्कृतीबद्दल अनुदार आणि पूर्वग्रहदूषित मते मांडण्याची शक्यता असते. उदा. मध्ययुगीन काळातील काही तवारीखांमध्ये किंवा भारतात आलेल्या परकीय प्रवाशांच्या प्रवासावर्णनांमध्ये भारतीय संस्कृतीबद्दलची अनेक विधाने अज्ञानातून किंवा स्वतःच्या धर्माच्या श्रेष्ठत्वाच्या भावनेतून आलेली दिसतात. लेखकाचा आर्थिक स्तर आणि त्याची सामाजिक प्रतिष्ठा त्याच्या लेखनाचे प्राधान्यक्रम ठरवत असते. त्यामुळे, अशा साधनांचा अभ्यास करताना संशोधकाला लेखकाच्या सामाजिक चौकटीचा विचार करून त्यातील सत्य आणि पूर्वग्रह वेगळे करावे लागतात.

### ४) लेखकाची पात्रता आणि सत्य सांगण्याची क्षमता:

इतिहास संशोधनात लेखकाची बौद्धिक व तांत्रिक पात्रता तपासणे अत्यंत आवश्यक असते. एखादी माहिती देणारा लेखक त्या घटनेचे किंवा विषयाचे सखोल ज्ञान बाळगतो का, यावरच त्या साधनाची विश्वासार्हता अवलंबून असते. एखाद्या लष्करी मोहिमेचे किंवा युद्धाचे वर्णन जर केवळ दरबारी कवीने केले असेल, तर त्यात प्रत्यक्ष युद्धाऐवजी अलंकारांचा आणि अतिशयोक्तीचा भर जास्त असू शकतो. ज्याने कधी रणांगण अनुभवले नाही, असा लेखक सैन्यव्यूहरचना किंवा भौगोलिक अडचणींबाबत तांत्रिक चुका करण्याची शक्यता असते. याउलट, प्रत्यक्ष रणांगणावरून सेनापतीने किंवा सैनिकाने लिहिलेले पत्र किंवा रोजनिशी अधिक पात्र मानली जाते. लेखकाची विषयातील तज्ज्ञता, त्याची बौद्धिक पातळी आणि प्रसंगाचे आकलन करण्याची क्षमता यावरच ऐतिहासिक माहितीची अचूकता सिद्ध होते. त्यामुळे माहिती स्वीकारण्यापूर्वी संशोधकाला लेखकाच्या पात्रतेचा विचार करावा लागतो.

### ५) घटनेचा साक्षीदार आणि लेखनकाळ:

इतिहास संशोधनामध्ये माहितीचा स्रोत प्रत्यक्ष आहे की ऐकीव, याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. लेखकाची त्या घटनेशी असलेली जवळीक आणि लेखन करण्यापूर्वीचा कालावधी हे विश्वासार्हतेचे मुख्य निकष मानले जातात. लेखक त्या घटनेचा प्रत्यक्षदर्शी आहे की नाही, यावर पुराव्याचा दर्जा ठरतो. दुसऱ्या किंवा तिसऱ्या व्यक्तीकडून ऐकलेल्या माहितीवर आधारित लिखाणात मूळ सत्याचा अपभ्रंश होण्याची शक्यता अधिक असते. याशिवाय, घटना घडल्यापासून ती नोंदवली जाईपर्यंत किती वेळ उलटला

आहे, हे देखील महत्त्वाचे असते. जर लेखन घटना घडल्यानंतर १०-२० वर्षांनी केले गेले असेल, तर मानवी विस्मृतीमुळे तारखा, व्यक्तींची नावे आणि भौगोलिक ठिकाणे यांच्या नोंदींमध्ये गफलत होऊ शकते. याउलट, घटना घडत असताना किंवा घडल्यानंतर तात्काळ केलेली नोंद (उदा. रोजनिशी किंवा युद्धभूमीवरील पत्रे) ही ऐतिहासिकदृष्ट्या सर्वाधिक विश्वसनीय मानली जाते.

**६) लेखकाची अभिरुची आणि पक्षपातीपणा:**

इतिहास लेखनामध्ये लेखकाची वैयक्तिक आवड आणि त्याचे कोणाबद्दल असलेले मत यांचा लिखाणावर खोलवर परिणाम होतो. लेखकाच्या आवडीच्या विषयाचे वर्णन अधिक सविस्तर येते, तर नावडत्या विषयांकडे दुर्लक्ष केले जाण्याची दाट शक्यता असते. लेखकाच्या अभिरुचीनुसार ऐतिहासिक वर्णनाचे स्वरूप बदलते. उदा. जर एखाद्या लेखकाला वास्तुकलेची आवड असेल, तर तो मंदिरांच्या किंवा किल्ल्यांच्या बांधकामाचे हुबेहूब वर्णन करेल, परंतु त्याच वेळी तो प्रशासकीय किंवा आर्थिक नोंदींकडे पूर्णपणे दुर्लक्ष करू शकतो. याउलट, लेखकाचा पक्षपातीपणा हा इतिहासासाठी घातक ठरू शकतो. एखाद्या व्यक्तीबद्दल असलेल्या प्रेमापोटी त्याचे गुणगाण करणे किंवा वैरापोटी त्याच्या चुकांचे अवास्तव वर्णन करणे, यामुळे ऐतिहासिक सत्य झाकले जाते. यालाच सायलन्स ऑफ सोर्सेस' असे म्हणतात. यात लेखक स्वतःला किंवा आपल्या पक्षाला न पटणाऱ्या किंवा अडचणीच्या ठरणाऱ्या गोष्टी जाणीवपूर्वक गाळतो. त्यामुळे संशोधकाला अशा मौन असलेल्या भागांचा शोध घेऊन सत्याची साखळी जोडण्याचे आव्हान पेलवे लागते.

**स्वय अध्ययन प्रश्न क्र. २**

१) ऐतिहासिक साधनांचे परीक्षण प्रामुख्याने कोणत्या दोन स्तरांवर केले जाते?

अ) लेखन आणि वाचन
ब) बहिरंग आणि अंतरंग
क) सकाळ आणि संध्याकाळ
ड) जुने आणि नवीन

२) कागदपत्राचा अस्सलपणा, लेखकाची ओळख आणि शिक्का तपासणे हा कोणत्या परीक्षणाचा भाग आहे?

अ) बहिरंग परीक्षण
ब) अंतरंग परीक्षण
क) सकारात्मक परीक्षण
ड) नकारात्मक परीक्षण

३) जुने अवशेष, हाडे किंवा कापड यांचे वय अचूकपणे ठरवण्यासाठी विज्ञानातील कोणती पद्धत वापरली जाते?

अ) रक्त गट तपासणी
ब) क्ष-किरण (X-ray)
क) कार्बन-१४ (C-14)
ड) पाणी शुद्धीकरण

४) साधनाचे अंतरंग परीक्षण म्हणजे नेमके काय?

अ) मजकुराची विश्वसनीयता आणि लेखकाचा हेतू तपासणे

ब) कागदाचा रंग तपासणे

क) लेखकाचे हस्ताक्षर सुंदर आहे का हे पाहणे

ड) कागदावर शिक्का शोधणे

५) पत्रातील भाषेच्या स्वरूपावरून काय ओळखता येते?

अ) लेखकाचे शिक्षण
ब) पत्राचा कालखंड आणि अस्सलपणा
क) लेखकाचे गाव
ड) पत्राचा आकार

६) ऐतिहासिक घटना घडल्यानंतर १०-२० वर्षांनी केलेल्या लेखनात कोणत्या चुका होण्याची शक्यता असते?

अ) मानवी विस्मृतीमुळे तारखा व नावांमध्ये गफलत होणे

ब) लेखन खूप सुंदर होणे

क) कागद खराब न होणे

ड) अक्षराचे वळण सुधारणे

७) ज्या राजाच्या आश्रयाने लेखक राहतो, त्याच्याबद्दल तो सहसा कसे लिहितो?

अ) चुकांचे वर्णन करतो

ब) काहीच लिहित नाही

क) खूप टीका करतो

ड) अतिशयोक्तीपूर्ण आणि स्तुतीपर लिहितो

८) मोडी किंवा बालबोध लिपीच्या वळणाचा अभ्यास का करावा लागतो?

अ) चित्रकला शिकण्यासाठी
ब) कविता करण्यासाठी
क) लेखनकाळाची निश्चिती करण्यासाठी
ड) कागद मोजण्यासाठी

९) मजकुरातील वाच्यार्थ' आणि गर्भितार्थ' तपासणे हे कोणत्या परीक्षणाचे काम आहे?

अ) रासायनिक परीक्षण
ब) बहिरंग परीक्षण
क) सकारात्मक अंतरंग परीक्षण
ड) भौगोलिक परीक्षण

१०) जर एखाद्या कागदपत्रात लेखकाने स्वतःच्या पराभवाचे वर्णन धोरणात्मक माघार' असे केले असेल, तर तो कशाचा नमुना आहे?

अ) लेखकाचा पक्षपातीपणा आणि हेतू ब) सत्य घटना

क) वैज्ञानिक सत्य ड) लेखकाचा प्रामाणिकपणा

**१.२.३ तथ्य संकलनाच्या पद्धती :**

प्रस्तुत उपघटकामध्ये आपण इतिहासलेखांनासाठी सहय्याभूत असलेल्यात सर्वेक्षण, मुलाखत आणि प्रश्नावली या पद्धतीची तोंड ओळख करून घेणार आहोत. या तिन्ही पद्धती मधून साधन अथवा पुरावा कसा जमा करतात याची चर्चा केलेली आहे. याशिवाय त्याची उपयुक्तता आणि मर्यादा काय आहे हे जाणून घेणार आहोत.

**अ) सर्वेक्षण:**

**१) सर्वेक्षण पद्धतीची संकल्पना:**

समकालीन इतिहासलेखनाचे महत्वाचे माध्यम म्हणून सर्वेक्षणाला महत्त्वाचे स्थान आहे. सर्वेक्षण म्हणजेच चिकित्सकपणे केलेली पाहणी, अथवा समस्येचे शास्त्रशुद्ध पद्धतीने केलेले निरीक्षण, अथवा एखाद्या विशिष्ट प्रश्नासंबंधीची चिकित्सक पाहणी करणे व तत्संबंधी सर्व त-हेची विस्तृत माहिती घेणे म्हणजेच सर्वेक्षण अशी सर्व साधारण व्याख्या केली जाते. इतिहासाच्या प्रत्येक कालखंडाच्या अभ्यासासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला जावू शकतो. उदा. प्राचीन, मध्ययुगीन शिल्पस्थापत्य, शिलालेख, पुरातत्वीय स्थळे, मंदिरे इत्यादीसंबंधीच्या संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धती वापरावी लागते. सर्वेक्षण पद्धतीनुसार प्राप्त अवशेषांची सविस्तर माहिती नोंदवून त्या अवशेषांची व्याप्ती, भौगोलिक विस्तार, सीमा लक्षात घ्यावी लागते. याशिवाय राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, व आर्थिक इत्यादी समकालीन इतिहास लेखनासाठी सर्वेक्षण पद्धती उपयोगी ठरते. सर्वेक्षण पद्धतीला सामाजिक सर्वेक्षण पद्धती म्हणून उल्लेख देखील ओळखले जाते. एका विशिष्ट भू-भागावर अथवा भौगोलिक ठिकाणी राहणाऱ्या विशिष्ट व्यक्तीसमूह अथवा जाती, धर्म, पंथ समुदायाच्या कोणत्याही प्रश्नाविषयीची विस्तृत माहिती सर्वेक्षण पद्धतीच्या माध्यमातून प्राप्त करू शकतो. सामाजिक सर्वेक्षणाने समाजाच्या कोणत्याही प्रश्नाविषयीची व्यवस्थित माहिती मिळविता येते. सर्वेक्षणातून माहिती संकलित करून विश्लेषण केल्यानंतर विशिष्ट निवडलेली समस्या अथवा प्रश्नासंबंधी निश्चित स्वरूपाची मांडणी करता येते.

**२) सर्वेक्षण पद्धतीची व्याप्ती:**

सर्वेक्षणाच्या माध्यमातून गाव, शहर, कुटुंब, कुल, जान, जमात, वर्ग, समूह अशा कोणत्याही घटक संबंधी अथवा लोकांची अगर संशोधन संबंधी प्रश्नाशी निगडित माहिती पद्धतशीरपणे प्राप्त करण्याचे सर्वे क्षण हा महत्वाचे माध्यम आहे. लोकांची सामाजिक परिस्थिती, त्यांचे परस्परसंबंध, त्यांच्यापुढील प्रश्न, त्यांच्यातील होत असणाऱ्या सामाजिक परिवर्तनाचे स्वरूप, दिशा व गती इत्यादी बाबींची तपशीलवार

आणि विस्तृत माहिती सर्वेक्षणाने घेता येते. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, व आर्थिक इत्यादी विषयाशी निगडीत संशोधन स्थानिक किंवा समकालीन परिप्रेक्षातून करता येते. कोणत्याही भागातील समाजाच्या जीवनासंबंधी सविस्तर माहिती मिळतेच पण त्या समाज पुढचे प्रश्न समजतात व त्यांचे निराकरण कसे करावे यासंबंधी उपाय-योजना सुचविणे सामाजिक सर्वेक्षणाने शक्य होते.

**३) सर्वेक्षणाचे प्रकार:**

सर्वेक्षणाची उद्दिष्टे ज्याप्रकारे वेगवेगळी असतात त्याप्रमाणे माहिती प्राप्त करण्याचे मार्ग आणि पद्धती व तंत्रे यामध्येही विविधता आढळते. यावरून सर्वेक्षणाचे प्रकार पाडता येतात.

१) सर्वसामान्य सर्वेक्षण

२) विशिष्ट सर्वेक्षण

३) नियमित सर्वेक्षण

४) नैमित्तिक सर्वेक्षण

५) प्रारंभिक सर्वेक्षण

६) अंतिम सर्वेक्षण

७) वैश्विक सर्वेक्षण

८) नमूना सर्वेक्षण इत्यादीचा यामध्ये समावेश होतो.

**४) सर्वेक्षण आणि प्रश्नावली:**

सर्वेक्षण करण्यासाठी प्रामुख्याने प्रश्नावलीचा वापर केला जातो. प्रश्नावलीच्या माध्यमातून संशोधकाला हवी असणारी माहिती शास्त्रशुद्ध पद्धतीने सर्वेक्षणाच्या माध्यमातून प्राप्त करता येते. वृत्तपत्रामधील बातम्या, सरकारकडून जाहीर केली जाणारी माहिती, शासकीय योजना, राजकीय नेत्यांच्या मुलाखती, इ. माहिती सर्वेक्षणातून ताडून पाहता येते. एखाद्या घटनेबद्दल जनसामान्यांचे मत समजावून घ्यावयाचे असेल तर ही सर्वात चांगली पद्धत आहे. सर्व्हेक्षणासाठी वापरली जाणारी प्रश्नावली साधी सोपी व सुटसुटीत असावी. अशा प्रश्नावलीतील प्रश्न संदिग्ध नसावेत व प्रश्नावली परिपूर्ण असावी. त्यामुळे मिळणारी माहिती परिपूर्ण व उपयुक्त मिळते.

**५) सर्वेक्षण करताना कोणती खबरदारी घ्यावी:**

सर्वेक्षण करताना काही मूलभूत स्वरूपाची खबरदारी संशोधकाने घेणे जरूरी असते. ती खालील प्रमाणे

१) सर्वेक्षणासाठी तयार केलेली प्रश्नावली जास्तीत जास्त अचूक आणि परिपूर्ण असावी.

२) संशोधकास जी माहिती हवी आहे त्याची मांडणी स्पष्ट शब्दात केलेली असावी, संदिग्ध प्रश्न विचारू नयेत.

३) सर्वेक्षणामधील मुद्दे सोपे, स्पष्ट आणि सुटसुटीत असावेत.

४) सर्वेक्षणातून प्राप्त माहिती हा पूरावा असल्याने त्याच्या नोंदी घाईगडबडीने न करता त्या अचूक व निर्दोष करव्यात.

५) सर्वेक्षणामधून प्राप्त महितीचे चिकित्सकपणे विश्लेषण करणे गरजेचे असते.

६) चिकित्सक विश्लेषण हा सर्वेक्षणचा दुसरा टप्पा असून प्राप्त माहिती विश्वासार्ह आहे का? नवीन माहिती मिळते का? अथवा नव्या पैलूवर प्रकाश पडतो का? या दृष्टीकोणातून विचार करणे गजेचे असते.

७) बिनचूक निष्कर्ष काढण्यासाठी सर्वेक्षण जास्तीत जास्त व्यापक स्वरूपाचे असणे गजचे आहे.

### ७) सर्वेक्षण पद्धतीच्या मर्यादा:

स्थानिक अथवा समकालीन इतिहासलेखानाचे सर्वेक्षण हे प्रभावी साधन असले तरी त्याच्या काही मर्यादा अथवा उणिवा आहेत हेही ध्यानात घेतले पाहिजे.

१) सरकारी, निम सरकारी, व्यावसायिक आणि वैयक्तीक पातळीवर केले जाते.

२) संशोधकाने संशोधनासाठी इतरांनी सर्वेक्षण करून गोळा केलेल्या माहितीवर आधारीत स्वत:चे निष्कर्ष काढवयाचे असतील तर, कोणाचे सर्वेक्षण निश्चित करायचे आणि त्याचे निष्कर्ष कसे घ्यायचे हे जिकरीचे आहे.

३) संशोधक ज्या तंत्र पद्धतीचा उपयोग करीत आहे याचा संशोधकाने विचार केला पाहिजे. मुळात सर्वे क्षण ही खर्चीक बाब आहे. याला वेळ आणि पैसा अधिक लागतो. सर्वेक्षणातून मिळालेली तथ्ये एकसारखी असतीलच अस नाही. मिळालेल्या तथ्य संकलनाची विश्वसनीयता सांगता येत नाही. विशिष्ठ लोकसमुदायचा एका विस्तृत भौगोलिक पार्श्वभूमीवर सखोल अभ्यास करणे कठीण असते, कारण यासाठी निवडलेले नमुने एकसारखे, समान आणि खात्रीशीर माहिती प्रदान करतील याची शक्यता नसते.

### ब) प्रश्नावली:

स्थानिक अथवा समकालीन संशोधांनासाठी विशिष्ट समूह, वर्ग, गट अथवा विशिष्ट भौगोलिक मर्यादेमध्ये प्रश्नावलीचा उपयोग करून माहिती प्राप्त करता येते. संशोधन कामी माहिती संकलित करण्याची प्रश्नावली ही अप्रत्यक्ष पद्धत आहे. विशिष्ट समस्येचा अभ्यास करण्यासाठी संबंधिताकडून त्या समस्येबाबत माहिती मिळविण्याच्या हेतूने तयार केलेल्या प्रश्नांच्या मालिकेस प्रश्नावली म्हणतात. अथवा सर्वेक्षणाचा अर्थ कोणत्याही वस्तूंचे वा घटनांचे सूक्ष्म निरीक्षण व परीक्षण होय. कोणत्याही प्रश्नाचा पूर्ण परीचय करुन घेण्यासाठी किंवा त्या प्रश्नांचे निदान करुन त्यावर व्यवहार्य तोडगा काढण्यासाठी सर्वेक्षणाचा आधार घ्यावा

लागतो. सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक आणि राजकीय विषयाशी निगडीत संशोधनाकामी प्रश्नावली पद्धत वापरुन माहितीचे संकलन केले जाते. स्थानिक आणि समकालीन इतिहासलेखनासाठी या पद्धतीचा प्रभावीपणे वापर केला जातो. स्थानिक अथवा समकालीन इतिहासलेखन करीत असताना संशोधक विशिष्ट अभ्यास समूहाचे उत्तम निरीक्षण करू शकतो, मात्र केवळ निरीक्षणाने त्यांच्या वर्तनामागील प्रेरणा, भावना, श्रद्धा अथवा विचार, मते काय? व कोणत्या असतात? हे कळत नाही. व्यक्तीचे वर्तन पाहून संशोधक वस्तुस्थिती रेखाटू शकतो. मात्र पण त्याची वैयक्तिक मते, त्यामागील प्रेरणा अभ्यासण्यासाठी प्रत्यक्ष व्यक्तीशी संपर्क साधून, त्याला प्रश्न विचारूनच ती  ही माहिती प्राप्त होवू शकते.

### १) लिखित प्रश्न व लिखित उत्तर:

संशोधनविषयाची विस्तृत माहिती प्राप्त करण्यासाठी संशोधक लिखित प्रश्नांची यादी तयार करतो. प्रश्नांची स्वरूप, आखनी आणि क्रमवारी पद्धतशीरपणे केलेली असते. संशोधक अभ्यास विषयाशी संबंधित असणार्या  निवेदकांना लिखित प्रश्न संशोधक प्रत्यक्षपणे विचारू शकतो, किंवा जे निवेदक दूर असतात त्यांच्याकडून माहिती प्राप्त करण्यासाठी प्रश्नावली पोस्टाद्वारे पाठवली जाते आणि त्यांच्याकडून लिखित प्रश्नांची लिखित उत्तरे प्राप्त केली जातात.

### २) प्रश्नावलीचे प्रकार:

संशोधन विषयाच्या हेतुनुसार प्रश्नावलीचे अनेक प्रकार पाडतात. संशोधन विषयाचे स्वरूप, प्रश्नांचे स्वरूप, रचना इत्यादी घटकावर आधारित प्रश्नावलीचे अनेक प्रकार येतात मात्र प्रामुख्याने पुढील दोन प्रमुख प्रकारांचा समावेश होतो. अ) संरचित प्रश्नावली: ब) असंरचित प्रश्नावली:

### अ) संरचित प्रश्नावली:

संशोधक या प्रकारात आपला विषय, हेतू, व्याप्ती आणि संशोधांनाची खोली विचारात घेवून प्रश्न व प्रश्नांचा क्रम निश्चित करतो. सर्वसामान्यपणे प्रश्नावलीतील प्रश्न आणि त्याचा क्रम निश्चित झाल्यानंतर संशोधक पर्यायी उत्तरेही देतो व उत्तरदात्यास आपल्या पसंतीचे उत्तर निवडण्यास सांगतो. अशा प्रकारची प्रश्नावली छापून पोष्टाने किंवा मुलाखतकारा बरोबर पाठवितो त्याला याला बंदिस्त प्रश्नावली असे म्हणतात. ज्या प्रश्नांची पर्यायी उत्तरे दिलेली नसल्यास उत्तरदात्याकडून त्याच्या शब्दामध्ये उत्तर देण्याचे स्वातंत्र्य दिलेले असते. त्याला मुक्त प्रश्नावली असे म्हणतात.

### ब) असंरचित प्रश्नावली:

संशोधकाने संशोधनविषय निश्चित केलेला असला तरी संशोधनविषयाची संपूर्ण माहिती संशोधकाला असेलच असे नाही. यावेळी नेमके कोणते प्रश्न विचारावयाचे व त्यांची पर्यायी उत्तरे कोणती यासंबंधी संशोधकाच्या मनात शंका असते. साहजिकच संशोधन विषयासंबंधी काही स्थूल प्रश्न उभे करून लोकांची मते, प्रतिक्रिया, नवे दृष्टिकोण समजून घेण्यासाठी असंरचित प्रश्नावलीचा वापर केला जातो. या प्रश्नावलीमध्ये ज्या संशोधनविषयाची फारशी माहिती उपलब्ध नाही, निश्चित प्रश्न किंवा पर्याय देता येत नाहीत अशा वेळी असंरचित प्रश्नालीचा उपयोग केला जातो.

### ३) प्रश्नावली पद्धतीचे स्वरूप:

प्रश्नावली तयार करताना संशोधकाने विशेष काळजी घेतली पाहिजे. प्रश्नांचा क्रम, लांबी, पर्यायी उत्तरे याबाबत स्पष्टता असणे गरजेचे असते. प्रश्नावलीचे स्वरूप संशोधन विषयाशी निगडीत ठेवले पाहिजे. प्रश्न छोटे, सोपे व सुटसुटीत असावेत. प्रश्न अचूक व काटेकोर शब्दात विचारावेत. प्रश्नाच्या अर्थाबाबत संधिग्ता असता कामा नये. कोणती शंका राहू नये. मुक्त प्रश्न मोजके व आवश्यक तेवढेच असावेत. योग्य उत्तराला बरोबर खूण करण्यास सांगावे. प्रश्नातून उत्तर सूचित होतील असे प्रश्न विचारू नयेत. उत्तरदात्यास उत्तर देताना आकडेमोड करावी लाग् नये. प्रश्नावलीमध्ये खाजगी प्रश्न विचारताना शब्दांची निवड काळजीपूर्वक करावी. गृहितकावर आधारलेले प्रश्न विचारताना काळजी घ्यावी.

### ४) प्रश्नावलीची पद्धतीची उपयुक्तता:

स्थानिक अथवा समकालीन इतिहास लिखानामध्ये साधने प्राप्त करताना अनेक अडचणी येतात. स्थानिक व समकालीन संशोधन विषयावर विपुल प्रमाणात साधने उपलब्ध असतील असे नाही, अशा वेळी संशोधक प्रश्नावलीच्या माध्यमातून संशोधांनाला पूरक पुरावे जमा करू शकतो. प्रश्नावली पद्धती मध्ये संशोधकाचा वेळ, श्रम आणि पैसा वाचतो. विचारलेल्या प्रश्नातून उत्तरात कमी विसंगती येते. प्राप्त उत्तरांची तुलना आणि विश्लेषण करणे सोपे जाते. प्रश्नावलीतून संशोधन विषयाचा एक दस्ताऐवज तयार होतो. की जो पुढे तुलनात्मक अभ्यासासाठी उपयुक्त असतो. संशोधन विषयाशी निगडीत ऐतिहासिक साधन तयार होते.

### ५) प्रश्नावली पद्धतीची मर्यादा:

प्रश्नावलीचे जसे फायदे आहेत तसेच काही उणिवादेखील आहेत, जसे की प्रश्नावली भरून देणार्युच्या स्वतंत्र विचारला आळा बसलेला असतो. कारण एका ठराविक मर्यादेमध्ये राहून उत्तरे द्यावी लागतात. त्यातूनही दिलेले उत्तर खरे असेलच असे नाही. प्रश्नावलीमधील प्रश्नांचा अर्थ समजावून घेण्याची कुवत प्रश्नावली भरून देणार्यातकडे असावी लागते. त्याला प्रश्नाची उकल व्यवस्थित न झाल्यास चुकीची अथवा संधिग्ध उत्तरे प्राप्त होवू शकतात. अथवा उत्तरात उणीव राहण्याची शक्यता असते. प्रश्नावली भरून विशिष्ट जाती समूह, धर्म समूह, वर्ग समूह समाजामध्ये रहात असल्याने तो पूर्वग्रहदूषित असण्याची शक्यता असते, यामध्ये वस्तूनिष्ठतेला बाधा येण्याची शक्य नाकारता येत नाही. प्रश्नावलीमध्ये प्रश्नावली भरून देणार्यायच्या उत्तरावर विश्वास ठेवावा लागतो, दिलेल्या उत्तराची पडताळणी शक्यता नसते.

### क) मुलाखत:

मुलाखत ही तथ्य संकलनाची अशी पध्दती आहे की, ज्यामध्ये मुलाखत घेणारा व मुलाखत देणारा (दाता) यात प्रत्यक्ष समोरासमोरचा संवाद प्रस्थापित होतो. मुलाखतदात्याशी प्रत्यक्ष संवाद प्रस्थापित झाल्याने त्याच्या भावना व मनोवृत्तीचे क्रमबध्द संशोधन केले जाते. स्थानिक व समकालीन इतिहासलेखनाचे एक साधन म्हणून मुलाखतीला विशेष महत्त्व आहे. सामाजिकशास्त्र संशोधनपद्धतीमध्ये मोठ्या प्रमाणात मुलाखत तंत्राचा वापर केला जातो. मुलाखत पद्धतीचा वापर करण्यापूर्वी मुलाखतीची उद्दिष्टे, स्वरूप,

व्याप्तीचा विचार संशोधकाने करणे गरजेचे असते. मुलाखतीच्या माध्यमातून संशोधकाला कोणती माहिती प्राप्त करवयाची आहे, मुलाखत कोणाची घ्यावयाची आहे, मुलाखतीचे स्वरूप कोणते असावे, किती लोकांच्या मुलाखती घेणे अपेक्षित आहे, याचा संशोधकाने विचार करणे गरजेचे असते.

### १) मुलाखत तंत्राची व्याख्या :

एखाद्या प्रश्नाबाबत माहिती प्राप्त करण्याच्या हेतूने सहाकार्य देणाऱ्या व जाणकार निवेदकाबरोबर मुलाखतकाराने केलेला संवाद म्हणजे मुलाखत होय. अशी सर्व साधारण व्याख्या केली जात असली तरी समाजशास्त्रीय संशोधनातील माहिती संकलनाचे एक महत्वपूर्ण तंत्र असलेल्या या पद्धतीची अनेक संशोधकांनी/विचारवंतांनी व्याख्या केली आहे. त्यापैकी काही महत्वाच्या व्याख्या पुढीलप्रमाणे :

१) **पॉलिन यंग:** मुलाखत ही अशी सुव्यवस्थित पध्दतीची प्रक्रिया आहे की, ज्यायोगे तुलनेने त्रयस्थ असलेल्या व्यक्तीच्या जीवनात अभ्यासक कल्पनाशक्तीच्या बळावर शरित असतो.

२) **हॅडर आणि लिंडमन:** मुलाखतीत दोन किंवा अधिक व्यक्तींमधील संवाद किंवा मौखिक प्रतिसाद असतो.

वरील व्याख्यांवरुन मुलाखत म्हणजे संशोधक स्वत: निवेदकांना भेटून संशोधना विषयाशी संबंधित प्रश्न विचारतो व माहिती संकलीत करतो. मुलाखत हे माहिती संकलनाचे सोपे तंत्र आहे.

### २) मुलाखत तंत्राची वैशिष्ट्ये :

ब्लॅक आणि चँपीयन यांनी मुलाखतीची पुढील वैशिष्ट्ये सांगीतलेली आहेत.

१) संशोधक व निवेदक (मुलाखत दाता) यांच्यात प्रत्यक्ष संवाद असतो.

२) संशोधक प्रत्यक्ष प्रश्न निवेदकाला विचारुन माहिती घेतो यातून संवाद होतो.

३) संशोधक व निवेदकाचे संबंध तात्पुरते असतात.

४) संशोधकाने प्रत्यक्ष संवाद साधल्याने संशोधांन विषयाची सखोल माहिती प्राप्त होते.

५) तथ्यांचे सुव्यवस्थित संकलन प्राप्त होते.

६) अनावश्यक माहिती टाळता येते.

७) मुलाखतीचा मुख्य हेतू विश्वसनीय माहितीचे संकलन करणे हा असतो.

### ३) मुलाखत तंत्राचे वर्गीकरण:

मुलाखत तंत्राचा व्यापक उपयोग आणि वापर लक्षात घेता सामाजिक संशोधन पद्धतीमध्ये विविध समाजशास्त्रज्ञांनी मुलाखतीचे खालील प्रकारात वर्गीकरण केलेले आहे.

अ) **लुंडबर्ग:** लुंडबर्ग यांनी मुलाखतीचे तीन प्रकार सांगितलेले आहे, यामध्ये १) वस्तुनिष्ठ तथ्यांचे संकलन करणे. २) अभिवृत्ती निर्धारण व मापन करणे. ३) सामाजिक संघटन व संस्थांची

माहिती करुन घेणारी इत्यादी प्रकारांचा समावेश होतो.

ब) **पी. व्ही. यंग:** पी. व्ही. यंग यांनी मुलाखतीचे चार प्रकार सांगीतलेले आहेत, यामध्ये १) संस्था सर्व्हेक्षण २) निरीक्षण ३) मूल्यांकन ४) दस्तऐवज इत्यादी प्रकारांचा समावेश होतो.

**४) मुलाखत तंत्राचे प्रकार:**

**अ) संरचीत किंवा आकारीक मुलाखत :**

संरचित मुलाखतीमध्ये पुर्वनियोजित व साचेबंद प्रश्न विचारले जात असल्याने संशोधकाचे काम सोपे होते. प्रश्नांची यादी अगोदरच तयार केल्याने मुलाखतदात्याला प्रश्नांच्या बाहेर जाता येत नाही, म्हणून मुलाखतीला संरचित किंवा आकारीक मुलाखत असे म्हणतात. यामध्ये प्रश्नाबरोबर संभाव्य उत्तरेही त्यांना दिली जातात. प्रश्न व उत्तरांची यादी छापून घेतलेली असते. संशोधक मुलाखतदात्याला प्रश्न विचारून पर्यायी उत्तरापैकी कोणते उत्तर निवेदकास द्यावयाचे आहे ते विचारतो व उत्तराबरोबर बरोबरची खूण करतो. पर्यायी उत्तरापैकी कोणत्याही उत्तराशी संशोधक सहमत होत नसेल तर मुलाखतदात्याच्या उत्तराशी अधिकाधिक साम्य असणाऱ्या उत्तरासमोर तो वरील प्रमाणे खूण करतो. जर निवेदकास संपूर्णपणे वेगळे उत्तर द्यावयाचे असल्यास ते उत्तर मुलाखतकार पूर्णपणे लिहून घेतो.

**ब) असंरचीत किंवा मुक्त मुलाखत:**

मुक्त मुलाखतीमध्ये संशोधक मुलाखतदात्यासमोर मुलाखतीचा विषय मांडतो. मुलाखतीमधील त्याचा हेतू स्पष्ट करून मुलाखतदात्याला मुक्तपणाने आपली मते मांडण्याची परवानगी देतो. संशोधकाने विषयाचा अभ्यास केला असल्याने कोणते प्रश्न विचारावयाचे याचा त्याने विचार केलेला असतो. संशोधक कोणताही प्रश्न केव्हाही विचारू शकतो. प्रश्न व उत्तरे दोन्हीही पूर्वनियोजित नसल्यामुळे मुलाखतीचे स्वरूप अनिश्चित असते. मुलाखतदात्याला व काही प्रमाणात संशोधकाला मुक्त स्वातंत्र्य असते हे या मुलाखतीचे वैशिष्टय असते. मुलाखतीमध्ये मुलाखतदाता आणि संशोधक यांच्यावर कोणतेही बंधन नसल्याने मुलाखतीमध्ये लवचिकता येते. मुलाखतदाता आपली मते स्पष्टपणे व स्वत:च्या शब्दात मांडू शकतो. संशोधकाकडे अधिक कौशल्य लागते.

**क) केंद्रित मुलाखत:**

केंद्रीत मुलाखत हा अनिर्देशित अथवा मुक्तमुलाखती प्रकार आहे. यामध्ये संशोधक मुलाखतदात्याच्या विशिष्ट अनुभवावर व त्याच्यावर झालेल्या परिणामावर आपले लक्ष केंद्रित करतो. अशा प्रकारच्या मुलाखती रेडिओ, टी.व्ही, चित्रपटामध्ये होतो.

**ड) पुनरावृत्ती किंवा फेरमुलाखत:**

एखाद्या घटनेबाबत व्यक्तीची मते कायमचीच राहतात असे नाही. त्या घटनेबाबतचा त्याचा दृष्टीकोनात अथवा विचार बदलत राहतात. अशा प्रकारच्या मुलाखती एखाद्या सामाजिक, मानसशास्त्रीय, आर्थिक किंवा राजकीय प्रश्नाबाबत लोकांचे दृष्टीकोनात कसा बदल होत गेला याचा अभ्यास करण्यासाठी होतो.

### इ) निदानोपचारात्मक मुलाखत:

निदानोपचारात्मक मुलाखतीत संशोधक मुलाखतदात्याचा अनुभव, प्रेरणा, इ. विषयी माहिती घेण्यासाठी करतो. केंद्रित मुलाखतीप्रमाणेच यामध्ये विशिष्ट वर्तनाचा अथवा अनुभवाच्या प्रेरणा कोणत्या आहेत जाणून घेण्यासाठी होतो. मुलाखतीची पूर्व तयारी असते. मुलाखतदात्याला कोणते प्रश्न विचारायचे व कोणत्या क्रमाने हे संशोधक ठरवत असतो.

वरील मुलाखत प्रकाराशिवाय औपचारिक, अनौपचारिक, व्यक्तीगत, सामूहिक, गुणात्मक, परिणामात्मक, उपचारात्मक, संशोधनात्मक असे अनेक प्रकार मुलाखतीचे आहेत.

### ५) मुलाखतीची पूर्व तयारी:

मुलाखत ही एक तांत्रिक गोष्ट असल्यामुळे ती जितकी कौशल्याने हाताळता येईल तेवढी अधिक परिणामकारक ठरते. ज्या व्यक्तीची मुलाखत घ्यायची आहे त्याची इत्यंभूत माहिती मुलाखत घेणाऱ्याकडे असायला हवी. मुलाखत देणारा आणि मुलाखत घेणारा यांच्यात सुसंवाद असणे आवश्यक असते. विसंवाद झाल्यास मुलाखत देणारा माहिती देणे थांबू शकतो अथवा योग्य माहिती मिळवण्यास अडथळा येऊ शकतो. मुलाखत सुरु करण्याआधी, मुलाखत देणाऱ्याला, विषयाची आधीच माहिती देणे गरजेचे असते, तसे न केल्यास गोंधळ होण्याची शक्यता असते. मुलाखत घेणाऱ्याने, मुलाखत देणाऱ्याच्या मनात, स्वत:बद्दल विश्वास निर्माण करायला हवा. त्यामुळे मुलाखत देणारा त्याला संवेदनशील वाटणारी माहिती देखील मुलाखत घेणाऱ्याला सांगू शकतो. मुलाखतीदरम्यान अथवा नंतर, मुलाखतीची टिपणे काढून, ती मुलाखत देणाऱ्याकडून तपासून मजकूर खरा असल्याची त्याच्याकडून खात्री करून, त्याची स्वाक्षरी घ्यावी. मुलाखतीची ध्वनीमुद्रण अथवा ध्वनिचित्रफिती बनवल्यास मुलाखतीचा सगळाच मजकूर दीर्घकाळासाठी उपयोगात आणता येतो. मुलाखत घेणे हे एक तंत्र असून ते कौशल्याने हाताळावे लागते. मुलाखत घेताना जर चूक झाली तर मुलाखतीचा हेतू साध्य होत नाही. मुलाखतीमधून हवी असणारी माहिती प्राप्त न झाल्याने संशोधक निराश अथवा हताश होवू शकतो. मुलाखतीची पूर्वतयारी करणे आवश्यक असते. मुलाखतीची पूर्वतयारी करताना पुढील प्रमाणे काळजी घ्यावी.

१) प्रथम मुलाखतदात्याची सर्व इत्यंभूत माहिती घेणे गरजेचे असते. यामध्ये नाव, टोपण नाव, वय, शिक्षण, व्यवसाय, सामाजिक व राजकीय दर्जा, सांस्कृतिक पातळी इत्यादीचा समावेश होतो. वरील माहिती वरुन त्या व्यक्तीची माहिती पुरविण्याची बौद्धिक क्षमता याचा अंदाज येतो.

२) मुलाखत घेणारा व देणारा यांच्यामध्ये संवाद निर्माण झाला तरच मुलाखत यशस्वी होवू शकते, अन्यथा अपेक्षित माहिती प्राप्त होत नाही.

३) मुलाखतददात्याची मानसिकता, आवड-निवड, मते, विचार पद्धती याची माहिती जमा केल्यास संशोधकाला हवी ती माहिती प्राप्त करता येते, संवादामध्ये अडथळा येत नये.

४) संशोधकाने मुलाखतददात्याला स्वत:ची ओळख व मुलाखतीचा स्पष्ट हेतू सांगितला पाहिजे, त्यामुळे संशोधनाविषयी कोणतीही शंका न राहता संवाद मोकळेपणाने होतो.

### ७) मुलाखत देणारी व्यक्ती

एखाद्या व्यक्तीचे चरित्रलेखन करत असताना त्याची स्वत:ची, जवळच्या व्यक्ती, परिवारातील व्यक्ती, व्यवसायिक सहकारी आणि विरोधक इत्यादींच्या मुलाखती घेणे गरजेचे असते. संशोधन विषयाशी संबंधीत व्यक्तीशी थेट संबंध नसलेले, मात्र त्यांच्या संबंधीची माहिती असलेल्या त्रयस्थ व्यक्तींची देखील मुलाखत घेणे महत्वाचे ठरते. चरित्रनायकाचे सहकारी अथवा विरोधकांकडून मिळणारी माहिती ही आत्मनिष्ठ असते. अशावेळी त्रयस्थ आणि चौकसबुद्धीच्या व्यक्तीची मुलाखत बऱ्याच प्रमाणात वस्तुनिष्ठ माहिती मिळण्यास उपयोगी ठरते. आंदोलन, चळवळ, राजकीय पक्ष, संस्था यांच्याशी संबंधित विषयांवर मुलाखती घेताना त्रयस्थ व्यक्तींच्या मुलाखती अत्यंत उपयुक्त ठरतात.

### ८) मुलाखतीमधील प्रश्न:

मुलाखतीत विचारले जाणारे प्रश्न हे थेट, मुद्देसूद आणि वस्तुनिष्ठ असावेत. असे प्रश्न विचारल्यास मुलाखतदात्याचा गोंधळ उडत नाही. मुलाखतदात्याला संशोधकाच्या व्यक्तीनिष्ठेची अथवा पूर्वग्रह दूषितपणाची शंका आल्यास तो अपेक्षित मोकळेपणाने माहिती देणार नाही. शक्यतो मुलाखत देणाऱ्याला न दुखावता त्याच्या कडून व्यक्ती, घटना यांच्याविषयीची त्याची मते हळुवारपणे काढून घ्यावीत.

### ९) मुलाखतीमधील प्रश्नांचे स्वरूप:

मुलाखतदात्याला आपला विषय कथन केलल्यानंतर संबंधीत विषयावर बोलण्याची मुभा दिली जाते. संशोधकाला आवश्यकता वाटल्यास मुलाखतदात्याला काही प्रश्न विचारावे लागतात. योग्य उत्तरे प्राप्त करण्यासाठी खबरदारीने प्रश्न तयार करावे लागतात. प्रश्न सरळ, नि:संदिग्ध, मुद्देसुद व सुटसुटीत असल्यास उत्तरे देताना मुलाखतदात्याचा गोंधळ होणार नाही. प्रश्न मुद्देसूद असले की उत्तरेही मुद्देसूद मिळतात.

### १०) मुलाखतीचा उपयोग आणि मर्यादा:

सामाजिक शास्त्र अथवा स्थानिक/समकालीन इतिहासलेखनामध्ये तथ्य संकलनाचे प्रभावी साधन म्हणून मुलाखत सर्वमान्य आहे. मुलाखत तंत्र हे मुलाखतदात्याकडून अभ्यासविषय अथवा समस्येविषयीची माहिती संकलित करण्याचे प्रत्यक्ष तंत्र आहे. आज सामाजिक संशोधनात मुलाखत तंत्राचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो, त्याची ज्या प्रकारे उपयुक्ततात आहे त्याप्रमाणे त्याच्या काही उणिवादेखील आहेत.

### अ) मुलाखत तंत्राचा उपयोग:

१) संशोधक व मुलाखतदाता यांच्यातील सुसंवाद हा पारंपारिक व प्रेरणात्मक स्वरुपाचा असल्याने मुलखातीमधून मिळणारी माहिती यथार्थ व व्यापक स्वरुपाची असते.

२) मुलाखतदात्याशी प्रत्यक्ष संवाद होत असल्याने सखोल संशोधनासंबंधी सखोल माहिती मिळते.

३) संशोधनासंबंधी असलेले प्रश्न ताठर स्वरुपाचे नसतात. त्यात लवचिकता असल्याने माहिती घेणे सोपे जाते.

४) समोरा समोर प्रश्न विचारत असताना मुलाखतदात्याच्या भावना जाणून घेता येतात.

५) माहितीची विश्वसनियता राहते.

६) संशोधक आणि मुलाखतदाता यांच्यामध्ये औपचारिक संबंध असले तरी बोलण्याच्या ओघात संशोधकाला इतर पूरक माहिती प्राप्त होते.

७) मुलाखतदात्या कडून प्राप्त माहिती संशोधक पडताळणी करू शकतो.

८) मुलाखतीमुळे पूर्वग्रह कमी होण्यास मदत होते.

**ब) मुलाखत तंत्राच्या मर्यादा:**

संशोधनासाठी मुलाखतीचे अनेक उपयोग असले तरी काही मर्यादासुद्धा आहेत, येतात त्या पुढीलप्रमाणे.

१) मुलाखत हे खर्चिर्क आणि वेळखावू स्वरुपाची पद्धती आहे.

२) पूर्वगृहयुक्त प्रतिक्रिया मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

३) मर्यादित क्षेत्रात तथ्य संकलन होते, संशोधकाला सहकार्य मिळवण्यात अडचणी येतात.

४) संशोधकाकडे प्रचंड सहनशीलता असणे आवश्यक असते.

५) संशोधक आणि मुलाखतदाता यांच्यातील आंतरक्रिया पूर्णपणे परस्पर विश्वासावर आवलंबून असते.

६) मुलाखत घेण्याचे वैयक्तीक कौशल्य सर्वांनीच आत्मसात केलेले असते असे नाही.

वरील मर्यादा गृहीत धरल्या तरी सामाजिक संशोधनाच्या क्षेत्रात मुलाखत तंत्राचा वापर अधिक प्रमाणात केला जातो. एक विश्वसनिय तंत्र म्हणून याकडे पाहिले जाते

**स्वय अध्ययन प्रश्न क्र. ३**

१) विशिष्ट भौगोलिक ठिकाणी राहणाऱ्या समूहाच्या प्रश्नांविषयी सविस्तर माहिती मिळवण्यासाठी कोणते माध्यम सर्वाधिक उपयुक्त ठरते?

अ) सर्वेक्षण　　ब) केवळ जुनी पत्रे वाचणे

क) चित्रे काढणे　　ड) केवळ कल्पना करणे

२) ज्या प्रश्नावलीत उत्तरदात्याला उत्तरांचे पर्याय दिलेले असतात, त्या प्रकाराला काय म्हणतात?

अ) मौखिक प्रश्नावली　　ब) संरचित किंवा बंदिस्त प्रश्नावली

क) असंरचित प्रश्नावली　　ड) मुक्त प्रश्नावली

३) मुलाखत घेणारा आणि मुलाखत देणारा यांच्यात विसंवाद झाल्यास काय परिणाम होतो?

अ) मुलाखत अधिक चांगली होते

ब) काहीच फरक पडत नाही

क) योग्य माहिती मिळवण्यात अडथळा येऊ शकतो

ड) मुलाखत लवकर संपते

४) पॉलिन यंग यांच्या मते, मुलाखत ही कोणती प्रक्रिया आहे?

अ) सुव्यवस्थित पद्धतीची प्रक्रिया

ब) केवळ गप्पा मारणे

क) केवळ लेखी परीक्षा

ड) केवळ भांडण करणे

५) मुलाखत तंत्राचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य कोणते?

अ) खूप पैसे मिळवणे

ब) संशोधक व निवेदक यांच्यात प्रत्यक्ष संवाद

क) मुलाखत न घेता माहिती लिहिणे

ड) केवळ टपाल पाठवणे

६) प्रश्नावली पोस्टाद्वारे पाठवून माहिती गोळा करण्याच्या पद्धतीला काय मर्यादा असू शकते?

अ) खर्च कमी होतो

ब) अनेक लोकांना पाठवता येते

क) उत्तरदात्याच्या उत्तराची पडताळणी करणे कठीण असते

ड) वेळ वाचतो

७) एखाद्या घटनेबाबत लोकांचा दृष्टिकोन कसा बदलत गेला, हे पाहण्यासाठी कोणती मुलाखत घेतली जाते?

अ) पुरावृत्ती किंवा फेरमुलाखत

ब) एकेरी मुलाखत

क) बंदिस्त मुलाखत

ड) अचानक मुलाखत

८) मुलाखत घेणाऱ्याने निवेदकाकडून माहिती घेतल्यानंतर कोणती खबरदारी घ्यावी?

अ) माहिती लगेच प्रसिद्ध करणे

ब) स्वतःच्या मनाने माहिती बदलणे

क) टिपणे काढून त्यावर निवेदकाची स्वाक्षरी घेणे

ड) माहिती विसरून जाणे

९) संशोधकाला संशोधन विषयाची फारशी माहिती नसेल, तर तो कोणत्या प्रश्नावलीचा वापर करतो?

अ) प्राथमिक प्रश्नावली  ब) साचेबंद प्रश्नावली

क) गणितीय प्रश्नावली  ड) असंरचित प्रश्नावली

१०) मुलाखत घेताना कोणत्या प्रकारचे प्रश्न टाळावेत?

अ) मुद्देसूद प्रश्न  ब) वस्तुनिष्ठ प्रश्न

क) संदिग्ध आणि निवेदकाला दुखावणारे प्रश्न  ड) सरळ प्रश्न

## १.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

मौखिक : पाठांतराच्या माध्यमातून परंपरेने चालत आलेले.

मुलाखत : तोंडी पद्धतीने माहिती प्राप्त करण्याचे तंत्र.

सर्वेक्षण : समस्येचे शास्त्रशुद्ध पद्धतीने केलेले परीक्षण.

पुराभिलेख : विविध माध्यमातून लिहिलेले कोरीव लेख

पुरातत्वविद्या : प्राचीन वस्तू आणि वास्तूंचा अभ्यास करणारे शास्त्र

ताम्रपट : तांब्याच्या पत्र्यावर कोरलेले लेख

भौतिक साधने : पुरतत्वीय अवशेष

टाकंसाळ : नाणी तयार करण्याचा कारखाना अथवा ठिकाण

## १.४ स्वय-अध्ययन प्रश्न व प्रश्नांची उत्तरे

स्वय अध्ययन प्रश्न क्र. १ ची उत्तरे

१)-क), २)-क), ३)-क), ४)-क), ५)-ड), ६)-ब), ७)-क), ८)-ब), ९)-क), १०) -पुणे

स्वय अध्ययन प्रश्न क्र. २ ची उत्तरे

१)-ब), २)-अ), ३)-क), ४)-अ), ५)-ब), ६)-अ), ७)-ड), ८)-क), ९)-क) १०)-अ)

स्वय अध्ययन प्रश्न क्र. ३ ची उत्तरे

१)-अ), २)-ब), ३)-क), ४)-अ), ५)-ब), ६)-क), ७)-अ), ८)-क), ९)-ड), १०)-क

**१.५ सारांश**

इतिहासलेखन ही केवळ जुन्या कथांची मांडणी नसून ती एक पुराव्यांवर आधारित शास्त्रशुद्ध प्रक्रिया आहे. साधन नाही तर इतिहास नाही हे या शास्त्राचे मूळ सूत्र आहे. ऐतिहासिक सत्यापर्यंत पोहोचण्यासाठी संशोधकाला विविध साधनांचा वापर करावा लागतो, ज्याचे प्रामुख्याने प्राथमिक आणि दुय्यम अशा दोन गटांत वर्गीकरण केले जाते. प्राथमिक साधनांमध्ये प्रत्यक्ष त्या काळातील शिलालेख, ताम्रपट, नाणी, किल्ले आणि रोजनिशी, पत्रव्यवहार यांचा समावेश होतो. ही साधने समकालीन असल्याने अधिक विश्वासार्ह मानली जातात. दुसरीकडे, या प्राथमिक साधनांच्या आधारे नंतरच्या काळात लिहिलेली चरित्रे किंवा ग्रंथ म्हणजे दुय्यम साधने होत.

साधने उपलब्ध झाल्यानंतर त्यांची शास्त्रशुद्ध पडताळणी करणे अनिवार्य असते, ज्याला साधनांची चिकित्सा असे म्हणतात. यामध्ये दोन टप्पे असतात: बहिरंग परीक्षण आणि अंतरंग परीक्षण. बहिरंग परीक्षणात पुराव्याचे बाह्य स्वरूप तपासले जाते, जसे की कागदाचा प्रकार, शाई, हस्ताक्षर आणि लेखकाचा काळ. एखादे साधन बनावट तर नाही ना, हे शोधणे हा याचा मुख्य उद्देश असतो. याउलट, अंतरंग परीक्षणात साधनातील मजकुराची सत्यता तपासली जाते. लेखकाने दिलेली माहिती वस्तुनिष्ठ आहे की ती अतिशयोक्तीपूर्ण किंवा पूर्वग्रहदूषित आहे, हे इतर पुराव्यांशी ताडून पाहिले जाते. या प्रक्रियेमुळे इतिहासातील तथ्य आणि कल्पना यातील फरक स्पष्ट होतो.

आधुनिक इतिहासलेखनात केवळ कागदपत्रांवर अवलंबून न राहता तथ्य संकलनाच्या विविध पद्धतींचा वापर केला जातो. यामध्ये सर्वेक्षण, प्रश्नावली आणि मुलाखत या तंत्रांना विशेष महत्त्व आहे. सर्वे क्षण पद्धतीद्वारे एखाद्या विशिष्ट ऐतिहासिक किंवा सामाजिक समस्येचे क्षेत्रिय निरीक्षण केले जाते. प्रश्नावली ही माहितीदात्यांकडून लिखित स्वरूपात उत्तरे मिळवण्यासाठी उपयुक्त ठरते, विशेषतः जेव्हा संशोधनाचे क्षेत्र मोठे असते. मुलाखत तंत्राद्वारे व्यक्तीच्या स्मृती, अनुभव आणि मौखिक परंपरेतून माहिती मिळवता येते, जे आधुनिक इतिहासासाठी अत्यंत प्रभावी साधन ठरते. थोडक्यात सांगायचे तर, ऐतिहासिक साधनांचे अचूक वर्गीकरण, त्यांची कठोर चिकित्सा आणि आधुनिक तथ्य संकलन पद्धतींचा वापर यामुळेच इतिहास लेखनाला विश्वासार्हता प्राप्त होते. संशोधकाने तटस्थ राहून या साधनांचे विश्लेषण केल्यास मानवी संस्कृतीचा खरा आणि वस्तुनिष्ठ इतिहास समोर येतो.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय:

### अ) टिपा लिहा:

१) खाजगी कागदपत्रे

२) पुराणवस्तू/ उत्खनित अवशेष

३) शिलालेख व स्तंभालेख

४) आधुनिक साधने

५) बहिरंग परीक्षण

६) अंतरंग परीक्षण

७) सर्वेक्षण पद्धतीच्या मर्यादा

८) प्रश्नावलीचे प्रकार

९) मुलाखतीची पूर्व तयारी

### ब) खालील प्रश्नांची सविस्तर चर्चा करा.

१) इतिहासलेखनाचे साधन म्हणून दुय्यम साधनांचे महत्व सांगा.

२) इतिहासलेखनाचे साधन म्हणून दुय्यम साधनांचे महत्व सांगा.

३) इतिहासलेखनात अंतरंग व बहिरंग परीक्षणाचे महत्व सांगा.

४) इतिहासलेखनाचे साधन म्हणून सर्वेक्षण पद्धतीची माहिती द्या.

५) इतिहासलेखनाचे साधन म्हणून प्रश्नावली पद्धतीची माहिती द्या.

६) इतिहासलेखनाचे साधन म्हणून मुलाखत तंत्राची माहिती द्या.

## १.७ संदर्भ ग्रंथ व अधिक वाचनासाठीची पुस्तके:


१) नाडगोडे, गुरुनाथ., सामाजिक संशोधन पद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९८६.

२) कुंभोजकर, ग. वि., संशोधन पद्धती व संख्याशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९८९.

३) कोठेकर, शांता, इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, नागपूर, २००५

४) वांबूरकर, जास्वंदी., (संपा.) इतिहासातील नवे प्रवाह, डायमंड प्रकाशन

५) भांडारकर, पु. ल., सामाजिक संशोधन पद्धती, महाराष्ट्र ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, ९७६.


❑❑❑

**घटक २**

# इतिहास लेखनाची प्रक्रिया
# (Process of History Writing)

२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.१.१ संशोधन प्रस्तावाची तयारी (Preparation of Research Proposal):

२.१.२ संशोधनाची साधने (Tools of research): टिपणे काढणे (Note-taking), तळटीपा व अंत्यटीपा (Footnotes, Endnotes), शब्दसूची (Glossary), परिशिष्ट (ppendix), सूची (Index), संदर्भग्रंथ सूची (Bibliography):

२.१.३ अहवाल लेखन आणि सादरीकरण (Report writing and presentation):

२.१.४ वाङ्मयचौर्य आणि बौद्धिक संपदा अधिकार (Plagiarism and Intellectual Property Rights :

२.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

२.४ स्वय-अध्ययन प्रश्न व प्रश्नांची उत्तरे

२.५ सारांश

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ संदर्भ ग्रंथ व अधिक वाचनसाठीची पुस्तके

**२.० उद्दिष्टे**

या घटकाचा सविस्तर अभ्यास केल्यानंतर विद्यार्थ्यांना पुढील गोष्टींचे आकलन होईल..

१) संशोधन प्रस्ताव कसा तयार करायचा आणि त्याचे महत्त्व काय आहे, हे सांगू शकतील.

२) संशोधनासाठी चांगला विषय कसा निवडायचा आणि त्याची मर्यादा कशी ठरवायची, हे समजून घेतील.

३) संदर्भासाठी पुस्तके वाचताना त्यातील महत्त्वाच्या माहितीची शास्त्रशुद्ध टिपणे काढायला शिकतील.

४) माहितीचा स्रोत सांगण्यासाठी तळटीपा आणि अंत्यटीपा यांचा योग्य वापर करण्याचे कौशल्य मिळवतील.

५) संशोधनातील कठीण किंवा तांत्रिक शब्दांची यादी तयार करण्यास शिकतील.

६) प्रबंधाच्या शेवटी वापरलेल्या पुस्तकांची व इतर साधनांची यादी योग्य पद्धतीने कशी मांडायची, हे समजेल.

७) संशोधनाचे निष्कर्ष मांडून अंतिम अहवाल तयार करणे आणि त्याचे सादरीकरण करण्याचे ज्ञान मिळेल.

८) दुसऱ्याचे साहित्य स्वतःचे म्हणून वापरणे ही चूक कशी टाळायची, याबद्दल जागरूक होतील.

९) स्वतःच्या संशोधनाचे हक्क सुरक्षित कसे ठेवायचे, याची ओळख होईल.

१०) संशोधनाच्या शेवटी जास्तीची माहिती परिशिष्टे, सूची जोडून अहवाल वाचनीय बनवण्यास शिकतील.

**२.१ प्रास्ताविक:**

इतिहास म्हणजे केवळ घडून गेलेल्या घटनांची जंत्री नसून, ते भूतकाळाचे केलेले एक वस्तुनिष्ठ आणि तर्कशुद्ध विश्लेषण असते. ज्याप्रमाणे विज्ञानामध्ये प्रयोगांना महत्त्व असते, त्याचप्रमाणे इतिहासलेखनामध्ये शास्त्रशुद्ध संशोधन पद्धतीला अनन्यसाधारण स्थान आहे. एक दर्जेदार आणि विश्वासार्ह इतिहासलेखन साकारण्यासाठी संशोधकाला संशोधनाच्या विविध शास्त्रीय टप्प्यांमधून जावे लागते. हे टप्पे केवळ मार्गदर्शक नसून ऐतिहासिक सत्यापर्यंत पोहोचण्याचे प्रबळ साधन आहेत.

इतिहास संशोधनाची पहिली पायरी म्हणजे योग्य विषयाची निवड. हा पाया जितका भक्कम, तितका संशोधनाचा डोलारा सुरक्षित असतो. विषय निवडताना संशोधकाने आपली वैयक्तिक रुची, साधनांची उपलब्धता, विषयाची नाविन्यपूर्णता आणि संबंधित कालखंडातील भाषेचे ज्ञान या निकषांचा सखोल विचार करणे आवश्यक असते. केवळ आवडीपोटी घाईने निवडलेला विषय संशोधनासारख्या प्रदीर्घ प्रवासात अडथळा ठरू शकतो. या प्रक्रियेत पूर्व संशोधनाचा आढावा घेणे अत्यंत कळीचे ठरते, कारण संशोधक शून्यातून कार्य करू शकत नाही. उपलब्ध साहित्याचा अभ्यास केल्यामुळे संशोधन दरी शोधणे आणि पुनरावृत्ती टाळणे शक्य होते.

संशोधन प्रक्रियेत गृहीतकांची मांडणी हे एक तात्पुरते पूर्वानुमान असते, जे संशोधनाला निश्चित दिशा देते. त्यानंतर तयार केला जाणारा संशोधन आराखडा प्रकरणांची सुसूत्र मांडणी, पद्धतीशास्त्र आणि संशोधनाच्या मर्यादा स्पष्ट करतो. इतिहासात पुराव्यांना अनन्यसाधारण महत्त्व असल्यामुळे साधनांचे प्राथमिक (समकालीन पुरावे) आणि दुय्यम (नंतरचे विश्लेषण) अशा गटांत वर्गीकरण करून त्यांची चिकित्सा केली जाते. साधनांचे बहिरंग आणि अंतरंग परीक्षण केल्यामुळे माहितीतील बनावटपणा दूर होऊन केवळ अस्सल पुराव्यांच्या आधारे ऐतिहासिक सत्याचा शोध घेतला जातो. अखेर, हे सर्व संशोधन

अहवाल किंवा प्रबंध रूपाने मांडताना त्याची भाषा शैली प्रवाही आणि तर्कसंगत असणे गरजेचे असते. संदर्भ सूची, तळटीपा आणि परिशिष्टे यांच्या वापरामुळे संशोधनाला शैक्षणिक दर्जा प्राप्त होतो. अशा प्रकारे, विषयाच्या निवडीपासून ते अहवाल सादरीकरणापर्यंतची ही प्रक्रिया एका जबाबदार इतिहास लेखनाचा पाया रचते.

**२.१.१ संशोधन प्रस्तावाची तयारी:**

इतिहास म्हणजे केवळ घडून गेलेल्या घटनांची नोंद नव्हे, तर भूतकाळाचे वस्तुनिष्ठ आणि तर्कशुद्ध विश्लेषण होय. ज्याप्रमाणे विज्ञानात प्रयोगशाळेतील प्रयोगांना महत्त्व असते, त्याचप्रमाणे इतिहासलेखनात संशोधन पद्धतीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. एक दर्जेदार इतिहासलेखन होण्यासाठी संशोधकाला संशोधनाच्या विविध शास्त्रीय पायऱ्यांमधून जावे लागते. या पायऱ्या केवळ मार्गदर्शक नसून त्या ऐतिहासिक सत्यापर्यंत पोहोचण्याचे साधन आहेत. ऐतिहासिक संशोधनाचे हे टप्पे खालीलप्रमाणे विस्ताराने अभ्यासता येतील:

**१) विषयाची निवड:**

इतिहास संशोधनाची पहिली आणि अत्यंत महत्त्वाची पायरी म्हणजे योग्य विषयाची निवड करणे. संशोधनाचा संपूर्ण डोलारा या निवडीवर उभा असतो.

**अ) मूलभूत विचार:**

संशोधनाचा पाया विषयाच्या निवडीवर अवलंबून असतो. केवळ आवडीखातर घाईने विषय निवडणे अविवेकीपणाचे ठरू शकते. संशोधकाने विषयाची व्याप्ती, त्यावर आधी झालेले काम आणि उपलब्ध साधनांचा सखोल विचार करणे आवश्यक आहे. विषयाचे गांभीर्य आणि संशोधनाची व्यवहार्यता तपासल्याशिवाय संशोधनाला सुरुवात करणे म्हणजे दिशाहीन प्रवास करण्यासारखे आहे.

**ब) विषय निवडीचे निकष:**

इतिहास संशोधनासाठी विषयाची निवड करणे ही एक जबाबदारीची प्रक्रिया आहे. संशोधनाचा दर्जा आणि यश हे प्रामुख्याने संशोधकाने स्वतःला विचारलेल्या काही मूलभूत प्रश्नांवर अवलंबून असते.

१) **वैयक्तिक रुची:** संशोधनाचा प्रवास प्रदीर्घ असतो; जर विषयात मनापासून ओढ नसेल, तर अर्धवट प्रवासात कंटाळा येऊ शकतो. त्यामुळे संशोधकाचा उत्साह टिकवून ठेवण्यासाठी विषयाची आवड असणे ही पहिली पायरी आहे.

२) **साधनांची उपलब्धता आणि आवाका:** इतिहास हा पुराव्यांवर आधारित असतो. संशोधनासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे, जुन्या नोंदी किंवा पुरातत्वीय पुरावे सहज उपलब्ध होणार आहेत का, याचा अंदाज घेणे गरजेचे असते. अनेकदा साधने उपलब्ध असतात, पण ती परदेशातील दप्तराखान्यात किंवा खासगी संग्रहात असू शकतात; अशा वेळी ती मिळवणे आपल्या आर्थिक आणि भौतिक आवाक्यात आहे का, हे तपासावे लागते.

३) **नाविन्यपूर्णता:** संशोधनाचा मूळ उद्देश ज्ञानात भर टाकणे हा असतो. जर निवडलेल्या विषयावर यापूर्वीच भरपूर काम झाले असेल आणि आपणही तेच पुन्हा मांडणार असू, तर त्याला संशोधकीय मूल्य राहत नाही. त्यामुळे आपल्या अभ्यासातून एखादा नवीन पैलू, नवा निष्कर्ष किंवा नवीन माहिती समोर येईल का, याची खात्री करणे अनिवार्य आहे. या चारही निकषांवर तावून सुलाखून घेतलेला विषयच एका दर्जेदार इतिहासलेखनाला जन्म देतो.

**क) भाषेचे ज्ञान:**

इतिहास संशोधनासाठी संबंधित कालखंडातील भाषा आणि लिपीचे ज्ञान असणे हे एक अनिवार्य कौशल्य आहे. मराठा कालखंडातील मोडी असो वा मध्ययुगीन फारसी-उर्दू, या भाषा अवगत असल्याशिवाय मूळ कागदपत्रांचा अचूक अर्थ लावता येत नाही. भाषेच्या अज्ञानामुळे ऐतिहासिक तथ्यांचा विपर्यास होण्याची भीती असते, म्हणूनच भाषाप्रभुत्व हे संशोधनाचे महत्त्वाचे हत्यार आहे.

**ड) स्थानिक इतिहास:**

विद्यार्थ्यांनी आपल्या सभोवतालचा इतिहास शोधण्यावर भर दिला पाहिजे. परिसरातील जुने वाडे, मंदिरे, शिलालेख किंवा स्थानिक परंपरांचा सूक्ष्म अभ्यास केल्यास अनेक दुर्लक्षित ऐतिहासिक संदर्भ उजेडात येऊ शकतात. स्थानिक इतिहास केवळ माहिती देत नाही, तर तो व्यापक राष्ट्रीय इतिहासाचे दुवे जोडण्यास मदत करतो, ज्यामुळे संशोधनात एक प्रकारची जिवंतपणा येतो.

**२) पूर्व संशोधनाचा आढावा:**

इतिहास संशोधनामध्ये विषयाची निश्चिती झाल्यानंतरची अत्यंत महत्त्वाची पायरी म्हणजे पूर्व संशोधनाचा आढावा घेणे होय. कोणताही संशोधक शून्यातून कार्य करू शकत नाही; त्यासाठी त्याला त्या विषयावर पूर्वी झालेल्या कामाचा पाया समजून घ्यावा लागतो. या प्रक्रियेत संशोधक निवडलेल्या विषयाशी संबंधित उपलब्ध असलेल्या सर्व साहित्याचा, म्हणजेच संदर्भग्रंथ, प्रकाशित शोधनिबंध, जुन्या संशोधन पत्रिका आणि विविध विद्यापीठांतील प्रबंधांचा सखोल अभ्यास करतो.

या टप्प्याचे महत्त्व बहुआयामी आहे. सर्वप्रथम, पूर्व वाचनामुळे संशोधकाला आपल्या विषयाची खरी व्याप्ती समजते. आपण ज्या विषयावर काम करू इच्छितो, त्यावर आधीच्या संशोधकांनी नेमके काय मांडले आहे आणि त्यांनी मांडलेले निष्कर्ष कोणते आहेत, याची स्पष्टता येते. यातूनच संशोधन दरी (Research Gap) शोधणे शक्य होते. म्हणजेच, आधीच्या अभ्यासात कोणत्या त्रुटी राहिल्या आहेत, कोणते ऐतिहासिक पुरावे दुर्लक्षित राहिले आहेत किंवा कोणत्या पैलूंचे विश्लेषण अपूर्ण आहे, हे संशोधकाच्या लक्षात येते.

आजच्या आधुनिक युगात माहिती तंत्रज्ञानामुळे हा आढावा घेणे अधिक सुलभ झाले आहे. शोधगंगा सारख्या राष्ट्रीय डिजिटल भांडाराचा वापर करून संशोधक घरबसल्या विविध विद्यापीठांतील हजारो प्रबंध पाहू शकतो. या व्यापक वाचनामुळे संशोधकाची दृष्टी अधिक प्रगल्भ होते आणि त्याला स्वतःचा एक नवा दृष्टिकोन विकसित करण्यास मदत होते. थोडक्यात, पूर्व संशोधनाचा आढावा संशोधकाला पुनरावृत्ती

टाळण्यास मदत करतो आणि त्याच्या संशोधनाला मौलिकता व शास्त्रीय दर्जा प्राप्त करून देतो.

**३) गृहीतकांची मांडणी:**

गृहीतक म्हणजे संशोधनाविषयी केलेले एक तात्पुरते पूर्वानुमान होय. विषय निवडीच्या वेळी संशोधकाकडे जे प्राथमिक ज्ञान असते, त्या आधारे तो काही मते गृहीत धरतो. संशोधनाच्या ओघात ही गृहीतके सत्याच्या कसोटीवर उतरली तरच ती स्वीकारली जातात; अन्यथा ती नाकारली जातात. गृहीतके संशोधनाला एक निश्चित दिशा देतात, परंतु संशोधकाने त्याविषयी पूर्वग्रहदूषित असू नये. इतिहासात केवळ सत्यालाच स्थान असते, त्यामुळे संशोधनांती जर गृहीतक चुकीचे ठरले, तर त्याचा त्याग करून वस्तुनिष्ठ निष्कर्षाकडे जावे लागते.

**४) संशोधन आराखडा:**

**अ) प्रकरणांची मांडणी:** संशोधनाचा विषय निश्चित झाल्यावर त्याचा आशय आणि स्वरूप लक्षात घेऊन प्रकरणांची विभागणी केली जाते. हा इतिहास राजकीय घडामोडींचा आहे, की सामाजिक-आर्थिक बदलांचा, यावर प्रकरणांची संख्या आणि त्यांची शीर्षके अवलंबून असतात. ही मांडणी संशोधनाला एक सुसूत्रता देते, ज्यामुळे वाचकाला ऐतिहासिक घटनांचा प्रवाह समजून घेणे सोपे जाते.

**ब) पद्धतीशास्त्र:** इतिहास केवळ वाचनावर अवलंबून नसतो, तर तो पुराव्यांच्या शोधपद्धतीवर उभा असतो. संशोधनासाठी माहिती कशी गोळा करायची, याचे तंत्र येथे निश्चित केले जाते. विषयानुरूप तज्ज्ञांच्या मुलाखती घेणे, प्रत्यक्ष ऐतिहासिक स्थळांना भेटी देऊन निरीक्षण करणे किंवा प्रश्नावलीच्या माध्यमातून माहिती संकलित करणे, या शास्त्रीय पद्धतींचा वापर करून संशोधनाचा दर्जा उंचावला जातो.

**क) मर्यादा आणि व्याप्ती:** कोणतेही संशोधन अफाट असू शकत नाही, त्याला विशिष्ट सीमा असाव्या लागतात. संशोधक आपल्या अभ्यासाचा नेमका कालखंड (उदा. १८ व्या शतकाचा उत्तरार्ध) आणि भौगोलिक सीमा (उदा. दक्षिण महाराष्ट्र) स्पष्ट करतो. या मर्यादेमुळे संशोधनाचे लक्ष विचलित होत नाही. तसेच, आराखड्यामुळे भविष्यात येणाऱ्या अडचणींचा अंदाज आधीच आल्याने संशोधनाचा मार्ग अधिक सुलभ आणि निर्दोष होतो.

**५) कागदपत्रांचे संघटन व व्यवस्थापन:**

इतिहास संशोधनात केवळ माहिती मिळवणे पुरेसे नसते, तर त्या माहितीचे सुसंगत संघटन करणे हे मोठे आव्हान असते. ऐतिहासिक पुरावे शोधणे आणि त्यांचे नियोजन करणे ही अत्यंत कष्टाची व संयमाची प्रक्रिया आहे. अनेकदा जुनी कागदपत्रे, मोडी पत्रे किंवा हस्तलिखिते विखुरलेल्या स्वरूपात, धुळीने माखलेल्या दप्तरखान्यात किंवा खासगी संग्रहात असतात. या विस्कळीत पुराव्यांना एकत्रित करून विषयानुसार त्यांचे वर्गीकरण करणे, ही संशोधनाची महत्त्वाची पायाभरणी असते.

**अ) प्रत्यक्ष निरीक्षण:** वास्तू संशोधनासारख्या विषयांमध्ये केवळ लिखित साधनांवर अवलंबून राहणे अपूर्ण ठरू शकते. अशा वेळी प्रत्यक्ष स्थळभेट हाच महत्त्वाचा पुरावा ठरतो. प्रत्यक्ष वास्तू पाहिल्यानंतर तिची मोजमापे घेणे, वास्तुकलेचे सूक्ष्म निरीक्षण करणे, महत्त्वाच्या भागांची रेखाचित्रे काढणे आणि

छायाचित्रण करणे अनिवार्य असते. हे भौतिक पुरावे संशोधनाला जिवंतपणा देतात आणि पुराव्यांची विश्वासार्हता वाढवतात.

ब) **माहिती संकलन आणि व्यवस्थापन:** जर संशोधनाचा विषय अर्वाचीन किंवा अलीकडील काळातील असेल, तर कागदपत्रांसोबतच मौखिक साधनांचे महत्त्व वाढते. अशा वेळी त्या घटनेचे साक्षीदार किंवा संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मुलाखती घेतल्या जातात. तसेच सर्वेक्षणाद्वारे माहिती गोळा केली जाते. मात्र, ही सर्व माहिती कच्च्या स्वरूपात असते. या माहितीचे योग्य व्यवस्थापन करून, तिची तर्कशुद्ध वर्गवारी करणे आणि ती स्वतःच्या प्रवाही भाषेत मांडणे, हे संशोधकाचे खरे कौशल्य आहे. माहितीचे हे संघटनच संशोधनाचा दर्जा आणि ऐतिहासिक सत्यता अधोरेखित करते.

**६) साधनांचे वर्गीकरण:**

इतिहास संशोधनामध्ये साधनांचे स्थान अनन्यसाधारण आहे; त्यांना इतिहासलेखनाचा आत्मा' मानले जाते, कारण पुराव्याविना मांडलेला इतिहास हा केवळ कल्पनाविलास ठरतो. संशोधकाला उपलब्ध माहितीचा डोंगर उपसताना गोंधळ होऊ नये, म्हणून संशोधनाच्या सुलभतेसाठी या साधनांचे प्रामुख्याने प्राथमिक आणि दुय्यम अशा दोन प्रमुख गटांत वर्गीकरण केले जाते.

**अ) प्राथमिक साधने:**

प्राथमिक साधने म्हणजे घटनेच्या काळातील प्रत्यक्ष पुरावे. प्रा. कार्ल गुस्तावन यांच्या मते, ही साधने मूळ स्वरूपातील आणि समकालीन असतात, ज्यावर कोणतीही संस्कारित प्रक्रिया झालेली नसते.

अ) **लिखित साधने:** यामध्ये शिलालेख, ताम्रपट, अधिकृत तह, करार, कैफियती आणि राजाज्ञा यांचा समावेश होतो. हे पुरावे सर्वाधिक विश्वसनीय मानले जातात.

ब) **भौतिक/अलिखित साधने:** पुरातन नाणी, वास्तू आणि उत्खननात सापडलेले अवशेष ऐतिहासिक कालखंडाची प्रत्यक्ष साक्ष देतात.

क) **आधुनिक साधने:** विसाव्या शतकापासून ध्वनीफिती, दुर्मिळ छायाचित्रे आणि चित्रफिती यांसारखी तांत्रिक साधने प्राथमिक पुरावे म्हणून वापरली जात आहेत.

**ब) दुय्यम साधने:**

ज्या साधनांची निर्मिती प्राथमिक साधनांच्या अभ्यासातून किंवा विश्लेषणातून कालांतराने होते, त्यांना दुय्यम साधने म्हणतात. प्रसिद्ध इतिहासकार इ. एच. कार यांच्या मते, या साधनांचा लेखक घटनेचा प्रत्यक्षदर्शी नसतो, तर तो उपलब्ध माहितीचा अर्थ लावणारा असतो. उदा. चरित्रग्रंथ, बखरी, तवारीखा, प्रकाशित संदर्भग्रंथ आणि सरकारी गॅझेट्स. ही साधने प्राथमिक साधनांइतकी प्रभावी नसली, तरी घटनेचा संदर्भ आणि अन्वयार्थ लावण्यासाठी संशोधकाला त्यांचा मोठा आधार घ्यावा लागतो.

**७) कागदपत्रांचे परीक्षण:**

इतिहास संशोधन ही केवळ माहिती गोळा करण्याची प्रक्रिया नसून ती एक अत्यंत चिकित्सक क्रिया

आहे. हाती लागलेला प्रत्येक कागद किंवा पुरावा सत्य असेलच असे नाही. म्हणूनच, मिळालेली माहिती जशीच्या तशी न स्वीकारता तिची शास्त्रीय कसोट्यांवर पडताळणी करणे म्हणजेच साधन चिकित्सा किंवा परीक्षण होय. संशोधनाच्या विश्वासार्हतेसाठी हे परीक्षण दोन स्तरांवर केले जाते.

**अ) बाह्य किंवा बहिरंग परीक्षण:**

याचा मुख्य उद्देश कागदपत्राची अस्सलता तपासणे हा असतो. ज्याप्रमाणे एखादा हिरा खरा आहे की खोटा हे बाह्यतः तपासले जाते, तसेच येथे कागदपत्राचा बाह्य भौतिक अंगाने विचार होतो. यामध्ये तो दस्तऐवज कोणत्या कालखंडातील आहे, लेखनासाठी वापरलेली शाई, कागदाचा अथवा तूचा प्रकार कोणता आहे, याची तपासणी केली जाते. लेखकाची भाषाशैली, लिपी आणि हस्ताक्षर त्या काळाशी जुळते का हे पाहिले जाते. या परीक्षणाने माहितीतील बनावटपणा दूर होऊन संशोधनासाठी केवळ अस्सल साधनांचीच निवड केली जाते.

**ब) अंतर्गत किंवा अंतरंग परीक्षण:**

एकदा का कागदपत्र बाह्यतः अस्सल ठरले की, संशोधक त्यातील आशयाची सत्यता तपासण्यासाठी अंतर्गत परीक्षणाकडे वळतो. एखादा कागद जुना असला तरी त्यातील मजकूर शंभर टक्के खरा असेलच असे नाही.

अ) **सकारात्मक परीक्षण:** यामध्ये लेखकाने वापरलेले शब्द आणि त्यामागील त्याचा नेमका अर्थ काय आहे, हे भाषिक अंगाने समजून घेतले जाते. लेखकाची नेमकी भूमिका काय होती, याचा शोध यात घेतला जातो.

ब) **नकारात्मक परीक्षण:** याला उच्च प्रकारचे परीक्षण मानले जाते. येथे संशोधक एक संशयी म्हणून भूमिकेत शिरतो. लेखकाची पात्रता काय होती? तो पूर्वग्रहदूषित होता का? त्याला सत्य सांगण्याची इच्छा होती का? यावर पद्धतशीर संशय घेऊन सत्याचा शोध घेतला जातो.

**८) गृहीतकांची पडताळणी व तथ्य विश्लेषण:**

इतिहास संशोधनाच्या या टप्प्यावर संशोधक आपल्या सुरुवातीला मांडलेल्या गृहीतकांची प्रत्यक्ष पुराव्यांच्या आधारे पडताळणी करतो. संकलित केलेली साधने आणि त्यांचे केलेले परीक्षण यातून समोर आलेली माहिती संशोधकाने सुरुवातीला केलेल्या अनुमानांशी जुळते का, हे येथे तपासले जाते. जर पुरावे गृहीतकांना छेद देणारे असतील, तर संशोधक त्यांचा त्याग करून नव्या सत्याचा स्वीकार करतो.

केवळ घटनांची यादी करणे म्हणजे इतिहास नव्हे; तर त्या घटनांमधील कार्यकारणभाव शोधणे महत्त्वाचे असते. इतिहासकार पुराव्यांचा तर्कशुद्ध अर्थ लावून मृत तथ्यांना बोलते करतो. एखादी घटना का घडली आणि तिचे परिणाम काय झाले, याचे शास्त्रीय विश्लेषण येथे केले जाते. या प्रक्रियेत संशोधकाचा तटस्थपणा आणि तर्कशक्ती अत्यंत महत्त्वाची ठरते. या तावून सुलाखून निघालेल्या विश्लेषणातूनच एका वस्तुनिष्ठ आणि विश्वासार्ह इतिहासाची निर्मिती होते, जो काळाच्या कसोटीवर टिकून राहतो.

**९) संशोधन अहवाल किंवा प्रबंध लेखन:**

**अ) भाषाशैली:** संशोधन अहवाल हे संपूर्ण प्रक्रियेचे अंतिम फलित असल्याने त्याची भाषा अत्यंत प्रभावी आणि प्रवाही असावी लागते. क्लिष्ट शब्दांऐवजी साधी, सुटसुटीत आणि तर्कसंगत भाषा वापरल्यास सामान्य वाचकांनाही विषय सहज समजतो. ऐतिहासिक घटनांची मांडणी कालक्रमानुसार असावी, जेणेकरून वाचकाला इतिहासाचा प्रवाह आणि कार्यकारणभाव स्पष्टपणे उमजेल.

**ब) प्रबंधाची मांडणी:** प्रबंधाची रचना शास्त्रशुद्ध असणे अनिवार्य आहे. यामध्ये लेखकाचे मनोगत, ऋणनिर्देश, आणि अनुक्रमणिका यांसारख्या प्राथमिक बाबींनंतर प्रकरणांनुसार मुख्य लेखन येते. शेवटी उपसंहार देऊन निष्कर्षांची मांडणी केली जाते. लेखनाची विश्वासार्हता सिद्ध करण्यासाठी नकाशे, छायाचित्रे आणि प्रत्येक पानाच्या शेवटी दिलेल्या तळटिपा अत्यंत कळीची भूमिका बजावतात.

**१०) संदर्भ ग्रंथांची यादी:**

ऐतिहासिक संशोधनाचा शेवटचा पण अत्यंत महत्त्वाचा टप्पा म्हणजे संदर्भ सूची तयार करणे. प्रबंधाच्या शेवटी आपण वापरलेल्या सर्व साधनांची पद्धतशीर नोंद करणे, हे संशोधकाचे नैतिक आणि कायदेशीर कर्तव्य असते. ही यादी केवळ एक यादी नसून, संशोधकाने किती सखोल अभ्यास केला आहे आणि त्याच्या मांडणीला किती भक्कम आधार आहे, याची ती साक्ष देते.

**अ) क्रमवारी:** संदर्भ सूचीची मांडणी करताना एक विशिष्ट शास्त्रशुद्ध क्रम पाळावा लागतो. सर्वात आधी प्राथमिक साधनांची नोंद केली जाते. त्यानंतर दुय्यम साधने म्हणजेच संदर्भग्रंथांची यादी येते. यानंतर विषयाशी संबंधित नियतकालिके, शोधनिबंध आणि सर्वात शेवटी आधुनिक काळातील इंटरनेटवरील संदर्भांचा उल्लेख केला जातो. ही क्रमवारी वाचकाला मूळ साधनापर्यंत पोहोचण्यासाठी मार्गदर्शक ठरते.

**ब) लेखन पद्धती:** संदर्भ देण्याचे एक ठराविक तंत्र आहे, ज्यामुळे त्या ग्रंथाची ओळख पटणे सोपे होते. सामान्यतः संदर्भ देताना प्रथम लेखकाचे आडनाव, त्यानंतर त्याचे नाव, स्वल्पविराम देऊन ग्रंथाचे नाव, आवृत्ती, प्रकाशनाचे वर्ष आणि शेवटी ठिकाण अशी नोंद केली जाते. या अचूकतेमुळे संशोधनाला शैक्षणिक दर्जा प्राप्त होतो आणि वाङ्मयीन चौर्याचा धोका टळतो.

**स्वय-अध्ययन प्रश्न क्र १**

१) इतिहास संशोधनाची पहिली आणि अत्यंत महत्त्वाची पायरी कोणती आहे?

अ) थेट निष्कर्ष मांडून प्रबंध लेखन करणे

ब) इतरांनी लिहिलेला इतिहास पुन्हा शब्दबद्ध करणे

क) संशोधनासाठी योग्य विषयाची निवड करणे

ड) केवळ ऐतिहासिक स्थळांना भेटी देणे

२) इतिहास संशोधनात पूर्व संशोधनाचा आढावा घेण्याचे मुख्य कारण काय आहे?

अ) केवळ दुसऱ्या लेखकांच्या चुका काढण्यासाठी

ब) जास्तीत जास्त पुस्तकांची नावे पाठ करण्यासाठी

क) संशोधनाचा काळ वाढवून वेळ घालवण्यासाठी

ड) संशोधनातील पुनरावृत्ती टाळण्यासाठी आणि संशोधनातील उणीवा शोधण्यासाठी

३) संशोधन प्रक्रियेत गृहीतक म्हणजे नेमके काय असते?

अ) लेखकाचे वैयक्तिक मत आणि आवड

ब) संशोधनाविषयी केलेले एक तात्पुरते पूर्वानुमान

क) इतरांनी सांगितलेली काल्पनिक कथा

ड) बदलता न येणारे अंतिम सत्य

४) ऐतिहासिक साधनांचे प्रामुख्याने कोणत्या दोन गटांत वर्गीकरण केले जाते?

अ) लेखी साधने आणि काल्पनिक साधने

ब) स्वदेशी साधने आणि परदेशी साधने

क) प्राथमिक साधने आणि दुय्यम साधने

ड) जुनी साधने आणि नवीन साधने

५) खालीलपैकी कोणते प्राथमिक साधनाचे उदाहरण आहे?

अ) चित्रपट आणि काल्पनिक नाटके

ब) पुष्कळ वर्षांनंतर लिहिलेली चरित्रे

क) ऐतिहासिक घटनांवर आधारित वर्तमानपत्रातील लेख

ड) घटनेच्या काळातील शिलालेख आणि ताम्रपट

६) कागदपत्रांचे बाह्य परीक्षण करताना कोणत्या गोष्टी तपासल्या जातात?

अ) कागदपत्राचा काळ, शाई, लिपी आणि लेखकाची शैली

ब) लेखकाच्या मनातील गुप्त विचार आणि भावना

क) कागदपत्राची किंमत किती आहे हे ठरवणे

ड) लेखकाला किती पुरस्कार मिळाले होते हे तपासणे

७) नकारात्मक अंतर्गत परीक्षणात संशोधकाची भूमिका कशी असते?

अ) तो लेखकाने लिहिलेले सर्व काही सत्य मानतो

ब) तो केवळ स्वतःच्या मतालाच प्राधान्य देतो

क) तो केवळ लेखकाचे कौतुक करण्यासाठी वाचतो

ड) तो लेखकाच्या पात्रतेवर आणि पूर्वग्रहावर पद्धतशीर संशय घेतो

८) निक इतिहासाचा अभ्यास का महत्त्वाचा मानला जातो?

अ) कारण त्यासाठी जुन्या कागदपत्रांची गरज भासत नाही

ब) त्यामुळे केवळ आपल्याच गावाची प्रसिद्धी वाढते

क) कारण स्थानिक इतिहास अभ्यासणे सर्वात सोपे असते

ड) तो व्यापक राष्ट्रीय इतिहासाचे दुवे जोडण्यास मदत करतो

९) प्रबंधाच्या शेवटी संदर्भ ग्रंथांची यादी देणे का अनिवार्य आहे?

अ) केवळ पुस्तकांच्या लेखकांना मदत करण्यासाठी

ब) प्रबंधाची पाने वाढवून तो मोठा दिसावा यासाठी

क) लेखनाची विश्वासार्हता सिद्ध करण्यासाठी आणि वाङ्मयीन चौर्य टाळण्यासाठी

ड) लेखकाला किती पुस्तके वाचता येतात हे दाखवण्यासाठी

१०) इतिहास संशोधनात संबंधित कालखंडातील भाषेचे ज्ञान असणे का आवश्यक आहे?

अ) जुनी गाणी आणि कविता समजून घेण्यासाठी

ब) मूळ कागदपत्रांचा अचूक अर्थ लावण्यासाठी आणि विपर्यास टाळण्यासाठी

क) इतर संशोधकांवर आपली छाप पाडण्यासाठी

ड) केवळ परदेशात नोकरी मिळवण्यासाठी

**२.१.२ संशोधनाची साधने:** टिपणे काढणे, तळटीपा व अंत्यटीपा, शब्दकोश/शब्दसूची, परिशिष्ट, सूची, संदर्भग्रंथ सूची:

**१) टिपण काढणे:**

इतिहास संशोधनाचा प्रवास हा पुराव्यांच्या शोधापासून सुरू होतो आणि या प्रवासातील सर्वात कळीचा टप्पा म्हणजे संदर्भ साधनांचे संकलन व त्यातील माहितीची नोंद करणे होय. इतिहासकार जेव्हा एखाद्या विषयावर संशोधन करतो, तेव्हा त्याला हजारो पानांची कागदपत्रे, ग्रंथ, हस्तलिखिते आणि पुराभिलेखीय

साधनांमधून जावे लागते. ही सर्व साधने जशीच्या तशी संशोधनात वापरणे केवळ अशक्य नसते, तर ते अनावश्यकही असते. म्हणूनच, उपलब्ध अफाट माहितीमधून आपल्या विषयाशी सुसंगत, नेमकी आणि तर्कावर आधारित माहिती निवडून ती लिहून घेण्याच्या प्रक्रियेला टिपण काढणे असे म्हणतात. हे काम केवळ माहिती उतरवून काढण्याचे नसून, तो एक बौद्धिक प्रक्रियेचा भाग आहे. संशोधकाने संदर्भ साधनाचे काळजीपूर्वक वाचन करून, त्यातील आशयाचे विश्लेषण करून आणि त्यातील सत्यासत्यता पडताळून मगच आपली टिपणे तयार करणे अपेक्षित असते. जर या प्राथमिक टप्प्यावरच माहिती चुकीची नोंदवली गेली, तर संपूर्ण संशोधनाचा डोलारा कोसळू शकतो आणि ऐतिहासिक सत्याचा अपलाप होऊ शकतो.

### अ) नोटबुक किंवा वही पद्धत:

टिपण घेण्याच्या पद्धतींमध्ये काळानुरूप बदल होत गेले असून, संशोधकाच्या सोयीनुसार आणि विषयाच्या व्याप्तीनुसार विविध पारंपरिक पद्धती आजही अस्तित्वात आहेत. यातील पहिली आणि अत्यंत प्राथमिक पद्धत म्हणजे नोटबुक अथवा वही पद्धत होय. प्रामुख्याने नवीन संशोधक किंवा पदवी स्तरावरील विद्यार्थी या पद्धतीचा अवलंब करतात. यामध्ये संशोधक एका स्वतंत्र वहीत वाचलेल्या ग्रंथांतील माहिती क्रमाने लिहीत जातो. या पद्धतीचा मोठा फायदा असा की, सर्व माहिती एकाच ठिकाणी सुरक्षित राहते. मात्र, जसा संशोधनाचा विस्तार वाढतो, तशी ही पद्धत गैरसोयीची ठरू लागते. उदा. जर एखादा संशोधक महाराष्ट्राचा सामाजिक इतिहास या विषयावर काम करत असेल आणि त्याने एकाच वहीत स्त्री शिक्षण, जाती व्यवस्था आणि धार्मिक सुधारणा या तिन्ही विषयांची टिपणे सरमिसळ पद्धतीने लिहिली, तर अंतिम लेखन करताना त्याला विशिष्ट मुद्दा शोधण्यासाठी संपूर्ण वही चाळावी लागते. यामुळे वेळेचा अपव्यय होतो आणि विचारांची साखळी तुटण्याची शक्यता असते. अनेकदा अनुभवी संशोधक प्रत्येक प्रकरणासाठी वेगळी वही वापरून हा दोष दूर करण्याचा प्रयत्न करतात, तरीही माहितीची अदलाबदल करणे किंवा दोन मुद्द्यांची तुलना करणे या पद्धतीत कठीण जाते.

### ब) फाईल पद्धत:

वही पद्धतीतील ही अडचण दूर करण्यासाठी फाईल पद्धत अधिक सोयीस्कर ठरते. या पद्धतीत संशोधक सुट्या कागदांवर टिपणे काढतो आणि विषयाच्या किंवा प्रकरणांच्या विभागणीनुसार त्या कागदांचे वर्गीकरण करून ते वेगवेगळ्या फाईल्समध्ये लावतो. या पद्धतीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे तिची लवचिकता. संशोधनादरम्यान जेव्हा एखादी नवीन माहिती किंवा नवीन संदर्भ मिळतो, तेव्हा तो कागद संबंधित फाईलमध्ये योग्य त्या ठिकाणी सहजपणे लावता येतो. ऐतिहासिक घटनांचा कालानुक्रम लावताना ही पद्धत अतिशय उपयुक्त ठरते. मात्र, फाईल पद्धतीतही काही उणिवा आहेत. सुटे कागद असल्याने ते गहाळ होण्याची भीती असते. तसेच, जर एखादा ऐतिहासिक पुरावा दोन वेगवेगळ्या प्रकरणांशी संबंधित असेल, तर तो एकाच फाईलमध्ये अडकून पडतो आणि दुसऱ्या प्रकरणाचे विश्लेषण करताना तो डोळ्यासमोर राहत नाही. अशा वेळी संशोधकाला वारंवार फाईल्स शोधाव्या लागतात, ज्यामुळे संशोधनाच्या गुणवत्तेवर परिणाम होऊ शकतो.

### क) कार्ड किंवा स्लीप पद्धत:

या सर्व मर्यादांवर मात करणारी आणि इतिहास संशोधनात सर्वाधिक शास्त्रशुद्ध मानली जाणारी पद्धत म्हणजे कार्ड किंवा स्लीप पद्धत होय. यालाच इंडेक्स कार्ड पद्धत असेही म्हणतात. ही पद्धत अत्यंत शिस्तबद्ध असून मोठ्या संशोधनासाठी ती अनिवार्य मानली जाते. यामध्ये साधारणपणे ४ बाय ६ इंच किंवा ८ बाय ६ इंच आकाराच्या कार्डांचा वापर केला जातो. या पद्धतीचा मुख्य नियम म्हणजे एका कार्डावर केवळ एकच मुद्दा लिहिणे. कार्डाच्या वरच्या बाजूला विषयाचे शीर्षक, मधल्या भागात मुख्य टिपण आणि खालच्या भागात त्या माहितीचा पूर्ण संदर्भ (ग्रंथाचे नाव, लेखक, पृष्ठ क्रमांक इ.) नोंदवलेला असतो. ही कार्डे लहान असल्याने ती विषयानुसार, कालखंडानुसार किंवा व्यक्तीनुसार सहजपणे वर्गीकृत करता येतात. समजा, एखाद्या संशोधकाला १८५७ च्या उठावातील राणी लक्ष्मीबाई आणि तात्या टोपे यांच्यातील पत्रव्यवहारावर भाष्य करायचे असेल, तर तो या संबंधित कार्डे समोरासमोर ठेवून त्यांचे तुलनात्मक विश्लेषण करू शकतो. अंतिम लेखन करताना ही कार्डे प्रकरणाच्या क्रमाने लावली की संशोधकाचा कच्चा मसुदा आपोआप तयार होतो. यामुळे लेखनात कमालीची सुसूत्रता येते आणि तळटीपा देणे सोपे होते.

### अ) कार्डवरील टिपणाची पद्धत आणि मुद्दे :

**टिपण लेखनाची पद्धत**

| | | | |
|---|---|---|---|
| प्रकरणाचे नांव | उपप्रकरण | | दिनांक |
| | मुद्दा / संदर्भ टिपण नोंदी | | |
| लेखकाचे नाव | पुस्तकाचे नाव | प्रकाशक | पृष्ठ क्र. |

१) कार्डच्या शीर्षस्थानी, डाव्या बाजूस मुख्य प्रकरणाच्या नावाची नोंद, त्याशेजारी मध्यभागी उपप्रकरण आणि उपलब्ध असल्यास उजव्या बाजूस दिनांकाचा उल्लेख करावा.

२) कार्डच्या मध्यभागी आणि पाठीमागील बाजूस असलेल्या कोर्या जागेवर महत्त्वाचा मुद्दा मोजक्या शब्दात मांडावा.

३) कार्डच्या खाली डाव्या कोपऱ्यात ग्रंथ लेखकाचे नाव, त्याशेजारी पुस्तकाचे नाव, प्रकाशक आणि उजव्या बाजूच्या कोपर्यापमध्ये त्या संदर्भ ग्रंथामधील पृष्ठाचा क्रमांक लिहावा.

### ब) कार्ड पद्धती वापरताना घ्यायची दक्षता

कार्ड पद्धती ही जरी संशोधनातील सर्वात शास्त्रशुद्ध पद्धत असली, तरी तिचा वापर करताना विशिष्ट शिस्त पाळणे अनिवार्य असते. संशोधकाने प्रत्येक नवीन नोंदीसाठी स्वतंत्र कार्डाचा वापर करावा; एकाच

कार्डावर दोन वेगवेगळ्या विषयांची माहिती लिहिल्यास वर्गीकरण करताना गोंधळ उडू शकतो. टिपणे घेताना ती अत्यंत बिनचूक आणि स्पष्ट असावीत. केवळ मुख्य मजकूर न लिहिता, त्या संदर्भाविषयीची अतिरिक्त माहिती (उदा. लेखकाचा दृष्टिकोन किंवा त्या काळातील परिस्थिती) तिथेच नोंदवून ठेवावी, जेणेकरून भविष्यात संदर्भ आठवणे सोपे जाते.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, जर एखाद्या विषयाची माहिती आधीच्या संशोधकांनी विस्तृतपणे मांडली असेल आणि ती सर्वपरिचित असेल, तर अशा माहितीसाठी कार्ड्स खर्च करणे टाळावे. संशोधकाचा भर नवीन आणि दुर्मिळ माहितीवर असावा. तसेच, संदर्भातील एखादे महत्त्वाचे विधान किंवा अवतरण (Quotation) वापरायचे असेल, तर ते जसेच्या तसे लिहावे. त्यात स्वतःचे शब्द न घालता ते अवतरण चिन्हात नोंदवावे, जेणेकरून मूळ लेखकाचा आशय बदलणार नाही.

**क) कार्ड पद्धतीची उपयुक्तता आणि व्यवहार्यता**

इतिहास संशोधनात कार्ड पद्धत ही केवळ सोयीस्कर नसून ती अत्यंत व्यवहार्य ठरते. या पद्धतीचा सर्वात मोठा फायदा असा की, संशोधकाला हव्या त्या वेळी विषयानुसार मांडणी बदलता येते. संदर्भ ग्रंथांतील माहिती जशीच्या तशी उतरवून काढण्यापेक्षा, संशोधकाने स्वतःच्या भाषेत त्याचे स्पष्टीकरण लिहिणे अधिक प्रभावी ठरते. यामुळे लेखनात प्रवाहीपणा येतो. जेव्हा संशोधक कार्ड्सवर आधारित मांडणी करतो, तेव्हा त्याला प्रकरणांची रचना करणे सोपे जाते. अंतिम लिखाणाच्या वेळी ही कार्डे समोर ठेवून केवळ साखळी जोडण्याचे काम उरते. थोडक्यात, कार्ड पद्धतीमुळे संशोधनाच्या दर्जासोबतच संशोधकाचा आत्मविश्वासही वाढतो.

**४) टिपणे काढण्याच्या इतर प्रचलित पद्धती**

**अ) लघु टिपणे:**

ही पद्धत अत्यंत अनुभवी आणि कुशल संशोधकांसाठी उपयुक्त असते. जेव्हा एखादा महत्त्वाचा संदर्भ वाचताना अचानक सापडतो आणि तो लगेच सविस्तर लिहून घेण्याइतका वेळ नसतो, तेव्हा केवळ त्या ग्रंथाचे नाव, लेखक आणि पृष्ठ क्रमांक यांची नोंद एका कागदावर केली जाते. यालाच 'संकेत टिपणे' असेही म्हणता येईल. ही पद्धत पूर्ण माहितीसाठी नसून भविष्यात तो संदर्भ पुन्हा शोधण्यासाठी स्मरणखूण' म्हणून वापरली जाते.

**ब) छायाचित्रण आणि तांत्रिक साधनांचा वापर:**

काही वेळा ऐतिहासिक संदर्भ इतके व्यापक असतात की ते सर्व हाताने लिहून काढणे अशक्य असते. अशा वेळी झेरॉक्स, फोटोग्राफी किंवा मायक्रोफिल्म या साधनांचा आधार घेतला जातो. पूर्वीच्या काळी अशा आधुनिक सोयी नसल्याने संशोधकांना तासनतास हस्तलिखिते उतरवून काढावी लागत, ज्यामुळे वेळ आणि श्रमाचा मोठा अपव्यय होत असे. आता मात्र डिजिटल कॅमेऱ्यामुळे किंवा स्कॅनरमुळे दुर्मिळ कागदपत्रे जतन करणे सुलभ झाले आहे. यामुळे संशोधकाचा वेळ वाचतो आणि तो वाचलेला वेळ माहितीच्या विश्लेषणासाठी वापरता येतो.

## ५) आधुनिक टिपण पद्धती आणि तंत्रज्ञान

आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात टिपणे काढण्याच्या पारंपरिक पद्धतींना आधुनिक साधनांची जोड मिळाली आहे. विशेषतः संगणक, इंटरनेट आणि अँड्रॉइड मोबाईल' हे संशोधकाचे अविभाज्य भाग बनले आहेत.

### अ) मोबाईल ॲतप्सचा वापर:

मोबाईलमधील प्ले स्टोअर'वर टिपणे घेण्यासाठी अनेक प्रगत ॲमप्स उपलब्ध आहेत. 'Google Keep', 'Notepad', One Note' किंवा 'Easy Notes' यांसारख्या अँप्समुळे वही-पेन सोबत नसतानाही संशोधक महत्त्वाचे मुद्दे डिजिटल स्वरूपात जतन करू शकतो. हे मुद्दे थेट क्लाउड'वर सेव्ह होत असल्याने ते हरवण्याची भीती नसते आणि ते कधीही संगणकावर उघडून पाहता येतात.

### ब) गुगलची डिजिटल परिसंस्था:

गुगलच्या विविध सेवांमुळे संशोधनाचे काम अधिक गतिमान झाले आहे:

१) Google Drive: यामध्ये टिपणांच्या फाईल्स कायमस्वरूपी साठवता येतात.

२) Google Play Books: याद्वारे जगभरातील लाखो संदर्भ पुस्तके मोफत किंवा सवलतीत उपलब्ध होतात, ज्यामुळे ग्रंथालयात जाण्याचा वेळ वाचतो.

३) Google Docs: यातील व्हॉईस टायपिंग' सुविधेमुळे न लिहिता केवळ बोलूनही टिपणे वेगाने तयार करता येतात.

तंत्रज्ञानामुळे संशोधन प्रक्रिया सुलभ आणि वेगवान झाली असली तरी, इतिहास संशोधनाचे मूळ चिकित्सक दृष्टी' (Critical Thinking) यातच आहे. जुन्या आणि नव्या पद्धतींचा योग्य मेळ घातल्यास पदवी स्तरावरील विद्यार्थी आपले संशोधन कार्य अधिक प्रभावीपणे पूर्ण करू शकतात. भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता (I) आणि प्रगत स्कॅनिंग तंत्रज्ञानामुळे ही प्रक्रिया आणखी नाविन्यपूर्ण होत जाईल.

## २) तळटीपा व अंतटीपा :

इतिहास संशोधन हे केवळ कल्पनेवर आधारित नसून ते पुराव्यांवर अधिष्ठित असते. संशोधकाने मांडलेल्या प्रत्येक विधानाला, मताला किंवा घटनेला पुराव्याचा आधार देणे अनिवार्य असते. संशोधनातील या पुराव्यांच्या मांडणीला आणि संदर्भांच्या नोंदीला तळटीपा (Footnotes) अथवा अंतटीपा (Endnotes) असे म्हणतात. इतिहासलेखन शास्त्रामध्ये या टिपांना संशोधनाचा भक्कम आधारस्तंभ' मानले जाते. या टिपांमुळे संशोधनाची विश्वासार्हता वाढते आणि वाचकाला संशोधकाने वापरलेल्या साधनांची खात्री पटते.

### अ ) तळटीपा आणि अंतटीपा: स्वरूप आणि फरक

संशोधन प्रबंध किंवा ग्रंथ लिहिताना संदर्भांची मांडणी प्रामुख्याने दोन प्रकारे केली जाते:

१) **तळटीपा:** जेव्हा संदर्भाची नोंद त्याच पृष्ठाच्या तळाशी (Bottom of the page) केली जाते, तेव्हा

त्याला तळटीप म्हणतात. वाचक मजकूर वाचत असतानाच लगेच खाली संदर्भ पाहू शकतो, हे या पद्धतीचे वैशिष्ट्य आहे.

२) **अंतटीपा:** जेव्हा सर्व संदर्भ प्रकरणाच्या शेवटी किंवा संपूर्ण ग्रंथाच्या शेवटी एकत्रित दिले जातात, तेव्हा त्यांना अंतटीपा किंवा शेवटी दिलेल्या टिपा म्हणतात. यामुळे मुख्य मजकुराचा वाचनाचा ओघ खंडित होत नाही.

**ब) आधुनिक वर्गीकरण:**

आजच्या काळात संशोधनाच्या गरजेनुसार टिपांचे दोन विशेष प्रकार पडतात:

**१) आशयपर टीप:**

इतिहास संशोधनात अनेकदा असे काही मुद्दे किंवा माहिती समोर येते, जी विषयाच्या अनुषंगाने महत्त्वाची असते, परंतु ती मुख्य मजकुरात समाविष्ट केल्यास लेखनाचा मूळ ओघ किंवा प्रवाह खंडित होण्याची शक्यता असते. अशा वेळी आशयपर टीप वापरली जाते. या टीपेचा मुख्य उद्देश वाचकाला केवळ संदर्भ ग्रंथ सांगणे हा नसून, एखाद्या विशिष्ट घटनेचे, व्यक्तीचे किंवा तांत्रिक शब्दाचे सविस्तर स्पष्टीकरण देणे हा असतो. उदा. समजा, संशोधक पेशवेकालीन न्यायदान पद्धतीवर लिहित आहे आणि मजकुरात महझर असा शब्द आला. सामान्य वाचकाला महझर म्हणजे काय हे माहित नसेल, तर मजकुराच्या ओघात त्याचे विवेचन करण्याऐवजी संशोधक पृष्ठाच्या खाली आशयपर टीप देऊन या शब्दाचा अर्थ, त्याचे स्वरूप आणि ऐतिहासिक महत्त्व स्पष्ट करू शकतो. यामुळे ज्या वाचकाला अतिरिक्त माहिती हवी आहे, त्याची जिज्ञासा शमते आणि ज्याला केवळ मुख्य मांडणी वाचायची आहे, त्याच्या वाचनात कोणताही अडथळा येत नाही. ही पद्धत संशोधनाचे सखोल ज्ञान दर्शवण्यासाठी अत्यंत प्रभावी ठरते.

**२) हक्क परवानगी टीप :**

२१ व्या शतकात बौद्धिक संपदा अधिकार अत्यंत कडक झाले आहेत. जेव्हा एखादा संशोधक आपल्या प्रबंधात किंवा पुस्तकात दुसऱ्या लेखकाचे, संस्थेचे किंवा संग्रहालयाचे एखादे दुर्मिळ छायाचित्र, नकाशा, चित्र किंवा ५०० शब्दांपेक्षा जास्त असलेला मजकूर वापरतो, तेव्हा त्याला कायदेशीररीत्या त्या मालकाची परवानगी घ्यावी लागते. ही परवानगी घेतल्याची अधिकृत नोंद ज्या टीपेद्वारे केली जाते, तिला हक्क परवानगी टीप असे म्हणतात. उदा. ऐतिहासिक संशोधनात नकाशांना अनन्यसाधारण महत्त्व असते. जर एखाद्या संशोधकाने भारतीय सर्वेक्षण विभागाने तयार केलेला एखादा जुना लष्करी नकाशा आपल्या संशोधनात वापरला असेल, तर त्या नकाशाच्या खाली किंवा पृष्ठाच्या तळाशी सदर नकाशा भारतीय सर्वेक्षण विभागाच्या लेखी परवानगीने आणि साभार पुनर्मुद्रित केला आहे, अशी नोंद करणे अनिवार्य असते. ही टीप केवळ कायदेशीर औपचारिकता नसून ती संशोधकाची नैतिकता आणि व्यावसायिकता सिद्ध करते. यामुळे भविष्यात उद्भवू शकणारे कॉपीराइट किंवा मालकी हक्काचे वाद टाळता येतात.

**क) संशोधनामध्ये तळटीपा देण्यामागील प्रमुख हेतू:**

तळटीपा देणे हे केवळ एक तांत्रिक काम नसून त्यामागे खालील महत्त्वाचे उद्देश असतात:

१) **वाचकांना संदर्भ साधनांचे ज्ञान करून देणे:** संशोधक आपल्या अभ्यासासाठी अनेक प्राथमिक (उदा. जुनी कागदपत्रे, नाणी, शिलालेख) आणि द्वितीयक (उदा. इतर इतिहासकारांचे ग्रंथ) साधनांचा वापर करतो. वाचकाला किंवा इतर संशोधकांना ही माहिती कोणत्या मूळ स्रोतातून घेतली आहे, हे कळावे हा यामागचा मुख्य हेतू असतो. यामुळे जिज्ञासू वाचकांना त्याच विषयावर अधिक सखोल वाचन करण्यासाठी दिशा मिळते.

२) **कृतज्ञता व्यक्त करणे आणि विश्वासार्हता जपणे:** इतिहास संशोधन ही एक अखंड चालणारी प्रक्रिया आहे. आपल्या आधी ज्या लेखकांनी किंवा संशोधकांनी कष्ट घेऊन माहिती संकलित केली आहे, त्यांच्या कामाचा आदर करणे आणि त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करणे हे संशोधकाचे नैतिक कर्तव्य असते. स्वतःच्या मांडणीला पुराव्याचा आधार देऊन संशोधक हे सिद्ध करतो की त्याचे कार्य प्रामाणिक आणि सत्य पुराव्यांवर आधारित आहे.

३) **जादा माहिती पुरवणे:** अनेकदा मुख्य मजकुरात विषयांतर होऊ नये म्हणून काही रंजक किंवा पूरक माहिती गाळावी लागते. परंतु, ज्या वाचकांना त्या विषयाची अधिक ओढ आहे, त्यांच्यासाठी अशी जादा माहिती तळटीपांमध्ये दिली जाते. उदाहरणार्थ, एखाद्या युद्धाचा उल्लेख करताना त्यातील एखाद्या शूर सरदाराची अल्प माहिती तळटीपेत दिल्यास मूळ ओघही कायम राहतो आणि वाचकाला अतिरिक्त ज्ञानही मिळते.

४) **विरोधी मते आणि संदर्भांची मांडणी करणे:** इतिहासात एकाच घटनेबद्दल भिन्न मते असू शकतात. संशोधकाला स्वतःचे मत मांडताना विरोधी मते किंवा इतर इतिहासकारांचे वेगळे दृष्टिकोनही मांडावे लागतात. अशा वेळी तळटीपेचा वापर करून संशोधक इतर उपलब्ध मतांची नोंद करतो. यामुळे संशोधनाचा दृष्टिकोन एकांगी राहत नाही, तर तो सर्वसमावेशक आणि वस्तुनिष्ठ बनतो.

५) **लेखनातील ओघ आणि सातत्य टिकवणे:** जर प्रत्येक संदर्भाची माहिती मुख्य मजकुरातच दिली, तर वाचनाची लय बिघडते आणि लेखनाचा ओघ खंडित होतो. सामान्य वाचकाला केवळ कथा किंवा विश्लेषण हवे असते, तर संशोधकाला पुरावे हवे असतात. तळटीपांमुळे या दोन्ही गरजा पूर्ण होतात. मुख्य मजकूर प्रवाही राहतो आणि ज्याला संदर्भ तपासायचे आहेत, तो पृष्ठाच्या तळाशी किंवा ग्रंथाच्या शेवटी जाऊन ते पाहू शकतो.

**ड) इतिहास संशोधनातील तळटीपांचे प्रकार, स्थान आणि लेखन पद्धती:**

इतिहास संशोधनामध्ये केवळ माहिती संकलित करणे पुरेसे नसते, तर ती माहिती कोणत्या पुराव्याच्या आधारे मांडली आहे, हे दर्शवणे तांत्रिकदृष्ट्या अनिवार्य असते. संशोधनातील विधानांना पुष्टी देण्यासाठी आणि वाचकांना विश्वासाहर्ता पटवून देण्यासाठी तळटीपांचे कार्य अत्यंत महत्त्वाचे आहे.

१) **तळटीपांचे मुख्य प्रकार** : तळटीपांचा वापर प्रामुख्याने दोन उद्दिष्टांसाठी केला जातो, त्यावरून त्यांचे खालील दोन प्रकार पडतात:

अ) **स्पष्टीकरणात्मक तळटीप:** अनेकदा संशोधक एखादा मुद्दा मांडताना त्याविषयी अधिक स्पष्टीकरण

देऊ इच्छितो, परंतु ते स्पष्टीकरण मुख्य मजकुरात दिल्यास मूळ मांडणीचा ओघ बिघडू शकतो. अशा वेळी, त्या विशिष्ट मुद्द्यावर अधिक प्रकाश टाकण्यासाठी किंवा एखाद्या पारिभाषिक शब्दाचा अर्थ स्पष्ट करण्यासाठी पृष्ठाच्या तळाशी स्पष्टीकरण दिले जाते. यामुळे वाचकाला विषयाचे सखोल ज्ञान प्राप्त होते.

ब) **प्रमाणभूत किंवा संदर्भीय तळटीप:** या प्रकारात संशोधक आपल्या विधानाच्या समर्थनार्थ मूळ पुराव्याची किंवा संदर्भ ग्रंथाची नोंद करतो. विशेषतः प्राथमिक साधनांमधील (पत्रावळी, शिलालेख इ.) पुरावा देताना या टिपांचा वापर केला जातो. यामुळे वाचकांच्या ज्ञानात भर पडते आणि संशोधकाचा प्रामाणिकपणा सिद्ध होतो.

**२) तळटीपांचे संशोधनातील स्थान आणि नियम**

तळटीपा देण्यासाठी कोणतेही कठोर कायदेशीर नियम नसले तरी, जागतिक स्तरावर 'शिकागो मॅन्युअल' आणि 'मॉडर्न लँग्वेज असोसिएशन' (MLA) यांनी ठरवून दिलेले संकेत पाळले जातात.

तळटीपांच्या मांडणीचे प्रमुख संकेत:

१) **अंकांची नोंद:** मुख्य मजकुरात ज्या शब्दासाठी संदर्भ द्यायचा आहे, त्याच्या उजव्या कोपऱ्यात थोड्या वरच्या बाजूला (Superscript) संदर्भ आकडा (१, २, ३...) लिहावा. शब्द आणि आकडा यामध्ये अंतर नसावे.

२) **सुसूत्रता:** संपूर्ण प्रबंधात किंवा ग्रंथात आकड्यांची पद्धत एकसमान असावी. सामान्यतः प्रत्येक नवीन प्रकरणासाठी १ पासून पुन्हा आकडे सुरू करणे अधिक सोयीचे ठरते.

३) **स्थानाची निवड:** संशोधकाच्या सोयीनुसार तळटीपा प्रत्येक पृष्ठाच्या तळाशी किंवा प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी (Endnotes) दिल्या जातात.

४) **अवतरणे आणि शीर्षके:** जर एखाद्या लेखकाचे विधान घेतले असेल, तर त्या अवतरणाच्या शेवटी आकडा द्यावा. लक्षात ठेवा, कोणत्याही प्रकरणाच्या मुख्य शीर्षकावर तळटीपेचा आकडा देऊ नये.

५) **एकाधिक संदर्भ:** जर एकाच वाक्यात दोन वेगवेगळे संदर्भ असतील, तर संबंधित शब्दांवर स्वतंत्र आकडे देऊन तळाशी ते स्वल्पविराम देऊन स्पष्ट करावेत.

**३) तळटीपा देण्याची शास्त्रीय पद्धत:**

तळटीपा लिहिताना एक निश्चित क्रम पाळला जातो, जेणेकरून वाचकाला तो ग्रंथ शोधणे सोपे जाईल.

**अ) प्राथमिक मांडणीचा क्रम:**

लेखकाचे नाव, ग्रंथाचे नाव (इटॅलिक्स किंवा अधोरेखित), प्रकाशक, प्रकाशन स्थळ, प्रकाशन वर्ष, पृष्ठ क्रमांक. उदा. पुराणिक, श. श्री., तुळाजी एक विजयदुर्ग, पार्श्व पब्लिकेशन, कोल्हापूर, २०२०, पृष्ठ क्र. ५०

**ब) कित्ता** (Ibid) **आणि उपरोक्त** (Op.cit) **चा वापर:**

ग्रंथांच्या नावांची वारंवार होणारी पुनरावृत्ती टाळण्यासाठी काही संज्ञा वापरल्या जातात:

**१) कित्ता:** जेव्हा एकाच पानावर एकाखाली एक येणारा संदर्भ एकाच पुस्तकाचा असतो, तेव्हा पूर्ण माहिती न लिहिता कित्ता अथवा Ibid लिहून फक्त पृष्ठ क्रमांक लिहिला जातो.

उदा. १. पुराणिक, श. श्री., तुळाजी एक विजयदुर्ग, पार्श्व पब्लिकेशन, कोल्हापूर, २०२०, पृष्ठ क्र. ५०

उदा. २. कित्ता, पृष्ठ क्र. १२१.

**२) उपरोक्त** / Op.cit (Opere Citato)**:** जर एखाद्या ग्रंथाचा संदर्भ एकदा देऊन झाला असेल आणि त्यानंतर दुसऱ्या लेखकाचा संदर्भ आला असेल, परंतु पुन्हा पहिल्याच ग्रंथाचा संदर्भ द्यायचा असेल, तर लेखकाचे नाव लिहून उपरोक्त' किंवा 'Op.cit' असे लिहावे.

उदा. १. पुराणिक, श. श्री., तुळाजी एक विजयदुर्ग, पार्श्व पब्लिकेशन, कोल्हापूर, २०२०, पृष्ठ क्र. ५०

२. जाधव, रमेश, लोकराजा शाहू छत्रपती, पुणे, १९९७, पृ. ३८.

३. पुराणिक, श. श्री., उपरोक्त, पृ. ७६.

तळटीपा या केवळ तांत्रिक बाबी नसून त्या संशोधकाची शिस्त आणि व्यासंग दर्शवतात. वरील संकेतांचे पालन केल्यास पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांचे संशोधन कार्य जागतिक दर्जाच्या मानकांशी सुसंगत ठरेल आणि ते वाचकांसाठी अधिक विश्वसनीय होईल.

**४) तळटीपांमधील संक्षिप्त रूपांचा शास्त्रीय वापर**

इतिहास संशोधनात एकाच ग्रंथाचा किंवा संदर्भाचा वारंवार उल्लेख करावा लागतो. अशा वेळी प्रत्येक वेळी पूर्ण माहिती (लेखकाचे नाव, पुस्तकाचे नाव, वर्ष इ.) लिहिणे कंटाळवाणे आणि जागेचा अपव्यय करणारे ठरते. ही पुनरावृत्ती टाळण्यासाठी काही विशिष्ट संक्षिप्त रूपांचा वापर केला जातो.

**मराठी आणि इंग्रजीतील प्रचलित संक्षिप्त रूपे:**

कित्ता / 'Ibid' (Ibidem): 'Ibid' हा मूळ लॅटिन शब्द 'Ibidem' पासून आला आहे, ज्याचा अर्थ Meaning the Same' (तत्रैव किंवा तेच) असा होतो. जेव्हा एकाच पानावरील दोन किंवा अधिक संदर्भ सलगपणे एकाच पुस्तकातील असतात, तेव्हा दुसऱ्या संदर्भासाठी पुन्हा पूर्ण माहिती न लिहिता कित्ता' किंवा खलळव' वापरले जाते.

वापराचा नियम: 'Ibid' चा वापर सलग संदर्भांसाठीच करावा. काही पाने उलटून गेल्यावर पुन्हा तोच संदर्भ द्यायचा असल्यास Ibid' वापरू नये.

उपरोक्त: 'Op.cit (Opera Citato)': याचा अर्थ 'In the work cited' (पूर्वी उल्लेखिलेल्या ग्रंथात) असा होतो. जर एखादा संदर्भ आधी देऊन झाला असेल, त्यानंतर इतर लेखकांचे संदर्भ आले

असतील आणि पुन्हा पहिल्याच लेखकाच्या त्याच ग्रंथाचा संदर्भ द्यायचा असेल, तर लेखकाच्या नावापुढे 'उपरोक्त' किंवा 'Op.cit' लिहून पृष्ठ क्रमांक दिला जातो.

इतर महत्त्वाची रूपे: मराठीत 'तत्रैव' (त्याच ठिकाणी), 'पूर्वोक्त' (पूर्वी म्हटल्याप्रमाणे), 'उपरिनिर्दिष्ट' (वर उल्लेख केलेले) यांसारखे शब्दही संदर्भाच्या गरजेनुसार वापरले जातात.

**५) तळटीपांचे उपयोग आणि ऐतिहासिक महत्त्व**

संशोधन प्रक्रियेत तळटीपांचे स्थान अनन्यसाधारण आहे. त्यांचे उपयोग खालीलप्रमाणे स्पष्ट करता येतील:

**अ) वाचकांच्या ज्ञानात भर:** तळटीपांमुळे जिज्ञासू वाचकांना मूळ साधन सामग्रीची माहिती मिळते. जर एखाद्याला संशोधकाने मांडलेल्या मुद्द्यावर अधिक अभ्यास करायचा असेल, तर तळटीपेतील संदर्भ त्याला दीपस्तंभाप्रमाणे मार्ग दाखवतात.

**ब) संशोधनाचा दर्जा:** प्राथमिक आणि अव्वल दर्जाच्या साधनांच्या नोंदी तळटीपेत असल्यास संशोधनाला अधिकृतता आणि शास्त्रीय दर्जा प्राप्त होतो.

**क) वाचनातील सुलभता:** जर संदर्भ प्रकरणाच्या शेवटी दिलेले असतील, तर सामान्य वाचकाला मूळ मजकूर वाचताना कोणताही अडथळा येत नाही. यामुळे वाचनाचा ओघ टिकून राहतो.

**३) तळटीपांचा वापर करताना घ्यावयाची दक्षता (दुरुपयोग टाळणे)**

तळटीपा देणे हे एक कौशल्य आहे. त्यात थोडीही गफलत झाल्यास संशोधनावर प्रश्नचिन्ह उभे राहू शकते.

**अ) ताळमेळ राखणे:** अनेकदा हस्तलिखित लिहिताना संशोधक मजकुरात संदर्भ आकडा देतो, पण तळटीप लिहिताना विसरतो किंवा चुकीचा आकडा लिहितो. मजकुरातील विधान आणि तळटीपेतील संदर्भ यांचा अचूक ताळमेळ असणे अत्यंत आवश्यक आहे.

**ब) अतिरेक टाळणे:** विनाकारण प्रत्येक ओळीला तळटीपा देण्याचा अतिरेक टाळावा. केवळ महत्त्वाच्या विधानांना आणि पुराव्यांनाच तळटीप द्यावी, अन्यथा सामान्य वाचक गोंधळून जाण्याची शक्यता असते.

**क) सरावाचे महत्त्व:** पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांनी सुरुवातीला हे काम थोडे कठीण वाटू शकते. परंतु, लेखन पूर्ण झाल्यानंतर शांतपणे सर्व संदर्भांची पडताळणी करून क्रम लावल्यास चुकांचा धोका कमी होतो. संशोधकाने सरावातून या प्रक्रियेत नैपुण्य मिळवणे अपेक्षित आहे.

थोडक्यात, तळटीपा या संशोधकाचा पुरावा असतात. आधुनिक आणि पारंपरिक दोन्ही पद्धतींचा समतोल राखून संक्षिप्त रूपांचा अचूक वापर केल्यास इतिहास संशोधनाचे कार्य अधिक प्रभावी आणि जागतिक दर्जाचे होऊ शकते.

**२) शब्दकोश किंवा शब्दसूची:**

इतिहास लेखन ही केवळ घटनांची मांडणी नसून ती एका विशिष्ट कालखंडाचा आणि संस्कृतीचा

आरसा असते. ऐतिहासिक संशोधनामध्ये अनेकदा अशा शब्दांचा, संज्ञांचा किंवा संकल्पनांचा वापर केला जातो, जे सामान्य वाचकांसाठी किंवा इतर प्रादेशिक संशोधकांसाठी अपरिचित असू शकतात. अशा वेळी, संशोधकाने आपल्या प्रबंधाच्या शेवटी किंवा सुरुवातीला अशा कठीण शब्दांची अर्थासह जी यादी दिलेली असते, तिला शब्दकोश' किंवा शब्दसूची' असे म्हणतात. इतिहास लेखनाच्या शास्त्रीय प्रक्रियेत या शब्दसूचीला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

**१) शब्दसूचीचे स्वरूप आणि आवश्यकता:**

इतिहासाचा अभ्यास करताना संशोधक विविध भाषांमधील मूळ साधनांचा आधार घेतो. उदाहरणार्थ, मराठा कालखंडाचा अभ्यास करताना मोडी, फारसी किंवा जुन्या मराठीतील शब्द येतात, तर ब्रिटीश काळाचा अभ्यास करताना विशिष्ट तांत्रिक इंग्रजी संज्ञा येतात.

१) **विशिष्ट पारिभाषिक संज्ञा:** प्रत्येक कालखंडाची स्वतःची एक परिभाषा असते. 'चौथाई', 'सरदेशमुखी', 'मोकासा', 'वतन' यांसारख्या शब्दांचे अर्थ आधुनिक काळात बदलले असू शकतात किंवा ते कालबाह्य झाले असू शकतात. या शब्दांचा अचूक ऐतिहासिक संदर्भ वाचकाला समजण्यासाठी शब्दसूची आवश्यक असते.

२) **प्रादेशिक शब्दांचा अर्थ:** इतिहास हा स्थानिक संदर्भाने लिहिला जातो. एका प्रदेशातील बोलीभाषेतील शब्द दुसऱ्या प्रदेशातील वाचकाला समजतीलच असे नाही. अशा वेळी शब्दसूची भाषेतील अडसर दूर करण्याचे काम करते.

३) **संशोधनातील स्पष्टता:** संशोधकाने आपल्या प्रबंधात एखाद्या शब्दाचा वापर कोणत्या विशिष्ट अर्थाने केला आहे, हे स्पष्ट करण्यासाठी शब्दसूचीचा उपयोग होतो. यामुळे वाचकाचा कोणताही गैरसमज होत नाही आणि संशोधनातील पारदर्शकता टिकून राहते.

**२) शब्दसूची तयार करण्याची पद्धत:**

शब्दसूची तयार करणे हे एक शास्त्रशुद्ध काम आहे. ती तयार करताना खालील बाबी लक्षात घेणे गरजेचे आहे:

१) **वर्णानुक्रमे मांडणी:** शब्दसूची नेहमी वर्णमालेनुसार (A-Z अथवा अ-ज्ञ) लावलेली असावी. यामुळे वाचकाला हवा तो शब्द शोधणे सोपे जाते.

२) **अचूक संदर्भ:** शब्दाचा केवळ शब्दशः अर्थ न देता, ऐतिहासिक संदर्भात त्याचा काय अर्थ होतो, हे स्पष्ट करावे लागते. उदा. बखर या शब्दाचा अर्थ सांगताना तो केवळ वृत्तांत न सांगता ऐतिहासिक कथनपर लेखन असा सविस्तर देणे अपेक्षित आहे.

३) **भाषेचा उल्लेख:** जर एखादा शब्द परभाषीय (उदा. अरबी, कानडी किंवा पोर्तुगीज) असेल, तर कंसात त्या भाषेचा उल्लेख करणे अधिक सयुक्तिक ठरते.

४) **संक्षिप्तता:** शब्दसूचीमधील स्पष्टीकरण हे साधे, सोपे आणि संक्षिप्त असावे. ती व्याख्या नसून तो केवळ अर्थाचा उलगडा असतो.

३) **इतिहास लेखनातील शब्दसूचीचे महत्त्व:**

इतिहास लेखनाच्या प्रक्रियेत शब्दसूची केवळ एक तांत्रिक सोपस्कार नसून ती संशोधनाच्या गुणवत्तेत भर टाकणारा घटक आहे.

१) **वाचकांसाठी सुलभता:** एक उत्तम संशोधक तोच असतो, ज्याचे लेखन सर्वसामान्यांना समजते. शब्दसूचीमुळे तांत्रिक किंवा कठीण विषयातही वाचकाची गोडी निर्माण होते.

२) **प्रमाणबद्धता**: शब्दसूचीमुळे संपूर्ण प्रबंधात एकाच शब्दाचा अर्थ सर्वत्र समान राहतो, ज्यामुळे विसंगती टाळता येते.

३) **बहुभाषिक संशोधनास मदत:** भारतासारख्या बहुभाषिक देशात जेव्हा एखादा संशोधक दुसऱ्या भाषेतील साधनांचा वापर करतो, तेव्हा शब्दसूची त्या दोन संस्कृतींमधील दुवा म्हणून काम करते.

थोडक्यात सांगायचे तर, शब्दसूची हा ऐतिहासिक प्रबंधाचा एक अविभाज्य भाग आहे. ती संशोधकाची विषयावरील पकड आणि त्याच्या सूक्ष्म अभ्यासाची साक्ष देते. ज्याप्रमाणे नकाशे आणि छायाचित्रे इतिहासाला दृश्य स्वरूप देतात, त्याचप्रमाणे शब्दसूची इतिहासातील कठीण संज्ञांना अर्थपूर्ण स्वरूप देते. यामुळे संशोधनाचे सादरीकरण अधिक प्रभावी, तर्कसुसंगत आणि प्रवाही होते.

३) **परिशिष्टे** (Appendix):

इतिहास संशोधनाचा प्रबंध किंवा ग्रंथ पूर्ण झाल्यानंतर, त्यातील मुख्य मजकुराला पुष्टी देण्यासाठी जी पूरक साधने जोडली जातात, त्यांना परिशिष्टे असे म्हणतात. परिशिष्ट म्हणजे थोडक्यात मुख्य संशोधनाला जोडलेली पुरवणी किंवा जोडपत्रे होत. संशोधनात मांडलेल्या विधानांच्या समर्थनार्थ दिलेली सांख्यिकीय माहिती, दुर्मिळ कागदपत्रे किंवा पत्रव्यवहार यांचा समावेश यात होतो. जरी ही माहिती मुख्य मजकुराचा भाग नसली, तरी संशोधनाची विश्वासार्हता आणि खोली वाढवण्यासाठी ती अत्यंत आवश्यक असते.

१) **परिशिष्टांचे सर्वसाधारण स्वरूप आणि स्थान:**

परिशिष्टे ही मुख्य संशोधनाच्या आणि संदर्भसूचीच्या (Bibliography) शेवटी दिली जातात. संशोधनाच्या मुख्य प्रवाहात जी माहिती समाविष्ट केल्यास वाचनाचा ओघ खंडित होईल, अशी तांत्रिक किंवा विस्तृत माहिती परिशिष्टात टाकली जाते. हे प्रामुख्याने जिज्ञासू वाचक आणि नवसंशोधकांसाठी असते, ज्यांना त्या विषयाच्या मुळाशी जाऊन पुरावे तपासायचे असतात. मुख्य मांडणीत तळटीपां'ना मर्यादित जागा असते, त्यामुळे विस्तृत दस्तऐवज किंवा नकाशे देण्यासाठी परिशिष्ट हेच योग्य स्थान ठरते.

२) **परिशिष्टांच्या नोंदणीची शास्त्रीय पद्धत:**

संशोधन ग्रंथाच्या शेवटी परिशिष्टे जोडताना विशिष्ट शिस्त पाळली जाते:

शीर्षक आणि क्रम: परिशिष्टाची सुरुवात नेहमी नवीन पृष्ठावरून केली जाते. पृष्ठाच्या मध्यभागी परिशिष्ट'

असे शीर्षक देऊन त्याला 'अ', 'ब', 'क' किंवा '१', '२', '३' असे क्रमांक दिले जातात (उदा. परिशिष्ट १: किल्ले रायगडाचा नकाशा). इंग्रजीमध्ये याला 'Appendix' असे संबोधले जाते.

अनुक्रम: मुख्य संशोधनात ज्या क्रमाने संदर्भांचा उल्लेख आला आहे, त्याच क्रमाने परिशिष्टांची मांडणी असावी. जर संशोधनात आधी पत्रांचा उल्लेख असेल आणि शेवटी प्रश्नावलीचा, तर परिशिष्टातही पत्रे आधी आणि प्रश्नावली शेवटी येईल.

पृष्ठ क्रमांक: संदर्भ ग्रंथाची यादी जिथे संपते, तिथूनच परिशिष्टांचे पृष्ठ क्रमांक सुरू होतात. समजा ग्रंथसूची पृष्ठ क्र. २६८ ला संपली, तर परिशिष्टाची सुरुवात २६९ व्या पृष्ठापासून होईल.

**३) परिशिष्टांमध्ये समाविष्ट होणारे विविध घटक**

परिशिष्टाची व्याप्ती मोठी असून त्यात विषयाला अनुसरून अनेक घटकांचा समावेश करता येतो:

**१. सांख्यिकीय माहिती व आलेख**

संशोधनातील क्लिष्ट आकडेवारी वाचकांना सुलभतेने समजावी यासाठी परिशिष्टात सांख्यिकीय कोष्टके, स्तंभलेख आणि विभाजित वर्तुळाकृतींचा वापर केला जातो. याद्वारे दोन कालखंडांतील लोकसंख्या, महसूल किंवा व्यापार यांमधील चढ-उतार स्पष्टपणे दाखवता येतात. केवळ वर्णनापेक्षा आलेखांच्या माध्यमातून मांडलेला निष्कर्ष अधिक वस्तुनिष्ठ आणि प्रभावी ठरतो, ज्यामुळे संशोधनाला तांत्रिक अचूकता प्राप्त होते.

**२) नकाशे आणि आकृत्या:**

इतिहास आणि भूगोल यांचा अतूट संबंध असल्याने परिशिष्टात नकाशांना अनन्यसाधारण महत्त्व असते. राज्यांच्या विस्ताराणाऱ्या सीमा, लष्करी हालचालींची युद्धभूमी, महत्त्वाचे व्यापारी मार्ग आणि किल्ले यांची भौगोलिक स्थाने नकाशाद्वारे स्पष्ट केली जातात. यामुळे वाचकाला ऐतिहासिक घटनांचे नेमके स्थान समजते आणि ग्रंथाची उपयुक्तता केवळ माहितीपुरती मर्यादित न राहता ती एक संदर्भ साधन बनते.

**३) छायाचित्रे आणि प्रतिमा:**

ऐतिहासिक सत्याची प्रचिती देण्यासाठी परिशिष्टात दुर्मिळ छायाचित्रे, उत्खननातील सापडलेल्या वस्तू, प्राचीन नाणी आणि स्मारकांच्या प्रतिमांचा समावेश केला जातो. हस्तलिखितांची मूळ पाने किंवा ऐतिहासिक व्यक्तींच्या दुर्मिळ फोटोंमुळे संशोधनाला जिवंतपणा येतो. या दृश्य पुराव्यांमुळे लेखनातील विधानांना भक्कम आधार मिळतो आणि वाचकांचा संशोधनावरील विश्वास वृद्धिंगत होतो, जे ऐतिहासिक मांडणीसाठी अत्यंत आवश्यक असते.

**४) मुलाखती आणि प्रश्नावली:**

प्रत्यक्ष क्षेत्रभेटी दरम्यान घेतलेल्या मुलाखतींचे सारांश आणि माहिती संकलनासाठी वापरलेली प्रश्नावली परिशिष्टात जोडली जाते. विशेषतः समकालीन इतिहासाचा अभ्यास करताना जिवंत साक्षीदारांचे अनुभव संशोधनाचा महत्त्वाचा स्रोत असतात. प्रश्नावलीचे स्वरूप आणि लोकांनी दिलेली उत्तरे यांची

परिशिष्टातील नोंद संशोधकाच्या निष्कर्षांमागील शास्त्रीय प्रक्रिया स्पष्ट करते, जी इतर संशोधकांसाठी मार्गदर्शक ठरते.

**५) पत्रव्यवहार:**

ऐतिहासिक व्यक्तींनी एकमेकांना लिहिलेली खाजगी पत्रे, सनदा किंवा अधिकृत सरकारी निवेदने हे इतिहासाचे अव्वल' पुरावे मानले जातात. आधुनिक संशोधनात ईमेल किंवा डिजिटल मेसेजेसचाही यात समावेश होतो. हा पत्रव्यवहार परिशिष्टात दिल्याने त्या काळातील व्यक्तींचे विचार आणि निर्णय घेण्याची प्रक्रिया स्पष्ट होते. अशा प्राथमिक साधनांमुळे संशोधकाचे वैयक्तिक मत बाजूला राहून पुराव्यांच्या आधारे निष्पक्ष मांडणी करणे शक्य होते.

**४) विशेष कोश आणि स्पष्टीकरणे:**

परिशिष्टामध्ये 'स्पष्टीकरणकोष' (Glossary) हा एक महत्त्वाचा भाग असतो. संशोधनाच्या कालखंडात प्रचलित असलेले परंतु सध्या व्यवहारात नसलेले विशेष शब्द, पारिभाषिक संज्ञा किंवा कानडी, मोडी, फारसी शब्दांचे अर्थ एका शब्दकोशाप्रमाणे येथे दिले जातात. याव्यतिरिक्त, जिज्ञासू वाचकांसाठी अधिक वाचनाची पुस्तके, महत्त्वाच्या वेबसाईटच्या लिंक्स आणि ब्लॉग्सची यादी देखील परिशिष्टात देता येते.

**५) परिशिष्टे देण्यामागील प्रमुख उद्देश**

**१) पुराव्यांचे प्रमाणीकरण:**

इतिहास हा पुराव्यांवर उभा असतो. संशोधकाने आपल्या मांडणीत ज्या मूळ दस्तऐवजांचा, सनदांचा किंवा पत्रांचा उल्लेख केला आहे, त्यांची सत्यप्रत परिशिष्टात दिल्याने संशोधनाची विश्वासार्हता वाढते. वाचक किंवा समीक्षक अशा मूळ साधनांची पडताळणी करू शकतात. यामुळे संशोधकाने केलेले विधान हे केवळ त्याचे वैयक्तिक मत नसून ते ठोस ऐतिहासिक पुराव्यांवर आधारित आहे, हे सिद्ध होते.

**२) समर्थन आणि विरोध:**

कोणत्याही ऐतिहासिक घटनेकडे पाहण्याचे विविध दृष्टिकोन असू शकतात. एक निष्पक्ष संशोधक केवळ आपल्या मताचे समर्थन करणारी माहिती देत नाही, तर त्या विषयाशी संबंधित विरोधी मते किंवा इतर तज्ज्ञांच्या टिपणांची माहितीही परिशिष्टात समाविष्ट करतो. यामुळे संशोधनामध्ये तटस्थता येते. वाचकाला विषयाच्या दोन्ही बाजू समजून घेण्यास मदत होते आणि संशोधनाचा दर्जा उंचावतो.

**३) भविष्यकालीन संशोधनास मदत:**

परिशिष्टे ही भावी संशोधकांसाठी कच्चा माल म्हणून कार्य करतात. अनेकदा संशोधकाला मिळालेली सर्वच माहिती त्याच्या मुख्य निष्कर्षात वापरता येत नाही, परंतु ती माहिती दुसऱ्या संशोधकासाठी महत्त्वाची असू शकते. अशा साहित्याचा परिशिष्टात समावेश केल्याने नवीन अभ्यासकांना तिथून पुढे संशोधन करण्याची दिशा मिळते. यामुळे ज्ञानाची साखळी अखंड सुरू राहते.

**४) प्रभावी सादरीकरण आणि स्पष्टीकरण:**

आजच्या काळात संशोधनाचे सादरीकरण पीपीटी (PPT) किंवा व्याख्यानांच्या माध्यमातून केले जाते. अशा वेळी मुख्य मजकूर संक्षिप्त ठेवून, सविस्तर माहिती (उदा. मोठी कोष्टके, सांख्यिकी किंवा नकाशे) परिशिष्टात ठेवली जाते. प्रश्नोत्तरांच्या तासात जेव्हा एखाद्या मुद्द्यावर सखोल स्पष्टीकरण मागितले जाते, तेव्हा परिशिष्टातील या अतिरिक्त माहितीचा वापर करून संशोधक प्रभावीपणे उत्तरे देऊ शकतो.

थोडक्यात, परिशिष्टे ही संशोधनाचा कणा असतात. ती केवळ पानांची संख्या वाढवण्यासाठी नसून, संशोधकाला मिळालेल्या अफाट माहितीचे योग्य वर्गीकरण करण्यासाठी असतात. योग्य परिशिष्टांमुळे संशोधनाचा प्रबंध हा केवळ एक ग्रंथ न राहता तो एक ऐतिहासिक दस्तऐवज बनतो.

**४) सूची**(Index)**:**

ऐतिहासिक संशोधन हे पुराव्यांच्या अफाट महासागरातून सत्य शोधण्याचे कार्य आहे. जेव्हा एखादा संशोधक शेकडो संदर्भ ग्रंथांचा वापर करून आपला प्रबंध किंवा ग्रंथ पूर्ण करतो, तेव्हा त्यातील माहिती वाचकाला सहजपणे शोधता यावी, यासाठी तयार केलेल्या सुटसुटीत मार्गदर्शिकेला सूची असे म्हणतात. सूचीशिवाय ऐतिहासिक संशोधनाला पूर्णत्व येत नाही. हे केवळ पृष्ठांचे संकलन नसून, संशोधनाच्या विषयाशी संबंधित सर्व महत्त्वाच्या घटकांची एकत्रित मांडणी असते.

**सूचीचे पारंपरिक आणि मुख्य प्रकार**

इतिहास संशोधनात सर्वसाधारणपणे खालील चार प्रकारच्या सूची अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जातात:

**१) स्थळ सूची:**

इतिहास आणि भूगोल हे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. कोणत्याही ऐतिहासिक घटना विशिष्ट भूपृष्ठावरच घडत असतात. त्यामुळे संशोधकाला संबंधित प्रदेशाची भौगोलिक परिस्थिती, शहरे, राजधान्या, रणभूमी, व्यापार केंद्रे आणि वाहतुकीचे मार्ग यांची माहिती असणे आवश्यक असते. ग्रंथात ज्या ज्या भौगोलिक स्थळांचा उल्लेख आला आहे, त्या स्थळांची नावे वर्णानुक्रमे लावून त्यांच्यासमोर संबंधित पृष्ठ क्रमांक दिले जातात. उदा. पुराणिक, श. श्री., तुळाजी एक विजयदुर्ग, पार्श्व पब्लिकेशन, कोल्हापूर, २०२० या ग्रंथात 'कुलाबा' या स्थळाचा उल्लेख पृष्ठ क्र. २८०, २८१, ३५९, ३७३ आणि ५४२ वर आला आहे. स्थळ सूचीमुळे वाचकाला कुलाब्याशी संबंधित सर्व माहिती एकत्रित शोधणे सुलभ होते.

**२) व्यक्ती सूची:**

इतिहासाच्या प्रवाहात व्यक्तींचे कर्तृत्व केंद्रस्थानी असते. एखाद्या महान व्यक्तीचा किंवा ऐतिहासिक पात्राचा उल्लेख ग्रंथात नेमका कोठे आला आहे, हे शोधण्यासाठी व्यक्ती सूचीचा वापर होतो. यात व्यक्तींच्या आडनावाच्या अद्याक्षराप्रमाणे (उदा. अ, ब, क...) यादी तयार केली जाते. व्यक्तीच्या नावापुढे त्या त्या घटनेशी संबंधित पृष्ठ क्रमांक नोंदवले जातात. उदा. पुराणिक, श. श्री., तुळाजी एक विजयदुर्ग,

पार्श्व पब्लिकेशन, कोल्हापूर, २०२० या ग्रंथात तुळाजी' यांच्या संदर्भात माहिती हवी असल्यास, व्यक्ती सूचीमध्ये तुळाजी' या नावापुढे पा. क्र. ८०, १०३, १३८, १५२ अशी नोंद केलेली असते. यामुळे संबंधित व्यक्तीच्या समग्र कार्याचा शोध घेताना वेळ वाचतो.

**३) ग्रंथसूची:**

हा प्रकार स्थळ आणि व्यक्ती सूचीपेक्षा भिन्न आहे. संशोधकाने आपल्या संपूर्ण कार्यकाळात ज्या ज्या संदर्भ ग्रंथांचा, मासिकांचा, वृत्तपत्रांचा किंवा गॅझेटिअर्सचा वापर केला आहे, त्यांची ही एकत्रित यादी असते. भावी संशोधकांसाठी ग्रंथसूची ही दीपस्तंभाप्रमाणे असते. या विषयावर यापूर्वी कोणते काम झाले आहे? कोणती पुस्तके उपलब्ध आहेत? ती कोठे मिळतील? या सर्व प्रश्नांची उत्तरे ग्रंथसूचीमुळे मिळतात. ही यादी संशोधनाच्या शेवटी जोडलेली असते.

**४) कालसूची:**

मोठ्या खंडात्मक ग्रंथात किंवा महापुरुषांच्या चरित्रात्मक लेखनात कालसूचीचा वापर केला जातो. यात घटनांचा क्रम त्यांच्या तारखांनुसार किंवा कालखंडानुसार लावलेला असतो. एका दृष्टीक्षेपात संबंधित व्यक्तीचे संपूर्ण जीवनचरित्र किंवा एखाद्या साम्राज्याचा चढ-उतार वाचकाला कालसूचीमुळे समजतो. निष्णात संशोधक वाचकांच्या सोयीसाठी ही मांडणी जाणीवपूर्वक करतात, ज्यामुळे कमी वेळात ऐतिहासिक घटनाक्रम स्पष्ट होतो.

थोडक्यात सूची ही संशोधनाचे सार असते. ती केवळ माहितीची यादी नसून, अभ्यासकाचा वेळ वाचवणारे आणि संशोधनाला शास्त्रीय अधिष्ठान प्राप्त करून देणारे एक प्रभावी साधन आहे. पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांनी सूची तयार करण्याचे कौशल्य आत्मसात केल्यास त्यांचे लेखन अधिक व्यावसायिक आणि वाचनीय होईल.

**४) संदर्भग्रंथ सूची:**

इतिहास संशोधनाच्या प्रक्रियेत संशोधकाला अनेक ग्रंथांचे, कागदपत्रांचे आणि पुराव्यांचे वाचन करावे लागते. या सर्व साधनांची प्रबंधाच्या शेवटी जी पद्धतशीर मांडणी केली जाते, त्यालाच संदर्भ ग्रंथांची यादी किंवा संदर्भ सूची असे म्हणतात. संशोधकाने आपल्या विषयासाठी कोणते ग्रंथ अभ्यासिले आणि त्याच्या मांडणीला कोणता आधार आहे, हे या सूचीवरून स्पष्ट होते.

**१) संदर्भ सूची देण्यामागील हेतू**

**अ) पारदर्शकता आणि विश्वासार्हता:**

इतिहास हा पुराव्यांच्या आधारे लिहिला जातो. संशोधकाने आपल्या प्रबंधात केलेली विधाने कोणत्या ग्रंथांवर किंवा कागदपत्रांवर आधारित आहेत, हे संदर्भ सूचीमुळे स्पष्ट होते. यामुळे वाचक आणि परीक्षकांना संशोधनाचे मूळ आधार शोधणे सोपे जाते. साधनांची स्पष्ट नोंद केल्यामुळे संशोधनात

पारदर्शकता येते आणि त्या कार्याची ऐतिहासिक विश्वासार्हता समाजामध्ये व शैक्षणिक क्षेत्रात प्रस्थापित होते.

**ब) वाचकांना मार्गदर्शन:**

संशोधन ग्रंथ वाचताना अनेक जिज्ञासू वाचकांना त्या विषयातील विशिष्ट पैलूंवर अधिक सखोल अभ्यास करण्याची इच्छा होते. अशा वेळी संदर्भ सूची एका दीपस्तंभाप्रमाणे कार्य करते. संशोधकाने दिलेली ग्रंथांची यादी वाचकाला पुढील अभ्यासासाठी दिशा दाखवते. त्या विषयाशी संबंधित इतर महत्त्वाचे लेखक, विविध कालखंडातील प्रकाशने आणि उपलब्ध साधनसामग्री यांची माहिती मिळाल्याने वाचकाचा संशोधकीय प्रवास सुकर होतो.

**क) संशोधनाचा आवाका:**

संदर्भ सूचीवरून संशोधकाच्या व्यासंगाची आणि कष्टाची कल्पना येते. संशोधकाने केवळ वरवरची किंवा दुय्यम माहिती वाचली आहे की प्रत्यक्ष अभिलेखागारात जाऊन अफाट प्राथमिक साधनांचा शोध घेतला आहे, हे सूचीतील नोंदींवरून समजते. संदर्भ जितके वैविध्यपूर्ण आणि दुर्मिळ, तितका संशोधनाचा आवाका मोठा मानला जातो. थोडक्यात, संदर्भ सूची ही संशोधकाच्या बौद्धिक प्रवासाचा आरसा असते.

**२) संदर्भ साधनांची शास्त्रीय वर्गवारी**

**अ) प्राथमिक संदर्भ साधने:**

प्राथमिक साधने ही इतिहासाचा अव्वल पुरावा' मानली जातात, कारण ती संबंधित ऐतिहासिक घटनेच्या काळातच निर्माण झालेली असतात. यामध्ये सरकारी गॅझेटियर्स, समकालीन दैनिकांचे अंक आणि प्रत्यक्ष पत्रव्यवहार यांसारख्या प्रकाशित साधनांचा समावेश होतो. तसेच, अभिलेखागारातील गोपनीय कागदपत्रे, हस्तलिखिते आणि खाजगी रोजनिशी यांसारखी अप्रकाशित साधने संशोधकाला मूळ सत्यापर्यंत पोहोचवण्यास मदत करतात. या साधनांची विश्वासार्हता सर्वाधिक असते, कारण ती कोणत्याही त्रयस्थ व्यक्तीच्या विश्लेषणाशिवाय थेट पुरावा सादर करतात.

**ब) दुय्यम संदर्भ साधने:**

जेव्हा संशोधक किंवा इतिहासकार प्राथमिक साधनांचा अभ्यास करून त्यावर आधारित स्वतःचे मत किंवा विश्लेषण मांडतात, तेव्हा त्यास दुय्यम साधने असे म्हणतात. यामध्ये विविध इतिहासकारांचे विवेचनात्मक ग्रंथ, चरित्रे आणि समीक्षात्मक पुस्तके यांसारख्या प्रकाशित साहित्याचा समावेश होतो. तसेच, इतर संशोधकांनी केलेले एम.फिल. किंवा पीएच.डी. चे अप्रकाशित प्रबंध हे देखील दुय्यम साधनांचा महत्त्वाचा भाग असतात. ही साधने मूळ घटनेकडे पाहण्याचे विविध दृष्टिकोन आणि संदर्भ समजून घेण्यासाठी उपयुक्त ठरतात.

**क) इंटरनेट साधने:**

२१ व्या शतकात माहिती तंत्रज्ञानामुळे संशोधनाचा वेग वाढला असून 'डिजिटल सोर्सेस'ला

अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. यामध्ये जगभरातील ग्रंथालयांनी उपलब्ध करून दिलेली ई-बुक्स, नामवंत विद्यापीठांचे ऑनलाईन शोधनिबंध आणि डिजिटल लायब्ररी (उदा. ब्रिटिश लायब्ररी, नॅशनल आर्काइव्हज) यांचा समावेश होतो. संशोधकाला विविध अधिकृत सरकारी वेबसाईटस् वरून गॅझेटिअर्स किंवा सांख्यिकीय माहिती एका क्लिकवर उपलब्ध होते. ही साधने वेळ आणि श्रमाची बचत करतात, मात्र त्यांचा वापर करताना माहितीची अधिकृतता आणि वेबसाईटची विश्वासार्हता तपासणे हे संशोधकासाठी मोठे आव्हान असते.

**ड) संदर्भ सूची तयार करण्याची पद्धत:**

मांडणीचा क्रम आणि नियम: संदर्भ सूची तयार करताना माहितीचा एक निश्चित क्रम पाळला जातो, ज्यामुळे वाचकाला मूळ ग्रंथ शोधणे सुलभ होते. यात सर्वप्रथम लेखकाचे आडनाव आणि मग नाव येते. त्यानंतर ग्रंथाचे नाव इटॅलिक्स मध्ये देऊन आवृत्ती, प्रकाशनाचे ठिकाण, प्रकाशक आणि वर्ष यांची नोंद केली जाते. दोनपेक्षा अधिक लेखक असल्यास पहिल्या नावापुढे इतर (et al) असे लिहावे लागते. तसेच, ग्रंथाच्या स्वरूपानुसार संपादक (Ed.) किंवा अनुवादक (Tr.) असा स्पष्ट उल्लेख करणे आणि खंडांचे क्रमांक रोमन लिपीत (उदा. खंड II) लिहिणे आवश्यक असते. ही शिस्तबद्ध मांडणी संशोधनाची व्याप्ती आणि अधिकृतता स्पष्ट करते.

**६) संदर्भ सूचीचे उदाहरण**

एखाद्या ग्रंथाची नोंद सूचीमध्ये कशी दिसते, याचे उत्तम उदाहरण खालीलप्रमाणे देता येईल: उदा. कुलकर्णी, अ. रा., शिवकालीन महाराष्ट्र, राजहंस प्रकाशन, पुणे, १९९३

थोडक्यात संशोधन ही एक सतत चालणारी प्रक्रिया आहे. संशोधकाची संदर्भ सूची ही त्याच्यापुरती पूर्ण असली तरी, येणारा नवा संशोधक त्यात पुन्हा नवीन भर घालत असतो. एक दर्जेदार आणि विश्लेषणात्मक संदर्भ सूची केवळ संशोधकाचा व्यासंग दर्शवत नाही, तर ती इतिहासलेखनाच्या समृद्ध परंपरेला पुढे नेण्याचे काम करते.

**स्वय-अध्ययन प्रश्न क्र २**

१) इतिहास संशोधनात टिपण काढणे या प्रक्रियेचा मुख्य उद्देश काय असतो?

अ) अफाट माहितीमधून विषयाशी सुसंगत आणि नेमकी माहिती निवडून ती लिहून घेणे

ब) संदर्भ ग्रंथातील सर्व पाने जशीच्या तशी उतरवून काढणे

क) दुसऱ्या संशोधकाची वही चोरून स्वतःच्या नावाने वापरणे

ड) केवळ पुस्तकांची चित्रे काढून संग्रह करणे

२) मोठ्या संशोधनासाठी सर्वाधिक शास्त्रशुद्ध मानली जाणारी टिपण पद्धत कोणती?

अ) केवळ स्मरणात ठेवून तोंडी माहिती लक्षात ठेवणे

ब) एकाच वहीत सर्व माहिती लिहिण्याची वही पद्धत

क) कार्ड किंवा स्लीप पद्धत

ड) कागदाच्या कपट्यांवर विस्कळीत माहिती लिहिणे

३) कार्ड पद्धतीमध्ये एका कार्डावर किती माहिती लिहिणे अपेक्षित असते?

अ) केवळ लेखकाचे नाव लिहून कार्ड कोरे सोडणे

ब) संपूर्ण प्रकरणाची सर्व माहिती एकाच कार्डावर दाटीवाटीने लिहिणे

क) एका कार्डावर केवळ एकच महत्त्वाचा मुद्दा लिहिणे

ड) कार्डाच्या दोन्ही बाजूला दोन वेगवेगळे विषय लिहिणे

४) जेव्हा संदर्भाची नोंद त्याच पृष्ठाच्या सर्वात खाली केली जाते, तेव्हा त्याला काय म्हणतात?

अ) तळटीप

ब) अंतटीप

क) परिशिष्ट

ड) अनुक्रमणिका

५) संशोधनातील आशयपर टीप देण्याचा मुख्य उद्देश काय असतो?

अ) कोणत्याही पुराव्याशिवाय स्वतःच्या मनातील काल्पनिक कथा सांगणे

ब) मुख्य मजकुरातील कठीण शब्द किंवा घटनेचे सविस्तर स्पष्टीकरण देणे

क) लेखकाची प्रशंसा करणारी कविता लिहिणे

ड) केवळ पुस्तकाची किंमत सांगणे

६) तळटीपांमध्ये वापरल्या जाणाऱ्या कित्ता या शब्दाचा अर्थ काय होतो?

अ) संदर्भ पूर्णपणे चुकीचा आहे असे घोषित करणे

ब) सलगपणे येणारा संदर्भ त्याच ग्रंथातील आणि त्याच लेखकाचा असणे

क) एका नवीन संदर्भ ग्रंथाची सुरुवात करणे

ड) लेखकाचे घरचा पत्ता लिहिणे

७) ऐतिहासिक ग्रंथातील स्थळ सूची वाचकासाठी का उपयुक्त असते?

अ) सर्व शहरांची केवळ लोकसंख्या पाहण्यासाठी

ब) केवळ नवीन सहलीचे नियोजन करण्यासाठी

क) पुस्तकातील चित्रे रंगवण्यासाठी

ड) विशिष्ट भौगोलिक ठिकाणाचे उल्लेख पुस्तकात कुठे आले आहेत हे सहज शोधता येते

८) संशोधनात परिशिष्ट जोडण्याचा मुख्य फायदा काय आहे?

अ) त्यात केवळ लेखकाची वैयक्तिक डायरी छापली जाते

ब) त्यामुळे लेखकाला जास्त पैसे मिळतात

क) सांख्यिकीय माहिती, नकाशे आणि दुर्मिळ पत्रांसारखे ठोस पुरावे सादर करता येतात

ड) केवळ पुस्तकाची जाडी वाढवून ते मोठे दिसते

९) गूगल डॉक्स मधील व्हॉईस टायपिंग सुविधेचा संशोधकासाठी काय उपयोग होतो?

अ) दुसऱ्यांचे प्रबंध चोरून वाचण्यासाठी याची मदत होते

ब) न लिहिता केवळ बोलून टिपणे वेगाने तयार करता येतात

क) मोबाईलचा आवाज वाढवण्यासाठी याचा वापर होतो

ड) या सुविधेमुळे आपोआप इतिहास तयार होतो

१०) ऐतिहासिक ग्रंथातील स्थळ सूची वाचकासाठी का उपयुक्त असते?

अ) सर्व शहरांची केवळ लोकसंख्या पाहण्यासाठी

ब) केवळ नवीन सहलीचे नियोजन करण्यासाठी

क) पुस्तकातील चित्रे रंगवण्यासाठी

ड) विशिष्ट भौगोलिक ठिकाणाचे उल्लेख पुस्तकात कुठे आले आहेत हे सहज शोधता येते

**२.१.३ अहवाल लेखन आणि सादरीकरण:**

**अ) अहवाल लेखनाचे प्रमुख घटक**

संशोधन अहवाल हे केवळ विखुरलेल्या माहितीचे किंवा आकडेवारीचे संकलन नसून, ते संशोधकाच्या दीर्घकालीन व्यासंग, चिकाटी आणि प्रगल्भ बौद्धिक कष्टांचे जिवंत प्रतिबिंब असते. जेव्हा एखादा संशोधक एखाद्या विषयाचा ध्यास घेतो, तेव्हा त्या प्रवासातील प्रत्येक टप्पा समस्येची निवड करण्यापासून ते निष्कर्षापर्यंत पोहोचण्यापर्यंत या अहवालात अत्यंत सूक्ष्मपणे गुंफलेला असतो. एक दर्जेदार अहवाल

वाचकाचे केवळ समाधान करत नाही, तर त्याला विषयाच्या गाभ्यापर्यंत घेऊन जातो. संशोधकाचा मुख्य उद्देश हा संशोधनाची विश्वासार्हता प्रस्थापित करणे हा असतो. संशोधकाने मांडलेले तर्क आणि काढलेले निष्कर्ष हे निव्वळ अंदाज नसून ते शास्त्रीय निकषांवर, पुराव्यांवर आणि तर्कशुद्ध विश्लेषणावर आधारित आहेत, याची खात्री हा अहवाल देतो. तो वाचकांना पुराव्यांच्या आधारे निष्कर्षांची सत्यता पटवून देतो आणि संशोधनामध्ये पारदर्शकता आणतो.

**अ) प्राथमिक भाग:**

**१) शीर्षक पृष्ठ आणि व्याप्ती:**

शीर्षक पृष्ठ हे संशोधन अहवालाचे पहिले दर्शन असते. यावरून वाचकाला संशोधनाचा नेमका विषय, त्याचा कालखंड आणि भौगोलिक किंवा तांत्रिक व्याप्ती यांची स्पष्ट कल्पना येते. एक प्रभावी शीर्षक संशोधकाचे कौशल्य आणि अभ्यासाची दिशा दर्शवते, ज्यामुळे वाचकाला विषयाचे गांभीर्य आणि महत्त्व प्रारंभीच समजण्यास मदत होते.

**२) ऋणनिर्देश आणि कृतज्ञता:**

संशोधन ही एक सामूहिक प्रक्रिया असते. ऋणनिर्देशाच्या माध्यमातून संशोधक त्या सर्व व्यक्ती, संस्था आणि मार्गदर्शकांबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो ज्यांनी माहिती संकलन, तांत्रिक मदत किंवा प्रोत्साहन देऊन हे कार्य पूर्ण करण्यास साहाय्य केले. हा भाग संशोधनातील मानवी नातेसंबंध आणि नैतिक कृतज्ञतेचे प्रतीक मानला जातो.

**३) अनुक्रमणिका आणि सूची:**

अनुक्रमणिका आणि कोष्टकांची सूची ही अहवालाचा नकाशा असते. यामुळे वाचकाला संपूर्ण अहवालातील प्रकरणांची रचना, उपमुद्दे आणि आकडेवारी नेमकी कुठे आहे, हे त्वरित शोधता येते. सुव्यवस्थित सूचीमुळे अहवालाची हाताळणी सोपी होते आणि वाचकाचा वेळ वाचतो, ज्यामुळे संशोधनाची तांत्रिक मांडणी अधिक सुटसुटीत आणि स्पष्ट दिसते.

**ब) औपचारिक संरचना:**

प्राथमिक भाग वाचकाला मुख्य मजकुराकडे नेणारा एक महत्त्वाचा दुवा आहे. अहवालाची ही औपचारिक मांडणी वाचकाच्या मनात विषयाबद्दल कुतूहल निर्माण करते आणि त्याला सखोल वाचनासाठी मानसिकदृष्ट्या तयार करते. या भागामुळेच संपूर्ण संशोधन दस्तऐवजाला एक व्यावसायिक दर्जा प्राप्त होतो आणि संशोधकाची शिस्तबद्धता दिसून येते.

**१) प्रस्तावना आणि समस्येचे गांभीर्य:**

ऐतिहासिक संशोधनात प्रस्तावना ही केवळ विषयाची ओळख नसते, तर ती विशिष्ट कालखंडातील सामाजिक, राजकीय आणि आर्थिक स्थितीचा नकाशा असतो. संशोधकाने हाच विशिष्ट काळ अथवा हीच

घटना अभ्यासासाठी का निवडली, याचे स्पष्टीकरण यात असते. वर्तमानातील प्रश्नांची मुळे भूतकाळात कशी दडलेली आहेत, हे मांडून संशोधक विषयाची निकड स्पष्ट करतो.

**२) साहित्य आढावा:**

इतिहासात साहित्य आढावा म्हणजे केवळ पुस्तकांची यादी नसून ती इतिहासलेखन परंपरेची चिकित्सा असते. आधीच्या इतिहासकारांनी या घटनेकडे कोणत्या दृष्टिकोनातून (उदा. वसाहतवादी, राष्ट्रवादी, मार्क्सवादी) पाहिले आहे, हे यात तपासले जाते. यामुळे विद्यमान संशोधकाला पूर्वीच्या लेखनातील पूर्वग्रह किंवा त्रुटी शोधून स्वतःची नवीन मांडणी करणे सोपे जाते.

**३) संशोधन पद्धती:**

ऐतिहासिक संशोधनाचा हा सर्वात कठीण भाग आहे. यात बाह्य चिकित्सा आणि अंतर्गत चिकित्सा या साधनांचा वापर होतो. कागदपत्रे, नाणी, शिलालेख किंवा हस्तलिखिते यांची अस्सलता कशी तपासली, हे यात स्पष्ट केले जाते. ऐतिहासिक पुराव्यांची विश्वासार्हता हीच संशोधनाच्या वैधतेचा आधार असते.

**४) माहितीचे विश्लेषण आणि निष्कर्ष:**

इतिहासात माहितीचे विश्लेषण म्हणजे कागदपत्रांना बोलते करणे होय. उपलब्ध साधनांची एकमेकांशी सांगड घालून, विसंगती दूर करून संशोधक घटनांचा कार्यकारणभाव लावतो. केवळ आकडेवारी नसून मानवी अनुभवांचे आणि सत्तासंघर्षाचे गुणात्मक विश्लेषण करून वस्तुनिष्ठ निष्कर्ष काढले जातात.

**५) शिफारसी आणि भविष्यातील दिशा:**

इतिहासातील शिफारसी या थेट नसून त्या बोधात्मक स्वरूपाच्या असतात. भूतकाळातील चुकांमधून धडा घेऊन भविष्य सुधारण्यासाठी हा विभाग दिशा दाखवतो. तसेच, ऐतिहासिक वारशाचे जतन कसे करावे किंवा विशिष्ट ऐतिहासिक सिद्धांतावर भविष्यात कोणती नवीन साधने उपलब्ध होऊ शकतात, याचे मार्गदर्शन यात समाविष्ट असते.

**क) पूरक भाग:**

**१) संदर्भसूची आणि वाङ्मयचौर्य:**

ऐतिहासिक संशोधनात संदर्भसूचीला अनन्यसाधारण महत्त्व असते. संशोधकाने माहितीसाठी कोणत्या मूळ ग्रंथांचा, हस्तलिखितांचा किंवा सरकारी दस्तऐवजांचा वापर केला आहे, याची ही अधिकृत नोंद असते. इतर इतिहासकारांच्या विचारांचा यथोचित संदर्भ दिल्याने संशोधकाची नैतिकता सिद्ध होते आणि वाङ्मयचौर्य टाळून लेखनाला एक वैश्विक कायदेशीर मान्यता प्राप्त होते.

**२) परिशिष्ट आणि मूळ साधने:**

परिशिष्टात संशोधनाशी संबंधित अशा पुराव्यांचा समावेश असतो जे मुख्य मजकुरात विस्तारामुळे देता येत नाहीत. यात ऐतिहासिक नकाशे, दुर्मिळ पत्रांच्या छायांकित प्रती, शिलालेखांचे फोटो किंवा

मुलाखतींच्या सूचीचा समावेश होतो. हे घटक वाचकाला मूळ पुराव्यांशी थेट जोडतात आणि संशोधनातील मांडणीची सत्यता स्वतः पडताळून पाहण्याची संधी देतात.

**ब) सादरीकरण:**

ऐतिहासिक संशोधनाचा प्रवास हा एका तपश्चर्येसारखा असतो, ज्याचा परमोच्च बिंदू म्हणजे सादरीकरण' होय. संशोधकाने विषयाची निवड केल्यापासून ते साधनांच्या परीक्षणापर्यंत जे अतोनात कष्ट घेतलेले असतात, त्याचे मूर्त स्वरूप या टप्प्यावर जगासमोर येते. केवळ माहितीचे संकलन करणे म्हणजे इतिहास नव्हे, तर त्या माहितीचा लावलेला अन्वयार्थ, त्यातील कार्यकारणभाव आणि शोधलेले ऐतिहासिक सत्य वाचकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवणे हे संशोधकाचे मुख्य उद्दिष्ट असते.

या टप्प्यावर संशोधकाच्या भाषेचे प्रभुत्व, बुद्धिमत्ता आणि तर्कशुद्ध मांडणीचा कस लागतो. जर सादरीकरण ओघवते, पुराव्यांनी युक्त आणि आकर्षक नसेल, तर संशोधकाचे मौलिक काम पडद्याआड राहण्याची भीती असते. थोडक्यात, सादरीकरण हे संशोधकाच्या कष्टांचे आणि निष्कर्षांचे असे एक आरसपाणी दर्शन आहे, जे गतकाळातील घटनांना वर्तमानात जिवंत करून संशोधनाला खऱ्या अर्थाने पूर्णत्व प्रदान करते.

**सादरीकरणाचे स्वरूप:**

**१) संशोधनाचे अंतिम फलित व यश:**

सादरीकरण हा इतिहास संशोधन प्रक्रियेचा कळस आहे. संशोधकाने विषयाची निवड केल्यापासून ते साधनांच्या परीक्षणापर्यंत जे अतोनात कष्ट घेतलेले असतात, त्याचे मूर्त स्वरूप या टप्प्यावर जगासमोर येते. केवळ माहितीचे संकलन करणे म्हणजे इतिहास नव्हे, तर त्या माहितीचा लावलेला अचूक अन्वयार्थ आणि कार्यकारणभाव जेव्हा शास्त्रशुद्ध पद्धतीने प्रबंध रूपाने मांडला जातो, तेव्हाच संशोधनाला खऱ्या अर्थाने पूर्णत्व आणि यश प्राप्त होते.

**२) कौशल्याचा आणि बुद्धिमत्तेचा कस:**

सादरीकरण करताना संशोधकाला आपल्या बौद्धिक क्षमतेचा, प्रदीर्घ अनुभवाचा आणि चिकीत्सा वृत्तीचा कौशल्याने वापर करावा लागतो. गतकाळात घडलेल्या मानवी जीवनातील घडामोडींवर निसर्गाचा आणि परिस्थितीचा काय परिणाम झाला, हे मांडताना संशोधकाच्या प्रतिभेचा कस लागतो. आपल्याजवळील ज्ञानाचा वापर करून मृतवत वाटणाऱ्या ऐतिहासिक घटनांना वर्तमान काळात जिवंत करण्याचे आव्हानात्मक काम संशोधक आपल्या लेखणीद्वारे करत असतो.

**३) गृहीतकांची पडताळणी व सिद्धांताची मांडणी:**

संशोधनाच्या प्रारंभी संशोधकाने काही गृहीतके किंवा तात्पुरती मते मांडलेली असतात. सादरीकरणाच्या वेळी ही गृहीतके पुराव्यांच्या आधारे सिद्ध झाली आहेत की निष्फळ ठरली आहेत, याचे स्पष्ट विवेचन

करणे अनिवार्य असते. जर पुरावे भक्कम असतील, तर गृहीतकांचे रूपांतर सिद्धांतामध्ये होते. ही पारदर्शकता संशोधकाचा प्रामाणिकपणा आणि त्याच्या कामाचा दर्जा अधोरेखित करते.

**४) प्रभावी लेखनशैली व ओघवती भाषा:**

प्रबंधाचे सादरीकरण प्रभावी होण्यासाठी त्याची लेखनशैली अत्यंत दर्जेदार असावी लागते. विषयाला साजेसे आकर्षक शीर्षक, विषयाचा मर्म सांगणारी समर्पक प्रस्तावना आणि वाचकाला खिळवून ठेवणारी ओघवती निवेदन शैली हे यशस्वी सादरीकरणाचे गमक आहे. भाषा साधी, सरळ आणि तर्कसंगत असावी, जेणेकरून संशोधकाने मांडलेले क्लिष्ट निष्कर्षदेखील वाचकाला सहजपणे आत्मसात करता येतील.

**५) पुराव्यांचे अधिष्ठान व तळटीपांचे महत्त्व:**

इतिहासलेखनात पुराव्याला सर्वोच्च स्थान आहे. सादरीकरण करताना प्रत्येक विधानाला किंवा मताला ऐतिहासिक पुराव्यांचा भक्कम आधार असणे आवश्यक असते. या मतांना पुष्टी देण्यासाठी तळटीपा वापरल्या जातात. तळटीपांमुळे संशोधनात अचूकता येते आणि वाचकाला अधिक माहिती मिळवण्यासाठी मूळ साधनांचा माग घेणे सुलभ होते. हे पुराव्यांचे अधिष्ठानच संशोधनाला वस्तुनिष्ठतेचा आणि विश्वसनीयतेचा दर्जा प्राप्त करून देते.

**ब) सामान्यीकरण:**

**१) तर्कावर आधारित निष्कर्षांची मांडणी:**

इतिहास संशोधनात सामान्यीकरण ही एक उच्च बौद्धिक प्रक्रिया आहे. विज्ञानामध्ये प्रयोगशाळेत प्रयोग करून निष्कर्ष काढले जातात, परंतु इतिहासात तसे करता येत नाही. इतिहास संशोधक गतकालीन घटनांचा सखोल अभ्यास करतो आणि आपल्या तर्कशक्तीच्या आधारे विशिष्ट निकष मांडतो. हे निष्कर्ष केवळ माहितीचे संकलन नसून, मानवी स्वभावाच्या आणि सामाजिक बदलांच्या प्रवृत्तीचा तो एक आरसपाणी शोध असतो. संशोधकाचा तर्क जेवढा भक्कम आणि पुराव्यांवर आधारित असतो, तेवढेच त्याचे सामान्यीकरण अधिक अचूक आणि वैश्विक ठरते.

**२) कार्यकारणभाव आणि साम्यानुमान:**

इतिहासातील दोन भिन्न घटनांमधील साम्य शोधणे म्हणजे साम्यानुमान' होय. संशोधक जेव्हा वेगवेगळ्या काळात घडलेल्या सारख्याच घटनांचा अभ्यास करतो, तेव्हा त्याला त्यामागील एक समान कार्यकारणभाव सापडतो. उदा. दोन युद्धांच्या कारणांचा अभ्यास करताना सत्तेची लालसा किंवा आर्थिक हितसंबंध हे समान दुवे असू शकतात. यातूनच विशिष्ट परिस्थितीत मानवी समूह विशिष्ट पद्धतीनेच वागतो, असा अंदाज बांधता येतो. हा कार्यकारणभाव शोधणे हेच सामान्यीकरणाचे मुख्य उद्दिष्ट असते, ज्यामुळे विखुरलेल्या घटनांना एक अर्थपूर्ण सूत्र प्राप्त होते.

**३) ऐतिहासिक मर्यादांचे भान:**

इतिहासात सामान्यीकरण करताना संशोधकाला आपल्या मर्यादांचे भान असणे अत्यंत आवश्यक

आहे. नैसर्गिक विज्ञानासारखे इतिहासात शंभर टक्के अचूक भाकीत करणे शक्य नसते, कारण मानवी स्वभाव आणि परिस्थिती अत्यंत चंचल असते. उदाहरणार्थ, शीतयुद्धाच्या अभ्यासावरून आपण भविष्यातील महासत्तांच्या संघर्षाचा अंदाज घेऊ शकतो, पण तो संघर्ष नक्की कधी आणि कसा होईल हे सांगता येत नाही. प्रत्येक घटना ही एका विशिष्ट कालखंडाच्या आणि संस्कृतीच्या चौकटीत घडलेली असते, त्यामुळे तिचे सरसकट सार्वत्रीकरण करणे जोखमीचे ठरू शकते.

**४) वस्तुनिष्ठ मांडणी आणि चिकीत्सक वृत्ती:**

सामान्यीकरण करताना संशोधकाने कोणताही उतावळेपणा किंवा घाई करू नये. पूर्वग्रह विरहित राहून विविध मतप्रवाहांचा आणि परस्परविरोधी पुराव्यांचा बारकाईने अभ्यास करणे गरजेचे असते. केवळ आपल्या मताला पुष्टी देणारे पुरावे न पाहता, वस्तुनिष्ठपणे सर्व बाजू तपासाव्या लागतात. संशोधकाची मांडणी जेवढी तर्कसंगत आणि पारदर्शक असते, तेवढेच त्याचे सामान्यीकरण अभ्यासकांमध्ये स्वीकारार्ह ठरते. ही वस्तुनिष्ठता आणि चिकीत्सक वृत्तीच संशोधनाला एका उच्च पातळीवर नेऊन ठेवते.

**५) समान दुव्यांचा शोध आणि अर्थपूर्णता:**

इतिहास संशोधनाचे सादरीकरण करताना केवळ घटनांचे वर्णन करून चालत नाही, तर त्या घटनांमधील समान दुवे शोधून त्यांचा अन्वयार्थ लावावा लागतो. यालाच घटितांचे सामान्यीकरण असेही म्हणतात. जेव्हा आपण दोन ऐतिहासिक प्रसंगांमधील समानता स्पष्ट करतो, तेव्हा इतिहास वाचकांसाठी केवळ एक कथा न राहता, तो जीवनाचा एक धडा बनतो. या प्रक्रियेमुळेच इतिहासाचा अभ्यास केवळ भूतकाळाशी मर्यादित न राहता तो वर्तमानाला समजून घेण्यासाठी आणि भविष्याची दिशा ठरवण्यासाठी अत्यंत अर्थपूर्ण व उपयुक्त ठरतो.

**स्वय-अध्ययन प्रश्न क्र ३**

१) संशोधन अहवालातील शीर्षक पृष्ठ वाचकासाठी का महत्त्वाचे असते?

अ) शीर्षक पृष्ठावरून वाचकाला संशोधनाचा विषय, कालखंड आणि व्याप्ती यांची स्पष्ट कल्पना येते

ब) यामुळे संशोधकाला किती मानधन मिळाले आहे याची माहिती वाचकाला मिळते

क) अहवालातील सर्व आकडेवारी आणि कोष्टके फक्त शीर्षक पृष्ठावरच दिलेली असतात

ड) शीर्षक पृष्ठ हे केवळ अहवालाची सजावट करण्यासाठी वापरले जाणारे पान असते

२) संशोधन अहवालात ऋणनिर्देश या भागाचा मुख्य उद्देश काय असतो?

अ) संशोधनासाठी खर्च झालेला सर्व पैसा कोठून आला याचा हिशोब मांडणे

ब) ज्या व्यक्ती किंवा संस्थांनी संशोधनात मदत केली त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे

क) अहवालात आलेल्या चुकांची जबाबदारी दुसऱ्या व्यक्तींवर ढकलणे

ड) संशोधनाचे निष्कर्ष खोटे असल्याचे जाहीर करणे

३) अनुक्रमणिका आणि सूची या भागाचे महत्त्व काय आहे?

अ) ही संशोधनाची मूळ कागदपत्रे आणि छायाचित्रे यांची यादी असते

ब) हा अहवालाचा नकाशा असून यामुळे वाचकाला उपमुद्दे आणि आकडेवारी त्वरित शोधता येते

क) हा केवळ अहवालाचा आकार वाढवण्यासाठी जोडलेला एक अनावश्यक भाग असतो

ड) यात संशोधकाने भविष्यात करायच्या कामांची यादी दिलेली असते

४) ऐतिहासिक संशोधनात साहित्य आढावा कशासाठी केला जातो?

अ) केवळ नवीन प्रकाशित झालेल्या गोष्टी आणि कादंबऱ्यांची यादी तयार करण्यासाठी

ब) आधीच्या इतिहासकारांच्या मांडणीतील त्रुटी शोधून स्वतःची नवीन मांडणी करण्यासाठी

क) संशोधकाने स्वतः लिहिलेल्या सर्व कवितांचा संग्रह अहवालात समाविष्ट करण्यासाठी

ड) केवळ परदेशी लेखकांच्या पुस्तकांचे मराठीत भाषांतर करून देण्यासाठी

५) संशोधन पद्धतीमध्ये बाह्य चिकित्सा आणि अंतर्गत चिकित्सा कशासाठी वापरली जाते?

अ) केवळ अहवालाची छपाई आणि कागदाचा दर्जा तपासण्यासाठी

ब) ऐतिहासिक पुराव्यांची आणि साधनांची अस्सलता व विश्वासार्हता तपासण्यासाठी

क) संशोधकाने किती प्रवास केला आणि किती वेळ काम केले हे मोजण्यासाठी

ड) अहवालाचे सादरीकरण कोणत्या शहरात करायचे हे ठरवण्यासाठी

६) इतिहासातील शिफारसी प्रामुख्याने कोणत्या स्वरूपाच्या असतात?

अ) या केवळ सरकारला नवीन कायदे बनवण्यासाठी दिलेल्या तांत्रिक सूचना असतात

ब) भूतकाळातील चुकांमधून धडा घेऊन भविष्य सुधारण्यासाठी या बोधात्मक स्वरूपाच्या असतात

क) केवळ नवीन इमारती बांधण्यासाठी दिलेल्या तांत्रिक मार्गदर्शक सूचना यात असतात

ड) संशोधकाने आपल्या वैयक्तिक फायद्यासाठी केलेल्या मागण्या यात असतात

७) संदर्भसूची मुळे संशोधकाला कोणता कायदेशीर व नैतिक फायदा होतो?

अ) यामुळे संशोधकाला शासनाकडून अधिक आर्थिक अनुदान मिळण्यास मदत होते

ब) इतर इतिहासकारांच्या विचारांचा संदर्भ दिल्याने वाङ्मयचौर्य टाळून कायदेशीर मान्यता मिळते

क) यामुळे संशोधकाला आपले पुस्तक बाजारात जास्त किमतीत विकता येते

ड) संदर्भसूचीमुळे संशोधनाचा विषय अधिक क्लिष्ट आणि कठीण होतो

८) संशोधनामध्ये गृहीतके केव्हा सिद्धांतात रूपांतरित होतात?

अ) जेव्हा संशोधक आपले मत कोणाचेही ऐकून न घेता अहवालात मांडतो

ब) जेव्हा सादरीकरणाच्या वेळी ही गृहीतके भक्कम पुराव्यांच्या आधारे सिद्ध होतात

क) जेव्हा अहवालाचे शीर्षक खूप मोठे आणि आकर्षक ठेवले जाते

ड) जेव्हा संशोधक गृहीतके सिद्ध करण्यात अपयशी ठरतो

९) इतिहास संशोधनात साम्यानुमान म्हणजे काय?

अ) दोन वेगवेगळ्या काळात घडलेल्या सारख्याच घटनांमधील समान कार्यकारणभाव शोधणे

ब) केवळ एकाच घटनेचे अनेक वेळा वाचन करून ती लक्षात ठेवणे

क) भविष्यकाळात नेमकी कोणती युद्धे होतील याची अचूक तारीख सांगणे

ड) इतिहास केवळ कथा म्हणून सांगणे आणि त्यातील पुराव्यांकडे दुर्लक्ष करणे

१०) अहवाल सादरीकरण करताना तळटीपा वापरणे का आवश्यक आहे?

अ) यामुळे पानावर रिकामी जागा राहत नाही आणि अहवाल भरलेला दिसतो

ब) विधानांना पुराव्यांचा आधार देण्यासाठी आणि वाचकाला मूळ साधनांचा माग घेणे सुलभ करण्यासाठी

क) केवळ अहवालाची पाने वाढवण्यासाठी मुद्दाम छोटे अक्षरे वापरणे

ड) अहवालातील कठीण शब्दांचे अर्थ सांगण्यासाठी डिक्शनरीचा वापर करणे

### २.१.४ वाङ्मयचौर्य आणि बौद्धिक संपदा अधिकार:

मानवी संस्कृतीचा विकास हा केवळ भौतिक नसून तो प्रामुख्याने विचारांच्या देवाणघेवाणीतून घडलेला एक प्रवास आहे. आदिम काळापासून आजच्या प्रगत तंत्रज्ञान युगापर्यंत, ज्ञानाचा वारसा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होत गेला आहे. मात्र, या प्रक्रियेत एका महत्त्वाच्या पैलूचा विसर पडता कामा नये, तो म्हणजे सृजनशीलतेचा सन्मान. जेव्हा एखादी व्यक्ती आपल्या बुद्धीचा कस लावून, कल्पकतेच्या जोरावर आणि अथक परिश्रमातून एखादे नवीन संशोधन, साहित्य किंवा कलाकृती निर्माण करते, तेव्हा ती तिची 'बौद्धिक संपदा' (Intellectual Property) असते. या निर्मितीवर त्या व्यक्तीचा केवळ नैतिकच नव्हे, तर कायदेशीर हक्कही असतो. ज्याप्रमाणे आपण भौतिक मालमत्तेचे रक्षण करतो, त्याचप्रमाणे बुद्धीने निर्माण केलेल्या या अमूर्त संपत्तीचे रक्षण करणे ही काळाची गरज आहे.

आजच्या डिजिटल क्रांतीमुळे माहितीचा महापूर आला आहे. एका क्लिकवर जगभरातील ज्ञान उपलब्ध असताना, नकळतपणे दुसऱ्याचे विचार स्वतःचे म्हणून मांडण्याची प्रवृत्ती वाढली आहे. यालाच आपण 'वाङ्मयीन चौर्य' (Plagiarism) म्हणतो. ही कृती लेखकाच्या कष्टाचा अपमान करणारी आणि

संशोधनाच्या शुद्धतेला बाधा आणणारी आहे. माहितीचा वापर करणे गैर नाही, मात्र त्या मूळ स्रोताचा आदरपूर्वक उल्लेख करणे हे सुसंस्कृतपणाचे लक्षण आहे.

**वाङ्मयीन चौर्य: संकल्पना आणि स्वरूप**

वाङ्मयीन चौर्य अथवा साहित्यिक चोरी ही संकल्पना केवळ मजकुराची नक्कल करण्यापुरती मर्यादित नाही, तर ती एका व्यक्तीच्या बौद्धिक कष्टांवर घातलेला दरोडा आहे. सोप्या भाषेत सांगायचे तर, जेव्हा एखादी व्यक्ती दुसऱ्या लेखकाचे शब्द, मूळ विचार, संशोधनाचे निष्कर्ष किंवा कल्पकता कोणत्याही स्वरूपात चोरते आणि मूळ निर्मात्याला त्याचे श्रेय न देता, ते सर्व स्वतःचे असल्याचा आभास निर्माण करते, तेव्हा त्या कृतीला वाङ्मयीन चौर्य म्हटले जाते.

याचे स्वरूप अत्यंत व्यापक आहे. एखाद्या पुस्तकातील परिच्छेद जसाच्या तसा उचलणे, इंटरनेटवरील लेखातील माहिती कॉपी करणे किंवा दुसऱ्याच्या संकल्पनेला थोडेफार शब्द बदलून स्वतःच्या नावे प्रसिद्ध करणे, हे सर्व वाङ्मयीन चौर्याच्या कक्षेत येते. आजच्या माहिती-तंत्रज्ञानाच्या युगात माहिती मिळवणे सोपे झाल्यामुळे ही प्रवृत्ती वाढीस लागली आहे. मात्र, ही केवळ एक तांत्रिक चूक किंवा विसरभोळेपणा नसून, तो एक गंभीर नैतिक अपराध आहे.

लेखन आणि संशोधन क्षेत्रात प्रामाणिकपणा हे सर्वात मोठे मूल्य मानले जाते. जेव्हा आपण दुसऱ्याचे विचार चोरतो, तेव्हा आपण केवळ त्या लेखकाची फसवणूक करत नाही, तर संपूर्ण वाचक वर्ग आणि ज्ञानशाखेचा विश्वासघात करतो. ही कृती सर्जनशीलतेला मारक ठरते, कारण यामुळे नवीन आणि कष्टाने काम करणाऱ्या संशोधकांचा उत्साह कमी होतो. म्हणूनच, शैक्षणिक आणि व्यावसायिक क्षेत्रात वाङ्मयीन चौर्याला कायदेशीर गुन्ह्याप्रमाणेच मानले जाते, ज्याचे परिणाम करिअर आणि प्रतिष्ठेवर गंभीरपणे होऊ शकतात.

**वाङ्मयीन चौर्याचे प्रकार:**

**१) प्रत्यक्ष चौर्य:**

प्रत्यक्ष चौर्य हा वाङ्मयीन चोरीचा सर्वात गंभीर आणि उघड प्रकार आहे. यामध्ये एखादी व्यक्ती दुसऱ्या लेखकाचे मूळ शब्द, वाक्ये किंवा संपूर्ण परिच्छेद कोणत्याही बदलाशिवाय जसेच्या तसे उचलते. महत्त्वाचे म्हणजे, हा मजकूर वापरताना मूळ लेखकाचे नाव किंवा संदर्भ दिला जात नाही, तसेच तो अवतरण चिन्हातही लिहिला जात नाही. ही कृती पूर्णपणे हेतुपुरस्सर केलेली फसवणूक असते. शैक्षणिक आणि संशोधन क्षेत्रात अशा प्रकारच्या चोरीला अत्यंत हीन मानले जाते. यामुळे लेखकाची विश्वासार्हता नष्ट होते आणि बौद्धिक संपदा कायद्यानुसार कठोर कायदेशीर कारवाई किंवा दंडात्मक पाऊले उचलली जाऊ शकतात.

**२) स्वतःचेच चौर्य:**

अनेकांना असे वाटते की स्वतःचेच जुने लेखन पुन्हा वापरणे चुकीचे नाही, परंतु संशोधनाच्या जगात याला स्वतःचेच चौर्य म्हटले जाते. जेव्हा एखादा लेखक त्याचे पूर्वी प्रकाशित झालेले संशोधन, लेख

अथवा प्रकल्प पुन्हा नवीन असल्याचे भासवून दुसऱ्या ठिकाणी सादर करतो, तेव्हा तो वाचकांची आणि प्रकाशकांची दिशाभूल करत असतो. शैक्षणिक नैतिकता असे सांगते की, जर तुम्हाला तुमच्याच जुन्या कामाचा संदर्भ द्यायचा असेल, तर तिथेही तसा स्पष्ट उल्लेख करणे अनिवार्य आहे. नवीन संशोधनात नाविन्य असणे अपेक्षित असते; जुन्याच माहितीचा नवा मुखवटा चढवून वापर करणे हे अनैतिक मानले जाते.

**३) पॅराफ्रेजिंग:**

हा वाङ्मयीन चौर्याचा एक अतिशय सूक्ष्म आणि सर्रास आढळणारा प्रकार आहे. यात मूळ लेखकाचे शब्द जसेच्या तसे न वापरता, केवळ त्यातील शब्दांची अदलाबदल केली जाते किंवा वाक्यांची रचना थोडी बदलली जाते. जरी शब्द बदलले असले, तरी त्यामागील मूळ विचार आणि संकल्पना ही दुसऱ्याचीच असते. जोपर्यंत तुम्ही त्या विचाराचा उगम किंवा मूळ लेखकाचे श्रेय देत नाही, तोपर्यंत तो मजकूर तुमचा स्वतःचा मानला जात नाही. केवळ शब्द फिरवून लिहिणे हे संशोधनाचे कार्य नसून, तो मूळ कल्पनेचा चोरटा वापरच ठरतो.

**४) तुकड्यांचे चौर्य:**

याला 'पॅचवर्क' चौर्य असेही म्हणतात. यामध्ये लेखक स्वतःचे कष्ट वाचवण्यासाठी वेगवेगळ्या स्रोतांतून (पुस्तके, इंटरनेट, शोधनिबंध) थोडे-थोडे संदर्भ किंवा वाक्ये उचलतो आणि ती एकत्र जोडून एक नवीन लेख तयार करतो. यात काही स्वतःचे शब्द आणि काही दुसऱ्याचे शब्द यांचे मिश्रण असते. हे एखाद्या चित्राच्या कोलाजसारखे वाटते, जिथे मूळ गाभा इतरांच्या साहित्याचा असतो. जरी हा मजकूर नवीन वाटला तरी, त्यातील प्रत्येक तुकडा हा दुसऱ्याच्या बौद्धिक श्रमाचा भाग असतो. योग्य संदर्भ न देता अशा प्रकारे माहितीची सांधेजोड करणे हा एक प्रकारचा बौद्धिक फसवणुकीचाच भाग आहे.

**बौद्धिक संपदा अधिकार** (Intellectual Property Rights IPR):

बौद्धिक संपदा अधिकार ही एक अशी कायदेशीर व्यवस्था आहे, जी मानवी बुद्धिमत्तेतून निर्माण झालेल्या अमूर्त मालमत्तेला संरक्षण देते. ज्याप्रमाणे एखाद्या व्यक्तीला स्वतःच्या जमिनीवर किंवा घरावर मालकी हक्क असतो, तसाच हक्क त्याने स्वतःच्या कल्पकतेने निर्माण केलेल्या साहित्यावर, शोधावर किंवा कलाकृतीवर असतो. या अधिकारांमुळे लेखक, संशोधक आणि कलाकार यांच्या सर्जनशीलतेला कायद्याचे कवच प्राप्त होते. याचा मुख्य उद्देश हा आहे की, ज्या व्यक्तीने कष्ट करून काहीतरी नवीन घडवले आहे, तिला त्याच्या निर्मितीचा आर्थिक लाभ मिळावा आणि समाजात योग्य सन्मान मिळावा.

**१) कॉपीराईट:**

कॉपीराईट हा अधिकार प्रामुख्याने साहित्यिक, संगीत, नाट्य, चित्रपट आणि सॉफ्टवेअर यांसारख्या कलात्मक निर्मितीसाठी दिला जातो. जेव्हा एखादा लेखक पुस्तक लिहितो किंवा संगीतकार धून तयार करतो, तेव्हा त्या मूळ कृतीवर त्याची मालकी सिद्ध करण्यासाठी कॉपीराईट महत्त्वाचा ठरतो. याचा सर्वात मोठा फायदा म्हणजे लेखकाच्या हयातीत आणि त्याच्या मृत्यूनंतरही ६० वर्षांपर्यंत हे संरक्षण कायम राहते. यामुळे मूळ निर्मात्याच्या संमतीशिवाय त्याच्या कामाची छपाई, विक्री किंवा रूपांतर (उदा. पुस्तकावर

चित्रपट काढणे) करता येत नाही. हे अधिकार कलाकारांना त्यांच्या कल्पकतेचा आर्थिक मोबदला मिळवून देण्यास आणि त्यांच्या कलाकृतीचे विद्रुपीकरण रोखण्यास मदत करतात.

**२) पेटंट:**

पेटंट हे नवीन तांत्रिक शोध, यंत्रसामग्री किंवा वैज्ञानिक प्रक्रियांसाठी दिले जाणारे कायदेशीर संरक्षण आहे. जेव्हा एखादा संशोधक जगाला उपयुक्त ठरेल असा नवीन शोध लावतो, तेव्हा सरकार त्याला २० वर्षांसाठी त्या शोधावर एकाधिकार देते. या कालावधीत संशोधकाच्या परवानगीशिवाय इतर कोणीही त्या तंत्रज्ञानाचा व्यावसायिक वापर करू शकत नाही. पेटंटमुळे संशोधकाने केलेल्या मोठ्या गुंतवणुकीचा आणि मेहनतीचा परतावा मिळण्याची खात्री मिळते. हे अधिकार केवळ नवीन शोधापुरते मर्यादित नसून, अस्तित्वात असलेल्या तंत्रज्ञानात केलेल्या महत्त्वपूर्ण सुधारणांसाठीही मिळू शकतात. यामुळे समाजात नवनवीन संशोधनासाठी पोषक वातावरण निर्माण होते.

**३) ट्रेडमार्क:**

व्यापार आणि उद्योगाच्या जगात 'ट्रेडमार्क' ही एखाद्या कंपनीची किंवा ब्रँडची अनन्य ओळख असते. यामध्ये कंपनीचे नाव, लोगो, एखादे विशिष्ट बोधचिन्ह किंवा आकर्षक घोषणावाक्य यांचा समावेश होतो. ग्राहकांना बाजारपेठेतील हजारो उत्पादनांमधून आपल्या आवडीचा ब्रँड ओळखता यावा, यासाठी ट्रेडमार्क अत्यंत प्रभावी ठरतो. याची नोंदणी सुरुवातीला १० वर्षांसाठी असते, परंतु ती वेळोवेळी नूतनीकरण करून अनंत काळासाठी टिकवता येते. ट्रेडमार्कमुळे इतर कोणत्याही कंपनीला तशाच प्रकारचे नाव किंवा लोगो वापरून ग्राहकांची फसवणूक करता येत नाही, ज्यामुळे व्यवसायाची प्रतिष्ठा आणि ग्राहकांचा विश्वास जपला जातो.

**बौद्धिक संपदा कायद्याची व्याप्ती आणि महत्त्व**

बौद्धिक संपदा कायदा हा संशोधक आणि निर्मात्यांना त्यांच्या कष्टाचा मोबदला मिळावा यासाठी तयार करण्यात आला आहे. जेव्हा एखादी व्यक्ती नवीन औषधाचा शोध लावते, एखादे पुस्तक लिहिते किंवा नवीन तंत्रज्ञान विकसित करते, तेव्हा त्या निर्मितीवर तिचा अनन्यसाधारण हक्क असतो. हा कायदा अशा निर्मितीची अनधिकृत कॉपी, विक्री किंवा वापर करण्यापासून इतरांना रोखतो.

**कायद्यांतर्गत येणारे प्रमुख घटक:**

१) **संरक्षण आणि प्रोत्साहन:** हा कायदा केवळ चोरी रोखत नाही, तर समाजात नवीन शोध लावणाऱ्यांना प्रोत्साहन देतो. संशोधकाला खात्री असते की त्याच्या कष्टाचा आर्थिक फायदा त्यालाच मिळेल.

२) **व्यावसायिक स्पर्धा:** ट्रेडमार्क आणि पेटंटच्या माध्यमातून बाजारपेठेत निकोप स्पर्धा टिकवून ठेवली जाते. यामुळे ग्राहकांची फसवणूक थांबते आणि त्यांना दर्जेदार उत्पादने मिळतात.

३) **जागतिक करार:** आजच्या जागतिक व्यापार युगात 'ट्रिप्स' (TRIPS) सारख्या आंतरराष्ट्रीय करारांमुळे एका देशातील बौद्धिक संपदेला दुसऱ्या देशातही संरक्षण मिळते.

**भारतातील बौद्धिक संपदा कायदा: स्वरूप आणि कायदेशीर तरतुदी**

भारतात बौद्धिक संपदेचे संरक्षण करण्यासाठी विषयानुसार वेगवेगळे कायदे संसदेने संमत केले आहेत. हे कायदे केवळ राष्ट्रीय स्तरावरच नव्हे, तर ट्रिप्स सारख्या आंतरराष्ट्रीय करारांशी सुसंगत आहेत.

१) **कॉपीराईट कायदा, १९५७** (The Copyright Act, 195%)**:**

भारतात साहित्यिक आणि कलात्मक कामांच्या संरक्षणासाठी हा कायदा १९५७ मध्ये पारित झाला. हा कायदा मूळ लेखकाच्या मृत्यूनंतर ६० वर्षांपर्यंत त्याच्या वारसांना अधिकार देतो. यामध्ये डिजिटल युगातील बदलांनुसार २०१२ मध्ये महत्त्वाची सुधारणा करण्यात आली.

२) **पेटंट कायदा, १९७०** (The Patents Act, 1970)**:**

नवीन तांत्रिक शोधांच्या संरक्षणासाठी हा कायदा १९७० मध्ये अस्तित्वात आला. सुरुवातीला हा कायदा केवळ प्रक्रिया पेटंट देत असे, परंतु २००५ च्या सुधारणेनंतर भारतात उत्पादन पेटंट देण्यास सुरुवात झाली, ज्यामुळे औषध निर्मिती क्षेत्राला मोठा फायदा झाला.

३) **ट्रेडमार्क कायदा, १९९९** (The Trade Marks Act, 1999)**:**

ब्रँड नेम, लोगो आणि व्यावसायिक चिन्हांच्या संरक्षणासाठी हा कायदा १९९९ मध्ये पारित झाला. या कायद्याने पूर्वीच्या १९५८ च्या कायद्याची जागा घेतली आणि व्यावसायिक जगाला अधिक सुरक्षित बनवले.

**वाङ्मयीन चौर्य टाळण्याचे उपाय:**

एक जबाबदार लेखक किंवा विद्यार्थी म्हणून 'कॉपी-पेस्ट' संस्कृतीपासून दूर राहण्यासाठी खालील बाबी महत्त्वाच्या आहेत:

१) **संदर्भ सूची:**

लेखन किंवा संशोधनामध्ये संदर्भ सूची देणे हे अत्यंत महत्त्वाचे आणि नैतिक पाऊल आहे. जेव्हा आपण आपल्या कामात दुसऱ्या लेखकाची माहिती किंवा विचार वापरतो, तेव्हा त्या माहितीचा मूळ साधन काय आहे, हे वाचकांना सांगणे आवश्यक असते. यामध्ये पुस्तकाचे नाव, लेखकाचे पूर्ण नाव, प्रकाशनाचे वर्ष आणि शक्य असल्यास पृष्ठ क्रमांक यांची स्पष्ट नोंद करावी लागते. यामुळे आपल्या लेखनाला एक शास्त्रीय आधार प्राप्त होतो आणि वाचकांना अधिक माहितीसाठी मूळ साधनापर्यंत पोहोचणे सोपे जाते. संदर्भ स्पष्टपणे दिल्याने आपण माहितीची चोरी करत नसून तिचा आदर करत आहोत, हे सिद्ध होते.

२) **अवतरण चिन्हांचा वापर:**

कधीकधी एखाद्या लेखकाचे विधान इतके प्रभावी किंवा महत्त्वाचे असते की, त्यातील एकही शब्द न बदलता तो वापरणे अनिवार्य ठरते. अशा वेळी, तो मजकूर जसाच्या तसा घेताना नेहमी दुहेरी अवतरण चिन्हांचा वापर करावा. यामुळे तो मजकूर तुमच्या स्वतःच्या शब्दांपेक्षा वेगळा आहे, हे वाचकाला त्वरित

समजते. अवतरण चिन्हांचा वापर केल्यावर त्या विधानाच्या शेवटी मूळ लेखकाच्या नावाचा उल्लेख करणे आवश्यक आहे. ही पद्धत केवळ वाङ्मयीन चौर्यच टाळत नाही, तर मूळ लेखकाच्या कल्पकतेला योग्य कायदेशीर आणि नैतिक श्रेय मिळवून देते.

### ३) संदर्भ स्पष्टीकरण:

पॅराफ्रेजिंग म्हणजे दुसऱ्याचा विचार स्वतःच्या भाषेत मांडणे. मात्र, यात केवळ शब्द बदलणे पुरेसे नसते. उत्तम पद्धत अशी की, आधी मूळ माहिती नीट वाचून समजून घ्यावी आणि नंतर पुस्तक बाजूला ठेवून ती आपल्या स्वतःच्या शैलीत लिहावी. असे करताना मूळ विचार किंवा गाभा बदलणार नाही याची काळजी घ्यावी लागते. महत्त्वाचे म्हणजे, जरी आपण शब्द बदलले तरी तो विचार आपला नसल्यामुळे मूळ लेखकाचे श्रेय देणे अनिवार्य असते. ही प्रक्रिया लेखकाची वैचारिक प्रगल्भता वाढवते आणि अनवधानाने होणारी चोरी रोखण्यास मदत करते.

### ४) सॉफ्टवेअरचा वापर

आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात 'कॉपी-पेस्ट' प्रवृत्ती रोखण्यासाठी प्रभावी सॉफ्टवेअर उपलब्ध झाली आहेत. 'Turnitin', Urkund' (Ouriginal) किंवा 'Grammarly' सारख्या साधनांचा वापर करून लेखक आपल्या मजकुरातील साम्य (Similarity index) तपासू शकतात. ही सॉफ्टवेअर जगभरातील लाखो पुस्तके, वेबसाईट्स आणि शोधनिबंधांशी तुमच्या मजकुराची तुलना करतात आणि कुठला भाग कोठून घेतला आहे, याचा सविस्तर अहवाल देतात. संशोधन प्रबंध किंवा लेख प्रसिद्ध करण्यापूर्वी अशा सॉफ्टवेअरद्वारे तपासणी करणे आता अनिवार्य झाले आहे. यामुळे अनवधानाने राहून गेलेल्या चुका सुधारता येतात आणि लेखनाची शैक्षणिक शुद्धता टिकून राहते.

### विषयाचे महत्त्व आणि नैतिकता

बौद्धिक संपदा अधिकारांचे जतन आणि वाङ्मयीन चौर्याचा निषेध करणे, हे केवळ कायदेशीर पालन नसून ती एक प्रगल्भ सामाजिक संस्कृती आहे. कोणत्याही समाजात जेव्हा नवीन विचारांचे आणि संशोधनाचे स्वागत होते, तेव्हाच त्या समाजाची प्रगती वेगाने होते. बौद्धिक संपदा अधिकारांच्या कडक अंमलबजावणीमुळे संशोधक, लेखक आणि कलाकारांना एक सुरक्षित वातावरण मिळते. त्यांना ही खात्री असते की त्यांच्या कष्टाचे, बुद्धिमत्तेचे आणि वेळेचे फळ दुसरे कोणीही अनधिकृतपणे चोरू शकणार नाही. ही सुरक्षितता समाजात नाविन्यपूर्ण संशोधनाला खऱ्या अर्थाने चालना देते.

या विषयाचा नैतिक पैलू अत्यंत महत्त्वाचा आहे. जर लेखकांच्या कष्टाची आणि कल्पकतेची चोरी होत राहिली, तर भविष्यात नवीन निर्मिती करण्याची मूळ प्रेरणाच नष्ट होईल. कष्टाने मिळवलेले ज्ञान आणि सहज 'कॉपी-पेस्ट' करून मिळवलेले यश यात मोठे अंतर असते. शैक्षणिक शुद्धता राखणे हे केवळ संस्थांचे नियम पाळण्यापुरते मर्यादित नाही, तर ते प्रत्येक विद्यार्थी आणि संशोधकाचे वैयक्तिक कर्तव्य आहे. सत्यावर आधारित संशोधन आणि दुसऱ्याच्या बौद्धिक मालमत्तेचा आदर करणे, हेच ज्ञानाच्या

क्षेत्रातील सर्वोच्च मूल्य आहे. आपण इतरांच्या सृजनशीलतेचा सन्मान केला, तरच आपल्या स्वतःच्या निर्मितीला नैतिक अधिष्ठान प्राप्त होते.

थोडक्यात वाङ्मयीन चौर्य टाळणे ही केवळ कायद्याची भीती नसून ती लेखकाच्या प्रामाणिकपणाची ओळख आहे. बौद्धिक संपदा अधिकारांची माहिती असल्यास आपण आपले हक्क जपू शकतो आणि इतरांच्या कष्टाचा सन्मानही करू शकतो.

**स्वय-अध्ययन प्रश्न क्र ४**

१) वाङ्मयचौर्य म्हणजे नेमके काय?

अ) दुसऱ्याचे विचार किंवा संशोधन स्वतःचे म्हणून मांडण्याची अनैतिक कृती

ब) लायब्ररीमधून एखादे जुने पुस्तक कोणालाही न सांगता घरी घेऊन जाणे

क) स्वतःचे पुस्तक स्वतःच विकत घेऊन वाचणे

ड) नवीन विषयावर स्वतःच्या कल्पनेने माहिती लिहिणे

२) स्वतःचे पूर्वी प्रकाशित झालेले काम पुन्हा नवीन असल्याचे भासवून वापरण्याला काय म्हणतात?

अ) प्रत्यक्ष वाङ्मयचौर्य	ब) स्वतःचेच चौर्य

क) पॅराफ्रेजिंग	ड) बौद्धिक संपदा अधिकार

३) पॅराफ्रेजिंग म्हणजे काय?

अ) दुसऱ्याचा विचार जसाच्या तसा कॉपी करणे

ब) मूळ आशय न बदलता दुसऱ्याचा विचार आपल्या स्वतःच्या भाषेत मांडणे

क) दुसऱ्याच्या पुस्तकावर स्वतःचे नाव टाकून ते विकणे

ड) जुन्या शोधनिबंधाची पाने फाडून टाकणे

४) कॉपीराईट हा अधिकार प्रामुख्याने कोणत्या क्षेत्रातील निर्मितीसाठी दिला जातो?

अ) यंत्रसामग्री आणि औषध निर्मितीसाठी

ब) व्यावसायिक ब्रँड आणि लोगोसाठी

क) साहित्यिक, संगीत, चित्रपट आणि कलात्मक निर्मितीसाठी

ड) जमिनीची खरेदी आणि विक्री करण्यासाठी

५) नवीन तांत्रिक शोधासाठी सरकार संशोधकाला २० वर्षांसाठी जो कायदेशीर हक्क देते, त्याला काय म्हणतात?

अ) पेटंट ब) ट्रेडमार्क

क) पॅचवर्क ड) संदर्भ सूची

६) एखाद्या कंपनीचा लोगो किंवा ब्रँड नेम संरक्षित करण्यासाठी कशाचा वापर केला जातो?

अ) कॉपीराईट ब) ट्रेडमार्क

क) पेटंट ड) पॅराफ्रेजिंग

७) वाङ्मयचौर्य टाळण्यासाठी मजकुरात दुसऱ्या लेखकाचे विधान जसेच्या तसे घेताना कशाचा वापर करणे अनिवार्य आहे?

अ) मोठ्या अक्षरांचा ब) रंगांचा

क) दुहेरी अवतरण चिन्हांचा ड) प्रश्नचिन्हांचा

८) पॅचवर्क किंवा तुकड्यांचे चौर्य म्हणजे काय?

अ) वेगवेगळ्या स्रोतांतून थोडे-थोडे संदर्भ उचलून त्यांची सांधेजोड करणे

ब) पुस्तकाची फाटलेली पाने पुन्हा शिवणे

क) इंटरनेटवरून पूर्ण लेख डाउनलोड करणे

ड) स्वतःच्या जुन्या लेखनाचे तुकडे करून फेकून देणे

९) संशोधनातील मजकुराचे साम्य तपासण्यासाठी कोणत्या सॉफ्टवेअरचा वापर केला जातो?

अ) फोटोशॉप किंवा कोरल ड्रॉ

ब) फेसबुक किंवा इंस्टाग्राम

क) Turnitin किंवा Urkund

ड) कॅल्क्युलेटर

१०) भारतात कॉपीराईट कायदा कोणत्या वर्षी संमत झाला?

अ) १९५० ब) १९५७

क) १९७० ड) १९९९

**२.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ:**

वाङ्मयचौर्य: दुसऱ्याचे साहित्यिक कार्य, विचार किंवा संशोधन स्वतःचे म्हणून मांडणे किंवा पुराव्याशिवाय वापरणे, ही एक अनैतिक कृती आहे.

**बौद्धिक संपदा:** संशोधक, लेखक किंवा कलाकार यांनी स्वतःच्या बुद्धिमत्तेने, कष्टाने आणि वेळेचा वापर करून केलेली नवनिर्मिती म्हणजे बौद्धिक संपदा होय. यामध्ये संशोधकाचे हक्क सुरक्षित ठेवले जातात.

**कॉपीराईट:** स्वतःच्या साहित्यिक किंवा संशोधनात्मक कार्याचे हक्क सुरक्षित ठेवण्यासाठी मिळणारा हा एक कायदेशीर अधिकार आहे. यामुळे लेखकाच्या कष्टाची आणि कल्पकतेची चोरी होण्यापासून संरक्षण मिळते.

**पेटंट:** संशोधकाने लावलेला एखादा नवीन शोध किंवा प्रक्रिया स्वतःच्या नावावर नोंदवून घेण्याचा अधिकार म्हणजे पेटंट होय. यामुळे इतरांना त्या शोधाचा अनधिकृत वापर करण्यापासून रोखता येते.

**ट्रेडमार्क:** एखाद्या उत्पादनाची किंवा सेवेची ओळख पटवण्यासाठी वापरले जाणारे विशिष्ट चिन्ह, नाव किंवा बोधवाक्य म्हणजे ट्रेडमार्क होय. हा बौद्धिक संपदा अधिकारांचाच एक भाग आहे.

**पॅराफ्रेजिंग:** दुसऱ्याच्या संदर्भातील माहिती किंवा विचार जसेच्या तसे न लिहिता, मूळ आशय न बदलता आपल्या स्वतःच्या प्रवाही भाषेत मांडण्याच्या कौशल्याला पॅराफ्रेजिंग म्हणतात. हे टिपणे काढताना किंवा अहवाल लिहिताना अतिशय महत्त्वाचे ठरते

**२.४ स्वय-अध्ययन प्रश्न व प्रश्नांची उत्तरे:**

स्वय-अध्ययन प्रश्न क्र १ ची उत्तरे

१-क, २-ड, ३-ब, ४-क, ५-ड, ६-अ, ७-ड, ८-ड, ९-क, १०-ब

स्वय-अध्ययन प्रश्न क्र २ ची उत्तरे

१-अ, २-क, ३-क, ४-अ, ५-ब, ६-ब, ७-ड, ८-क, ९-ब, १०-ड

स्वय-अध्ययन प्रश्न क्र ३ ची उत्तरे

१-अ, २-ब, ३-ब, ४-ब, ५-ब, ६-ब, ७-ब, ८-ब, ९-अ, १०-ब

स्वय-अध्ययन प्रश्न क्र ४ ची उत्तरे

१-अ, २-ब, ३-ब, ४-क, ५-अ, ६-ब, ७-क, ८-अ, ९-क, १०-ब

## २.५ सारांश:

इतिहास लेखनाची प्रक्रिया हा घटक ऐतिहासिक संशोधनाचे शास्त्रशुद्ध टप्पे आणि त्यातील तांत्रिक बारकावे स्पष्ट करतो. इतिहास हा पुराव्यांवर अधिष्ठित असल्यामुळे कोणत्याही विधानाला पुराव्याचा आधार असणे अनिवार्य असते. या प्रक्रियेची सुरुवात प्रामुख्याने संशोधन प्रस्तावाच्या सिद्धतेने होते. इतिहास संशोधनासाठी विषयाची निवड करणे हा पहिला महत्त्वाचा टप्पा असून, विषयाची व्याप्ती आणि मर्यादा ठरवून, पूर्व संशोधनाचा आढावा घेतल्यावर संशोधक आपले उद्दिष्ट निश्चित करतो. यामध्ये मांडलेली गृहीतके संशोधनाला योग्य दिशा देणारी मार्गदर्शक तत्त्वे ठरतात.

विषय निश्चितीनंतर माहिती संकलन आणि टिपण पद्धतीला महत्त्व प्राप्त होते. उपलब्ध असलेल्या अफाट माहितीमधून आपल्या विषयाशी सुसंगत माहिती निवडून ती लिहून घेणे म्हणजे ‘टिपण काढणे’ होय. यासाठी पारंपरिक वही पद्धती किंवा लवचिक फाईल पद्धतीऐवजी अत्यंत शास्त्रशुद्ध मानली जाणारी ‘कार्ड किंवा स्लीप पद्धत’ वापरली जाते. आधुनिक तंत्रज्ञानाच्या काळात गुगल ड्राईव्ह, व्हॉईस टायपिंग आणि विविध मोबाईल ॲप्समुळे ही माहिती संकलनाची प्रक्रिया आता अधिक वेगवान आणि सोपी झाली आहे.

संशोधन प्रक्रियेत साधनांचे विश्लेषण आणि चिकित्सा करणे हा गाभा आहे. ऐतिहासिक साधनांचे प्राथमिक, जसे की शिलालेख व नाणी, आणि दुय्यम, जसे की बखरी व ग्रंथ, असे वर्गीकरण केले जाते. हाती आलेल्या कागदपत्रांची अस्सलता तपासण्यासाठी बहिरंग परीक्षण केले जाते, तर त्यातील आशयाची सत्यता पडताळण्यासाठी अंतरंग परीक्षण करणे ही एक अनिवार्य चिकित्सक प्रक्रिया आहे. या संदर्भांची अचूक नोंद करण्यासाठी तळटीपा आणि अंतटीपा वापरल्या जातात, ज्यामुळे वाचकांना मूळ स्रोताची माहिती मिळते आणि संशोधकाची विश्वासार्हता व नैतिकता सिद्ध होते.

शेवटी, संशोधनाचे अंतिम फलित म्हणजे अहवाल किंवा प्रबंध लेखन होय. यामध्ये प्रकरणांची शास्त्रशुद्ध मांडणी, आलेख, नकाशे आणि संदर्भ ग्रंथ सूची देणे अनिवार्य असते. २१ व्या शतकातील संशोधनात वाङ्मयचौर्य टाळणे आणि बौद्धिक संपदा अधिकारांचे पालन करणे हे प्रत्येक संशोधकाचे कायदेशीर आणि नैतिक कर्तव्य बनले आहे. थोडक्यात सांगायचे तर, इतिहास संशोधनासाठी केवळ माहिती गोळा करणे पुरेसे नसून, तिची तर्कशुद्ध चिकित्सा करून ती प्रवाही भाषेत मांडणे हे खऱ्या संशोधकाचे कौशल्य आहे, जे विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक दृष्टी विकसित करण्यास मदत करते.

## २.६ सरावासाठी स्वाध्याय:

### अ) टिपा लिहा.

१) संशोधन प्रस्तावाचे महत्त्व

२) पूर्व संशोधनाचा आढावा.

३) प्राथमिक साधने

४) बहिरंग परीक्षण

५) अंतरंग परीक्षण

६) कार्ड पद्धती

ब) दिर्घोत्तरी प्रश्नः

१) प्राथमिक व दुय्यम साधनांची सविस्तर माहिती द्या.

२) साधन चिकित्सा म्हणजे काय? अंतरंग व बहिरंग परीक्षणाचे महत्त्व सांगा.

३) टिपणे काढण्याच्या विविध पद्धतीची माहिती द्या.

४) वाङ्मय चौर्य संदर्भात सविस्तर माहिती द्या.

५) संशोधन अहवाल अथवा प्रबंध लेखनाची मांडणी कशी असावी याची सविस्तर माहिती द्या.

**२.७ संदर्भ ग्रंथ व अधिक वाचनसाठीची पुस्तके:**


१) नाडगोडे, गुरुनाथ., सामाजिक संशोधन पद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९८६

२) कुंभोजकर, ग. वि., संशोधन पद्धती व संख्याशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९८९

३) कोठेकर, शांता., इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, नागपूर, २००५

४) सरदेसाई, बी. एन., इतिहासलेखन परिचय, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००६

५) सातभाई, श्रीनिवास., इतिहास लेखनशास्त्र, विद्या बुक्स, संभाजीनगर, २०११

६) मायकल जे. एस. आणि कोनाल फुरे, The Methods and Skills of History, A practical Guide, वायली -ब्लॅकवेल, १९८८


❑❑❑